

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं. क. ७३८

# [illegible]

सौ. हेमा जावडेकर



REFBK-0026583




४३९
२६५८३

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

| | |
|---|---|
| 22 JUL 1992 | 19 MAY 1993 |
| 1 AUG 1992 | 4 AUG 1993 |
| 1 AUG 1992 | 11 AUG 1993 |
| 19 AUG 1992 | 18 AUG 1993 |
| 26 AUG 1992 | 9 OCT [illegible] |
| 31 OCT 1992 | 10 NOV 1993 |
| 5 DEC 1992 | 20 APR 1994 |
| | [illegible] |

१०००० — ११ — ८९



वरुन: १) नमस्तेजी ! २) दमास्कस विमानतळ
३) थाय: दृश्ये ४) उटावरचा शहाणा

संदर्भ
ग्रंथालय
५३८.
२६५८३
७।६।९२

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

| | |
|---|---|
| 22 JUL 1992 | 19 MAY 1993 |
| 1 AUG 1992 | 4 AUG 1993 |
| 1 AUG 1992 | 11 AUG 1993 |
| 19 AUG 1992 | 18 AUG 1993 |
| 26 AUG 1992 | 9 OCT 199[illegible] |
| 31 OCT 1992 | 10 NOV 1993 |
| 5 DEC 1992 | 20 APR 1994 |
| | 2( JUN ) 199[illegible] |

१०००० – ११ – ८९

# शिर्डी लीला

आगळं वेगळं प्रवासकथन

सौ. हेमा जावडेकर

REFBK-0026583



ीआयपी
काशन

प्रकाशक
अरुण नासिककर
व्हीआयपी प्रकाशन
नाशिक ४२२ ००२
प्रकाशन तिथी
पहिली आवृत्ती
मकर सक्रांत
१५ जानेवारी १९९२
सर्व प्रकारचे हक्क
प्रकाशकाकडे सुरक्षित


मुखपृष्ठ
रचना व सजावट
अरुण नासिककर
शिर्षकअक्षरे
पडीत सोनवणी

प्रोसेसिंग, मुखपृष्ठ व
रंगीत फोटो मुद्रण
स्टेप इन प्रोसेसेस
पुणे ४११ ०११
मुद्रक : स्मिता प्रिंटर्स
पुणे ४११ ०३०


लेखिका
सौ हेमा जावडेकर
सी-८३,
डिफेन्स कॉलनी,
नवी दिल्ली, ११० ०२४

मुखपृष्ठ छायाचित्रे
१) बँकॉक
ग्रँड पॅलेस
२) सोन्याने मढलेली
अरब सुंदरी
३) उंटावरच्या शहाण्या
लोकांच्या ऐतिहासिक
गावातील एक रस्ता

मूल्य . रु १००/-








देश - विदेश पाहिले
विज्ञानाचे अनंत
चमत्कारही पाहिले,
प्राकृतिक अन् मानवनिर्मित
सौंदर्य विलास पाहिले
पायाशी लोळण घेणारे
उदण्ड ऐश्वर्य उपभोगले,
पण तरीही
जिच्या माडीवर डोक ठेवून
श्रांत मनास,
शांत करावेसे वाटले
त्या माझ्या
प्रियतम जननी-जन्मभूमीस

सौ हेमा जावडेकर



इराक - इजिप्त एक थडगे



सेटी देऊळ



नेफर्टीटी देवता



अल-मिन्याचा सुर्यास्त

कोणे एके काळी परदेशगमनावर बदी होती त्यामुळे हिंदू माणूस हिदुस्थान सोडून इतर देश तर सोडाच पण आजूबाजूच्या मुलखातसुध्दा जायला धजत नसे इग्रजांमुळे आपण परदेशी जायला शिकलो सुरुवातीच्या काळात परदेशगमन हे अत्यल्प होते आता ते सर्रास झाले आहे पूर्वी ते फक्त ज्ञानार्जन व उद्योगधद्यासाठी केले जाई आज परदेशदर्शन मनोरजनासाठी व आनदासाठी करण्याचा प्रघात आहे


ह्या जावडेकर दापत्यास त्याची फार मोठी हौस जे जे आपण पाहिले, अनुभवले ते इतराना सागण्याची व त्या लेखनातून 'शहाणे करुनि सोडावे सकलजनाची' दाडगी इच्छा हेमा जावडेकराना आहे जे पाहिले, जे भोगले, जे अनुभवले ते

मलुला




उत्तर सिरीया





दमास्कस



## शुभेच्छा

सौ हेमा जावडेकर यानी देशात परदेशात खूप प्रवास केला आहे. तो अनुभव केवळ दृष्टीने नव्हे तर उत्कट मनानेही त्यानी टिपलेला आहे अशा अनेक अनुभवाची ही सुदर स्मरण चित्रे वाचकाना ती आवडतील असा विश्वास वाटतो प्रकाशनास शुभेच्छा !

वि वा शिरवाडकर



अरबाचा ऐटबाज राष्ट्रीय पक्षी फाल्कन





ओमानी कलाकृती

# ○ प्रस्तावना ○


कोणे एके काळी परदेशगमनावर बंदी होती त्यामुळे हिंदू माणूस हिदुस्थान सोडून इतर देश तर सोडाच पण आजूबाजूच्या मुलखातसुध्दा जायला धजत नसे इग्रजामुळे आपण परदेशी जायला शिकलो सुरुवातीच्या काळात परदेशगमन हे अत्यल्प होते आता ते सर्रास झाले आहे पूर्वी ते फक्त ज्ञानार्जन व उद्योगधंद्यासाठी केले जाई आज परदेशदर्शन मनोरजनासाठी व आनदासाठी करण्याचा प्रघात आहे

ह्या जावडेकर दापत्यास त्याची फार मोठी हौस जे जे आपण पाहिले, अनुभवले ते इतराना सागण्याची व त्या लेखनातून 'शहाणे करुनि सोडावे सकलजनाची' दाडगी इच्छा हेमा जावडेकराना आहे जे पाहिले, जे भोगले, जे अनुभवले ते

मलुला



उत्तर सिरीया





दमास्कस



सारे कागदावर उतरविणे फार अवघड काम आहे पण अत्यंत विनायास, जणु आपण शिळोप्याच्या गप्पा गोष्टी करीत आहोत अशा थाटात सहजसुंदर, खेळकर, खुसखुशीत व विनोदी शैलीत हेमा जावडेकरानी आपले अनुभव वाचकाना कथन केले आहेत हे केवळ एका स्थानाहून दुसऱ्या स्थानाकडे कूच करण्यासारखे यांत्रिक, नीरस व कंटाळवाणे प्रवासवर्णन नसून वाचताना जणू आपण ते प्रत्यक्ष पहात आहोत किंवा आपणही हा गुरुमंत्र घेऊन आपल्या बॅगा तयार करुन त्या त्या देशाना भेटी दिल्याच पाहिजेत असा भाव वाचकाच्या मनात तावडतोब निर्माण करण्याइतके त्यांचे लेखन प्रभावी व परिणामकारक बनले आहे

परदेश पाहून आपले अनुभव वाचकांना सांगणाऱ्या यादीत पु ल देशपांडे, गंगाधर गाडगीळ, रमेश मंत्री यासारखी मातब्बर मंडळी आहेत त्याच क्षितीजावर




न्यू दुबई हॉस्पिटल




अल घरेअर सेंटर

... आल्या व त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात माहिती, राजकारण – आपले सामाजिक अनुभव सांगून 'अफगाण डायरी' द्वारा मराठी साहित्याचे दालन समृध्द बनविले असाच प्रयत्न सौ. हेमा जावडेकरांनी प्रस्तुत पुस्तकाद्वारा मोठ्या परिणामकारकपणे केला आहे नर्म विनोदाची साखरपेरणी, खट्याळपणा, स्वप्नाळूपणा, सर्वंकष व सुरेख अशी आपली स्वत:ची खास, सूक्ष्म निरीक्षणे त्यातून लोकांचा फायदा व्हावा ही कळकळ, तत्त्वचिंतनाची बैठक व देशभक्ती ह्या गुणांमुळे ह्या गुणी लेखिकेचे लेखन खूप प्रभावी बनले आहे.

'दुबईचा शेख व त्याचे कुटुंब एका भारतीय धोब्याकडे दारू पिण्यास जात असे पुढे तो स्वतंत्र राजा झाल्यानंतर त्या शेखने त्या धोब्यास दोन लाख रूपये दिले' अशा बारीक सारीक पण उपयोगी गोष्टी सागून लेखिकेने आपले साहित्य दर्जेदार बनविले आहे. 'दुबईचे अरब हे अत्यंत मगरूर, चढेल, उद्दाम व पैशाची गुर्मी असलेले आहेत. आपण फेकलेल्या तुकड्यावर पोट भरणारे लोक म्हणून ते आपल्याकडे पहातात ..एफ अल अहमदिया कंपनीच्या चीफ इंजिनियर गोखले ह्यांच्या पत्नी अरब देशात अरब मालकाविरूध्द केस लढवून ती जिंकलेली ही पहिलीच भारतीय व्यक्ति होय ...दुसरी मैत्रिण एलन कोल्हटकर . 'पण आमची ही रणरागिणी, झाशीची राणी, महिषासुरमर्दिनी, शेरावाली,











थायलड : १) अरुण मदीर
२) बेंजामाबोफिट मदीर
३) फराकेओ मदीर






काली कलकत्तेवाली भर चव्हाटयावर चोहो बाजूनी ट्रफिक जॅम करून, कमरेवर हात टेवून, मध्ये उभी राहून अस्खलित अरबी भाषेत कडाकडा भाडून त्या अरबांच्या चुकीच मापटं त्याच्या पदरात (की त्याच्या झगाऱ्यात?) घालीत असे तिचे ते तसे 'सुदर ते रूप, सुदर ते ध्यान' हे पाहिले की मला 'माझी गुणाची बाळी ती' असे म्हणत अक्षरक्ष: तिच्या कानशीलांवर कडाकडा बोट मोडून तिची मीठ-मोहऱ्यानी दृष्ट काढावीशी वाटे' अशी सुदर व स्वतत्र निरीक्षणे मराठी महिला वाङ:मयात दुर्मिळ आहेत

प्रवाशांचा वेळ, पैसा व शक्ती कशी वाचेल याविषयी अधूनमधून हेमा जावडेकर सुरेख मार्गदर्शन करतात 'बँकाक-हाँगकाँग-सिंगापूर हा प्रवास बँकॉक-सिंगापूर-हाँगकाँग पेक्षा अधिक स्वस्त पडतो किंवा इजिप्तसाठी Visa विमानतळावरच मिळतो बगदादचा Visa मिळविण्यासाठी दोन महिने आधी खटपट करावी लागते' दुबईच्या नोकरी बाबतीत धोक्याचे कदिलही त्यानी दाखविले आहेत हेमा जावडेकर सहजपणे सागतात, 'मध्यपूर्व व प आशियाच्या मागासलेपणाचे एक उघड चिन्ह म्हणजे तेथील वाहतूक व्यवस्थेचा अभाव एक कैरो सोडले तर आम्हाला कोठेही आपल्यासारखी व्यवस्था दिसली नाही' दुसऱ्या एका ठिकाणी त्या सागतात, 'परदेशात राजकीय, धार्मिक भेदभाव विसरले जातात उरतो तो फक्त मानवधर्म इतकेच नव्हे तर दुबईत किती तरी उच्चभ्रू पाकिस्तानी स्वत:ला भारतीय म्हणवून घेत असल्याचे आम्ही पाहिले आहे' लेबनॉनच्या सुदर स्त्रियाविषयी त्या उपरोधाने लिहितात! 'बहुधा मेकअप करण्यातच त्या सारा दिवस घालवीत असाव्यात जितक्या मुली होतील तेवढे चागले असा स्त्रीजातीला आनद वाटणारा हा एकमेव देश आहे कारण त्यांना वेश्याव्यवसायाला लावून खोऱ्याने पैसा मिळविता येतो ना!'

त्याच्या खटयाळपणाबरोबरच अधूनमधून अतर्मुख होऊन सौंदर्य, मानवी-जीवन, अर्थशास्त्र, राजकारण, समाजशास्त्र, संरक्षण, सस्कृती आदी विषयावर त्यांनी केलेल सूक्ष्म विवेचन फारच मार्मिक, समर्पक व सखोल आहे 'ह्या जगात माणुसकी कितीही महाग व दुर्मिळ असली तरी माणसाच त्यातल्या त्यात स्त्रीच शरीर तर फारच स्वस्त आहे' 'मनुष्य केवळ देशभक्तीनेच देशासाठी मरतो हे खरे नाही पिढ्या न् पिढ्या, शतकानुशतके मायभूमीच्या मातीशी आपल्या पार्थिव शरीराची माती एकजीव झालेली असते, ती परकीय देशातील मातीत सहजासहजी एकजीव होऊ शकत नाही' त्याच्या मनाला तत्वचितनाची किती पक्की बैठक आहे हे दिसून येते सागराबद्दलचे त्यांचे आकर्षण, विश्वास, त्याच्या गूढ रम्यतेबद्दल कुतूहल फार मर्मस्पर्शी आहे

हेमा जावडेकरांचा मुक्त छंदही वाचकाना वेधक वाटेल सिगापूरचे वर्णन करता करता लेखिकेचा संज्ञाप्रवाह कुशवतसिंग-श्रीखड-आपल्या मैत्रिणींपर्यंत जाऊन पोहोचला आहे पण तेही मनोरजक वाटते त्याचा आपल्या मैत्रिणींबद्दलचा अभिमान व गुणग्राहकता कौतुकास्पद आहे आत्मस्तुति मात्र कोठेही नाही, उलट स्वत:चीसुध्दा येता जाता भरपूर टिंगलच केली आहे

लेखिकेच्या स्वप्नाळूपणाप्रमाणेच अधून-मधून डोकावणारा फटकळपणा वाचकांना वेधक वाटेल व त्यांना विचारही करावयास लावेल इराकमधील खुफाच्या मशिदीतील आपला अनुभव त्या सांगतात, 'हे आपले सरळ मशिदीत घुसून मुस्लिम रिवाजाप्रमाणे 'या अल्लाह' या पध्दतीने हात वर करून डोळे मिचमिचे करून फिरून आले

मला मात्र कुंकवावरून मी मुस्लिम नाही हे ओळखून 'काफर काफर' करीत बाहेरच थाबविण्यात आले. "सौदी अरेबियात मक्का-मदीना ह्या त्यांच्या अत्यंत पवित्र धार्मिक स्थानी आत कबरांपर्यंत हिंदू जाऊ शकत नाही, दुरूस्तीसाठीसुध्दा हिंदू इंजिनियर्सना सुध्दा मज्जाव आहे आणि आपल्या रामजन्मभूमीवर मात्र त्यांनी खुशाल बाबरी मस्जिद उभारावी निधर्मी राज्य आहे ना आमचे! आम्हाला धर्म नाही, स्वाभिमान नाही, तत्वे नाहीत, देशप्रेम नाही-फक्त खुर्ची व सत्ता तेवढी समजते आम्हाला' तीन ताड पूर्वजाचे तीन फुटी पुत्र आम्ही! अल्लाच्या देशात रामभक्तांचा असा घोर अपमान, पण रामाच्या देशात मात्र अल्ला शिरजोर! कुठेतरी एक दोहा ऐकला होता,

राम माँगे दाना. अल्ला माँगे रेवडी। और अल्ला की रेवडी चुक गयी तो,

राम से कहे की अपना दाना हमें देव।

प्रवास वर्णनाला आवश्यक असलेली ओघवती भाषाशैली लेखिकेजवळ आहे त्यात सहज सुंदरता आहे, माधुर्य आहे, मधूनच लवंगी मिरचीचा झणझणीत तिखटपणाही आहे देशोदेशींच्या खाद्यपदार्थांची वर्णनं वाचून तोंडाला पाणी सुटते 'गांधील माशाचे झणझणीत सॉस, मधमाशाचा जॅम .!' वा! त्यातही त्याच्या रम्य कल्पनाविलासाने कुठेही कंटाळवाणं वाटत नाही.

एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे लेखणीच्या एका फटकाऱ्यात एखादे स्थळ, एखादा प्रसंग चितारण्याचे सामर्थ्य त्याच्या लेखणीत आहे मग ते दुबईचे चैतराम सुपरमार्केट असो, बेरूतचा कॅसिनो असो, थायलंडचे बुध्द मंदिर असो की इजिप्तच्या ममीज अन् पिरॅमिड्स!

जाता जाता हेमाबाईंना हेच सांगावसं वाटत की, अजून खूप खूप फिरा व आम्हाला असं खूप खूप सांगा, असच भरभरून खाद्य पुरवा पेट्रोलच्या चढत्या किंमतीमुळे आहेत कोठे असे रसिक प्रवासी, अशा उत्साही, निर्भीड अन् 'सारी अने चोख्खी लेखिका!'

दादूमिया . पितृछाया, खारी बाव, बडोदरा ४ जून १९९१




नवीकिम, खजिन्याची पेटी ?

० मनोगत ०

'होनहार बिरवान के होत चिकने पात '। लहान मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणे। आमच्या पतिराजाचे तर नक्कीच दिसले असतील लहानपणी ह्यांची आई बहुधा ह्यांना 'दमादम मस्त कलदर' हे अंगाईगीत म्हणवून झोपवीत असावी असं हे कलदर बाळ वयाच्या दहाव्या वर्षी मुबई बघायला एकटं निघाल व बसल बनारसच्या गाडीत हे पार्सल घरी परत कस आल, ती एक सुरस आणि चमत्कारिक कथा आहे

असा हा पायाला चक्र बाधलेला माणूस एका जागी स्थिर नोकरी थोडीच करणार? ह्या सिंदबादला नोकऱ्याही तशाच मिळत गेल्या-सफरी होत राहिल्या 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या न्यायाने अस्मादिकाचासुध्दा बराच प्रवास झाला मला आलेले विविध अनुभव मी ह्या पुस्तकात माडण्याचा प्रयत्न केला आहे आपले अनुभव मला चांगल्या रितीने सागता आले किंवा नाही हे रसिक वाचकानी ठरवायचे आहे पण एखाद लहान मूल सर्कस पाहून आल्यावर जस दिपून जात, आपण पाहिलेली ती विलक्षण चित्तथरारक अद्भुत दृश्ये लोकानाही सागण्यासाठी त्याची उत्सुकता दुथडी भरून वहात असते, एक अनावर उत्साह जिभेवर थुईथुई नाचत असतो विधात्याच्या ह्या अवाढव्य सर्कशीतील थोडासाच भाग पाहिल्यावर माझीही अवस्था अगदी तशीच झाली मग कधी शब्दाना भरतीचे उधाण येऊन ते अगदी भरभरून ओसाडून वहायला लागले तर कधी 'नीरवतेतूनी शब्द उमटती,



एलगिझा ४८०० वर्षांपूर्वीचा भव्य स्फिंक्स-मागे पिरॅमिडस

अर्थ त्यातला शपथ कळेना' असे वाटले, तर कधी

गुपित अनिर्वच निःशब्दाचे शब्दाच्या सीमेवरले ते,

जाणवते, पण हाय! मिळेना असून हाती अतीत उरते!

मनाचा असा 'झपूझा' झाला

मी आपले अहोभाग्य समजते की, ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या स्वरुपात मला दादूमियासारख्या थोर तत्वनिष्ठ व विचारवत लेखकाचे आशीर्वाद मिळाले वास्तविक पहाता, तेवढी माझी योग्यता नाही, पण म्हणतात ना, 'प्रभु साळ्या भोळ्याची हरी वात्सल्ये कथा पितो काने' मोठ्या रसिकतेने व मार्मिकपणे त्यांनी माझ्या 'वाकड्या तिकड्या बोलास' दाद दिली आहे ह्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे व्हीआयपी प्रकाशनाचे श्री अरुण नासिककर ह्यांनी ह्या पुस्तकास गोंडस स्वरूप देऊन त्याचे प्रकाशन केल्याबद्दल मी त्याचेही मनःपूर्वक आभार मानते माझ्या घरगुती अडचणींमुळे लेख लिहिण्यास माझ्याकडून विलंब झाला तरीही मुळीच न रागावता उलट त्यानी शातपणे मला धीरच दिला तात्यासाहेब शिरवाडकरांचे आभार मानणे हा विशेष आनंदाचा भाग मी दिल्लीला, माझे पत्र नाशिकला अन् ते लडनला, असा तिढा होता पण लंडनहून नाशिकला पोहोचल्याबरोबर त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या बस, भरून पावलय!

माझी मैत्रिण सौ संगिता बोराटेनेही मला खूप मदत केली. मी तिचीही खूप आभारी आहे माझा भाचा श्री प्रदीप शिवतरकर ह्याने खूप धडपड करून मला दुर्मिळ फोटो मिळवून दिले त्याचीही मी आभारी आहे



इजिप्त २५०० वर्षापूर्वीचे बॅबिलोन संस्कृतीचे अवशेष

हे नुसते एका स्थळाहून दुसऱ्या स्थळी घेऊन जाणारे प्रवासवर्णन नाही तर त्या त्या देशातील सस्कृती, आचार विचार, राजकारण, अर्थव्यवस्था, इतिहास, भूगोल, परपरा व सामाजिक स्थितीचा हा आरसाही आहे मला असं वाटत की मानवाची दु:खे समस्या ह्या सर्वसाधारणपणे एकच असतात पण ज्या देशात तो जन्म घेतो त्या देशातील आर्थिक, सामाजिक व भौगोलिक परिस्थितींमुळे त्याच्या मनाची जडण-घडण भिन्न होते व त्यामुळे त्या त्या समस्यांना सामोरे जाण्याचा त्याचा 'अप्रोच' भिन्न भिन्न असतो

प्रवासाने मला शहाणपण किती आल देव जाणे पण एवढे मात्र कळून चुकल की विश्वाच्या ह्या अवाढव्य पसाऱ्यात आपण एक क्षुद्रातिक्षुद्र कण आहोत चौऱ्याशी लक्ष योनि फिरून मिळविलेल्या ह्या मानवजन्मात आपण काहीच मिळविल नाही पण आहे ते गमावण्याची वेळ आली असता ते जपता आलं तरी पुष्कळ पण नाही, मला अस खचून चालणार नाही अजून मला मानस परिक्रमा करायची आहे, कैलाशाला मानवंदना करायची आहे, हिमगीरी काचनगंगेवरील सप्तरंगी उधळण बघायची आहे, जगले वाचले तर अंटार्क्टिकाला जाऊन इन्द्रधनुषी 'अरोरा'ची आतषबाजी पहायची आहे व दृष्टीपुढे अंधारी आणणारे 'व्हाइट आऊट' पहायचे आहे पॅन्विनशी प्रेमाने 'गूसगूँ' करायचे आहे

[illegible] जिप्सी प्रत्येकाच्याच मनात खोल खोल दडलेला असतो पण मनाच्या डोहकाळिम्यातून बाहेर पडून तो जेव्हा विश्वरूप दर्शन करतो, कोसळणाऱ्या आभाळाखाली उफाळणाऱ्या समुद्राच्या आपल्याच मस्तीत उसळणाऱ्या अवखळ फेनिल लाटाचे तांडव नर्तन पहातो, त्यांना कशाचीही तमा न बाळगता बेदरकारपणे किनाऱ्यावर आपटून फुटतांना पहातो, हजारो फुटावरून कोसळणाऱ्या




रास-अल-खेमा उंटाच्या चित्तथरारक शर्यती

नायगाऱ्यांचे उद्घोष ऐकतो, मुग्धात थरारणारा गोड, कोवळा गारवा आपल्याभोवती लपेटून खुल्या आसमानाखाली मोकळा श्वास भरभरून घेऊन मातीतून घमघमणारे अत्तर मनसोक्तपणे हुंगतो तेव्हा तो 'आनंदयात्री' बनतो

अफाट आकाश, हिरवी धरती, प्रकाशाचा गर्भ, जलवती पोटी
अखंड नूतन मला ही धरित्री, आनंदयात्री, मी आनंदयात्री ॥

सौ हेमा जावडेकर : सी-८३ डिफेन्स कॉलनी, न्यू दिल्ली ११० ०२४



दुबई बँक

★ प्रस्तावना / ९
★ मनोगत / १३

० अनुक्रम ०


खाडीचे देश
★ सा रम्या नगरी
★ सुलताना

मध्य-पूर्व आशिया
★ दमिष्ठक
★ इथे गधर्वैचिए नगरी
★ अल अहीब अल इराक

अफ्रीका
★ काहिरा

दक्षिण-पूर्व आशिया
★ सदाफुलीचा देश
★ अलिबाबाची गुहा
★ जीवनमे एक बार!

परिशिष्ट
★ दुबई नोकरी सबधी
★ प्रवासाचे नियोजन व
प्रवासाची तयारी





दुबई म्युझियम




म्युझियम अतर्भाग

## प्रस्थान

*अरेबियन नाईट्समधील सिंदबाद व अल्लाउद्दीन आठवतात ना? त्याच्या त्या रोमहर्षक साहसी सफरी, ते विशाल गगनचुंबी राजमहल, हिऱ्याच्या खाणी, सोन्याचा नेत्रदीपक झगमगाट, मोत्याच्या वर्षाव, त्या भरजरी रेशमी वस्त्रातील असामान्य लावण्यलतिका शबाब शराब कबाब! पण ह्या 'जन्नत'ला उर्फ 'अेल-डो-रॅडो' ला भेट कशी देणार? आपल्याजवळ सिंदबादची जादूची सतरजी नाही की अल्लाउद्दीनाचा जादू-ई-चिराग नाही मग? थांबा, आपली जादूची सतरजी तयार आहे हे पहा, गल्फ अेअरवेजचे विमान*



थॉयलॅंड हवाई सुदरी? अह, थाय सुदरी!





Relief from Palmyra (2nd century D.)



कैरो . सिरीयन ललनाचा उत्साही ग्रुप

# सा रम्या नगरी

वा. क्र. ५३९ २६५५३

'अस्मान से गिरा और खजूरमें अटका' अशी कायशीशी म्हण आहे ना? ती आमच्या बाबतीत अगदी खरी आहे नाहीं तर काश्मीरच्या नदनवनातील ताजी, रसाळ रसरशीत सफरचदे सोडून दुबईच्या रखरखीत वाळवटातील खजूर शोधावयास आम्ही कशाला गेलो असतो? आमच्या पतिराजाच्या मनातील लपलेला जिप्सी त्यांना एका जागी कधीही स्वस्थ बसू देत नाही मलाही बालपणापासून सिंदबाद, हरुन-अल-रशीदचे बगदाद, पिरॅमिड्स, ममीज, स्फिन्क्स, अरब आणि त्याच्या त्या गावातील सुंदर स्त्रिया बघण्याची मनस्वी उत्सुकता होती अरेबिअन नाइट्स वाचण्याचा आनंद वाटणाऱ्या वयात दुबईला सोन्याचे डोंगर आहेत व सोन्याच्या रसाच्या नद्या आहेत अशी माझी प्रामाणिक समजूत होती ह्यांनी मध्य पूर्वेत दुबईला नोकरी धरल्यावर माझी मनोकामना सफल होईल असे वाटले

दुबई...! जे नाव ऐकताच कस्टमवाल्यांची झोप खाडकन् उडून खदिरांगारासारख्या लाल लाल डोळ्यांनी ते आपापली 'शस्त्रे पाजळीत पुढे येतात, जेथील उपवधु मुलाची नावे ऐकून वधुपित्याचे डोळे आशेने लकाकु लागतात, जेथे प्रवेश केल्यावर थोड्याच दिवसात अल्लाउद्दीनचा जादुई चिराग मिळाल्यागत मनुष्य रंकाचा राव बनतो एअर पोर्टवर पाय ठेवताक्षणीच सोन्याच्या पायघड्यांनीच जेथे स्वागत केले जाते अशी लोकाची गोड कल्पना-ती सुवर्ण नगरी दुबई...! आमचा बेत चार भिंतींच्या बाहेर पडताक्षणींच 'कशाला ह्याना ही दुर्बुद्धी सुचली ! वाळवटात पिण्यास् पाणी तरी मिळेल का?' 'तिथे महागाई काय भयकर असते हो, २५ रु किलो तुरीची डाळ, १० रु किलो बटाटे, ब्रेड तर मिळतच नाही' (जणु जन्मत'च मी ब्रेड चघळत आले आहे) 'हेमा, सांभाळ बाई, बायकानी तर तिकडे बाहेर तोंड काढायची सोय नाही' 'शिवाय दुबई म्हणजे स्मगलराचा बालेकिल्ला' (माझ्या डोळ्यासमोर हिन्दी सिनेमातील यच्चयावत् सर्व स्मगलर्स फेर धरून नाचू लागले) अशा दतकथा कानावर आदळू लागल्या पण 'ऐकावे जनाचे आणि करावे मनाचे' हा न्याय आम्ही अमलात आणला 'ज्यांना येथे भारतात चागली नोकरी मिळत नाही असे कुचकामी किंवा वाया गेलेले लोकच दुबईला नोकरीसाठी जातात' असे कुजके टोमणेसुद्धा ऐकावे लागले

दुबई हे मुबईच्या पश्चिमेस १००० मैलांवर इराणी आखातात आहे मुबई-दुबई हा विमानाने प्रवास २ ॥ तासाचा असून दुबईची वेळ भारताच्या दीड तास मागे आहे साधारण १९७० सालापर्यंत इराणी आखाताचा हा भाग ब्रिटिशानी फक्त लष्करी

महत्त्वाच्या दृष्टीने ताब्यात ठेवला होता त्यानी तेथे वीज, पाणी, रस्ते वगैरे काही केले नाही तसेच तेल वगैरे शोधण्याच्या भानगडीतही ते पडले नाहीत भारतातून येथे येण्यास व्हिसा वगैरे लागत नसे फक्त लहान बोटीतून (गोंडोला) येण्याची सोय होती भारतीय रुपया, चलनामध्ये अगदी अलीकडे अलीकडे पर्यंत चालू होता अरब टोळयाखेरीज येथील लोकसंख्या भारतीय व इराणीच होती (पाकिस्तान होण्यापूर्वी) भारतातून कापड, खाद्य पदार्थ व इतर गरजेच्या वस्तु मागवणे व येथून खजूर, लिंबे व मुख्यत सोने निर्यात करणे हा मुख्य व्यापार होता, शिवाय चाचेगिरीही होतीच येथील स्थानिक टोळीवाले अरब व भारतीय ह्यांचे सबध अत्यत सलोख्याचे होते मुसलमानांना येथे उघडपणे दारु पिण्यास बदी असल्यामुळे हा व्यवहार चोरूनच करावा लागतो दुबईचा शेख व त्याचे कुटुब एका भारतीय धोब्याकडे दारु पिण्यास जात असे पुढे तो स्वतत्र राजा झाल्यानतर त्या शेखने त्या धोब्यास दोन लाख रुपये दिले

१९७१ साली दुबई, अबुधाबी, शारजा, अजमन, रासअल-खेमा, फुजिरा, ओमल गवन ही एकमेकींच्या जवळ असलेली सात शेखराज्ये स्वतंत्र झाली १९७४ साली त्याचे स्वतत्र सघराज्य स्थापन झाले ह्याला संयुक्त अरब अमीरात अरबी भाषेत अल इत्तिहाड-अल इमारात अलअराबियाह म्हणजेच United Arab Emirates असे नाव पडले U A.E च्या उत्तरेस क्वातार, पश्चिम व दक्षिणेस सौदी अरब व पूर्वेला ओमन आहे क्षेत्रफळ - ३२,३०० चौ मैल १९५८ मध्ये अबूधाबीला तेल सापडले अबू धाबी (अबूजबी) मरीन एरीआज लिमिटेड (ADMA) ह्या ब्रिटिश व फ्रेंचाच्या मालकीच्या कपनीने सर्वांत मोठा तेलाचा साठा शोधून काढला किनाऱ्यापासून दूर असलेले तेलाचे मुख्यक्षेत्र ओमशैफ हे पर्शियन आखातात असून डास आयलडपासून २० मैलावर आहे तेलाच्या ह्या खाणीमध्ये सब-मरीन पाइप-लाईन, स्टोरेज टँक्स आहेत झाकुम ह्या दुसऱ्या एका तेलाच्या खाणीला पाईप लाईनने दास आयलडला जोडण्यात आलं आहे मुबाराज येथेही एका जपानी कंपनीने तेल शोधून काढले किनाऱ्याजवळील तेलाचे साठे अबूधाबी पेट्रोलियम कंपनीच्या मालकीचे आहेत ही कंपनी इराक, अमेरिका व कॅनडाच्या मालकीची आहे मुर्बानजवळ बाब डोम व बुहासाह येथील तेलाचे साठे अझ-झानाहला पाइपलाइन ने जोडले आहेत १९७० मध्ये अमेरिकेने दुबईला फतेह येथे पेट्रोलियम कंपनी काढली दुबईचे तीन पिरॅमिड्स म्हणून ती ओळखली जाऊ लागली कारण पंपाने तेल ज्या तीन टँक्समध्ये भरले जाते त्या टँक्सचा आकार उपड्या ठेवलेल्या शॅम्पेनच्या ग्लाससारखा आहे तेलाची सर्वांत जास्त कृपा अबु धाबी वर झाली असल्याने ती U A E. ची राजधानी बनली प्रत्येक अमीरातीचा वेगवेगळा राजा आहे त्याला शेख म्हणतात अबुधाबीचा शेख जैद हा U.A E चा प्रेसिडेंट असून दुबईचा शेख रशीद हा व्हाइस प्रेसिडेंट आहे येथे सुप्रीम कौन्सिलच्या आज्ञेवरून सरकार तयार केले जाते

अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व काही सुप्रीम कौन्सिलच्या आज्ञेवरून ठरविण्यात येते अबूधाबी व दुबईसाठी आठ सभासदांचे कौन्सिल आहे इतर राज्यासाठी सहा सभासदाचे आहे ह्याचा एक विचित्र नियम असा की व्हिसा हा त्या व्यक्तीस स्वतंत्र देत नाहीत ज्याला नोकरी पाहिजे त्याला नोकरी देणारा माणूस व्हिसा देववतो व ह्या माणसाखेरीज दुसरीकडे कुठेही नोकरी करता येत नाही अमेरिकेत तुमचा स्वत चा व्हिसा असतो, तुम्ही कुठेही नोकरी करू शकता किंवा वाटेल तशा नोकऱ्या बदलू शकता तसा प्रकार येथे नाही ही एक प्रकारची गुलामीच झाली जर तुमचे व मालकाचे म्हणजे अरबाचे भांडण झाले तर तुमचा व्हिसा खतम व तुम्हाला ताबडतोब देश सोडून गेले पाहिजे बऱ्याच वेळा तुमचा पासपोर्ट मालक स्वतःकडे ठेवतो अशा परिस्थितीत मालक तुम्हाला कबूल केलेल्या गोष्टीपैकी काहीही देत नाही किंवा कमी सवलती देतो तुमच्या मर्जीविरुद्ध तुम्हाला त्याची बाधिलकी स्विकारावी लागते

सबंध U.A E ची लोकसंख्या सुमारे आठ लाख आहे पैकी भारतीय सुमारे १ ॥ लाख, पाकिस्तानी, १ ॥ लाख इराणी ५० हजार ब्रिटिश, अमेरिकन, इतर ३० हजार, पॅलेस्टाईन, लेबनॉन मिळून ७० हजार आणि मूळ रहिवासी जेमतेम साडेतीन लाख आहेत अल-हाजर पर्वतात शिहुआ नावाचे टोळीवाले रहातात त्यांच्या मूळ वंशाचा पत्ता नाही ते गुहेत राहून शेती करतात भारतीयामध्येसुद्धा मुख्य भरणा मलबारी लोकाचा ह्या लोकाची चिकाटी, सहनशीलता, कोणतेही काम करण्याची लाज न वाटणे व आपल्या जातभाईला मदतीचा हात पुढे करण्याची वृत्ती खरोखर वाखाणण्यासारखी आहे एक केरळीय तेथे पोहोचला की तो आपल्या आणखी दहा बाधवांना तेथे आपल्या १०' x १०' च्या खोलीत आसरा देतो त्याला नोकरी मिळेपर्यंत त्याच्या जेवण्याखाण्याचा खर्च करतो अट हीच की त्याने हे व्रत पुढे चालवावे

तेल सापडल्यापासून येथे कन्स्ट्रक्शनचा धदा अगदी तेजीत आला व घरे, रस्ते बाधण्यासाठी बँकानी कर्जे देण्यास सुरवात केली ह्यासाठी लागणारे इंजिनियर्स भारत, पाकिस्तान व युरोपमधून आले मराठी इंजिनिअर्स, आर्किटेक्टस्, टेक्निशियन्स मोठ्या प्रमाणात येऊ लागले भारतीय प्रामुख्याने असल्याने हिन्दी भाषेचा सर्रास वापर होतो अरब लोकानाही मोडके तोडके हिंदी येते

दुबईस येण्यापूर्वी दुबईच्या उन्हाळ्याचे जे वर्णन ऐकले होते ते निराधार असल्याचे दिसले जुलै-ऑगस्ट मध्ये १२० अश फॅ पर्यंत तापमान चढते पण Humidity मुळे सन्स्ट्रोक होत नाही घरोघरी, दुकाने, ऑफिसेस, गाड्या सर्वत्र एअरकंडीशनर्सचा सर्रास वापर केला जात असल्याने येथे उन्हाळा जाणवत नाही अगदी टर्नर, फीटर सुद्धा 'येशी' लावून आराम करतो नोव्हेंबर ते एप्रिल हवा फार छान असते हिवाळ्यात तापमान ६० अश फॅ असते पाऊस ह्या लोकाना गेल्या १०-१५ वर्षांपासून माहित झाला आहे त्या

आधी येथे मुळीच पाऊस नव्हता आतासुद्धा जानेवारी फेब्रुवारीमध्ये थोडीशी बुंदाबुन्दी होते इतकेच त्यामुळे पाऊस पहाण्यासाठी, वर्षाऋतूचे बरखा रानीचे सौंदर्यपान करण्यासाठी अरब लोक मुंबईला येतात ऑबेराय इंटरनॅशनल हॉटिलमध्ये एका अब्जाधीश अरबाने आपल्या खोलीच्या खिडक्यांच्या काचा फोडून पावसाचे पाणी आत घेतले खोलीतील सर्व सामान, गालीचा खराब झाला तो अरब हॉटेल-मॅनेजरला म्हणतो कसा 'कुछ परवाह नहीं ! दुप्पट-तिप्पट नुकसान भरपाई घ्या पण पाऊस असाच आत येऊ द्यां ' पैशाने काय विकत घेता येत नाही ? पेट्रोलच्या जोरावर ह्या लोकानी काय मिळवायचे ठेवले आहे ? २५० वर्षे राज्य केलेल्या ब्रिटिशांच्या इंग्लंड मधील इस्टेटी अरब लोक धडाधड विकत घेत आहेत

येथील जमीन सुपीक नाही सर्वत्र रखरखीत वाळवंट आहे पण दुबई बरीच हिरवीगार आहे शेतीयोग्य जमीन फुजिरा, अल-एन, जैद, रास-अल-खेमा ह्या भागात आहे येथे भाज्या, थोडा ऊस, कलिंगडे, खजूर व लिंबे होतात गोड पाणी ह्याच भागात आहे बाकी ठिकाणी ओयासिसमधून पाणी मिळते येथे हिरव्या-पिवळ्या रसरशीत लिंबांनी लहडलेल्या बागा, गर्द केळीची बने पाहून आपण वाळवटात आहोत असे वाटतच नाही ट्यूब वेल्स पुष्कळ असल्याने चोवीस तास पाणी असते वीज थरमल पॉवरची आहे नैसर्गिक असे वाहते पाणी-मिनरल वॉटरचे झरे मसाफी व वाडी हट्टा येथेच पाहिले वाळवट पसरू नये पाऊस वाढावा म्हणून झाडी लावण्याचा फार मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे आणखी १०-१५ वर्षांनी येथे बरीच हिरवळ तयार होईल सध्या कोबड्या व गायी पाळून दुधाचे पदार्थ व अंडी ह्यांचे उत्पादन काढले जाते जवळच्या समुद्रात भरपूर मासळी मिळते कोळबी तर फारच छान असते काही मासे, हिरव्या, पिवळ्या, तांबड्या निळ्या रंगाचे असून प्रचंड मोठे असतात

दुबई म्हणजे नुसते रखरखीत वाळवट ही समजूत चुकीची आहे उत्तुंग गगनचुंबी इमारती, बाजार, रंगीबेरंगी निऑन-दिव्यांच्या रोषणाईचा लखलखाट ह्यामुळे वाळवटाची आठवणच येत नाही रस्ते अतिशय मुलायम, रेशमी आहेत एकही खड्डा किंवा खोदून ठेवलेला रस्ता दिसला नाही, कितीही वेगाने गाडी हाणली तरी पोटातील पाणीसुद्धा हलत नाही रस्त्याना नावे नसल्यामुळे काहीतरी विशिष्ट खुण ठेवून घरे व ऑफिसेस लक्षात ठेवावी लागतात खुद्द दुबईचे खाडीने दोन भाग केले आहेत व्यापारी भाग अलीकडे वसवला आहे त्यास देअरा म्हणतात जुना भाग दुबई म्हणून ओळखला जातो खाडी ओलाडण्यासाठी खाडी खालून बोगदा आहे व उघडणारा पूल आहे बोट पूलाखालून जाताना पूल मध्यावर उघडा होतो सर्व दुबईच अगदी थोड्या क्षेत्रफळावर वसली आहे त्यामुळे वाहनांची गर्दी जास्त वाटते एवढ्या लहान जागेत १ ॥ लाख वाहनाचा वापर होतो रस्ते (शहरातील) अरुंद त्यामुळे पुण्याच्या लक्ष्मीरोडची आठवण

येते जुन्या काळातील अरबी पद्धतीची घरे, त्याच्या जाड भिंती, अरुद गल्ल्या व वारा खेळविणारे मनोरे अजून जुन्या काळाची आठवण करून देतात ज्यावेळी ए.सी नव्हते त्या काळात ह्या मनोऱ्याचा सर्रास उपयोग करून घेतला जाई अशीच साधारण योजना आपल्याकडील बिकानेर व जसलमेर ह्या भागात आहे परंतु मनोऱ्याऐवजी येथे विहिरी आहेत खाडी ओलाडण्यासाठी टॅक्सी, मोटारी न वापरणारे लोक लहान बोटींचा उपयोग करतात दर पाच मिनिटानी ह्या बोटी सुटत असतात पादचाऱ्यासाठी व इतर वाहनासाठी खाडीच्या खालून केलेल्या बोगद्यामध्ये दिव्याचा लखलखाट असतो

इन्कमटॅक्स, सेल्सटॅक्स, वेल्थ टॅक्स वगैरे कोणतेही कर येथे नाहीत त्यामुळे प्रचंड हिशोबखाती ठेवण्याची येथे गरज भासत नाही अलिकडे अनौपचारिक ऑडिटर काही कपन्या आपल्या सोयीसाठी ठेवू लागल्या आहेत कोणताही पदार्थ आयात अथवा निर्यात करण्यासाठी सरकारी परवाना लागत नाही हा परमिट राज्य नसल्याचा आनद प्रत्येक व्यापाऱ्याच्या तोंडावर थुईथुई नाचत असतो परकीय चलनासाठी रिझर्व बँकेचे पाय धरावे लागत नाहीत बाजारात पाहिजे तेवढे खुले सर्रास मिळते कितीतरी भारतीयांनी तेथील व्यापाराची-भविष्याची नाडी ओळखून हिंमत केली व आज ते बँका विनिमय केन्द्रे, शिक्षण सस्था, आयात-निर्यात व्यापार यात हुकमी एक्के बनले आहेत स्थानिक लोकांपेक्षा बाहेरचे लोक जास्त होऊ लागल्याने, कुठलाही व्यापार करायचा असला तर अरबी मनुष्यास भागीदार म्हणून घेतलाच पाहिजे असा कायदा आहे ह्या कायद्याने शेखने आपल्या बाधवाचे केवढे भले केले आहे अनेक अरबाना नावापुरते भागीदारीत राहून घरबसल्या लाखो रुपये मिळतात 'अरब-उडपी' हॉटेल्सही येथे आहेत रास-अल-खेमाला तर मलबारी लोक इतके मोठ्या प्रमाणात आहेत व ते ह्या मातीशी (रेतीशी म्हणा) इतके एकजीव झाले आहेत की अरब-केरळी वर्णसकर होऊन पुढे एक नवी पीढी तयार होत आहे पैशाच्या जोरावर जग जिंकायला निघालेल्या अरबानी वैराण वाळवंटात खरोखर नदनवन फुलविले आहे युरोपमधून भरभरून माती, खते व जगातील रोपे आणून रूप पालटविले आहे येथील प्रसिद्ध स्टेडियमसाठी पाकिस्तानमधून बोटी भरभरून माती वाहून आणण्यात आली होती क्रिकेटीयर्सचे मक्का-मदीना इग्लडचे लॉर्डस् मैदान असले तरी मला वाटत सगळ्या विश्वविख्यात क्रिकेटीयर्सची स्वीस बँक दुबईच बनली आहे

दुबई हे Free Port आहे कोणत्याही प्रकारचा कर येथे नसल्यामुळे इतर कोणत्याही करानी गाजेल्या देशास दुबईचे आकर्षण वाटणे साहजिकच आहे खुद्द दुबईला विशेष काही होत नसल्यामुळे सर्व जगातून येथे माल येतो व्यापार हाच येथील उत्पन्नाचा मुख्य भाग आहे जपान, ब्रिटन, स्वित्झर्लंड, अमेरिका, भारत, प जर्मनी, पाकिस्तान, चीन, हॉलंड, व हाँगकाँगबरोबर दुबईचा व्यापार चालतो पूर्वी मोती

काढण्याचा-धदा खूप जोरात होता पण आता जपानी कल्चर्ड मोत्यामुळे तो बसला जगातील कोणतीही वस्तु गस्त दरात येथे मिळू शकते देशोदेशीची सर्व मडळी विश्वबधुत्वाच्या नात्याने येथे सुखाने हातात हात घालून नादतात आम्ही पाकिस्तानी बासमतीच्या पाढऱ्या शुभ्र भातावर इराणी तुरीच्या डाळीचे पिवळे धमक वरण घेत असू वर मुखशुद्धी हॉलड बटरच्या तुपाची दिवसाचा शुभारभ मात्र भारतीय चहाने त्यात दूध हॉलंडचे तर कोरियन साखर त्यात माधुर्य आणीत असे चायना क्रॉकरीतून चहा घेताना हिंदी चीनी भाई भाईचा निनाद त्या कपबशाच्या किणकिणीतून होई साबण, बिस्किट्स ईग्लिश, चॉकलेट स्वीस, परफ्युम्स फ्रेच, कणिक ऑस्ट्रेलिया कॅनडाची तर फ्रोझन भाज्या अमेरिकेच्या, केळी केनियाची तर कारली सायप्रसमधून येत ह्या देशात खास दुबईसाठी कारल्याची लागवड केली जाते ही कार्ली आपल्या कार्ल्याच्या मानाने बरीच लाब व मोठी असतात परतु बिया कमी व कोवळी असतात भारतातूनही ताज्या भाज्या, मासे, मास येते चिकन भेंडीपेक्षा ही स्वस्त मिळते भाज्या, धान्ये महाग आहे पण लवंगा, पिस्ते, बदाम, वेलची, केशर ह्याचे भाव भारताच्या १/४ आहेत जायफळे तर २ रुपयाला ५० मिळतात त्यामुळे मलयगिरीची भिल्ल पुरध्री ज्याप्रमाणे स्वयपाकाला चदनाची लाकडे वापरत असे त्याप्रमाणे आम्हीही प्रत्येक गोष्टीत केशर वेलदोड्याची लयलूट करीत असू बदामाच्या वड्या तर गुळपापडीच्या वड्यापेक्षा येता जाता होत असत वाळवटातही भाजी व भरपूर फळे, सुका मेवा आम्ही खात असू. भाजी मार्केट जवळजवळ दक्षिण भारतीयानी काबीज केले आहे अमेरिकेप्रमाणे येथील सुपर मार्केट्सही अतिशय आकर्षक व समृद्ध आहेत चीज, योगर्टस्, निरनिराळ्या प्रकारची आईस्क्रीम्स, पुडींग्ज, मासे, भाज्या वगैरे फ्रोझन अन्नाने बर्फाच्या मोठमोठ्या पेट्या भरून ठेवलेल्या असतात शिवाय शेवया, पापड्या, पापड, लोणची, डाळी, कडधान्ये, अमसुल वगैरे भारतीय मंडळीही आबदारपणे मोठ्या डौलात उभी असतात किराणा मालाची दुकाने व कापडाची दुकाने भारतीय पाकिस्तानी व इराणी लोकानी चालविली आहेत सुपर मार्केट्स भारतीय पाकिस्तानी इराणी, लेबनीज, अरब व ब्रिटीश लोकानी चालविली आहेत 'टी चैतराम' 'के एम ब्रदर्स' ही दुबईतील अतिशय आघाडीवरील सुपर मार्केट्स, भारतीय आहेत सुपर मार्केटमधील कर्मचारी बहुतेक भारतीय असतात कारण ते इतर लोकापेक्षा प्रामाणिक असतात असे येथे मत आहे पॉलिएस्टरचे कपडे, साड्या, फ्रेंच सेंट्स खूप स्वस्त मिळतात कॅमेराच्या रगीत फिल्म्स स्वस्त मिळतात पण कॅमेरे महाग आहेत जपानी भाडी खूप स्वस्त आहेत पण चामड्याच्या वस्तु, चपला फार महाग आहे कापडाची शिलाईही फार महाग आहे

दुबई पूर्वी पासून प्रसिद्ध आहे, ते सोन्याची जागतिक बाजारपेठ म्हणून 'स्मगलिंग' हा शब्द येथे नाही सोन्याचा व्यापारच म्हणतात आमच्या कपनीचा अरबी मालक एकदा

आमच्या घरी आला होता बोलता बोलता त्याने अगदी सहजपणे खिशातून विड्याचे बंडल काढावे त्याप्रमाणे चमचमणाऱ्या सोन्याच्या लगडींचे बडल काढले दोन वर्षांपूर्वी येथे सोने खूपच स्वस्त होते येथील सोना बाजार प्रचड मोठा आहे सराफांच्या दुकानात तऱ्हेतऱ्हेचे दागिने (जास्तीकरून इटली मध्ये तयार झालेले) सोन्याच्या लगडी, सोन्याची बिस्कीट्स, सॉवरींग्ज, आकर्षक पद्धतीने माडून ठेवलेले असते सोना बाजारातही बहुतेक सोनार कच्छी, सिंधी व गुजराथी आहेत दिव्याच्या लखलखाटात सोनाबाजाराचा झगमगाट कुबेर नगरीची आठवण करून देतो दुकानावर पहारा नसतो दुकानाच्या काचामध्ये इलेक्ट्रिक करट खेळविलेला असतो रात्री पोलिसांची कडक गस्त असते ह्या रस्त्यावरील पोलिसाला मोटर सायकल दिलेली असते, त्याच्याजवळ बिनतारी यंत्रही असते त्यामुळे लगेच ठाण्यावर सबध प्रस्थापित होऊ शकतो रात्री अपरात्री जर कोणाला फिरताना पाहिले तर हमखास पोलीस हटकतो एकदा हे आणि ह्यांचा मालक साइटवर चक्कर मारून रस्त्यातच कामाची चर्चा करीत बसले रात्रीचा दीड कधी वाजला कळल नाही मग 'सखाराम' डुलत डुलत येऊन ह्या दोघावर गुरगुरला दोघानी लेबर कार्ड दाखविले तरी त्याच्या नजरेतील 'सशय का मनी आला ?' हा भाव जाईना आमचे घर जवळ होते शेवटी खाणाखुणा करून त्याला घरी आणून मला दाखविले तेव्हा कुठे हा घरंदाज, बीबी ससारी सभ्य माणूस असल्याची त्याची खात्री पटली सभ्य दिसण्यासाठी बायको असावी लागते हे मला येथे येऊन कळले पोलिसात इथोपिया, सोमाली, सुदानकडील लोकाचा भरणा आहे जुलै-ऑगस्ट महिन्यात बरेचसे लोक सुट्टीवर दुबई सोडून जातात पोलिसाना जर आपला पत्ता देऊन ठेवला तर ते विनामूल्य तुमच्या घराची रखवाली करतात पोलिस हा सर्वसाधारणपणे कार्यक्षम असतो पोलिसाला भरपूर पगार (किमान रु ५०००) सुसज्ज घर, व इतर सुखसोई देण्यात येत असल्याने लाचलुचपत कमी आहे जेल सुद्धा सुसज्ज आहेत व तेथे चार वेळा खाणेपिणे मिळते आमच्या ड्रायव्हरला एकदा ट्रॅफिक नियम मोडल्याबद्दल दोन दिवसाची सजा झाली तर हा पठ्ठा जेलमध्ये अगदी आरामात राहिला चोरीची भिती येथे कमी कारण येथे शिक्षा खूप कडक आहेत हात तोडणे, कडेलोट, तळघरात अंधार कोठडी, कडकशा उन्हात तप्त वाळूवर उघडे करून आसुडाने फटके मारणे असा शिक्षा आहेत चोरी, बलात्काराचे त्यामुळे प्रमाण कमी आहे. मला दिल्लीपेक्षा येथेच सुरक्षित वाटत होते वेश्या व्यवसायही इकडे गुन्हा समजला जातो कायदा कडक सजा देतो परतु बेरूतची धूळधाण उडाल्यामुळे लेबनीज लोकांचे लोंढे इकडे आले आहेत लेबनीज बायका चोरटा वेश्या व्यवसाय करतात वाहतुक ८०-९० मैल वेगाने होत असल्याने अपघाताचे प्रमाण जास्त आहे बिनतारी संदेशाची सोय, सारख्या फिरणाऱ्या पोलिसाच्या गाड्या ह्यामुळे अपघात झाल्याच्या २।३ मिनिटाच्या आत पोलिस व पोलिसाची ॲम्ब्युलन्स येते स्वतची ॲम्ब्युलन्स असल्याने पोलिसांना हॉस्पिटलची मनधरणी करावी लागत नाही तसेच हॉस्पिटलला

लागूनच पोलिसचौकी असते त्यामुळे पोलिस चौकशी झाल्याखेरीज प्रवेश देणार नाही अशी भानगडच नसते गाडी चालवण्याचा परवाना फारच कटाक्षाने कडक परीक्षा घेऊन देतात न्यायखाते काजीच्या हातात असून कायदा शरियत कायद्यावर आधारीत आहे

दुबईत 'पोस्टमन—' ही ललकारी कधीही ऐकू येत नाही प्रत्येक ऑफिसास पोस्टबॉक्स असून स्वत जाऊन त्या पोस्टबॉक्समधून पत्रे आणायची असतात न्हावी, धोबी, सोनार हॉटेलवाले ह्यासारख्या बऱ्याच धंदेवाईक लोकानी आपल्या दुकानाबाहेर पत्रपेटी ठेवलेली असते ज्याचा पोस्ट बॉक्स नसतो, तो ह्या पेटीचा वापर करतात येथून मनीऑर्डर्स सर्व जगभर जवळ जवळ रोजच जात असतात त्यामुळे पोस्टात नेहमी प्रचड यात्रेचे स्वरूप असते वेळ वाया जाऊ नये म्हणून लोक पोस्टाच्या बाहेरच उभ्या असलेल्या लोकांकडून तिकिटे विकत घेतात उघडरित्या तिकिटे विकताना येथे पाहिले आपल्याकडे हा गुन्हा असतो पोस्ट, फायर ब्रिगेड, भाजीवाले, लहान चहाची दुकाने, म्युन्सिपालटी ह्या ठिकाणी केरळाचे व पाकिस्तानी लोक असतात आंतरराष्ट्रीय बँकाचे वैपुल्य आढळते बँक ऑफ बरोडा ही भारतीय बँक व हबीब बँक ही पाकिस्तानी बँक आहे

भारतीय वृत्तपत्रे, मासिके सर्रास मिळतात परतु चौपट किंमत मोजावी लागते आम्ही दुबई सोडल्यानतर तेथील एक आर्किटेक्ट श्री विनय कुटे ह्याच्या पत्नीने फिरती लायब्ररीही सुरू केल्याचे ऐकले तिच्या कर्तबगारीची 'रेकॉर्डर' ह्या स्थानिक वृत्तपत्रात खूप प्रशसाही आली होती एका स्थानिक वर्तमानपत्राने (सलीज टाईम्स) दुबई व अबुधाबी येथे दोन स्त्री-सस्थाही सुरु केल्या आहेत 'सलीज-टाईम्स वुमेन्स असोसिएशन' असे तिचे नाव आहे देशोदेशीच्या खाद्यपदार्थांची प्रात्यक्षिके व विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात ह्या सस्थेतील स्त्री सभासद मुख्यत्वे भारतीय व पाकिस्तानी स्त्रिया आहेत

सकाळपासून आपल्याकडे ठणाणा करणारा कबाडीवाला येथे दिसत नाही भारंभार रद्दी जमली की डोळे मिटून 'समुद्रास्तुप्यन्तु' तरी करायची किंवा मनावर दगड ठेवून कचऱ्यात फेकून द्यावी लागे मला लहानपणापासून सुदर सुदर आकाराच्या व रंगाच्या बाटल्या व डबे जमविण्याचा नाद असल्याने मला 'डबे बाटलीवालीच म्हणत' आणि येथे तर ज्यूस, जॅम, दारू वगैरेंच्या मोठमोठाल्या सुदर सुंदर आकाराच्या बरण्या फेकून देताना माझा जीव अगदी थोडा थोडा होत असे कचरा रस्त्यात फेकणे हा गुन्हा आहे, पाश्चात्य देशाप्रमाणे मोठ्या थैलीत कचरा जमा करून ठराविक ठिकाणी ठेवावा लागतो पहाटे ५ ॥ वाजता कचरा गाडी येते व कचरा जमा करून (Incinerator) ने जाळून टाकते

दुबईचे प्रचलित नाणे दरहॅम असले तरी बाजारात त्यास रुपया किवा रियाल

म्हणतात येथे सर्व सामान भारताच्या मानाने महाग असले तरी कोणीही भारतीय माणूस भारतात मिळणाऱ्या पगारापेक्षा निदान तिप्पट पगार मिळाल्याशिवाय इकडे येत नाही घरे मात्र इकडे फारच महाग आहेत एक बेडरूम फ्लॅटचे वर्षाला ७० हजार रुपये भाडे एकदम द्यावे लागते त्यामुळे कपनीने घर दिले तर ठीक नाही तरपगाराचाबराचसा भाग भाड्यात जातो घर मध्येच सोडताही येत नाही आता भाडी उतरत आहेत घरातील बहुतेक फिटिंग्ज उत्तम दर्जाची, गिझर, ए.सी., फर्निचर व सजावट ह्यावर पाश्चात्य सस्कृतीचा प्रभाव स्पष्ट दिसतो मुबईच्या मानाने घरे मोठी असली तरी ड्रेनेज सिस्टीम अगदी बेकार असते आम्ही दुबईत नुकतेच आलो असता एक दिवस आमच्या स्वयपाकघराच्या पाईपामधून एकदम भसाभसा सांडपाणी आले व सैरावैरा घरभर धावू लागले ईदच्या सुट्टीच्या दिवशी मोठ्या मुश्किलीने प्लबर मिळाला त्याने खाली जाऊन पाईप फोडला तर त्यात दोन मुसलमानी टोप्या अडकलेल्या आढळल्या ह्या टोप्यानी बादशहा औरगजेबाचे पोट भरले तर माझे पाय मात्र घाण पाण्याने भरले बाकी वेड्याचे घर उन्हात तसे आमचे घर आपले पाण्यातच असावे असा दैवदुर्विलासच आहे नतर एकदा आम्ही युरोपची टूर करून मोठ्या आनदाने परत आलो असता आमचे घर परत पाण्यात डूबत होते (ह्यावेळी फरक इतकाच की वरून पाणी आले तेही अगदी स्वच्छ) त्याचे असे झाले, आमच्या वरच्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या इराणी माणसाचे आमच्या घरमालकाशी भाडण झाले त्यामुळे सूडबुद्धीने तो भाडे बुडवून तर पळालाच पण, सगळे नळ उघडे ठेवून गेला ते पाणी आमच्या फ्लॅटमध्येही येऊन आमचे कार्पेट, सामान खराब करून गेले जवळ जवळ सहा महिने आमच्या किचनचे छत आसवे ढाळीत होते भिलाईला वादळामध्ये आमच्या घराचे छप्पर उडून 'व्हेनिस' झाले होते, तर दिल्लीला 'आषाढस्य प्रथम दिवसे' पडणारा वेडावाकडा पाऊस असाच आमच्या घरास रडवून जातो

बिऱ्हाड बाजल थाटल्यावर गॅस मिळण्यासाठी आता किती दिवस लागतील ह्या काळजीत मी होते, पण 'पैसे भरा अर्ध्या तासात गॅस पोहोचेल' असे कळल्यावर कानावर विश्वासच बसेना तुमचा नबर १,५३५१७ आहे, साधारण तीन वर्षांनी गॅस मिळेल असे ऐकण्याची त्या बापड्याना सवय बर सिलेंडर आपल्या सिलेंडरच्या दुप्पट मोठे दुसरा धक्का फोनच्या बाबतीत फोन केल्यावर किती पैसे देऊ असे एका दुकानात विचारणा करताच तो दुकानाचा मालक बघतच राहिला फोन घेताना दर तिमाहीचे पैसे जे भरावे लागतात त्याव्यतिरिक्त स्थानिक कॉलचे पैसे लागत नाहीत

दुबईतील महत्त्वपूर्ण शहरात अबुधाबी हे U A.E च्या राजधानीचे शहर असून दुबई-अबुधाबी १७० कि.मी अतर आहे रस्ता अगदी रेशमी आहे पण सध्या रस्त्यावर एकही झाड नाही त्यामुळे हा प्रवास जरी फक्त दोनच तासाचा आहे तरी अत्यत रुक्ष व कटाळवाणा आहे अबुधाबी शहर हे एक बेट आहे व मुख्य प्रदेशाशी एका मोठ्या पुलाने

लागूनच पोलिसचौकी असते त्यामुळे पोलिस चौकशी झाल्याखेरीज प्रवेश देणार नाही अशी भानगडच नसते गाडी चालवण्याचा परवाना फारच कटाक्षाने कडक परीक्षा घेऊन देतात न्यायखाते काजीच्या हातात असून कायदा शरियत कायद्यावर आधारीत आहे

दुबईत 'पोस्टमन—' ही ललकारी कधीही ऐकू येत नाही प्रत्येक ऑफिसास पोस्टबॉक्स असून स्वत जाऊन त्या पोस्टबॉक्समधून पत्रे आणायची असतात न्हावी, धोबी, सोनार हॉटिलवाले ह्यासारख्या बऱ्याच धदेवाईक लोकांनी आपल्या दुकानाबाहेर पत्रपेटी ठेवलेली असते ज्याचा पोस्ट बॉक्स नसतो, तो ह्या पेटीचा वापर करतात येथून मनी ऑर्डर्स सर्व जगभर जवळ जवळ रोजच जात असतात त्यामुळे पोस्टात नेहमी प्रचड यात्रेचे स्वरूप असते वेळ वाया जाऊ नये म्हणून लोक पोस्टाच्या बाहेरच उभ्या असलेल्या लोकाकडून तिकिटे विकत घेतात उघडरित्या तिकिटे विकताना येथे पाहिले आपल्याकडे हा गुन्हा असतो पोस्ट, फायर ब्रिगेड, भाजीवाले, लहान चहाची दुकाने, म्युन्सिपालटी ह्या ठिकाणी केरळाचे व पाकिस्तानी लोक असतात आतरराष्ट्रीय बँकाचे वैपुल्य आढळते बँक ऑफ बरोडा ही भारतीय बँक व हबीब बँक ही पाकिस्तानी बँक आहे

भारतीय वृत्तपत्रे, मासिके सर्रास मिळतात परतु चौपट किंमत मोजावी लागते आम्ही दुबई सोडल्यानतर तेथील एक आर्किटेक्ट श्री विनय कुंटे ह्यांच्या पत्नीने फिरती लायब्ररीही सुरू केल्याचे ऐकले तिच्या कर्तबगारीची 'रेकॉर्डर' ह्या स्थानिक वृत्तपत्रात खूप प्रशसाही आली होती एका स्थानिक वर्तमानपत्राने (सलीज टाईम्स) दुबई व अबुधाबी येथे दोन स्त्री-सस्थाही सुरु केल्या आहेत 'सलीज-टाईम्स वुमेन्स असोसिएशन' असे तिचे नाव आहे देशोदेशीच्या खाद्यपदार्थांची प्रात्यक्षिके व विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात ह्या सस्थेतील स्त्री सभासद मुख्यत्वे भारतीय व पाकिस्तानी स्त्रिया आहेत

सकाळपासून आपल्याकडे ठणाणा करणारा कबाडीवाला येथे दिसत नाही भारभार रद्दी जमली की डोळे मिटून 'समुद्रास्तुप्यन्तु' तरी करायची किवा मनावर दगड ठेवून कचऱ्यात फेकून द्यावी लागे मला लहानपणापासून सुदर सुदर आकाराच्या व रगाच्या बाटल्या व डबे जमविण्याचा नाद असल्याने मला 'डबे बाटलीवालीच म्हणत' आणि येथे तर ज्यूस, जॅम, दारू वगैरेंच्या मोठमोठाल्या सुदर सुंदर आकाराच्या बरण्या फेकून देताना माझा जीव अगदी थोडा थोडा होत असे कचरा रस्त्यात फेकणे हा गुन्हा आहे, पाश्चात्य देशाप्रमाणे मोठ्या थैलीत कचरा जमा करून ठराविक ठिकाणी ठेवावा लागतो पहाटे ५ ॥ वाजता कचरा गाडी येते व कचरा जमा करून (Incinerator) ने जाळून टाकते

दुबईचे प्रचलित नाणे दरहॅम असले तरी बाजारात त्यास रुपया किंवा रियाल

म्हणतात येथे सर्व सामान भारताच्या मानाने महाग असले तरी कोणीही भारतीय माणूस भारतात मिळणाऱ्या पगारापेक्षा निदान तिप्पट पगार मिळाल्याशिवाय इकडे येत नाही घरे मात्र इकडे फारच महाग आहेत एक बेडरूम फ्लॅटचे वर्षाला ७० हजार रुपये भाडे एकदम द्यावे लागते त्यामुळे कपनीने घर दिले तर ठीक नाही तर पगाराचाबराचसा भाग भाड्यात जातो घर मध्येच सोडताही येत नाही आता भाडी उतरत आहेत घरातील बहुतेक फिटिंग्ज उत्तम दर्जाची, गिझर, ए.सी , फर्निचर व सजावट ह्यावर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट दिसते। मुबईच्या मानाने घरे मोठी असली तरी ड्रेनेज सिस्टीम अगदी बेकार असते आम्ही दुबईत नुकतेच आलो असता एक दिवस आमच्या स्वयपाकघराच्या पाईपामधून एकदम भसाभसा साडपाणी आले व सैरवैरा घरभर धावू लागले ईदच्या सुट्टीच्या दिवशी मोठ्या मुश्किलीने प्लबर मिळाला त्याने खाली जाऊन पाईप फोडला तर त्यात दोन मुसलमानी टोप्या अडकलेल्या आढळल्या ह्या टोप्यानी बादशहा औरगजेबाचे पोट भरले तर माझे पाय मात्र घाण पाण्याने भरले बाकी वेड्याचे घर उन्हात तसे आमचे घर आपले पाण्यातच असावे असा दैवदुर्विलासच आहे नतर एकदा आम्ही युरोपची टूर करून मोठ्या आनदाने परत आलो असता आमचे घर परत पाण्यात डूबत होते (ह्यावेळी फरक इतकाच की वरून पाणी आले तेही अगदी स्वच्छ) त्याचे असे झाले, आमच्या वरच्या मजल्यावरील फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या इराणी माणसाचे आमच्या घरमालकाशी भाडण झाले त्यामुळे सूडबुद्धीने तो भाडे बुडवून तर पळालाच पण, सगळे नळ उघडे ठेवून गेला ते पाणी आमच्या फ्लॅटमध्येही येऊन आमचे कार्पेट, सामान खराब करून गेले जवळ जवळ सहा महिने आमच्या किचनचे छत आसवे ढाळीत होते भिलाईला वादळामध्ये आमच्या घराचे छप्पर उडून 'व्हेनिस' झाले होते, तर दिल्लीला 'आषाढस्य प्रथम दिवसे' पडणारा वेडावाकडा पाऊस असाच आमच्या घरास रडवून जातो

बिऱ्हाड बाजल थाटल्यावर गॅस मिळण्यासाठी आता किती दिवस लागतील ह्या काळजीत मी होते, पण 'पैसे भरा अर्ध्या तासात गॅस पोहोचेल' असे कळल्यावर कानावर विश्वासच बसेना तुमचा नबर १,५३५१७ आहे, साधारण तीन वर्षांनी गॅस मिळेल असे ऐकण्याची त्या बापड्याना सवय बर सिलेंडर आपल्या सिलेंडरच्या दुप्पट मोठे दुसरा धक्का फोनच्या बाबतीत फोन केल्यावर किती पैसे देऊ असे एका दुकानात विचारणा करताच तो दुकानाचा मालक बघतच राहिला फोन घेताना दर तिमाहीचे पैसे जे भरावे लागतात त्याव्यतिरिक्त स्थानिक कॉलचे पैसे लागत नाहीत

दुबईतील महत्त्वपूर्ण शहरात अबुधाबी हे U A.E च्या राजधानीचे शहर असून दुबई-अबुधाबी १७० कि.मी अंतर आहे रस्ता अगदी रेशमी आहे पण सध्या रस्त्यावर एकही झाड नाही त्यामुळे हा प्रवास जरी फक्त दोनच तासाचा आहे तरी अत्यत रुक्ष व कटाळवाणा आहे अबुधाबी शहर हे एक बेट आहे व मुख्य प्रदेशाशी एका मोठ्या पुलाने

जोडलेले आहे चार लेन हायवेने अबुधाबी अल-एन व अल बुरायमीला एका ब्रीजने जोडले आहे १९७० मध्ये दुबई-अबूधाबी जोडणारा हा ८० मैलाचा रस्ता तयार झाला डोंगरातून ओमन गल्फ व पर्शियन गल्फला जोडणारा रस्ता करण्याच्या योजना आहेत U.A.E राज्यात रेल्वे आहे दुबईच्या मानाने अबुधाबी हे नवीन असल्याने इतर शहरांच्या मानाने जास्त चकचकीत व आधुनिक दिसते एका दिशेने चार चार गाड्या व दुसऱ्या दिशेने तितक्याच गाड्या अगदी सहजतेने जातील इतके विस्तीर्ण रस्ते, मैलच्या मैल पसरलेल्या हिरवळी, भव्य-सुदर आधुनिक इमारती, दिव्याची रोषणाई सर्वच शेखच्या अमीरीचे द्योतक आहे तेथे सध्या एका मोठ्या विमानतळाचे काम चालू आहे ह्याच्या आजूबाजूस सबध अबुधाबी दुबई रस्त्यावर झाडी झुडपे लावण्याचा प्रकल्प चालू आहे दास आयलड ह्या भागात फार मोठ्या प्रमाणात तेल सापडल्यामुळे ह्यास फार महत्त्व आले आहे अबुधाबी राज्यातील दुसरे महत्त्वाचे शहर म्हणजे अल-ऐन, हे शेती-बागायतीसाठी प्रसिद्ध आहे आता येथेs U A.E. युनिव्हर्सिटी चालू होत आहे तारीक मारीक वगैरे सारखी लहान लहान गावे टेलिकम्युनिकेशन सेंटरसाठी पुढे येत आहेत शारजा हे राज्य जवळ जवळ दुबईला लागूनच आहे दिल्ली-गाजियाबादसारखी येथे आवक-जावक चालू असते ह्या राज्यातील जैद हा भाग हिरवळ, बागा, शेती, व डोंगर ह्यासाठी प्रसिद्ध आहे तर खोरफखान हे गाव मच्छीमारी व पर्यटक केंद्र म्हणून पुढे येत आहे अजमन हे छोटेसे सघराज्य दुबईच्या मानाने हिरवे आहे सिकदराच्या काळापासूनचे किल्ले व बुरुज येथे दिसतात

ओमलगवन हे बेट सौम्य उन्हाळा, मच्छीमारी व पर्यटक केंद्र म्हणून योग्य आहे समुद्र किनाऱ्यावरच हॉलिडेहोम्स सारखी व्यवस्था आहे रासलखेमा हे राज्य शेती, बागा, हिरवळ, डोंगर मासेमारी ह्यासाठी प्रसिद्ध असून एका टेकडीवर कॅसिनो आहे मोठ्या प्रमाणावर जुगार खेळण्याचे हे एकमेव स्थान आहे अबुधाबी, दुबई, शारजा ही राज्ये सोडली तर बाकीच्या राज्यात अतर्भागात गरीब अरब दिसतात कारण ह्या भागात तेल नाही त्यामुळे व्यापार नाही हे गरीब अरबच तसे आदरातिथ्यासाठी प्रसिद्ध आहेत फुजिराजवळ गरम पाण्याचा झरा आहे त्यात भरपूर सल्फेट सापडते त्याच्या आसपासच्या खेडेगावात खरे खुरे टोळीवाले अरब दिसतात सुदर कारपेट टाकून त्यावर पांढऱ्याशुभ्र झग्यातील अरब हुक्का पीत बसलेले दिसतात जवळच त्याच्या बंदुका पडलेल्या असतात शारजा, जैद, फुजीरा खोरफकान, डिब्बा, मसाफी हा रस्ता फार प्रेक्षणीय आहे तसेच वाडी-हट्टाचा रस्ता पण चागला आहे डिसेंबर-जानेवारी महिने सहलीसाठी चागले असतात झाडीप्रमाणेच येथे जनावरेही कमी दिसतात उंट हा राष्ट्रीय प्राणी आहे हे महाराज कधी कधी मोटर-अपघातासही कारणीभूत होतात पण त्याच्या नखालाही धक्का लावणे हा राष्ट्रीय गुन्हा समजून कडक शासन होते इकडचा राष्ट्रीय

पक्षी फाल्कन किंवा बहिरी ससाणा आहे हा फारच रुबाबदार व देखणा आहे त्याची उत्तम बडदास्त ठेवण्यात येते जेव्हा त्याच्या शर्यती लावतात तेव्हा शेख लोकही उपस्थित असतात

अरब लोक सेमेटिक वशाचे असून उचनीच, गोरेपान व धिप्पाड असतात दुबईचे अरब हे अत्यंत मगरूर चढेल उद्दाम व पैशाची गुर्मी असलेले आहेत आपण फेकलेल्या तुकड्यावर पोट भरणारे लोक म्हणून ते आपल्याकडे पहातात आपल्यात मिसळत नाहीत आमच्या सिंधी शेजी बाईला आपल्या स्वयपाकघराची खिडकी सतत बद ठेवावी लागे का तर म्हणे पाठीमागच्या अरबाचा हमामखाना तिकडे येत होता त्याच्या 'हरम' ला तकलीफ होत होती मग मेल्या तू जाळी लाव खिडकीला त्याच्या घरी गेले की 'स्वागत' (म्हणजे बाहेरच्या बाहेर फुटवणार बायको बियकोची ओळख करून देणार नाहीत.) नोकर करणार आमच्या घरी आले की मात्र साताजन्माची ओळख असल्यासारखे गप्पा मारणार अघळपघळ. ह्या अरबाची डाळ शिजू न देणाऱ्या दोन महिलाचा-होय आणि त्यासुद्धा महाराष्ट्रीयन-मला फार अभिमान वाटतो एक उल अहमदिया कपनीच्या चीफ इंजिनियर गोखले ह्याच्या पत्नी अरब देशात अरब मालकाविरुद्ध केस करून ती जिंकलेली ही पहिलीच महिला होय एरवी पैसे बुडाले तरी 'वल्लाह! किती हो तुम्ही चागले, थोडे आणखी का नाही बुडवले' असे वर म्हणत मूग गिळून हात चोळीत बसावे लागते दुसरी माझी मैत्रिण, एलन कोल्हटकर ही गोरीपान, देखणी करारी स्त्री गणपतीपुढे टाळ्या वाजवून धडाधड आरत्या म्हणू लागली की कोणाला वाटणार नाही, ही (तिच्या भाषेत) 'पाववाली' आहे 'ब्रिटीश बँक ऑफ मिडल् इस्ट' च्या चेअरमनची ही पर्सनल सेक्रेटरी होती नेमणूक झाल्यावर तिला मस्टररोलवर सही करण्यास सागण्यात आले 'आधीच्या ब्रिटीश सेक्रेटरीला सही करावी लागत नव्हती सबब मी का म्हणून करावी?' असे ठणकावणाऱ्या एलनने तडफदारपणे व स्वाभिमानाने आपल्या देशाचीही शान वाढविली दुबईला ट्रॅफिक रुल्स फारच कडक आहेत पण ते परकीयांना वतनी अरबांनी मोठा ॲक्सिडेंट जरी केला तरी तिकडे बशोरता पद्धतशीरपणे काणाडोळा करतो पण आपण दुसऱ्याच्या, विशेषत: अरबाच्या गाडीला ओरखडा जरी काढला तरी शिव्यांची लाखोली, वीस हजार रुपये दड, जेल अशी शिक्षा असते पण आमची ही रणरागिणी झाशीची राणी, महिषासूर मर्दिनी शेरावाली काली कल कत्तेवाली भर चव्हाट्यावर चोहो बाजूनी ट्रॅफिक जॅम करून कमरेवर हात ठेवून मध्ये उभी राहून अस्खलित अरबी भाषेत कडाकडा भांडून त्या अरबाच्या चुकीचे मापट त्याच्या पदरात (किती त्याच्या झगाऱ्यात) घालीत असे तिच ते तसे 'सुदर ते रूप सुदर ते ध्यान' पाहिले की मला 'माझी बाळी ती' म्हणत अक्षरश: तिच्या कानशिलावर कडाकडा बोट मोडून तिची मीठ मोहऱ्यानी दृष्ट काढाविशी वाटे

अरबाच्या पांढऱ्याशुभ्र झग्यास 'कदुरा' म्हणतात हिवाळ्यात ते ह्या झग्यावर कोट

घालतात बायका अंगावर काळा बुरखा घेतात पण तोंड मात्र उघडेच असते जुन्या खेडवळ बायका नाक, ओठ, एका काळ्या पट्टीने झाकून घेतात झगझगीत कपड्यांची ह्याना विशेष आवड दिसून येते लेबनीज स्त्रिया मिनी व मिडीज घालतात ओमानी, सोमाली, अरब बायका मिडी फ्रॉकवर मद्रासी मुलीसारखी ओढणी गुंडाळतात डोक्यावर पदरही असतो ह्या बायका चागल्या पावणे सहा-सहा फूट उच, धिप्पाड असतात स्थानिक अरबी स्त्रिया मॅक्सीसारखा लांब झगा घालतात अरबी दिसावयास अतिशय सुदर असतात ईजिप्त लेबनान, जॉर्डन येथील अरबानी पाश्चात्य संस्कृतीचा स्विकार केला असला तरी U.A E व सौदी अरेबियातील अरब हे अत्यत सनातनी व धर्मनिष्ठ आहेत सौदी अरेबियात तर बाईचे नख जरी दिसले तरी नवऱ्याला फटक्याची शिक्षा होते म्हणे। अरबाचे राजकीय, सामाजिक सर्व जीवनच धर्मनियत्रित आहे राजकर्त्यापासून सर्वजण रोज मशिदीत जातात पाच वेळा नमाज पढतात पहाटेच्या प्रशात वेळी 'अल्ला हो अकबर' ही बाग मला अतिशय आवडे त्याच्या काही पद्धती खूप मजेशीर आहेत आपण एकमेकाना भेटल्यावर नमस्कार करतो तर हे लोक एकमेकांच्या नाकाला नाक घासून अभिवादन करतात कोणाही अरबाच्या घरी गेले तर प्रथम छोट्याशा कपात काळी टर्किश कॉफी दिली जाते दुकानात सुद्धा ती नाकारणे अपमानास्पद समजले जाते एकदा घेतल्यावर नको असेल तर कप तिरका करून बशीवर वाजवायचा म्हणजे कळते की तुम्हाला कॉफी नको आहे बाजारातच काय पण एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना वाटेत सुद्धा 'बार-बे-क्यू' खूप दिसून येतात सळयांवर १०-१२ चिकन्स लोणी लावून खरपूस भाजलेल्या दिसत एक अरब लाल लाल झालेल्या गुबगुबीत अशा ५-६ चिकन्स अगदी सहजपणे फडशा पाडतो बहुपत्नीत्वाची चाल अजूनही आहे एखादा अरब आपल्या २-३ बायकाना घेऊन मिशीवर ताव देत आपल्या मर्दुमकीचे ऐटीत प्रदर्शन करीत बाजारात फिरताना पाहून मोठी गमत वाटते दारु पिण्यास धर्माने बदी असल्यामुळे तो गुन्हा समजला जातो रमजानच्या दिवसात रोजे कडक पाळले जातात त्या दिवसात उघड जेवणे, धूम्रपान करणे हाही गुन्हाच समजला जातो सर्व मुसलमानी हॉटेल्स रमजानच्या दिवसात सध्याकाळी पाचपर्यंत बद असतात (हिंदूना जेवणास परवानगी असून हिंदू हॉटेल्स उघडी असतात परतु हिदूनासुद्धा ह्या दिवसात सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास मनाई आहे.) अमेरिकन लोकाप्रमाणेच खाण हा अरबाचाही अतिशय जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे रोजे पाळण्यात त्याना किती कष्ट होत असतील ह्याची कल्पना येईल रोजे सुटण्याच्या वेळी घरी, हॉटेलमध्ये सर्वजण कबाब, रोट्या, भजी, चिकन ह्यानी प्लेट्स भरून जय्यत तयारी करून अक्षरश: अगदी तोंडाजवळ घास घेऊन बसलेले असतात रोजा सुटल्याची तोफ तिकडे डागली गेली रे गेली की त्या क्षणीच ह्याच्या उदरभरणाची सुरूवात झालीच म्हणून समजा सगळ्याच बाबतीतील व्रतस्थपणा परवडण्यासारखा नसल्याने श्रीमत अरब मजा

मारण्यासाठी ह्या दिवसात युरोप अमेरिकेला जाऊन रहातात व गरीब अरब भारतात येतात

शिक्षणाचे व अरबाचे अजूनही वावडेच आहे पैशाच्या सुबत्तेने त्याना जगभर हिंडण्यास मिळते, चांगल्या चांगल्या गाड्या वापरण्यास मिळतात (हो, अगदी १५ ।१६ वर्षांची पोरे मर्सिडीज, पॉंटीॲक गाड्या वाटेल तशा उडवतात व एका महिन्याच्या आत त्याचे डबडे करून फेकून देतात) व चांगले कपडेलत्ते मिळत असल्याने चरितार्थाचे साधन म्हणून शिक्षण घेण्यास त्याना जरूरीच वाटत नाही अर्थात पुढच्या पिढ्याना अशिक्षित राहून फार काळ चालणार नाही हा विचार हल्ली काही विचारवत करीत असल्याने शाळामधून हल्ली मुलांना सर्व तऱ्हेचे उत्तम शिक्षण दिले जाते अबुधाबी, दुबईला 'इंडियन स्कूल' ही आहे मान्यवर भारतीय ह्या शाळांचे विश्वस्त असून अभ्यासक्रम दिल्लीच्या सेंट्रल बोर्ड ऑफ स्कूल एज्युकेशन (सी बी एस ई) यानुसार चालतो पण अरबानी इतर देशीय शिक्षण संस्थांच्या नाड्या आपल्या हातात ठेवण्याची हुषारी दाखविली आहे भारतीयाना अरेबिक भाषा व यु ए. ई सोशल स्टडीज् हे दोन विषय आवश्यक आहेत त्यासाठी शिक्षण खाते अरब शिक्षक नेमते शाळेत विशेषत भारतीय शाळात जरास खुट्ट वाजलं की शिक्षण खात्यात त्याची बित्तबातमी पोहोचते त्यामुळे भारतीय शाळामधून जरी अकरावीपर्यंत शिक्षणाची सोय झाली असली तरी बहुतेक लोक मुल मोठी झाली की शिक्षणासाठी भारतात पाठवून देतात

पूर्वी सांगितल्याप्रमाणे दुबईत ड्राईविंग लायसन्स मिळविणे फार अवघड आणि कटकटीचे असते पूर्वी भारतीय परवाना येथे ग्राह्य समजला जाई पण ह्या सवलतीचा गैरवापर होऊ लागला कोणीही भारतीय मुबईतील खोटे लायसन्स घेऊन बेकायदेशीररीत्या गाडी चालवू लागल्याने ही सवलत बंद करण्यात आली लायसन्सच्या कटकटीमुळे रोज टॅक्सी वापरणे अनेक परदेशी पत्करतात टॅक्सीज इतक्या स्वस्त नाहीत सर्व टॅक्सीज् जपानी गाड्या असून त्याना ठराविक रग नसतो खाजगी गाड्यांवरच दारावर मोठ्या काळ्या वर्तुळात अरबीमध्ये नंबर लिहिलेला असतो नबराची प्लेट इग्लिशमध्ये असते जितका छोटा नबर तितकी गाडी व्ही आय पी ची असते टॅक्सीच्या डोक्यावर बाहेरून एक पिवळा दिवा असतो पॅसेंजर टॅक्सीज् आहेत त्याचे ड्रायव्हर्स 'अबुधाबी-अबुधाबी' 'दुबई-दुबई-दुबई' 'शारजा वाहेद शारजा वाहेद' असे ओरडत असलेले पाहून मला आपल्या दिल्लीच्या I.S.B T ची आठवण झाली

आम्हा बायकाचे दुबईतील जीवन मात्र फारसे आकर्षक नाही सेक्रेटरियल कोर्स केलेल्या, टाईपिंग शॉर्टहॅन्ड येणाऱ्या बायकाना उद्योग मिळू शकतो केरळातून बऱ्याचशा नर्सेस आल्या आहेत मोठमोठाल्या हॉस्पिटल्समधून कोणासही विनामूल्य औषधोपचार

होतो खाजगी दवाखाने आहेत टेलिफोन ऑपरेटर्स, बँकेतील कामाचा अनुभव असणाऱ्या महिला, इंग्रजी माध्यमातून शिकवू शकणाऱ्या शिक्षिकाना थोडाफार वाव आहे काही बायका घरबसल्या 'बेबी सीटींग' ही करतात अमेरिकेप्रमाणे येथेही सर्व घरकाम हाताने करावे लागते बसेस व रेल्वेची सोय नाही कारण खाजगी गाड्यांची संख्या मोठी आहे कडक कायद्यामुळे बायका सर्रास ड्रायव्हिंग करीत नाहीत टॅक्सीज खूप असल्या तरी एकट्या दुकट्या बाईने स्वतत्र टॅक्सीने कुठेही जाणे तितकेसे सुरक्षित नाही त्यामुळे स्त्री ही घरात कोंडल्यासारखी होते (अर्थात फोनवर तास न् तास मैत्रिणीशी गप्पा मारून ती कोंडलेली वाफ दवडते ह्यात नवल काय ?) सुई दोऱ्यापासून ते वॉशिंग मशीन, टी.व्ही खरेदीपर्यत बिचारीला नवरा ह्या एका अत्यत लहरी व मिजासखोर प्राण्यावर अवलबून रहावे लागते येथे शुक्रवारी सुट्टी असल्याने शुक्रवारी शॉपिंगला जाव तर बाजारात सर्व पाकिस्तानी व भारतीय लेबर हिंडत असते बायका माणसाकडे त्याच ते एकटक पहाण प्रथम कससच वाटे पण नतर लक्षात आले त्यात त्याचा काहीही वाईट हेतु नसतो केवळ कुतूहल म्हणून व वर्षानुवर्ष आपल्या कुटुबियांपासून दूर राहिल्याने होमसीक होऊन ते असे पहात कुठल्याही स्त्रीला पाहून त्याना आपल्या आई, बहिण, पत्नी, मुलीची आठवण येणे साहजिकच नाही का ?

मनाचा एकाकीपणा घालवण्यासाठी आम्हाला, शेजीबाईला-मग ती सिंधी असो, लेबनीज असो की पाकिस्तानी-जवळ करून खेळीमेळीची सखी सोबतीण करावी लागते परदेशात राजकीय, धार्मिक भेदभाव पूर्णपणे विसरला जातो उरतो तो फक्त मानवधर्म मी माझ्या पाकिस्तानी शेजारणीची बिर्याणी जितक्या चवीने खाई, तितक्याच आवडीने ती माझी मटकीची उसळसुद्धा अगदी मिटक्या मारीत खाई मला ज्याप्रमाणे लाहोर, कराची पहाण्याची उत्सुकता आहे त्याप्रमाणे तिलाही मुबई, दिल्ली विषयी तीव्र कुतूहल आहे नवऱ्याच्या छळाला कटाळून एक अरबी शेजारीण आपले दुःख हलक करण्यासाठी माझ्याकडे येई

बायकाचा दुसरा सोबती म्हणजे टी व्ही येथे रगीत टी व्ही असून पाच सहा चॅनेल्स वर दुपारी तीन ते रात्री दीडपर्यंत कार्यक्रम चालू असतात Six Million dollar man, Bionic Woman, The Rich man and the poor man ह्यासारखा अमेरिकन सिरीज व Mees, Brothers सारखी ब्रिटीश सिरीज येथे तूफान लोकप्रिय आहेत अरबी चित्रपट व नाटकेही खूप दाखवितात अरबी वाङ्मय खूप समृद्ध आहे प्रेमाचा त्रिकोण कुटूबासाठी, मित्रासाठी त्याग वगैरे आपल्यासारखेच विषय असतात अभिनयाचा दर्जा चागला असतो बहुतेक चित्रपट इजिप्शियन असतात गाणी व नाच लेबनीज मुली करतात काही तरी केसाने झाडण्याचा नाचाचा प्रकार फार लोकप्रिय आहे अरबी लोकांना गाण्याची खूप आवड आहे गाण्यात टाळ्यांचा वापर फार असतो संगीत फारच सुरेल व कर्णमधुर वाटले टी व्ही वर आठवड्यातून दोनदा हिन्दी चित्रपटही दाखवितात हिंदी चित्रपट व गाणी, अरबी, व पाकिस्तानी लोकांना खूप आवडतात

बहुतेक सर्व थिएटर्समधून हिंदी चित्रपट दाखविले जातात एवढेच नव्हे तर, अरबी शाळांच्या परीक्षा जवळ आल्या की मुलं अभ्यास करणार नाहीत म्हणून चांगले हिंदी चित्रपट थिएटर्समधून दाखविले जात नाहीत, परीक्षा झाल्यावर मात्र सतत चार शोज ठेवतात हिंदी चित्रपट, हिंदीचा वापर, दुकानादुकानातून लागलेल्या हिंदीच्या टेप्स, भारतीय लोक व दुकाने ह्यामुळे आपण भारताच्या बाहेर आहोत असे वाटतच नाही मुलसुद्धा शाळा सुटल्यावर खेळण्याची सोय नसल्यामुळे टी व्हीलाच चिकटून बसतात

अबुधाबी व दुबईला उद्याने खास स्त्रियांसाठी राखीव आहेत त्यात केवळ स्त्रिया व बारा वर्षाखालील मुलेच जाऊ शकतात अबुधाबी मध्ये 'इंडियन लेडीज असोसिएशन' (आय एल ए) नावाची खरेखुरे समाज कार्य करणारी स्त्री सस्था आहे मनोरंजन करमणुकीच्या कार्यक्रमाबरोबरच अभ्यासू दृष्टिकोणातून दिलेली व्याख्याने, प्रश्नमंजूषाही येथे होतात ह्या सस्थेने नोकरी करणाऱ्या भगिनींची अडचण ओळखून मोठे पाळणाघर व त्याबरोबरच के जी चा वर्ग चालू करण्याची प्रशसनीय कामगिरी केली आहे दुबईत मोठा इंडियन क्बल आहे पण तेथील विलासी वातावरण, हिंन्यानी मढवलेला, बिअर पिऊन पिऊन शरीराचा ड्रम झालेल्या सिंधी-बायका, त्यांचे विषय माझ्या अभिरूचीला रुचले नाहीत

'मराठा तितुका मेळवावा' ह्या हेतूने दुबईलाही महाराष्ट्र मडळाची स्थापना झाली आहे श्री गजेंद्रगडकर व श्री सुहास कांबळी ह्याच्या अविश्रांत श्रमामुळे त्याची शुक्लेन्दुवत् प्रगति झाली त्यास स्थैर्य प्राप्त झाले असून ते आकर्षक कार्यक्रम सादर करीत आहे तेथील रुक्ष, नीरस, एकाकी, वाळवटी जीवनात ते ओयासिसचे काम करीत आहे गेली दोन तीन वर्षे गणेशोत्सव ही दणदणीत झाला एअर इंडियाही स्पेशल चार्टर प्लेन देऊन मूर्ति फूल आणण्यास मदत करते दुबईचा शेख रशीदही उदारपणे हा उत्सव साजरा करण्यास परवानगी देतो फक्त मोहरमचे दिवस असल्याने मिरवणुकीत आरडाओरडा जल्लोष केलेला चालत नाही गतवर्षी श्री वसंत कानेटकर लिखित व श्री सुहास कांबळी दिग्दर्शित 'प्रेमा तुझा रग कसा ?' हे नाटक यशस्वीरीत्या सादर करण्यात आले सबध मध्यपूर्वेत हे पहिलेच नाटक असल्याने दूरदूरच्या रसिक प्रेक्षकानी त्याला चांगलीच दाद दिली सगीत सम्राट श्री रामदास कामत ह्याचे एअर इंडियाच्या नोकरीनिमित्त सध्या दुबईत वास्तव्य असल्याने त्याच्या मधुर सगीत लहरींनी दुबई बहरून गेली असाच बसत बहार पुढे भीमसेन जोशींनीही आणला ह्या वर्षीही श्री सुनील हत्तगडी दिग्दर्शित 'घेतल शिंगावर' हा फार्सही चागला वठला गेल्या दिवाळीत 'आनद बझार' भरवून आलेले उत्पन्न आंध्र प्रदेश पूरग्रस्तांसाठी देण्यात आले महाराष्ट्र मडळाची सपूर्ण गृहव्यवस्था माझी प्रिय मैत्रिण सौ विजया गजेन्द्रगडकर संभाळीत असे घरी दोन माणस जास्ती झाली की माझी तिरपीट उडते पण ही गणेशोत्सवाच्या सर्व खाण्यापिण्याची व्यवस्था डोक शात ठेवून कुशलतेने हसतमुखाने संभाळत असे कुठेही गोंधळ नाही अनागोंदी कारभार नाही अतिशय उत्तम सयोजिका व प्रबंधक होती ती

चदना कामत, प्रतिभा कावळी, हेमा चोडणकर, सुधा गाडगीळ, शिरोडकर, सरोज अगोळकर, अमिता सरदेसाई, छाया ठाकूर किती नाव घेऊ ? ह्या साऱ्या मैत्रिणींचे प्रेम मी कधींच विसरणार नाही आपल्या गणेशोत्सवाप्रमाणे बगाली दुर्गापूजाही येथे मोठ्या थाटामाटात होते कच्छी लोकानीसुद्धा श्रीनाथजी मदिर बाधले आहे सरदारजींचा गुरुद्वाराही आहे दुबई त्यादृष्टीने हिंदूना खूप सवलती देते सौदी अरेबिया, ओमन येथे हे शक्य नाही

अशी ही दुबई व असे आहे तेथील जीवन पूर्व व पश्चिम जगाचा येथे सगम झाला आहे सध्या माणसापेक्षा इमारती अधिक झाल्या आहेत अनेक लोकाना दुबई सोडून जावे लागत आहे (त्यात आम्हीही आलो) त्यामुळे तेथील जीवन अशाश्वत व अस्थिर झाले आहे नवी तयार होणारी अरबी पिढी लडन प्रशिक्षित आहे बरेचसे लेबनीज डॉक्टर्सही आले आहेत परकीय बुद्धिवंतांची गरज कमी होत आहे सुरुवातीला विकास कार्यासाठी गरजेपेक्षा दुप्पट-तिप्पट मनुष्यबळ आयात केले होते आता गरज सपल्याने हजारोना नोकऱ्यावरून कमी करण्यात येत आहे वाटेल ती नोकरी पत्करण्यापेक्षा स्वदेशात मानाची नोकरी करणे अधिक चागले जेथे फुले वेचली तेथे गोवऱ्या वेचण्याचे नाकारणारी आमच्यासारखी बरीच माणसे मायदेशी परतली स्थानिक कामगार कायद्यातही खूप बदल करण्यात आले स्थानिक कपन्याशी वेगवेगळ्या शेखाचा दुरान्वयाने सबंध असल्याने जेणे करून स्थानिक कपन्यांचा फायदा व्हावा अशा पळवाटा शोधल्या जात आहेत

चर्मचक्षूपुढून दुबई दृष्टिआड झाली असली तरी निळ्या निळ्या पाण्याच्या क्रीकने वेढलेली, हिरव्या निळ्या समुद्राच्या कुशीत विसावलेली, उत्तुग इमारती, चकचकीत रगीबेरगी मोटारींचा सुळसुळाट, इद्रधनुषी निऑन लाइटच्या जाहिरातींचा चमचमाट मिरविणारी ती यक्षनगरी अन्तःचक्षूंसमोर अजूनही नाचत आहे 'यथा काष्ठ च काष्ठ च' अशी माणसाची गाठ पडते, थोडा वेळ ती एकमेकात गुतून जातात मग परत आपापल्या मार्गांनी निघून जातात मागे उरतो तो फक्त स्मृतींचा चदनी सुगध मीही तेथील मित्र-मैत्रिणींच्या रेशमी बधनात गुरफटून गेले होते, ती बंधने अजून सैल झाली नाहीत, होणारही नाहीत

आमच्या समोरच्या बिल्डींगमधील म्हातारा इराणी चौकीदार आपले दतविहीन निरागस हास्य फुलवीत 'क्यों जी अच्छा है ना ?' (कारण तेवढच हिदी त्याला येत होते.) दिवसातून चारदा तरी विचारताना किंवा आमचा म्हातारा पाकिस्तानी चौकीदार पाणावलेल्या डोळ्यांनी 'बेटा, मुलूकसे जल्दी लौट आना, अच्छा ?' म्हणत निरोप देताना अजून दिसत आहे लहानापासून थोरांपर्यंतच्या प्रेमाची ही शिदोरी भविष्यकालीन जीवनाच्या वाटेवरील काटे वेचीत चालताना निश्चितच उपयुक्त ठरेल, नाहीं का ?

इत्यलम् ।

# सुलताना

'एकदा का तुम्ही आमच्या मस्कतला रहायला आलात ना' की तुम्हाला परत दुबईला जावेसेसुद्धा वाटणार नाही आमच्या ह्या सुलतानाच्या अगदी तुम्ही प्रेमात पडून जाल बघा

मस्कत इंटरनॅशनल एअर पोर्टवर उतरल्याबरोबर आमच्या स्वागतास आलेल्या गुलाबसी रतनसींचा मस्कती डाळिंबासारखा लालबुद घवघवीत चेहरा झळकला गेल्या एक महिनाभर तो 'दुबई सोडून इकडे आमच्या कपनीत ये' म्हणून ह्याच्यामागे लागला होता 'निदान २ ।३ दिवस राहून बघून जा, थोडा फार सल्ला दे ' असेही त्याने सागितले, म्हणून आम्ही मस्कतला आलो होतो दुबई-मस्कत फ्लाईट एक तासाची आहे

गुलाबसी भाईच्या भल्यामोठ्या एअरकडिशन्डकारमधून आम्ही त्याच्या व्हिलाकडे चाललो होतो दिल्लीला-जुन्या दिल्लीला-म्हणजे चादणी चौक लालकिल्ला ह्या भागात गेल्यावर जस अस्सल प्राचीन दिल्लीच्या सस्कृतीचे दर्शन होते बाकी नवी दिल्ली इतर चार अद्यावत् शहरासारखीच आहे त्याप्रमाणे इतर अरबी देशापेक्षा ओमानला अस्सल अरबी सस्कृतीचे दर्शन होते त्याचप्रमाणे आग्र्यासारखीच येथेही एक प्रकारची गूढ रम्य उदासीनता जाणवली मस्कत टेकड्यावर वसलेले असल्याने घाटासारखे उंचसखल रस्ते दिसत होते गुलाबसी रतनसीचा व्हिला फारच सुदर होता (ह्या गुलाबसी रतनसी की रतनसी गुलाबसी च्या घोळातून दुबईला परतल्यावरसुद्धा मला बाहेर पडता येईना कपनीच नाव होत रतनसी गुलाबसी अँड को) हा विलायती गुलाब आपल्याला गुलाबसी रतनसी म्हणवून घेत होता मला वाटतं, ह्याच्या प्रत्येक पिढीत रतनसीला गुलाबसी नावाचा मुलगा होत असावा व त्या गुलाबसीला रतनसी नावाचा मुलगा होत असावा असाच घोळ शापुरजी पालमजी की पालमजी शापुरजी मध्ये दिसला) व्हिलातील दालनाचे रग, खिडक्या, दरवाजाचे पडदे, गालिचे ह्या सर्वांची रंगसगति अप्रतिम होती जिन्यावरसुद्धा भव्य पेंटिग्ज, मोठाले फ्लॉवर व्हास दिसत होते लक्ष्मीधराकडे क्वचितच असणारी उच्च अभिरूची व सौंदर्यदृष्टी येथे ठायी ठायी विखुरलेली होती नाही तर दिल्लीला आपला काळा पैसा सत्कारणी लावण्यासाठी सगमरवर, ग्रेनाइट, जयपुरी, गुलाबी पत्थर, हड्या-झुबर ह्यांची रेलचेल करूनसुद्धा सौंदर्याचा लवलेश नसलेल्या बेढब, भडक रंगाच्या व बोजड इटिरिअर डेकोरेशनच्या हवेल्या आपण पहातोच नंतर रात्री मी गुलाबसीभाईच्या सगीत व झकाराच्या कॅसेटसचा संग्रह पाहिला बडे गुलामअली, अब्दुल करीम, फैयाज खाँ, विलायन हुसेन, ओंकारनाथ

ठाकूर, पलुस्कर, बिस्मील्ला खाँ, बुद्धदेवदास गुप्ता अशा अनेक अतिरथी महारथींना त्यानी आपल्या दरबारी ठेवलेले दिसले त्यातही त्यांची उच्चाभिरूची दिसून आली गुलाबसी भाईंच्या पत्नी भारतात गेल्या होत्या पण आमच्या आदरातिथ्यात जरासुद्धा कमतरता दिसली नाही गेल्या गेल्या सुंदर मसालेदार चहा, मग थोड्या वेळाने कच्छी कढी, खाटी दाल, खिचडी, असख्य प्रकारची गुजराथी लोणची व बत्ताशासारख्या पाढऱ्याशुभ्र, बेदाग, पापडासारख्या पातळपण रेशमासारख्या अत्यंत मुलायम असली घी चोपडलेल्या रोटल्या असा साधाच पण रुचकर बेत होता नंतर मुखशुद्धी म्हणून सुकामेवा, व्यवस्थित साल काढून फोडी केलेली, बर्फात ठेवलेली, काळे मीठ व मीरपूड भरभरवलेली रसाळ फळफळावळ भोजन उरकून हे गुलाबसी भाई बरोबर कामाला निघून गेले मी आम्हाला दिलेल्या खोलीत विश्रातीसाठी आले पांच वाजता आम्हाला ह्या सुलतानाच्या दर्शनाला जायचे होते मी समोर टागलेला ओमानचा भव्य नकाशा पाहू लागले

ओमान अरबी द्वीपकल्पाच्या दक्षिण पूर्वेला आहे- कागदोपत्री ह्याचे नाव 'सल्तनत उमान' असे आहे १९७० पर्यंत मस्कत व ओमान वेगवेगळी स्वतत्र राज्ये होती ओमानच्या दक्षिणेस येमेन, पूर्वेला अरबी समुद्र, पश्चिमेला सौदी अरेबिया, उत्तरेला ओमानचे आखात, उत्तर पूर्वेला युनायटेड अरब एमीरेटस् आहेत रास-अल-जिलबा हा लहानसा मुसान्डम द्वीपकल्पाच्यावरील ओमानचे आखात व पर्शियन गल्फमधील प्रदेशाची पट्टी हाही ओमानचाच भाग आहे पण तो U A.E ने अलग केला आहे सन १९५५ मध्ये U A.E च्या दक्षिणेकडे असलेल्या अल-ब्रेमी नावाच्या ओयासिसमधील नऊ गावापैकी तीन गांव बिटनने ओमानला दिली पण अजूनसुद्धा त्या ओयासिसवर सौदी अरेबियाच आपला हक्क सांगत आहे रब-अल-खाल्ली (रिकामा कोपरा) पर्यंत ओमानच्या सीमा भिडल्या असल्या तरी ह्या वाळवंटाच्या पूर्वेकडील भागावरसुद्धा सौदी अरेबियाच आपला हक्क सागत आहे कारण सौदी अरेबिया व ओमान मधील सीमा अजून निश्चित झाल्या नाहीत

ओमानचे क्षेत्रफळ सुमारे १०५००० चौरस मैल आहे ओमानची समुद्रकिनारपट्टी १००० मैल लांब असून ती बुखाजवळ रास-अल-खेमा पासून मुसान्डम द्वीपकल्पाजवळ पश्चिमेला सुरु होऊन येमेनपर्यंत रास-धाबन-अली पर्यंत पसरली आहे अल-बातिनाह, अल-हाजर-अल-धारबी, अल हाजर अश-शार्की, अश-शारकीयाह, अझ-झहीरताह, जलान, मस्कत, रुस-अल-जिबाल, उमान-अल-वुस्ता, धोफार हे ओमनचे जिल्हे आहेत

समुद्रसपाटी, पहाडी प्रदेश व पठार असे ह्याचे तीन भौगोलिक विभाग पडतात

ओमनच्या उत्तर भागात अल-हाजर पर्वताच्या रागा असून त्या रास-अल-जिबाल पासून रास-अल-हद पर्वताशी समांतर आहेत सर्वांत उच शिखर जेबेल अखादर १०,१९४ फूट उच आहे दोफारच्या किनाऱ्यावर सुद्धा पर्वताच्या रागा आहेत

ओमनचे हवामान उष्ण, रुक्ष व रखरखीत आहे किनाऱ्याजवळील प्रदेशात ह्युमिडीटी फार आहे येथे वर्षाला सरासरी तीन ते चार इंच पाऊस पडतो पर्वतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी तेथून ओयासिसपर्यंत भूमिगत नाल्यातून आणण्यात येते

मस्कतची उत्तर-पश्चिम किनारपट्टी बातिनाहचे पठार, ओयासिस व अतर्गत प्रदेश सुपीक व सपन्न आहे येथे १५० मैल लांबवर खजूराचे मळे पसरले आहेत दोफर व मस्कतमधील किनारपट्टी ओसाड आहे पण खुद दोफर अगदी हिरवेगार व सुपीक आहे खजुराचे वार्षिक उत्पादन ५०,००० टन असून तो अधिकतर भारतात निर्यात केला जातो बातिहाला थोडी शेती, खजूर, लिंब, नारळ, पपया, केळी, ऊस, संत्री, द्राक्ष हे उत्पन्न निघते पण महत्त्वाचे खाद्य पदार्थ तादूळ वगैरे बाहेरूनच आणावे लागते जमिनीचे सर्वेक्षण व पाणी पुरवठ्यावर सशोधन करून येथे शेतीचा विकास करण्याच्या योजना आखण्यात आल्या आहेत मस्कतच्या पूर्वेस पर्वताची इतकी गर्दी आहे की प्रवास व शेतीला फारच कमी वाव आहे पाण्याच्या टचाईमुळे शेती फारच मर्यादित आहे

ओमनमध्ये नावाजण्यासारखे उद्योगधंदे नाहीत १९८० मध्ये ताब्याचा व्यवसाय सुरू करण्यात आला उटाची जोपासना देशाच्या अंतर्भागात करण्यात येते ओमनचे उंट संपूर्ण आखाती प्रदेशात प्रसिद्ध आहेत समुद्र किनाऱ्यावर मासेमारीचाही धदा चालतो मासेमारी, पाणी पुरवठा, मातीचे सर्वेक्षण, शेती विकास वगैरे अनेक योजना सरकारने हाती घेतल्या आहेत

सन १९६४ मधे व्यावसायिक दर्जापर्यंत तेलाचे संशोधन झाल्याचे जाहिर करण्यात आले नाति-फुहूद क्षेत्रापासून रब-अल-खालीच्या किनाऱ्यापर्यंत ओमन गल्फच्याखाली पाईप लाईन टाकण्यात आली १९६७ पासून तेलाची निर्यात सुरू झाली १९७१ पर्यंत तेलाचे उत्पादन प्रतिदिवशी ३००,००० बॅरल्स होते पेट्रोलियम ही देशाची एकमेव खनिज सपत्ति होती बाकी उत्पन्न कस्टम ड्युटी व टॅक्स मधून येत असे तेलावर देशाची आर्थिक व्यवस्था अवलबून आहे सध्या येथे १,३८०,००० बॅरल्स तेलाचे उत्पादन होते नातिह, यिबाल, अल-हुवाइशाह येथे तेलाच्या खाणी असून सरासरी २२९,९४७ बॅरल्स तेल प्रतिदिवशी निघते ७५ साली धावा येथे तीन प्लान्टस् सुरु झाल्यापासून हे उत्पादन ३७५००० बॅरल्स वर गेले पेट्रोलियम डेव्हलपमेंटने ओमन व धोफरला मारमूल येथे ड्रीलिंग करून तेलाचे उत्पादन वाढवले ओमन, यू.एन व अरब लीगचे सभासद असले तरी पेट्रोलियम एक्सपोर्टिंग कंपनी चा किंवा अरब पेट्रोलियम एक्स्पोर्टिंगचाही

ओमन हे आफ्रिका व आशियाला जोडणारे व्यापारी केंद्र म्हणून आज शतकानुशतके प्रसिद्ध आहे प्रमुखत' ब्रिटन, भारत, ऑस्ट्रेलिया, जपान व आखाती देशाशी ओमनचा व्यापार चालतो तादूळ, गहू, आटा, दूध व दूधाचे पदार्थ, मशिनरी, सिमेंट, इलेक्ट्रिकल गुड्स, बिल्डींगचे सामान वगैरे पदार्थांची आयात होते व तेल, खजूर, सुकी मासळी, तबाखूची पाने, फळे ह्यांची निर्यात देशाची अर्थव्यवस्था सरकारच्या हाती असून ते सेनेच्या खर्चाच्या ओझ्याने वाकून गेले आहे

ओमनची लोकसख्या सुमारे ८९०,००० असून २०००० लोक स्थानिक आहेत बाकीचे भटके आहेत लोकसख्येच्या५%लोक शहरी आहेत बाकी सर्व ग्रामीण आहेत प्रमुख अरबी लोक असून त्याच्या खालोखाल इराणी, बलूची, पाकिस्तानी, भारतीय व पूर्व अफ्रिकेचे निग्रो आहेत बहुतेक अरब टोळीवाले असून त्यात शतकानुशतके चाललेल्या उत्तर-दक्षिण अरबाचा वैराग्नि धुमसत असतो उत्तरेकडील अरब टोळीवाले निझारचे वशज असून त्याना घाफिरिस असे म्हणतात व दक्षिणेकडील अरब टोळीवाले क्वाधानचे वशज असून त्याना हिनावीज असे म्हणतात ही दुफळी ओमनच्या समाजाचा महत्त्वपूर्ण भाग होता १९७० पर्यंत तो हळूहळू कमी झाला जवळ जवळ ४०,००० लोक धोफरमध्ये राहतात मुत्राह हे दुसरे व्यापारी बंदर आहे मस्कत व मुत्राहची मिळून लोकसख्या २५,००० आहे खोजा जमातीचे (सिंध व कच्छ) पुष्कळसे व्यापारी व गुजराथ, मुबईकडील हिंदू व्यापारी येथे स्थायिक झाले आहेत सोहार, खाबुरा, सूर ही इतर बदरे आहेत ओमन गल्फवरील बलुचिस्तान, किनाऱ्यावरील ग्वाहूर नावाचे बदर १९५८ मध्ये पाकिस्तानला देण्यात आले तेलाच्या व्यवसायामुळे व देशाच्या विकासामुळे अनेक परकीय तज्ज्ञ, इजिनियर्स येथे येत आहेत शिवाय इतर अरब देशातील लोकाची सुद्धा ये-जा चालूच असते

ओमनमध्ये इस्लाम धर्मातील 'इबादीं'चा सर्वात मोठा समूह आहे इबादी ही खारीजीतांची (Kharıjıtıes) एक शाखा आहे हा इस्लाम धर्मापासून वेगळा झालेला पहिला उपपंथ आहे १८ व्या शतकापासून ओमनमध्ये इबादी आपल्या इमामाची निवड करीत असे त्यातील शेवटच्या इमामाने सुलतान सैदला विरोध केल्यामुळे १९५८ मध्ये ब्रिटीशांनी त्याची हाकलपट्टी केली सुलतान क्वाबस हा इबादी असून त्या पथाचा मुख्य म्हणून त्याला स्विकारण्यात आले नाही इबादींनी आपले लक्ष अल-हाजरच्या सपाट प्रदेशात केंद्रित केले नजवा ही इबादीची जुनी राजधानी होती सुन्नी मुस्लिम उत्तरेकडे अझ-झारिआह व जालन मध्ये आहेत तर शिया व इस्माइली मुस्लिम दक्षिणेकडे आहेत १९ व्या शतकात 'वाहा विझम' चे सुद्धा (Fundamentalıst) वर्चस्व पसरले दुबईचा शेख परधर्मसहिष्णु आहे तेथे मंदिरे आहेत, गुरुद्वारा आहे आम्ही गणेशोत्सवसुद्धा

मोठ्या थाटामाटाने साजरा करीत असू फक्त त्याचवेळी मुसलमानाचा मोहरम असल्याने व ते दुःखात असल्याने मिरवणुकीच्या वेळी आरडाओरडा 'गणपति बाप्पा मोर्या, पुढच्या वर्षी लवकर या' सारख्या घोषणा न करता शातपणे जुमेराला विसर्जन करीत असू. पण मस्कतला हिंदू देवाचा फोटो जरी दिसला तरी तो टर्रकन् फाडण्यात येतो

सन १९३२ मध्ये सुलतान सैद-इब्न तैमूर ब्रिटीशाच्या सरक्षणासाठी असलेल्या सल्तनतच्या गादीवर आला त्याने ओमनला सर्व जगापासून अलग ठेवले फक्त ग्रेट ब्रिटन, अमेरिका, व हिंदुस्थानाशीच त्याने सपर्क ठेवला देशाचा फारच थोडा विकास त्याच्या कारकिर्दीत झाला १९७० मध्ये आपल्या पित्याचा पराभव करून सुलतान क्वाबूस इब्ज सैद गादीवर आल्यावर त्याने राज्याच्या विकासाकडे लक्ष पुरविले आतरराष्ट्रीय व अतर्गत व्यापार, उद्योग, दळणवळण वाढविले १९८१ मध्ये ह्या सुलतान क्वाबूस बिन सैद ने तीन हुकूमनामान्वये ४५ सभासदांची सल्लागार समिती नेमली राज्याच्या बारीक सारीक घडामोडीत जातीने लक्ष पुरविले निरनिराळी खाती व मत्रीमडळाने सरकारी यंत्रणा उभारली पण तात्रिक व शासकीय पदाचा भार सांभाळण्यास हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक असल्याने परकीय सल्लागार, (ब्रिटीश अधिकारी) नेमावेच लागत

७१ मध्ये ओमनमध्ये दोन महत्त्वाचे रस्ते होते माराहच्या पुढे मस्कत ते बायन-अल-फालाज च्या मिलिट्री कॅम्पपर्यंतची डाबरी सडक, मालाहच्या पश्चिमेला तेलवाहू जहाजाच्या शेवटच्या स्टॉपपासून तेलाच्या खाणीपर्यंतचा चिखलाने लडबडलेला रस्ता होता १९७१ ला माराहला अत्याधुनिक बंदर तयार झाले व मस्कतला विमानतळ झाला महत्त्वाच्या बंदरावर लहान सहान बोटी उभ्या राहू लागल्या सुहारहून खजूर, सूर व मिरबात हून सुकी मासळी जाऊ लागली सलालालासुद्धा काही जहाजे येत असत पुढे वस्ती असलेल्या जवळ जवळ सर्व शहराना जोडणाऱ्या रस्त्याचे येथे जाळे पसरले १९७६ पासून रस्ते बाधणीचे काम जोरात चालू झाले व १,२७२ किलो मीटर लांबीचे पक्के रस्ते तयार झाले ओमनच्या उत्तरेस मस्कत व सोहार, सोहार व बुरैमी, निझवा आणि बुरैमी, निझवा व सीन वॉटरप्रुफ रस्तेसुद्धा तयार झाले

सीव इटरनॅशनल एअरपोर्टहून (मस्कतपासून २० मैलातून) गल्फ एअरवेजचे बहारीन, दोहा, अबूधाबी, दुबई, कराची बॉम्बेला फ्लाईट्स जातात ब्रिटीश एअरवेजच्यासुद्धा रोज लडनला व लंडनहून येणाऱ्या फ्लाइट्स असतात दुसऱ्या एअरलाईन्स MEA, कुवेत एअर लाईन्स पाकिस्तान एअर लाइन्स, एअर इंडिया, इरान एअर वेज ऊर्र (कार्गो) ट्रेडविंड्स्ट (कार्गो) आहेत

मुत्राहला 'मिना क्वाबूस' नावाचे खोल पाण्यात जाणारे जहाज तयार झाले दळणवळणाच्या साधनात सुधारणा झाल्यामुळे देशाची आर्थिक स्थितीही सुधारली

रोगराई वाढल्याने व बेसुमार शिशुहत्या होत असल्याने ओमनला गंभीर स्वरूपाच्या आरोग्यविषयक समस्याना तोंड द्यावे लागले नव्या नव्या हॉस्पिटल्स, क्लिनिक्ससाठी सरकार पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे सध्या १५ हॉस्पिटल्स, १२ हेल्थ सेंटर्म,४७ डिस्पेन्सरीज आहेत सोहार व सूरला चिल्ड्रन वेलफेअर क्लिनिक्स आहेत.

सुलतान सैदच्या हाताखाली तीन प्राथमिक शाळा असून त्यात ७८००० मुले शिकत होती १९७० साली शाळांची संख्या १५ वर गेली त्यात कन्याशाळाही आहे नऊ सेकडरी स्कूल्स असून त्यात ६८५ विद्यार्थी शिकत आहेत उच्च शिक्षणासाठी परदेशी जावे लागते टेक्निकलर शेतकीच्या प्रशिक्षण योजना चालू आहेत ओमनची पहिली युनिव्हर्सिटी नझवा येथे १९८१ मध्ये बाधण्यात प्रारंभ झाला साक्षरता प्रसारासाठी कार्यक्रम व योजना आखण्यात येत आहेत

ओमनचे सास्कृतिक जीवन पूर्णपणे इस्लामवर आधारित आहे शिल्पकलेचे सुंदर नमुने विशेषत प्राचीन किल्ल्यामध्ये विखुरलेले आहेत प्रिंटीग प्रेसच्या अभावी साहित्याची वाढ खुटली आहे पण धार्मिक व ऐतिहासिक विषयावर भरपूर हस्तलिखिते मिळतात सुलतान सैदच्या कारकिर्दीत सगीत सिनेमा व इतर चैनीच्या कार्यक्रमाना, करमणुकींना बदी होती १९७० नतर येथील सांस्कृतिक जीवन फळफळले. ओमनचे पहिले वर्तमानपत्र बेरुतला छापण्यात आले

ओमनचे राष्ट्रीय निशाण लाल-सफेद-हिरव्या ह्या तीन रगाचे आहे ब्रिटीश सरकार व ओमनमध्ये आज दिडशे वर्ष व्यापार व आरमारात करार झालेला आहे

ओमनच्या सेनादलात आठ इन्फेन्टरी बटालियन्स असून ११५०० सैनिक आहेत नेव्हीमध्ये दोन जलद गतीची मिझाईल्स, सशस्त्र पेट्रोल बोटी, चार जलद गतीच्या बोटी, एक शाही आरमार आहे तीन सशस्त्र मिझाइल्स जलद हल्ल्यासाठी तयार होत आहेत चौदा किनाऱ्यावरील पेट्रोल बोटी आहेत १५०० अधिकारी आहेत

१९५९ मध्ये ह्याचा एअर फोर्स तयार झाला त्यात २१०० हवाई सैनिक आहेत जागुअर्सचे हल्ला करणारी विमाने, जमिनीवरून हल्ला करणारी विमाने, स्क्वार्डन स्ट्राईक मास्टर्स, लाइट जेट ट्रेनिंग, अॅटॅक एअर क्राफ्टस, ३ BAC पन इलेव्हन-ट्विन टरबोफॅन ट्रान्सपोर्टस, एक फाल्कन VIP ट्रान्स्पोर्ट, lc-130, H हर्क्युलस, एक ट्विन, टरबोप्रॉप बफेलो, सात डिफेन्डर, १५ श्यावान लाइट ट्रान्सपोर्ट, २७ ऑगस्टा-वेल, २०५, २१२, २१४ बी संरक्षणार्थ जेट, टेलिकॉप्टर्स, दोन ब्रेव्हो पिस्टन इजिन असलेली ट्रेनर्स आहेत

मस्कत व मुलाहला सल्तनत पोस्ट ऑफिस आहे PO बॉक्स पद्धती येथे आहे मस्कतला ऑटोमॅटीक टेलिफोन एक्सेंज ऑफिस असून त्याला १३०६८ लाईन्स जोडलेल्या आहेतच मुलाह-बैत-अल-फालाज-मित-अल-फाहाल व ऑईल कपनी

टर्मिनलला संपर्क करता येतो. १९७२ मध्ये हाय फ्रिक्वेन्सी रेडिओ लिंक झाल्यामुळे येथून इतरजगाशी व्यवस्थित सपर्क साधता येतो अतर्गत सर्व्हिस मध्ये रेडिओ टेलिफोन टेलेक्स, टेलिग्राफ सर्व्हिस, सलाला व मस्कतला डायरेक्ट होते VHF रेडिओ लिंक सीव इटरनॅशनल एअरपोर्ट व मस्कत मध्ये आहे विमानतळ SITA टेलेक्सपद्धती आहे येथे १९७२ मध्ये सौदी रियाल जाऊन ओमानी रियाल आला १००० बैझा म्हणजे एक रियाल होतो

सध्याकाळी पाच वाजता आम्ही ह्या सुलतानाच्या दर्शनार्थ निघालो सृष्टीच्या कणाकणातून खरच नित्य नवे सौंदर्य तराणे निघतात नाही ? येथे निसर्गाचे नेहमीचे हिरवेगार सौंदर्य नव्हते तर एक आगळे वेगळे गूढरम्य सौंदर्य दिसत होते पिवळी वाळू, पिवळे उघडे बोडके डोंगर त्यामधील पिवळ्या दगडाची घरे आणि ह्या सर्वांवर सूर्याच्या कोवळ्या उन्हाने पसरलेली सोनेरी शाल एक वेगळीच किमया करून इन्द्रजाल निर्माण झाले होते मला जसेलमेरची आठवण झाली जयपूरच्या गुलाबी कोड्यापेक्षा ते सोनेरी स्वप्न मला अधिक भावले होते

प्रथम आम्ही मस्कतचे तीन मोठमोठे म्युझियन्स पाहिले तेथे ह्या देशाची शिल्पकला, इतिहास, व भौगोलिक माहिती मिळते त्याचप्रमाणे ओमनचा दिव्य भव्य इतिहास, आधुनिक मजबूत वर्तमान व उज्ज्वल भविष्याचेही दर्शन घडते शापूरजी पालमजी कपनीने येथील सुलतानाचा भव्य पॅलेस बाधला आहे आधुनिक व प्राचीन शिल्पकलेचा तो एक सुदर नमूना आहे. ह्या प्रासादाखाली भूयारातून समुद्रमार्गे वेळ पडल्यास पलायन करण्याचा गुप्त मार्ग आहे शिवाय प्रासादाच्या विशाल गच्चीवर हेली-पॅडही आहे डोक्यावर एका केसावर आधारलेली टागती तलवार घेऊन वावरणाऱ्या ह्या सुलतान मडळींना अशा पळापळींच्या वेळा सागून येत नाहीत म्हणून ह्या सोयी

मला माझ्या लाडक्या समुद्रालाही भेटायची घाई झाली होती तशी दुबईला आमच्या घराच्या गोलाकार गॅलरीतून समोरील हिरवी निळी खाडी व तिच्यामागे धीरोदात्त नायकासारखा उभा असलेला विशाल सागर मी रोज पहात होते पण येथे डोंगर कड्यावरून खाली किल्ल्याच्या भिंतींना धडका मारणारा उसळणारा समुद्र पहायचा होता ह्या किनाऱ्यावर १६ व्या शतकातील जलाली व मिरानी हे किल्ले उसळणाऱ्या लाटांचे तडाखे अंगावर घेत अजून ठामपणे उभे आहेत येथून कितीतरी कैद्याचा समुद्रात झालेला कडेलोट त्यानी पाहिला आहे संपूर्ण ओमनमध्येच प्राचीन किल्ल्याची लयलूट आहे निझवा ही ओमनची पूर्वीची राजधानी दक्षिण पश्चिमेला असून येथेही प्राचीन भव्य किल्ले आहेत निझवाला आपल्या प्राचीन बाजारपेठेचा फार अभिमान आहे शुक्रवारी बाजाराच्या मुख्य दिवशी जवळपासचे शेतकरी बकरे, गाईचे कळप आणतात जवळच

१७ व्या शतकातील सुलतान इब्न-सैद-किल्ला आहे

मस्कतचा समुद्रकिनारा म्हणजे सहलीचे एक सुदर ठिकाण आहे अतरा अतरावर बेंचेस आहेत किनाऱ्याजवळील गल्ल्यात छोटी छोटी दुकाने आहेत ह्या 'सुक' मध्ये हरविण्याची मुळीच भीति नाही वाट चुकली तरी पुढे येऊन कोणी तरी हसतमुखाने रस्ता दाखवित होते ह्या बाजारात जुन्या घडणीचे दागिने, तांब्याची भाडी विणलेल्या पिशव्या मिळतात

परत येताना रात्र झाली टेकड्या टेकड्यातून वळणावळणातून दुस्तर हा वाट ओलांडताना इमारतींच्या लखलखणाऱ्या नवलाख दिव्यानी नटलेल्या सुलतानाचे सौंदर्य अनुपम दिसत होते

दुसऱ्या दिवशी सकाळच्या फ्लाइटने आम्ही सलालाला निघालो मस्कत-सलाला फ्लाईट अर्ध्या तासाची आहे सलाला ही दक्षिण ओमनमधील दोफार जिल्ह्याची राजधानी असून ते रासूत चे प्रमुख बदर आहे सुलतान अनेकवेळा येथे राहतो नारळी, पोफळी, केळीची घनदाट बने पाहून मला कारवारची आठवण झाली येथे तसे बघण्यासारखे काहीच नाही आम्ही प्रथम गुलाबसी भाईंच्या कपनीच्या कॉलनीत गेलो तेथे त्यांची बहिण व मेव्हणे होते येथेही आमचे मोठ्या प्रेमाने स्वागत व आदरातिथ्य झाले ह्या कच्छी-गुजराथी लोकाच्या यशाची गुरुकिल्ली त्याच्या आर्जवी, गोड वागण्यात असते सगळ्याची वाणी कशी अगदी पाकात घोळवलेल्या मालपुव्यासारखी मिष्ठास जेवण झाल्यावर आमची उतरण्याची व्यवस्था 'हॉलिडे इन' मध्ये करण्यात आली होती हॉटेलमधील कितीतरी भारतीय कर्मचारी आम्हाला भेटण्यास आले कोकणच्या बाल्याना मुबईला कोकणातून आलेला गाववाला भेटल्यावर जसा आनद होतो तसाच आनद ह्याच्या चेहऱ्यावरून ओसडून वहात होता

'हॉली डे इन' च्या मागच्या बाजूलाच समुद्र किनारा आहे मी तिकडे जाऊन मऊशार वाळूत बसले एकटीच समोर अफाट सागर पसरला होता अगदी शात शात मला वाटल, मनमुराद धुडगुस घातल्यावर आईने रागाने दामटून निजविलेल्या हट्टी बालकासारखा सागर पहुडला होता मध्येच कोमल, किसल्याप्रमाणे त्यावर होणारी नाजुक थरथर त्या बाळाच्या दाटून येणाऱ्या हुदक्यासारखी वाटत होती माझ्याबरोबर असलेल्या टेपरेकॉर्डवर अनूप जलोटाची गजल गुणगुणत होती

दहर के इस वीरानों मे
जो कुछ भी नजारा करते हैं
अश्कोंके जबाँ में कहते हैं
आहों में इशारा करते है ॥


खूप दिवसानी असा एकात मिळाला होता हवा हवासा वाटणारा मला वाटल जोराने ओरडून सांगाव, 'इस सूने वीराने की मैं हूँ रानी मतवाली ।'

सारं वातावरण स्तब्ध शात-नारळी पोफळीच्या झावळयासुध्दा मत्रमुग्ध होऊन खिळल्या होत्या काळसुद्धा थाबला होता समोर अफाट दर्या व वर निळे आभाळ-पश्चिम क्षितिजावरील भाळावर एखाद दुसरी सावळ्या ढगाची डौलदार कुरळी बट रुळत होती एखाद्या पारव्याने आपले पख मिटून घ्यावे तसे आकाश नि'शब्द होते सारे कसे शांत शात होते त्या सथ निळ्याशार पाण्यातील सुजाण आशय मी जाणून घ्यायचा प्रयत्न करीत होते कारण अशा शात वेळी नेहमींचे अबोल मन मुखर होते, त्यातील वादळे बाहेर येतात, कधी ही कळत नाही ते कळू लागते मी घाबरले, आतापर्यंत' ह्या वीराणीची स्वामिनी झाल्याचा माझा गर्व, ताठा पराभूत होऊन पळून गेला, एकदम पोरक पोरक मला वाटू लागल, वाटल ह्या दाटल्या दर्याकिनारी एकटी अनिकेता मी, बाहेरच्या वादळाना तोंड देणारी मी मनातील वादळांना तोड देऊ शकत नाही

थोड्या वेळाने ही कातरवेळ जाईल, काजळमाया दाटून येईल, त्या काजळकोषातून नक्षत्राचे असख्य कोंब फुटतील पण

ही सध्याकाळ माझ्या मनात अमर होईल !

* * *



उघडली मूठ तलवारीची !

# दमिष्क

कोणाला वेड कनकाचे तर कोणाला वेड कार्पण्याचे दुबईचे वास्तव्य म्हणजे अळवावरील पाणी ! कधी सर्रकन् निसटून जाईल ह्याची काही शाश्वति नाही त्यामुळे कमीत कमी वेळात जास्तीत जास्त सोनं व आपली गंगाजळी पुष्ट कशी बनेल अशी इकडे चढाओढ लागलेली आम्ही दुबईहून परत आल्यावर प्रत्येक जण अगदी सात्विक संतापाने 'हे काय ? तुम्ही व्हिडीओ, कलर टी व्ही काही आणला नाही ? अरे मूर्खांनो, निदान ब्राउन किंवा केनवूडचा मिक्सर तरी आणायचा रे !' त्यांच्या त्या जळजळीत नजरा पाहून मे आम्हाला ह्या अपराधाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नाही असे ठणकावणार असे वाटे गोव्याला गेला की काजू-कोकम-आणलीच पाहिजेत तसे हाँग-काँग सिंगापूर किंवा दुबईला गेल्यावर कलर टी व्ही, व्ही.डी.ओ आणलाच पाहिजे असा हल्ली अलिखित नियम झाला आहे असो हा प्रत्येकाच्या आवडी निवडीचा भाग आहे पण आमचे पतिराज म्हणजे रमता जोगी ! 'ह्या सर्व गोष्टी आता इंडियातही चांगल्या मिळतात आपला सुमित मिक्सर केनवुड ब्राऊनच्या तोडीचा आहे गोदरेजचा फ्रीज तर आता एक्स्पोर्टही होतो शिवाय ह्या वस्तु बाहेरून आणल्या तर त्याचे पार्टस् खराब झाले की येथे मिळत नसल्याने वांदे येतात दुरुस्तीचा खर्चही भरमसाठ असतो मग तो इम्पोर्टेड फ्रीजच कपड्याच कपाट करायचं का ? त्यापेक्षा जग बघण्याचि संधी परत मिळणार नाही तेव्हा जितकं जग पाहून घेता येईल तेवढ पाहून घ्याव' असा सिंदबादी कलंदरी विचार त्यांच्या मनात न येईल तर नवल खरच जग इतके सुंदर आहे की, 'ह्याचि देही ह्याचि डोळा' सर्व पहाणे शक्य नाही पण जेवढ जग आम्ही पाहिल ते इतकं सुंदर व विविध रूपाने नटलेले आहे की आपला पैसा नाहक खर्च झाला असे आम्हाला कधीही वाटले नाही शिवाय दुबईहून कुठलाही Visa मिळण भारतासारख कटकटीच नसल्यामुळे आम्ही कैरोहून सीरीयाकडे आपला मोर्चा वळविला

सीरीयन एअरवेज ने आम्ही कैरो सोडले त्यावेळी रात्रीचे दहा वाजले होते दुपारी बारा वाजता हॉटेल सोडायचे असल्यामुळे तेव्हापासून आम्ही एअरपोर्टवर तळ ठोकला होता, पण वेळ कसा गेला, कळलं नाही कैरो ते दमास्कस हा प्रवास दोन तासाचा आहे सीरीयाची राजधानी दमास्कस ह्याचा खरा उच्चार 'दमिष्क' असा आहे फ्रेंच लोकांना ह्यास दमास्कस असे रूप दिले इंग्रजानी नाही का भारतातील किती तरी नावे बदलली ? ठाकूरचे टागोर केले, खडकीला तिरकस किरकी बनविले, मुंबईचे बॉम्बे केले चालायचेच हम कुछ कम नहीं जनाब ! त्यांच्या एल्फिन्स्टनचा 'इस्तुरफाकडा' केला

ग्रीकाच्या सॉक्रिटीसचा 'सुकरात' बनविला

काही कारणाने (अस कशाला, आम्ही विमानात मौजूद होतो हेच भक्कम कारण पुरेसे आहे) आमचे विमान रात्री आठला सुटण्याऐवजी दहाला सुटले आणि आम्ही दमास्कसला रात्री १२ ॥ वाजता पोहचलो नवीन प्रदेश, सर्वत्र अरबी आणि फ्रेंच भाषेचा फसफसाट. तेव्हा रात्री हॉटेलमध्ये जायचे कसे हा प्रश्न 'आ' वासून समोर उभा होता आमचे तिकीट कैरो-दमास्कस-दुबई असे होते आम्हाला दमास्कसला थांबून (Stopover) मग दुबईला जायचे होते कुठल्याही देशात एअर बुकींग काऊंटरवरील कर्मचाऱ्याना थोडे फार इंग्रजी येते असा आमचा अनुभव असल्याने ह्यानी त्या काउंटरवर चौकशी केली त्याने आमच्या तिकीटावर एक उडती नजर फेकली पण बहुधा बाळ झोपेने अगदी पेंगुळलेले असल्यामुळे त्याने काहीही विचार न करता सांगितले, 'दुबईची फ्लाइट जाऊन एक तास झाला आता दुसरी उद्या सकाळी दहा शिवाय नाही तेव्हा नियमाप्रमाणे तुमची सोय येथे पचतारांकित हॉटेलमध्ये करण्यात येईल व तुम्हाला विमानतळावरून हॉटेलवर पोहोंचविण्याची सोय विमान कपनीच करेल' त्याने परत बजावले 'विमान कपनी फक्त एका रात्रीचेच हॉटेलचे बील देईल बर का' वास्तविक आम्ही दमास्कसला रहाणार होतो त्यामुळे ही सवलत आम्हाला मिळणे शक्य नव्हते कुठल्या घबाड मुहूर्तावर आम्ही निघालो होतो देव जाणे पण आमचा अचानक असा लाभ झाला मी मात्र प्रामाणिकपणे 'कायस्थाचे इमान' दाखविण्याचा प्रयत्न करू लागले, 'अहो, तुमचा गैरसमज होतो आहे आमची दुबईची फ्लाईट वगैरे काही चुकली नाही आम्हाला ५ ।६ दिवस दमास्कसला रहायच आहे' पण त्याने मलाच परत दम दिला 'तुम्हाला एकदा सागितलं ना की नियमाप्रमाणे फक्त एक रात्र हॉटेल फुकट मिळेल, जास्त नाही' त्याच्या छोट्याशा मेंदूचा परत गैरसमज झाला असावा की आम्ही ५ । ६ दिवस फुकट राहू द्या असा आग्रह धरीत आहोत एकूण असा १०० ।१५० सीरीयन पौंडांचा अचानक फायदा होत असल्याने आता जास्त प्रामाणिकपणा दाखविण्यात अर्थ नव्हता दमास्कसला व्हिसा विमानतळावरच पाच सीरीयन पौंड देऊन मिळतो वरील कर्मचाऱ्याचा असा गोड गैरसमज झाल्यामुळे त्याने व्हिसा सुद्धा विनामूल्य मिळवून दिला हॉटेलसाठी त्याने एका रात्रीचे कुपनही दिले (त्यात चहा आणि ब्रेकफास्ट समाविष्ट होता.) विमान कपनीच्या गाडीने आम्हाला हॉटेलवर सोडण्यात आले विमान तळ ते हॉटेल सुमारे ३० सीरीयन पौंड (१२५ रु) टॅक्सीचा खर्च येतो अर्थात तेही वाचले विमानतळ सोडताना काउंटरवरील त्या थोर कर्मचाऱ्याने आम्हाला परत बजावले की, 'हे पहा, उद्या जर हॉटेल सोडले नाही तर आमची जबाबदारी नाही' आणि कर्तव्यपूर्तीचा सात्विक आनदात तो परत डुलक्या घेऊ लागला आम्ही आपल्या मायबोलीत त्याला दुवा देत म्हटले, 'मठ्ठ माणसा, आम्ही तुझे फार फार आभारी आहोत'

# दमिष्क

कोणाला वेड कनकाचे तर-कोणाला वेड कार्पण्याचे दुबईचे वास्तव्य म्हणजे अळवावरील पाणी ! कधी सर्रकन् निसटून जाईल ह्याची काही शाश्वति नाही त्यामुळे कमीत कमी वेळात जास्तीत जास्त सोन व आपली गगाजळी पुष्ट कशी बनेल अशी इकडे चढाओढ लागलेली आम्ही दुबईहून परत आल्यावर प्रत्येक जण अगदी सात्विक सतापाने 'हे काय ? तुम्ही व्हिडीओ, कलर टी व्ही काही आणला नाही ? अरे मूर्खांनो, निदान ब्राउन किंवा केनवूडचा मिक्सर तरी आणायचा रे !' त्याच्या त्या जळजळीत नजरा पाहून ते आम्हाला ह्या अपराधाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नाही असे ठणकावणार असे वाटे गोव्याला गेला की काजू-कोकम-आणलीच पाहिजेत तसे हॉंग-कॉंग सिंगापूर किंवा दुबईला गेल्यावर कलर टी व्ही, व्ही डी ओ आणलाच पाहिजे असा हल्ली अलिखित नियम झाला आहे असो हा प्रत्येकाच्या आवडी निवडीचा भाग आहे पण आमचे पतिगज म्हणजे रमता जोगी ! 'ह्या सर्व गोष्टी आता इडियातही चागल्या मिळतात आपला सुमित मिक्सर केनवुड ब्राऊनच्या तोडीचा आहे गोदरेजचा फ्रीज तर आता एक्स्पोर्टही होतो शिवाय ह्या वस्तु बाहेरून आणल्या तर त्याचे पार्टस् खराब झाले की येथे मिळत नसल्याने वादे येतात दुरुस्तीचा खर्चही भरमसाठ असतो मग तो इम्पोर्टेड फ्रीजच कपड्याच कपाट करायच का ? त्यापेक्षा जग बघण्याचि संधी परत मिळणार नाही तेव्हा जितकं जग पाहून घेता येईल तेवढ पाहून घ्याव' असा सिदबादी कलदरी विचार त्याच्या मनात न येईल तर नवल खरच जग इतके सुदर आहे की, 'ह्याचि देही ह्याचि डोळा' सर्व पहाणे शक्य नाही पण जेवढं जग आम्ही पाहिल ते इतक सुदर व विविध रूपाने नटलेले आहे की आपला पैसा नाहक खर्च झाला असे आम्हाला कधीही वाटले नाही शिवाय दुबईहून कुठलाही Visa मिळणं भारतासारखं कटकटीच नसल्यामुळे आम्ही कैरोहून सीरीयाकडे आपला मोर्चा वळविला

सीरीयन एअरवेज ने आम्ही कैरो सोडले त्यावेळी रात्रीचे दहा वाजले होते दुपारी बारा वाजता हॉटेल सोडायचे असल्यामुळे तेव्हापासून आम्ही एअरपोर्टवर तळ ठोकला होता, पण वेळ कसा गेला, कळल नाही कैरो ते दमास्कस हा प्रवास दोन तासाचा आहे सीरीयाची राजधानी दमास्कस ह्याचा खरा उच्चार 'दमिष्क' असा आहे फ्रेंच लोकाना ह्यास दमास्कस असे रूप दिले इंग्रजांनी नाही का भारतातील किती तरी नावे बदलली ? ठाकूरचे टागोर केले, खडकीला तिरकस किरकी बनविले, मुबईचे बॉम्बे केले चालायचेच हम कुछ कम नहीं जनाब ! त्याच्या एल्फिन्स्टनचा 'इस्टुरफाकडा' केला

ग्रीकाच्या सॉक्रिटीसचा 'सुकरात' बनविला

काही कारणाने (अस कशाला, आम्ही विमानात मौजूद होतो हेच अवकाश कारण पुरेसे आहे) आमचे विमान रात्री आठला सुटण्याऐवजी दहाला सुटले आणि आम्ही दमास्कसला रात्री १२ ॥ वाजता पोहचलो नवीन प्रदेश, सर्वत्र अरबी आणि फ्रेंच भाषेचा फसफसाट तेव्हा रात्री हॉटेलमध्ये जायचे कसे हा प्रश्न 'आ' वासून समोर उभा होता आमचे तिकीट कैरो-दमास्कस-दुबई असे होते आम्हाला दमास्कसला थाबून (Stopover) मग दुबईला जायचे होते कुठल्याही देशात एअर बुकींग काऊटरवरील कर्मचाऱ्याना थोडे फार इग्रजी येते असा आमचा अनुभव असल्याने ह्यानी त्या काउटरवर चौकशी केली त्याने आमच्या तिकीटावर एक उडती नजर फेकली पण बहुधा बाळ झोपेने अगदी पेंगुळलेले असल्यामुळे त्याने काहीही विचार न करता सागितले, 'दुबईची फ्लाइट जाऊन एक तास झाला आता दुसरी उद्या सकाळी दहा शिवाय नाही तेव्हा नियमाप्रमाणे तुमची सोय येथे पचतारांकित हॉटेलमध्ये करण्यात येईल व तुम्हाला विमानतळावरून हॉटेलवर पोहोचविण्याची सोय विमान कपनीच करेल' त्याने परत बजावले 'विमान कपनी फक्त एका रात्रीचेच हॉटेलचे बील देईल बरं का' वास्तविक आम्ही दमास्कसला रहाणार होतो त्यामुळे ही सवलत आम्हाला मिळणे शक्य नव्हते कुठल्या घबाड मुहूर्तावर आम्ही निघालो होतो देव जाणे पण आमचा अचानक असा लाभ झाला मी मात्र प्रामाणिकपणे 'कायस्थाचे इमान' दाखविण्याचा प्रयत्न करू लागले, 'अहो, तुमचा गैरसमज होतो आहे आमची दुबईची फ्लाईट वगैरे काही चुकली नाही आम्हाला ५ ।६ दिवस दमास्कसला रहायच आहे' पण त्याने मलाच परत दम दिला 'तुम्हाला एकदा सागितल ना की नियमाप्रमाणे फक्त एक रात्र हॉटेल फुकट मिळेल, जास्त नाही' त्याच्या छोट्याशा मेंदूचा परत गैरसमज झाला असावा की आम्ही ५ । ६ दिवस फुकट राहू द्या असा आग्रह धरीत आहोत एकूण असा १०० ।१५० सीरीयन पौंडाचा अचानक फायदा होत असल्याने आता जास्त प्रामाणिकपणा दाखविण्यात अर्थ नव्हता दमास्कसला व्हिसा विमानतळावरच पाच सीरीयन पौंड देऊन मिळतो वरील कर्मचाऱ्याचा असा गोड गैरसमज झाल्यामुळे त्याने व्हिसा सुद्धा विनामूल्य मिळवून दिला हॉटेलसाठी त्याने एका रात्रीचे कुपनही दिले (त्यात चहा आणि ब्रेकफास्ट समाविष्ट होता.) विमान कपनीच्या गाडीने आम्हाला हॉटेलवर सोडण्यात आले विमान तळ ते हॉटेल सुमारे ३० सीरीयन पौंड (१२५ रु.) टॅक्सीचा खर्च येतो अर्थात तेही वाचले विमानतळ सोडताना काउटरवरील त्या थोर कर्मचाऱ्याने आम्हाला परत बजावले की, 'हे पहा, उद्या जर हॉटेल सोडले नाही तर आमची जबाबदारी नाही' आणि कर्तव्यपूर्तीचा सात्विक आनंदात तो परत डुलक्या घेऊ लागला आम्ही आपल्या मायबोलीत त्याला दुवा देत म्हटले, 'मठ्ठ माणसा, आम्ही तुझे फार फार आभारी आहोत'

आमचे हॉटेल अर्थात् चागले होतेच दर सुमारे १०० सीरीयन पौंड (४०० रु) दमास्कस गोलन पर्वताच्या रांगात असल्यामुळे येथे हवामान थड आहे आम्ही मार्चमध्ये गेलो होतो तेव्हा चागलेच गार होते हॉटेलच्या मॅनेजरने खोली गरम करण्याची व्यवस्था दाखविली दमास्कसला रात्री १२ ॥ ला पोहोंचल्यापासून सर्व सव्यापमव्य करीपर्यंत तीन वाजले होते उबदार खोलीत आम्ही जे झोपून गेलो ते सकाळी दहा वाजता उठलो उठल्यावर प्रथम मनात विचाराला तो हॉटेलच्या दराचा विमान कंपनीच्या सौजन्याने ह्या महागड्या हॉटेलात एक रात्र फुकट तर काढली पण आणखी तीन चार दिवसाचे काय ? आम्ही हॉटेलच्या मॅनेजरला स्पष्ट सागितले, हे पहा, तुमचा दर आम्हाला परवडणार नाही पण काही सवलत दिलीत तर आम्ही ४ । ५ दिवस राहू. दमास्कस चागले 'मे' महिन्यापर्यंत थंडगार असते, व टुरीस्ट सीझन त्यानंतर सुरू होतो त्यामुळे हॉटेल ओसच पडले होते व्यवस्थापकाने 'बेकार से बेगार' भली ह्या न्यायाने ५० टक्के सवलत दिली हॉटेलची नीट व्यवस्था झाल्यामुळे आम्ही अगदी आरामात निवातपणे चहा व नाश्ता घेतला त्या दिवशी काहीही न करता हॉटेलमध्येच बसून राहिलो व येथील प्रेक्षणीय स्थळांची चौकशी केली

सीरीया (ऑफिशिअली अल-जम्हुरिया-अल अरबिया-सुरीया) भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर असून आशिया खडाच्या दक्षिण पश्चिम भागातील फार प्राचीन सस्कृतीचा देश आहे ह्याचे क्षेत्रफळ ७१४९८ चौरस मैल असून लोकसख्या दीड कोटी आहे सीरीयाच्या उत्तरेला तुर्कस्थान व इराण, पूर्वेला इराक, दक्षिणेला सौदी अरेबिया, पश्चिमेला जॉर्डन, इस्राइल, लेबनॉन, व भूमध्य समुद्र असल्याने रशियाच्या दृष्टीने सीरीयाला फार महत्त्व आहे

जाबाल पर्वताच्या रागा सीरीयाच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरल्या आहेत ह्याची रुदी २० मैल व उची उत्तरेला ३००० फूट, दक्षिणेला २००० फूट आहे क्वॉलमन सिनीर ह्या पर्वताच्या रागा लेबनॉनच्या हद्दीला भिडतात सीरीयाचे सर्वोच्च शिखर जब्दानी सॅडल (उची ९,२३२ फूट २८१४ मीटर्स) आहे दुसऱ्या पर्वतापैकी जबाल-अल-ड्रूझ (उची ५,९०५ फूट, १८०० मीटर) अगदी दक्षिणेला आहे पामुरा व जबाल-अश-शार्की पर्वताच्या रागा सीरीयाच्या मध्यभागात उत्तर पूर्वेला असून जबाल-अझझाबियाह धाब खोऱ्याच्या पूर्वेला आहे पूर्वेला अब्द-अल-अझीझ पर्वत आहे

मध्यपूर्वेला तैग्रीस व यूफ्रेटीस ह्या दोन अत्यत महत्त्वाच्या नद्या तुर्की पहाडात उगम पावून सीरीयातून इराकला वहात जातात यूफ्रेटीस नदी तर सीरीयाचीच आहे, असे म्हणावयास हरकत नाही ही सबध देशाला प्रमुख पाणी पुरवठा करण्याचे साधन आहे नौकानयनासाठी ही देशातील एकमेव नदी आहे देशाच्या पूर्व भागातून ही पश्चिम भागाकडे वहाते जाब, जाधाह, बालीख, साजुर ह्या यूफ्रेटीसच्या उपनद्या आहेत पहाडी

प्रदेशातील ओरोन्टस् ही प्रमुख नदी आहे; ही लेबनॉनमध्ये उगम पावून पर्वतश्रेणीतून व घाब खोऱ्यातून उत्तरेकडे वहात जाऊन तुर्कस्थानातील आन्टीओजवळ भूमध्य समुद्राला जाऊन मिळते यारमुख नदी जॉर्डन नदीची उपनदी आहे जॉर्डन नदी आपल्या गगा नदीप्रमाणे पवित्र मानली जात असून आपल्याप्रमाणेच हिच्यात स्नान करून तमाम ज्यू, ख्रिश्चन, व मुसलमान आपले पापक्षालन करतात

सीरीयातील सर्वात मोठे सरोवर माम्लाहत अल जब्बल हे असून ते अलेप्पोच्या दक्षिणेस आहे त्याचे क्षेत्रफळ ६० चौरस मैल आहे जायरूद हे मोठे खारट पाण्याचे सरोवर दमास्कसच्या उत्तरेस आहे मुझायरीन हे गोड्या पाण्याचे सरोवर दाराच्या उत्तरेस आहे होम्सच्या पश्चिमेला बाहरात हीन्सचे reservior आहे

समुद्र किनारा आणि पश्चिमेला पहाडी इलाखा येथे भूमध्य सामुद्रिक हवामान, म्हणजे मे ते ऑक्टोबर कोरडा सीझन असतो समुद्र किनाऱ्यावर उन्हाळा फार तीव्र (८४ अंश फॅ) असतो पठारी प्रदेशावर हवामान रखरखीत व विषम असते दमास्कस व अलेप्पोचे सरासरी तापमान उन्हाळ्यात जास्तीत जास्त ३३ ते ३७ अंश सें व हिवाळ्यात १ अंश ते ४ अंश असते समुद्र किनाऱ्यावर आणि पश्चिमी पहाडी इलाख्यात वर्षाला ३० ते ५० इंच पाऊस पडतो जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे प्रमाण झपाट्याने कमी होते हिवाळ्यात प्रचलित वारे पूर्वेकडून वाहतात वर्षातून एकदा किंवा दोनदा वाळूची वादळे होऊन सुमारे ५००० फूट उंचीची वाळूची भिंत उभी राहते ती आकाशाची झाकोळ बनते

सीरीयामध्ये पर्वताच्या उतरणीवर देवदार, पाईन, पॉपलर, बिब आदी वृक्षांची लागवड फार मोठ्या प्रमाणावर केली जाते खजूरची लागवड युफ्रेटिसच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणात केली जाते समुद्रकिनाऱ्यावर व पठारी प्रदेशावर धान्य होते ह्यात गहू हे सर्वात महत्त्वाचे पीक होते बारली, मका, ज्वारी पण होते कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर काढून त्याची निर्यात केली जाते मसूरीची डाळ भोजनात मुख्यत्वे करून वापरली जाते इराकलाही मसूरीशिवाय अन्य डाळ मिळत नाही ऑलीव्ह, द्राक्ष, जरदाळू, ओट्स, कांदे, बटाटे, बीट, सफरचंद, आदीची लागवडही होते लिंब, संत्री, काकड्या, सॅलेड, मुळे, तुती आदी तत्सम भूमध्य सामुद्रिक हवामानात होणारी सर्व भाज्या व फळे येथे होतात हिवाळ्यात सुब्बाय झाह नावाची पालकसारखी भाजी व उन्हाळ्यात सूमॅक नावाची झाडे लावतात सूमॅक झाडाची पाने मसाल्याच्या पदार्थासारखी उपयोगात आणतात बदाम, पिस्ते, आदि सुकामेवा येथे भरपूर होतो फुलामध्ये ॲस्फोडेल, लीली, ट्युलीप, हायसिंथ, डाफोडील, सायक्लेम ही फुलं प्रामुख्याने दिसून येतात घनदाट जंगलात लांडगे, तरस, कोल्हे, बजर, रानमांजर, रानडुक्कर, अस्वल, हरिण, खारी, वाळवंटातील जनावरे, काळवीट आदी जनावरे सर्रास दिसून येतात गरुड बहिरी ससाणा, घार हे पक्षी पहाडी प्रदेशात दिसून येतात

सीरीया भूमध्य समुद्र, पर्शियन गल्फ, एशिया मायनर ह्यामधील व्यापारी मार्गावर असल्यामुळे व तेलाची पाइप लाइन सीरीयन प्रदेशातून जात असल्यामुळे उद्योगधद्याच्या दृष्टीने फार फायदेशीर झाले आहे पेट्रोल हे येथील प्रमुख उत्पादनाचे साधन आहे सुमारे २६० ००० ००० टन पेट्रोल येथे मिळते सुवाडिया हे पेट्रोलचे मुख्य ठिकाण आहे कुरा, शुक्र व रूमायलान ही इतर ठिकाणी पेट्रोलसाठी प्रसिद्ध आहेत

कुठली ही संस्कृती ध्या, ती वर्षभर खळखळ वहाणाऱ्या नद्याच्या काठीच जन्म घेते, फळते-फुलते बहरते सिंधु सस्कृती मिस्त्री संस्कृती, बाबीलोनियन सस्कृति सर्वच अशा नद्यांच्या अगाखाद्यावर बाळसेदार झाल्या असीरियन सस्कृतीही मेसापोटेमिअन (बाबीलोनियन) सस्कृतिप्रमाणेच फारच प्राचीन असून सीरीयात तिचे भग्नावशेष यत्रतत्र दिसून येतात सीरियामध्ये मानवाने शेती, धातुविद्येची रहस्ये शोधली पहिले मूळाक्षर शोधून काढले धर्म, तत्त्वज्ञान, व्यापार, राजनीति व सास्कृतिक आदान-प्रदान सर्व ह्याच देशात सुरू झाले अलेप्पो, होम्स, ट्रिपोली ही शहरे ह्या दृष्टीने फार प्राचीन प्रसिद्ध महत्त्वाची आहेत सिंदबाद खलाशी नेहमी भूमध्य समुद्रातून दमास्कस-मोसलमार्गे बगदादला येत असल्याची वर्णने आपण वाचतो फार पूर्वीपासून युरोप आशियाचा हा खुष्कीचा मार्ग होता सीरीयाचा उत्तर पश्चिम भाग भूमध्य समुद्रावर असल्यामुळे पर्यटक केन्द्रे ह्या समुद्र किनाऱ्यावर दिसतात

सीरीयाची राजधानी दमास्कस ही बाराडा नदीच्या दक्षिणपूर्व किनाऱ्यावर ओयासिसमध्ये असून ती क्वासीयन पर्वताच्या पायथ्याशी आहे हे सीरीयातील सर्वात मोठे शहर (लोकसख्या सुमारे ६० लाख) असून सरकारचे व राजकारणी लोकाचे हेडक्वार्टर आहे दमास्कस हे जगातील सर्वात जुने शहर असल्याने ह्यास 'शहराची माता' असे म्हणतात सम्राट ज्युलियनने ह्यास 'पूर्वेचा मोती' असे म्हटले आहे रोमन बेझटाईन, अरब, सस्कृतीचे अवशेष येथे दिसून येतात आझम पॅलेस, उमायाद मॉस्क, सेंट पॉल, खिडकी, नॅशनल म्युझियम, सालादीन-महल, हमी दियाह, बाजार, बाब शारकी (पूर्वेकडील गेट) आदी येथील प्रेक्षणीय स्थळे आहेत दमास्कस पासून ३७ मैलावर मामूला नावाचे डोंगरात वसलेले सुदर गाव आहेत येथे लोक अजूनही पाश्चिमात्य, आरमाइक भाषा बोलतात ही येशु ख्रिस्ताची भाषा आहे हे शहर सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक केंद्र बनले आहे ही मध्यसीरीयाची बाजारपेठ असून ब्रोकेड, लाकडावरील कोरीव काम, सोन्याचादीचे दागिने व गालिचे आदी पारपारीक कलाकुसरीची कामे येथे होतात नव्या जुन्याचे मिश्रण येथे आढळते शहर अद्ययावत असले तरी अजून पुरातन पद्धतीची बाजारव्यवस्था कायम आहेत रस्ते रुद आहेत उच इमारती व जुनी ठेंगणी ठुसकी घरे ह्याचे मिश्रण येथे आढळते जुनी घरे नरम कच्च्या विटाची व लाकूड दगडाची बाधलेली आहेत नव्या उंच इमारती सिमेंट कॉंक्रिटच्या आहेत खोदलेले कोरीव दगड,

सरकारी ऑफिसेस, मशिदी व चर्चेसाठी राखून ठेवले आहेत

अलेप्पो शहर दमास्कसच्या उत्तरेस ३६० कि मी वर ऑरोन्टस् आणि युफ्रेटिस नद्यांच्या मध्ये वसलेले असून व्यापार व उद्योगाचे केंद्र बनले आहे (लोकसंख्या सुमारे २० लाख) अलेप्पो शहरात सिटाडेल, खानावळी, मध्ययुगीन सुक आहेत ख्रि पु तिसऱ्या शतकापासून हे वैभव व उज्ज्वल इतिहास परंपरा असलेले शहर आहे ह्या शहरात सर्वत्र चुन्याच्या शुभ्र इमारती असल्यामुळे उदयपूरप्रमाणे ही धवलगिरी म्हणून प्रसिद्ध आहे (हालाब-अश-शाहबा- Alleppo the White City) ह्या शहरातील रस्ते चांगले आहेत ह्याच्या सभोवती रेल्वेमार्गही व्यवस्थित आखलेले आहेत. मेंढपाळाचा धंदा येथे उत्तम चालतो दमास्कस व इतर शहरासाठी येथून मेंढ्या व लोकर पुरविली जाते

लटाकिया लहासा हे भूमध्य सरोवरावरील बंदर (लोकसंख्या २ लाख) आहे शेतीसाठी हा भाग समृद्ध समजला जातो समुद्र किनाऱ्यावर असलेल्या ट्रीपोली शहराला पर्यटक क्षेत्र म्हणून फार मोठा वाव आहे पण तिकडे लक्ष देण्यास आसादला वेळ नाही होम्स व हमाह ही इतर महत्त्वाची शहरे आहेत होम्सला तेलाच्या खाणी, मोठ्या फॅक्टरीज्, प्लान्टस् व मिल्स आहेत एलागबाल व अलेक्झांडर सिवरस हे दोन प्रसिद्ध रोमन सम्राट होम्सचे होते येथील किल्ला महत्त्वपूर्ण आहे

उगारित (रास शाम्रा) लटाकियाच्या उत्तरेला १६ मैलावर आहे येथे जगातील आद्य मूळाक्षराचा शोध लागला एका करंगळीएवढ्या मातीच्या गोळीवर ३० अक्षरे खोदली आहेत हीच अक्षरे पुढे पाश्चात्य मूळाक्षराचा पाया बनली

एब्ला (तेल मार्दीख) - दक्षिण अलेप्पोपासून ४० किलोमीटरवर हे शहर आहे ख्रि पू २५ व्या शतकात येथील शाही लायब्ररीतून १७००० मातीच्या गोळ्या उत्खननात सापडल्या त्या जगातील सर्वात प्राचीन द्विभाषिक शब्दकोषात आहेत

पामुरिया (ताडमोर) - होम्सच्या पूर्वेला १५० कि मी वर आहे हे वाळवंटातील सुंदर ओयासिस आहे राणी झेनोबियाच्या काळात अनेक अवशेष (तिसऱ्या शतकातील) येथे सापडतात एका बाजूने खजुराची झाडे व ऑलिव्ह वृक्षानी वेढलेली व दुसऱ्या बाजूने उघड्या बोडक्या टेकड्यानी वेढलेले पामुरा शहर फारच रमणीय आहे बेल मंदिरात (सिरीयन मध्ये ह्यास 'झीअस' म्हणतात) राणी झेनोबियाचे चित्र आहे हिने इ स २६६-२७० च्या दरम्यान रोमन सैन्याचा पराभव केला व ईजिप्त व एशिया घेतला पण नंतर ऑरेलस (२७२ मध्ये) ने तिचा पराभव केला व तिला सोन्याच्या साखळीने बांधून रोमला नेले वाळवंटातील हे शहर पश्चिम व पूर्वेकडील व्यापारीक व सांस्कृतिकदृष्ट्या क्रॉसरोड आहे दक्षिणेकडे अल-हिर-अल-बघारबी किल्ला आहे

बसोराला जगातील सर्वात मोठे ॲम्फी थिएटर आहे दुसऱ्या शतकात हे बांधले असून त्यात १५००० लोक बसू शकतील एवढे ते मोठे आहे सीरियाच्या भौगोलिक स्थितीमुळे ह्याचा आशिया, आफ्रिका व युरोप ह्या तीन खंडाशी तो जोडला जातो सीरियाने गेल्या ६००० वर्षातील अवशेष जपले आहेत टेलेनिस्टिक, बुझानाइट,

ओमायाद, मामुल्कत व ऑटोमन काळातील ग्रीक, रोमन व अरब सस्कृतीचे अवशेष येथे सापडतात

सीरीयामध्ये ८८% जनता इस्लामधर्मीय आहे त्यातसुद्धा सुन्नी ७२% असून सबध देशात सुवायदा (दक्षिणेला) व उत्तरेला लटाकीया ह्या दोन शहराशिवाय सर्वत्र आढळतात अलावीडस ह्या पथाचे सुमारे ६०००० इस्लामी सीरीयन आहेत ह्यातील तीन चतुर्थांश लटा कियामध्ये व बाकीचे होम्स व हमाहामध्ये आहेत ग्रुझेस ह्या पथाचे लोक सुमारे दोन लाख असून त्यातील काही सुवायदामध्ये व बाकीचे दमास्कस, अलेप्पो, क्वुना तिराहला रहातात इस्माइति ह्याची सख्या ६०,००० असून ८० % अलसलामियाला व हमाहाजवळ राहतात शिद्दीज पथाचे लोक मुख्यत दमास्कस, अलेप्पोला राहतात येजदीज पथीयाची संख्या थोडी असून बहुतेकानी सुन्नी पथ स्विकारला आहे

दमास्कसला स्थिरस्थावर झाल्यावर आम्ही प्रथम अलेप्पो व होम्स ह्या ठिकाणी जाण्याचे ठरविले दमास्कसहून ही ठिकाणे जवळ आहेत बसेसही खूप आहेत स्वस्तही आहेत म्हणून आम्ही एका बसमधून प्रवास सुरु केला बराच वेळ झाला तरी होम्स येईना भाषेची अडचण आम्ही विचारात पडलो वाटेत एका बसस्टॅन्डवर बस थाबली असता आम्हाला एक विद्यार्थ्यांचे टोळके दिसले माझ्या साडीने त्यांचे लक्ष वेधून घेतले आम्ही भारतीय असल्याचे त्याना लगेच ओळखून आले त्याना बऱ्यापैकी इग्रजी येत होते आमच्याकडे सीरीयाचा नकाशा होता त्यावर त्याना होम्स, अलेप्पो ही ठिकाणे दाखविली त्यावर ते म्हणाले, 'दमास्कसला ही ठिकाणे जवळ आहेत खरी पण अंतर निदान १५० मैल तरी आहे बस सध्याकाळपर्यंत जाईल, न्यूयॉर्कलाही आम्ही सामान डोक्यावर घेऊन आमचं हॉटेल शोधीत अगदी रात्री ९ वाजता 'Two Blocks away' करीत करीत चांगले मैलभर पिदविले गेलो होतो आतापर्यंतचा बसचा प्रवास गोव्याच्या बसच्या प्रवासाची आठवण करून देत होता तेथेही बस कोठेही थाबायची ओळखीच्या माणसानी कोपऱ्या कोपऱ्यावर हात (अगदी आपल्या घराजवळ सुद्धा) केला तर थाबणे व चालू करणे (राब रे बस रे) हा बस ड्रायव्हर व प्रवासी ह्याचा घरोबा येथेही दिसून आला त्यामुळे घाबरून आम्ही परत दमास्कसला आलो हा दिवस असा वाया गेला बसच्या प्रवासात एक दिसून आले, रस्ते चागले होते बस अड्डे आपल्यासारखे दिसले

मध्य-पूर्व व पश्चिम आशियाच्या मागासलेपणाचे एक उघडे चिन्ह म्हणजे वहातूक व्यवस्थेचा अभाव एक कैरो शहर सोडले तर आम्हाला कोठेही आपल्यासारखी व्यवस्था दिसली नाही तसेच सहली आयोजित करणाऱ्या कंपन्या पण नाहीत कैरोला 'डेल्टा टूर सर्व्हिस' मुळे आम्हाला सर्व इजिप्तभर फिरता आले बाकी सर्व ठिकाणी टॅक्सीशिवाय बाहेर जाण शक्यच नाही ह्या टॅक्सीजना ठराविक निराळा रग (ओळखून येण्यासाठी)

नसतो, मीटर नसते, आपण भाव करून पैसे द्यायचे आमचे हॉटेल भर बाजारात होते टॅक्सी स्टॅन्ड समोरच होता ह्या सगळ्या टॅक्सीज जपानी किंवा जुन्या मॉडेलच्या मोठ्या अमेरिकन गाड्या दिसल्या आम्हाला एक टॅक्सीवाला मिळाला त्याचे नाव डेव्हीड होते त्याला बरेचसे इग्रजी कळत होते त्याने सबध दिवस दमास्कस गावात फिरण्याचे २०० सीरीयन पौंड मागितले (८०० रु.) हे अर्थात् आम्हाला परवडणारे नव्हते त्यावर डेव्हीडने एक उपाय सुचविला तो म्हणाला, 'मी दमास्कस मध्ये (फी मर्दाने) फेरफटका मारून आणेन बाजार, मशीदीत घेऊन जाईन' चार तास पुरे होतील साबून (सत्तर) पौंड द्या' हे आम्ही कबूल केले व आमचा दमास्कसचा दौरा सुरू झाल जगातील तमाम नवऱ्याना दुसऱ्याच्या बायका सुदर, स्मार्ट व हुषार दिसतात पण आपली बायको मात्र दाल बराबर ! त्यात माझ्यासारखी बावळट, मठ्ठ व व्यवहारशून्य बायको असल्यावर बघायलाच नको हे साशकतेने म्हणाले, 'काय ग अरबी आकडे नीट येतात ना तुला ? नाहीतर त्याला म्हणायचे असेल १७० पौंड व तू आपली समजली असशील सत्तर' माझी अशी अस्मिता दुखावल्यावर मी घडाघड, 'वाहेद, इत्थियान, थालाथात, अरबा सामसा' म्हणायला सुरुवात केली, तशी ह्यानी हात जोडले, पण चार तासानी ७० पौंड पैसे देईपर्यंत ह्याच्या मनातील 'संशय खट हा झोटिंग महा' त्यांचा काही पिच्छा सोडायला तयार नव्हता

प्रथम डेव्हीडने आम्हाला त्याच्या घरी नेऊन त्याच्या बहिणीशी नोरीनशी ओळख करून दिली तिला इग्रजी चागले बोलता येत होते गालिचा, सोफा, टी व्ही ह्यानी सुसज्जित डेव्हीडचे घर छान सजवलेले होते त्याची आई भल्यामोठ्या पिशवीत लाबट आकाराचे ताजे ताजे गुबगुबीत ब्रेड घेऊन बाजारातून नुकतीच आली होती आम्हाला छोट्या छोट्या कपातून टर्कीश कॉफी व केक देऊन आमचा पाहुणचार करण्यात आला त्यांच्या घरातील काश्मिरी लोकासारखी लाल लाल स्ट्रॉबेरीसारखी गोरीपान, कुरळ्या केसाची, गुटगुटीत गोंडस बालके व गोऱ्यापान सुंदर सीरीअन बायका आमच्याभोवती उभ राहून आम्हाला न्याहाळीत होत्या आम्ही कॉफीपान सपवून त्याच्या आईचा मानेने निरोप घेऊन टॅक्सीपाशी आलो, तर शेजारीपाजारीपण 'अल हिन्दी' म्हणजे आम्हाला बघण्यास जमले होते त्याना बहुधा माझ्या काळ्या रंगाचे कौतुक वाटले की काय देव जाणे आपल्याकडे जे नसते त्याचेच माणसाला अपरूप वाटते डेव्हीडची बहिण नोरीनही आमच्याबरोबर येणार होती

मस्त हवा पडली होती हिरव्यागार झाडीतून रस्ते वरखाली जात होते टेकड्यांच्या शिखरावर शुभ्र बर्फ चमचमत होते सारे गाव टेकड्यानी वेढलेले असल्यामुळे टेकड्यावर अनेक उद्याने आहेत त्यात वाघ-सिंह, हत्ती वगैरे प्राण्याचे मोठमोठे पुतले उभे केलेले आहेत एका प्रेक्षणीय ठिकाणी आम्ही फोटो काढायचे ठरविले त्यावेळी तेथे नशिबाने फोटोग्राफरही मौजूद होता आम्ही डेव्हीड व नोरीनबरोबर फोटो काढला फोटो २ । ३ तासात मिळणार होता आपली सहल सपल्यावर फोटो घेऊन जाऊ असे डेव्हीडने सागितले

आमची टॅक्सी बाजाराच्या दिशेने धावू लागली चागली दुकाने पार्लमेंट स्ट्रीट व पोर्ट सैद स्ट्रीटला आहेत बाजारातील दुकानाना अजून पाश्चिमात्यच काय पण आपल्याकडील दुकानाचीसुद्धा सर नाही डेव्हीडने आमची नापसती ओळखून टॅक्सी ओमियाड मशिदीकडे वळविली ही ओमियाड मशीद म्हणजे एका प्रचड आवारात मध्यभागी बाधलेले थडगे आहे आपल्याकडील जुम्मा मशीदीसारखेच भव्य आहे सर्वसाधारण मध्यपूर्वेच्या मुसलमान राष्ट्राप्रमाणेच सगळा बाजार खऱ्या अर्थाने अशा मशिदीजवळ असतो मशीदीच्या भिंतींना लागून चौफेर लहान लहान दुकाने आहेत त्यात हुक्का, पितळी वस्तु, भरतकाम केलेले सॅटीनचे कपडे, ब्रोकेड जडी बुटी औषधे, जरीकाम केलेले बूट, चपला आदि मिळते येथील पितळीकाम फार प्रसिद्ध आहे तुम्ही पितळी वस्तु घ्या असे डेव्हीडने सुचविले आम्ही एक घोडा पसत केला पण त्याची नीट पहाणी केल्यावर ह्याना वाटले तो बहुधा मुरादाबाद (भारत) येथेच बनविला असावा दुकानदाराला थोडेफार हिंदी येत होते ह्यानी आपली शका व्यक्त करताच तो म्हणाला, 'तुम्ही म्हणता ते खरे आहे हल्ली आम्ही दमास्कसच्या कारीगीरांकडून असल्या वस्तु घेण्यापेक्षा हिंदुस्थानातून आणतो, कारण त्या स्वस्त पडतात त्याने हे पण सांगितले की आपण मुरादाबादला खरेदीला जात असल्याने आपल्याला थोडेफार हिंदी येते अर्थात लडनमध्ये Made in India चा स्वेटर घेण्याचा विनोद आम्हाला करायचा नव्हता तीच गोष्ट जरीकाम केलेले बूट, चप्पल याची आपल्याकडील जयपूर व अमृतसरला मिळतात त्या पद्धतीचे सॅटिनवर भरतकाम केलेले गाऊन्स मात्र चागले स्वस्त वाटले हा जडावाचा गाउन घातल्यावर अरेबियन नाइटसमधील शहजादी झाल्यासारखे नक्कीच वाटले असते दुकानातील खाद्यपदार्थ बरे दिसत होते पण अस्वच्छ फॅन्टा, कोक तर मिळत नाही व्यापारकेंद्र (Commercial area) सरकारी ऑफिसेस वसाहत ही वस्ती आधुनिक आहे बहुमंझील इमारती आहेत, पण अशा एका टोलेजंग इमारतीला लागूनच दगडमातीची जुन्या पद्धतीची

घालून वावरत असतात डांबरी रस्त्याबरोबर साधे पूर्वीसारखे दगडी रस्ते पण आहेत थोडक्यात जुने दमास्कस कसे असेल हे लक्षात येते बहुतेक मशीदीतून लाऊडस्पीकर लावलेले असतात, व दिवसातून पाच वेळा नमाज पढण्याची बाग देतात. मशीदींना चार मिनार नसून एकच असतो

मध्यपूर्व व पश्चिम आशियामध्ये इजिप्त, सीरिया, लेबनॉन व बहारीन हीच अरब राष्ट्रे पुढारलेली म्हणता येतील येथे बायका बुरखा पाळतातच असे नाही बहुतेक स्त्री-पुरुष पाश्चात्य पद्धतीचा पोषाख करतात धुम्रपान सर्रास करतात अर्थार्जनासाठीही बायका बाहेर पडतात एकत्र कुटुंब पद्धती आहे पुत्र जन्माचा आनंद व पुत्रीजन्म येथेही सकट मानले जाते भुताखेतावर ह्या लोकाचा फार विश्वास आहे पुत्रजन्मानतर ४० दिवस त्या बालकाला मीठाच्या पाण्याने स्पंज करतात त्याची अशी समजूत आहे, की असे केल्याने त्यास भुताखेताची बाधा होत नाही

सीरीयात शिक्षणाचा प्रसार वाढत आहे अलेप्पो व होम्स

विश्वविद्यालये आहेत सौदीअरबिया, जॉर्डनसारख्या मागासलेल्या देशांतून येथे विद्यार्थी येऊ शकतील 'पण त्या देशाशी सिरीयाने वैर ठेवले आहे म्हणून सिरीयाची भरभराट होत नाही नाहीतर मी टॅक्सी कशाला हाकीत बसलो असतो ?' डेव्हीड सात्त्विक संतापाने फुलून फुलून बोलत होता

शहर पाहणे, गप्पा मारणे, ह्यात आमचे चार तास मजेत गेले त्याने अरबी गाण्याची टेपही लावली होती अरब लोकाच्या सगीतप्रियतेची झलक वारवार दिसून येते नोरीन म्हणाली, 'तुमचे हिंदी सिनेमे आम्हाला खूप आवडतात विशेषत त्यातील गाणी, साधना, राजेंद्रकुमार, शम्मीकपूर हे नट, नटी आम्हाला खूप आवडतात (साधनाचे सध्याचे एका-भल्या मोठ्या ड्रमचे आकारमान आहे, राजेंद्रकुमार आता आजोबा झाला आहे, तर शम्मीकपूर नामक एक ठासून भरलेले मैद्याचे पोत पानपरागच्या जाहिरातीत झळकत असत हे त्या बिचाऱ्याना काय माहित ? कालाय तस्मै नम !) असे म्हणून त्या दोघानी 'अयाय्या-सुकू-सुकू' हे गाणेही गाण्यास सुरुवात केली ते ऐकून मला इतका आनद जाला की त्या आदी मानवासारखी 'याऽऽहू' अशी आरोळीही ठोकावीशी वाटली गाण्याप्रमाणेच आपल्या हिंदी सिनेमातील शूर हिरोंचा महिमा काय वर्णावा ? हातात एकही शस्त्र नसताना एकावेळी दहा-वीस गुंडाशी मुकाबला करून त्यांना x x x ला पाय लावून पळवून लावण्याऱ्या अमिताभ बच्चनला पाहून 'अह ब्रह्मास्मि' समजणारा विश्वविजेता बॉक्सिग चॅम्पीयन कॅशिअस के उर्फ महंमद अली भारतात यावयास घाबरत होता म्हणे !

परत येताना डेव्हीड आम्हाला त्या फोटोग्राफरकडे घेऊन गेला आमचे बोलणे त्याला कळले नाही की तो अगदीच सनकी अवलिया होता देव जाणे पण त्याने आम्हाला फोटो न देता टराटर फाडून टाकले आम्ही अवाक् ! आमच्यापेक्षा डेव्हीडला खूप वाईट वाटले पण त्याने शिताफीने एक प्रत काढून घेतली व ही प्रत तुमची आठवण म्हणून माझ्याजवळ ठेवीन असे सांगितले परतीचा प्रवास करताना डेव्हीडने निराळा मार्ग चोखाळला दुतर्फा झाडी असलेला हा रस्ता 'पतझड' चा मोसम असल्यामुळे उघडाबोडका दिसत होता सप्टेंबरमध्ये या रस्त्याचे खरे सौंदर्य दिसते Come September हे डेव्हीड नोरीनचे आग्रही आमत्रण स्विकारणे आम्हाला शक्य नव्हते तेव्हा त्याने त्या रस्त्याचे चित्र दाखविले श्रीनगर-बारामुल्ला रस्त्याप्रमाणे हा रस्ता दिसत होता 'भूखे भजन न होय गोपाला' म्हणतात ना ? आता आमच्या पोटात अगदी अस्सल भारतीय कावळे टाहो फोडत होते त्यामुळे आमचे इकडे तिकडे कुठेच लक्ष लागत नव्हते., आम्ही हॉटेलवर पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते आम्ही त्या दोघानाही आमच्याबरोबर जेवण्याचा आग्रह केला पण त्याने साभार नाकारून ती प्रेमळ, हसतमुख, आनदी बहीण भावंडं आमचा निरोप घेऊन निघून गेली

सीरीयन खाद्यपदार्थ हे लेबनॉनसारखेच चविष्ट वाटले खुब्बुस (लेबनीज रोटी) मध्ये मुळा, शलगम, व्हिनीगर व डाळीची चटणी घालून खातात हे पचावयास पण हलके असते ठिकठिकाणी हॉटेलमध्ये आर. के. च्या पंखीच्या मोठ्या सळईवर उत्तम

[library stamp]

शिजवलेले व मसाला लावलेले मास थापलेले असते व ते निखाऱ्यावर कबाबासारखे फिरवून खरपूस भाजून ते गरमागरम तुकडे खुब्बूसमध्ये घालूनही खातात ह्याच्या जोडीला बिना दूधसाखरेची टर्किश कॉफी छोट्या छोट्या कपातून येता जाता पितात. (कहवा) दूध न घातल्यामुळे सारखा मासाहार करूनही गॅस होत नाही. हे ह्या बिनदूधाच्या चहा कॉफीचे शास्त्रीय कारण आहे

सीरीयन पाकक्रियेत विविध प्रकार असून अरब जगतात फार प्रसिद्ध आहेत 'किब्बेह' हा खिमा व कणिक ह्याच्या परोठ्यासारखा प्रकार आहे 'मेश्वी' हे 'ग्रील्ड मीट' असते 'हाडमोस' ही एक प्रकारची मटणकरी असते 'लाब्बोलेह' हा सॅलेडचा प्रकार आहे 'कॉनफा' हा एक पेस्ट्रीसारखा प्रकार असून त्यात चीज,क्रीम व पिस्ते भरतात व साखरेच्या पाकात बुडवतात

सीरिया हे लोकतंत्र राज्य असून सार्वजनिक मतदानाने तेथे सात वर्षाच्या मुदतीने अध्यक्षाची निवडणूक होते तो पंतप्रधान व लोकसभेच्या इतर सभासदाची निवडणूक करतो लेजिस्लेटिव्ह व पीपल्स असेंब्लीमध्ये १९५ सभासद असतात प्रेसिडेंट जनरल-हाफीझ-अल-आझाद आहे

मध्य पूर्वेमध्ये सतत चालू असलेल्या अरब-अस्त्राइली संघर्षामुळे सीरीयातही राजकीय अस्थिरता आली आहे अरब-इस्त्रायल युद्धात इस्त्रायलने सीरियाच्या दक्षिणेकडील गोलन पर्वताजवळील ४४४ स्क्वे मैलाचा प्रदेश काबीज केल्यापासून सीरियाची आर्थिक स्थिती डळमळीत झाली आहे सुरक्षा व सैन्य ह्यासाठी राष्ट्रीय बजेटचा ४० टक्के भाग खर्च होत असल्यामुळे देशाच्या औद्योगिक विकासासाठी फारच थोडा पैसा मिळतो वाढती लोकसंख्या हेही चिंतेचे कारण आहे नाहीतर सीरीयाचे सौम्य भूमध्य सामुद्रिक हवामान व व्यापारासाठी योग्य भौगोलिक स्थान ह्यामुळे ह्या देशाची कितीतरी भरभराट झाली असती ईजिप्तचे अध्यक्ष नासर ह्याना काही काळ सीरियाचा बाथ समाजवाद (अरबसमाजवाद) आकर्षक वाटला सीरिया व ईजिप्त ह्याचे राजकीय एकीकरण झाले आहे व युनायटेड अरब प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले आहे पण हे फार दिवस टिकले नाही सन १९६१ च्या सुमारास ईजिप्त व सीरिया विभक्त झाले दोघानाही कार्ल मार्क्सप्रणीत समाजवाद नको होता त्याना आपल्या राष्ट्रापुरता मर्यादित म्हणजे राष्ट्रीय समाजसत्तावाद हवा होता सत्तेसाठी बाप-भाऊ न ओळखता रक्तपात करणे हे मुस्लिम संस्कृतीचे ब्रीद सीरीयानेही चालू ठेवले आहे गेली १५ वर्षे हाफीज आसाद ह्याच्या पक्षाकडे सत्ता आहे आसाद हे हुकूमशहाच आहेत सीरियाची वाढ करण्यासाठी लेबनॉनमध्ये त्यानी लक्ष घातले आहे जॉर्डन व इराक ह्या अरब शेजाऱ्याशी त्याचे वैर आहे व इराणशी मैत्री आहे वास्तविक इराकचे तेल सीरियातून भूमध्य समुद्राकडे जाऊ शकते पण आसादने त्याला मोडता घातला आसाद हे एका स्थानिक जमातीचे आहेत ही जमात जरी मुसलमान धर्माची असली तरी कट्टर मुसलमान त्याना मानीत नाहीत इस्लामिया पंथाचे मुसलमान हे मुसलमान नाहीत असे पाकिस्तानी मनातात तसाच हा प्रकार डेव्हिडने सांगितल्याप्रमाणे एक गोष्ट आमच्याही लक्षात आली

सीरियन पौंडाला 'लीरा' म्हणतात १०० पिएस्टर्स म्हणजे एक लीरा होतो बँका सेंट्रल बँक ऑफ सीरिया, कमर्शिअल बँक, ॲग्रिकल्चर बँक व लँड बँक आदि बँका आहेत

प्रचंड प्रकल्पासाठी आमच्यासारखे हजारो भारतीय सीरियाचे शेजारी इराक, इराण, सौदी अरेबिया येथे आले पण सीरियात मात्र नाही सीरियाने अजून त्यादृष्टीने काहीच हालचाल केली नाही हॉटेल मालकाला आम्ही ह्याचे कारण विचारले त्याने कपाळावर हात मारून सांगितले, 'हेच मला कळत नाही नाहीतर आज तुम्हाला ग्राहकाअभावी अर्ध्या भावात खोली देण्याची वेळ का आली असती ?'

सांस्कृतिक व कलात्मक जीवन येथे वर्षभर चालू असते कला प्रदर्शनी जवळ जवळ दर आठवड्याला भरते बसोरा (ऑक्टोबर) व पामेरा ह्या ऐतिहासिक ठिकाणी वार्षिक आंतरराष्ट्रीय नृत्य महोत्सव होतात शिवाय सप्टेंबरमध्ये दमास्कस फ्लॉवर शो, दमास्कस इंटर नॅशनल फेअर असते पामुरा संगीत उत्सव (२२ मे १४ जून) बोसरा उत्सव (सप्टेंबर), इद-अल-फिल, (रोजे सपल्यावर), ईद-अल-आधा, रास-अल-अलामा-अलहिजरी (इस्लामी कॅलेंडरचा पहिला दिवस) अल-माविल्ट (पैगंबरचा जन्मदिवस) वगैरे सण व उत्सव धूमधडाक्यात साजरे करण्यात येतात

येथे 'अल-बाथ' 'अल-थाबरा' 'तिश्रीन' ही अरबी भाषेतील वर्तमानपत्रे येतात रेडिओ-टीव्ही रोज २ तास फ्रेंच, २ तास इंग्रजी, ३० मि स्पॅनिश, ३० मि रशियन, ३० मि जर्मन, ३० मि हिब्रू. व ३० मि टर्कीश भाषेत कार्यक्रम देतात

दमास्कस मध्ये टी व्ही १९६० साली चालू झाला पण जास्त कार्यक्रम अरबी व फ्रेंच असतात आमच्या हॉटेलसमोर एक सिनेमा हॉल होता सगळे पिक्चर्स इजिप्तमधून येतात बाजारात दारू विकणारी दुकाने दिसली नाहीत पण लोक दारू नक्कीच पीत असावेत असो

हॉटेल मालकालाच विनती करून आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या फ्लाइटचे दुबईचे रिझर्व्हेशन केले त्यानेच टॅक्सीची पण सोय केली दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेल मालकाला 'खुदा हाफीज' करून आम्ही दुबईसाठी रवाना झालो दमास्कस-दुबई अडीच तासाचा प्रवास आहे विमान तळावर उंच, गोऱ्यापान, देशासाठी, 'जान हथेली पर' घेऊन लढण्यास सिद्ध झालेल्या सीरीयन सैनिक-जवानांची गर्दी होती त्यांना पोहोचविण्यास आलेल्या त्यांच्या वीरमाता, वीर भगिनी, वीर कन्या, व वीर पत्नी अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांना निरोप देत होत्या हे हृदयद्रावक दृश्य पाहून मला भडभडून आले ह्यांपैकी कितीजण परत येऊन आपल्या कुटुंबियात हसत खेळत जीवन घालवतील ? मी मनाशी म्हटले, 'हाझान सैदान (Good Luck)'

'आमेन'

* * *

# इये गंधर्वेंचिए नगरी

महाभारतात पांडव अज्ञातवासात असताना गंधर्व त्यांना संकटाच्या वेळी मदत करून गंधर्व लोकी सोडवून आणतात त्यांचा सुरा-सुंदरीने मनसोक्त पाहुणचार करतात, त्यांना मधूर संगीत लहरीमध्ये चिंब भिजवून टाकतात अशी रसाळ वर्णने लहानपणापासून ऐकिवात होती. हे गंधर्व बापडे फक्त सुरा-सुंदरी-च्या उपभोगात व्यस्त असतात पण त्यासाठी पैसा कोठून आणतात ह्याचा काही कधी उलगडा झाला नव्हता पण ज्याप्रमाणे वीज, चुंबक व गती ह्या तीन गोष्टींपैकी कोणत्याही दोन गोष्टी असल्या तर तिसरीचे अस्तित्त्व असतेच त्यासाठी निराळे काही करावे लागत नाही त्याप्रमाणे जेथे सुरा सुंदरी असतात तेथे पैसा असतोच हा सिद्धान्त बेरूत पाहिल्यावर नीट लक्षात आला

एवं गुण विशिष्ट गंधर्वनगरीला आम्ही दमास्कसहून टॅक्सीने निघालो दमास्कस-बेरूत हा प्रवास टॅक्सीने चार तासात होतो टॅक्सीज वाटेल तितक्या मिळतात तिष्ठत बसावे लागत नाही बेरूतला जाण्यासाठी लेबनॉनचा 'व्हिसा' हा रस्त्यावरच लेबनानची सरहद्द सुरु होण्याच्या चेक पोस्टवर तावडतोब मिळतो ह्यासाठी पाच लेबनीज पौंड द्यावे लागतात हे सत्कृत्य टॅक्सी ड्रायव्हर मोठ्या आनंदाने करतो हा सर्व प्रवास गोलन पर्वताच्या रांगातून होतो खरच जन्माला येऊन एकदा तरी करावा असा आहे एका बाजूला बर्फाच्छादीत पर्वतराजी तर दुसऱ्या बाजूला अथांग पसरलेला गर्द निळा भूमध्य समुद्र सहसा बर्फ व समुद्र ह्यांची युति जुळत नाही पण बेरुत अशा अक्षांश-रेखांशामध्ये आहे की हे दुर्मिळ दृश्य पहाण्यास मिळते वर इंद्रनीलमण्याचा प्याला उलटा केल्याप्रमाणे निळेभोर आकाश पसरले होते मधूनच शाळा चुकवून टिवल्या बावल्या करीत फिरणाऱ्या खोडकर मुलासारखा एखादा उनाडटप्पू मेघ इकडून तिकडे बागडत होता मला माझी अमृता प्रीतम आठवली,

अम्बर की इक पाक सुराही,<br>
बादल का इक जाम उठा कर<br>
घूँट चाँदनी पी है हमने ।

चाँदनीच्या घोटाऐवजी कोवळे नरम मखमली लुसलुशीत उन्हाचा घास होता टॅक्सीत आम्ही दोघे व एक लेबनीज तरुणी एवढेच होतो टॅक्सीवाल्याने एक मधुर गीताची टेप लावली लेबनीज लोक हे अतिशय संगीतवेडे आहेत दुबईला टी व्ही वर सुद्धा सगळे गायक-गायिका लेबनीज आहेत म्हणूनही ह्या नगरीला गंधर्वनगरी म्हणावेसे वाटते अत्यंत भडक मेकअप आणि झगमगत्या वस्त्र आभूषणात ह्या एखादे दुःखी, दर्दभरे

प्रणयगीत आळवीत बसतात 'किल्सा किल्सा' हा स्वर इतका हृदयाला जाऊन भिडत होता की हे युगायुगाचे वेदनेचे गीत असावे असे वाटत होते सबंध रस्त्यावर अनेक छोटी मोठी मोटेल्स, चहा, फराळाची दुकाने, दारुची दुकाने लागली कबूल केल्याप्रमाणे बेरुत आल्यावर टॅक्सीवाल्याने आम्हाला एका चांगल्या सभ्य हॉटेलात नेऊन सोडले हॉटेलचा दर ५० पौंड रोज होता पण छान होते 'आँखे' सिनेमाचे बरेचसे शुटींग बेरुतला झाले होते

लेबनान हे एक अरब गणतंत्रराज्य असून भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर आहे उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत १३५ मैल लांब व २० ते ३५ मैल रुंद (पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत) असलेला हा भूप्रदेश निसर्गसौंदर्याने नटलेला आहे दुसऱ्या महायुद्धानंतर लेबनॉन, इस्राइल हे देश जन्माला आले लेबनॉनच्या पश्चिमेला इस्राईल, उत्तरेला भूमध्य समुद्र, दक्षिणेला जॉर्डन व पूर्वेस सीरिया आहे ह्याचे क्षेत्रफळ ३,९५० स्क्वे मैल आहे हे जगातील सर्वात लहान सार्वभौम राज्य आहे

बेरूत (अरबी-बेरोट फ्रेंच-बेराउथ) लेबनानची राजधानी असून सर्वात मोठे बदर आहे अल-अशराफ याह (पूर्व बेरुत) आणि अल-मासा-तिबाह (पश्चिम बेरुत) ह्या दोन टेकड्यावर हे शहर वसले आहे बेरुत हे लेबनॉन पर्वताची पार्श्वभूमी लाभलेले एक नितान्त रमणीय शहर आहे ह्याची लोकसंख्या ९,५०००० आहे 'बेरुत' हे नाव आरमेनिक (पाइन वृक्ष) वरून किंवा रोमन (Berytus) वरून आले असावे पौराणिक परंपरेप्रमाणे हे शहर ह्या किनाऱ्यावरील जुन्या शहरांपैकी असून इलियन (Ilion) ह्या देवाने ते वसविले ह्या इलियनच्या पत्नीचे नाव 'बेरुत' होते 'मुल्ला की दौंड मस्जिद तक' ह्या न्यायाप्रमाणे आपण फक्त घराला पत्नीचे नाव देऊ. 'जानकी कुटीर' 'यमुना कुंज' 'लक्ष्मी-निवास' वगैरे! पण बायकोचे नाव आपल्या राजधानीच्या शहराला देऊन ते इतिहासात अजरामर करणं हा भारतीय नवऱ्याच्या कल्पनेच्या बाहेरचाच मामला आहे असो इजिप्तच्या दुसऱ्या रामसेसच्या कारकीर्दीपासून ते सन १९४९ पर्यंत ब्रिटीशानी हे काबीज करेपर्यंत ह्या शहरावर खूप आक्रमणे झाली ह्या शहराचा उज्ज्वल इतिहास आणि प्रवेशद्वारासारखी ह्याची भौगोलिक स्थिती असूनही १८६० पर्यंत ह्याच्याकडे विशेष कोणाचेही लक्ष गेले नाही सीरीयन राजवटीत ट्रायफोनने (ख्रि पू १४०) ह्याचा नाश केल्यावर ख्रि पू ६४ नंतर रोमन राजवटीने ह्याची भरभराट केली त्यामुळे हा बेरुतचा सुवर्णकाळ मानला जातो ख्रि पू १५ मध्ये मार्क्स, ॲग्रीप्पा ऑगस्टस ह्या रोमन ॲडमिरलने ह्या शहराला भेट दिल्यानतर ही रोमन कॉलनी म्हणून ओळखली जाऊ लागली सन ६३५ ते १११० पर्यंत अरबांनी ह्या शहरावर अमल केला

पुढे बालद्वीनने पहिल्या क्रूसेड (धर्मयुद्धात) मध्ये बेरुत शहराचा कब्जा घेतला सन ११५१ मध्ये इजिप्शियन नौदलाने बेरुतला लुटल्यानंतर आणि मुस्लिम नेता सालादिन

ह्याने बेरुतवर कब्जा केल्यावर सन ११८७ पर्यंत बेरुत शहर हे सतत युद्धाचा आखाडा बनले

सन १७७० मध्ये रशियाने आक्रमण केल्यानतर बेरुत परत सघर्षाचे केंद्र बनले सन १८४१ मध्ये ब्रिटीश, तुर्की आणि ऑस्ट्रीयन्स लोकांच्या ह्याहीपेक्षा भयानक आक्रमणाने बेरुतमधील इजिप्तच्या मोहम्मदअलीची कारकीर्द सपुष्टात आली, आणि बेरुतची पार धूळधाण उडाली सन १८६० मधील धार्मिक कत्तलीमुळे मॅरोनाइट ख्रिश्चन (Maronite) व ड्रुझा (Druzes) ह्यामधील तणाव वाढला आणि ख्रिश्चन लोकाचे येथे पेंव फुटले अनेक अमेरीकन आणि ब्रिटीश धर्मपथके येथे आली त्याचप्रमाणे बेरुतच्या वाढत्या व्यापारी उलाढालींनी ब्रिटीश व सीरीयन लोकाचे बेरुतविषयीचे आकर्षण अधिकच वाढले बदरामध्ये कितीतरी आधुनिक सुधारणा करण्यात आल्या सन १८९५ मध्ये दमास्कस रेल्वे सुरु झाल्यामुळे बेरुतचा विस्तार अधिकच वाढला आणि सन १९०० पर्यंत बेरुतची लोकसख्या १२०००० पर्यंत येऊन पोहोचली १९१२ मध्ये इटलीचे तुर्कस्थानशी घनघोर युद्ध होऊन ते बेरुतमध्ये समुद्रमार्गे घुसले दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारभी सन १९४१ पर्यंत बेरुतवर ब्रिटीश व फ्रेंचाचा अमल होता त्यानंतर मात्र ती स्वतत्र लेबनानची राजधानी म्हणून जाहीर करण्यात आली मात्र सन १९५० पर्यंत जुन्या बेरुत शहराचे फारच थोडेसे अवशेष अस्तित्त्वात राहिले १९७४-७६ च्या काळातील ख्रिश्चन वॉर ने जुन्या शहराला पार बेचिराख करून टाकले पूर्व-पश्चिम बेरुत मधील चकमकीमुळे सर्व व्यापार दुसरीकडे हलविण्यात आला त्रिकोणात्मक पेनिन्शुलाने वेढलेल्या बेरुतच्या उत्तरेला व पश्चिमेला भूमध्य समुद्र, पूर्वेला पर्वताच्या रागा आणि दक्षिणेला २०० एकर पाइन्सची घनदाट जंगले आहेत १९१४ मधील तुर्कस्तानमधील कत्तलीने सुमारे ५०००० शरणार्थी लोकाचे थवेच्या थवे बेरुतमध्ये घुसले ते शहरामध्ये झोपडपट्टी करून राहिले त्यामुळे उच्चभ्रू लोकाची वस्ती व ऑफिसेस दुसरीकडे हलविण्यात आली

बेरुतचे हवामान सामान्यत उन्हाळ्यात कोरडे, उष्ण व हिवाळ्यात सौम्य व आर्द्र असते अधिक तापमान जुलैमध्ये किनाऱ्याजवळ ९० अश फॅ (३३ अश) आणि न्यूनतम तापमान जानेवारीत ६० अश फॅ (१६ अश) असते पाऊस हिवाळ्यात ३० ते ४० इंचापर्यंत पडतो पर्वतावर बर्फ पडते

पूर्वी लेबनानमध्ये घनदाट जगले होती पण जहाजाच्या बाधकामासाठी ही जगले तोडण्यात आली पर्वतावर ओक, पाइन, सुरु, देवदार, बेरीची झाडे, किनाऱ्यावर केळी, महाळूगची लागवड, तराइला ऑलिव्ह, द्राक्ष, तबाखू, खजूर आणि बदामाची लागवड करण्यात येते तर वरच्या उच भागावर पीच, चेरी, सफरचद व पिअर्स होतात उत्तम हवा, फळफळावळ, फुलाची रेलचेल व रमणीय निसर्ग सौंदर्यामुळे बेरुतला पूर्वेचे

स्वित्झर्लंडच म्हणतात अरण्यामध्ये हरिणे, रानमाजर, खारी, रानउंदीर, फ्लेमिंगो, बहिरी ससाणे, गरुड, बदक वगैरे दिसतात

लेबनानमध्ये लोकसख्येच्या १/३ सुन्नी मुस्लिम आहेत इतर धर्मीय लोकात आरमेनियन ऑरथोडॉक्स, ग्रीक ऑरथोडॉक्स, प्रोटेस्टट, ग्रीक लॅटिन, कॅथलिक आणि ज्यूज लोकाचा समावेश होतो आरमेनियन, पॅलेस्टाइन्स शिवाय येथे २५०००० सीरीयन्स आहेत घटनेप्रमाणे ख्रिश्चन राष्ट्राध्यक्ष आणि मुस्लिम पतप्रधान असतो व्यवहाराची भाषा फ्रेंच व अरबी असून इतर अरबी राष्ट्रांपेक्षा येथे इग्रजीचा वापर अधिक करण्यात येतो

१९५२ ते १९७५ च्या काळात बेरुत मोठ्या प्रमाणात बाधकाम, व्यापार आणि फूड प्रोसेसिंग, टेक्स्टाइल्स, बूट आदि व्यवसायात गुतवलेल्या अरबी धनाचे केंद्रस्थान बनले आंतरराष्ट्रीय हवाई मार्गाचे हे मोठे केंद्र असल्यामुळे पर्यटन हा मोठा धदा येथे झपाट्याने वाढला जगातील अगदी कानाकोपऱ्यातील अत्याधुनिक उपभोग्य वस्तु येथे येतात वेश्याव्यवसायामुळे हा व्यापार धदा अधिकच आकर्षक झाला अगदी परवा परवापर्यंत बेरुत हीच मध्यपूर्वेची बाजारपेठ होती. बेरुतला शॉपिंगला जाणे हे मोठ्या ऐश्वर्याचे व इभ्रतीचे लक्षण समजण्यात येत असे

आधुनिक बदरे, विमानतळ त्याचप्रमाणे लेबनानची खुली आर्थिक व चलन पद्धती, बँकाचे व्याजाचे उचित दर, गुप्ततेचे कायदे ह्यामुळे बेरुत हे मध्यपूर्वेकडील आर्थिक व भरभराटीचे व्यापार केंद्र व बाजारपेठ समजली जाते नवीन औद्योगिक केंद्रातील प्रचड मोठी अद्यावत् डिपार्टमेंटल स्टोअर्स, सुपरमार्केटस, पारपारिक मध्यवर्ती बाजारपेठा, रस्त्यावरील असंख्य दुकाने, चलती-फिरती दुकाने ह्यामुळे बाजार नुसता गजबजलेला असतो फर्निचर, धातूकाम, कापडबाजार सबध शहरात विखुरलेला आहे सध्याच्या किमान मजुरीचा दर दरमहा १५० लेबनीज पौंड आहे लोकसख्येच्या मानाने लेबनानमध्ये सर्वात अधिक मेडिकल कॉलेजेस असून १३८ हॉस्पिटल्स आहेत

बेरुतमध्ये वहातुकीची व्यवस्था अद्यावत् आहे दुतर्फा 'गार्ड ऑफ ऑनर' देणारा झाडी असलेले रस्ते शहराला वेढतात सन १९६५ मध्ये ट्राम्सची जागा बसेसने घेतली ओरिएट एक्स्प्रेसने बेरुतला युरोपशी जोडले पण दूरच्या प्रवासासाठीच हिचा उपयोग करण्यात येतो बदरामध्ये २० जहाजे असून वर्षाला ४०००००० टनांपेक्षा अधिक माल वाहून नेण्यात येतो बेरुत इटर नॅशनल एअरपोर्टमध्ये तीसापेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय एअरलाईन्स आहेत बेरुत हा मध्यपूर्वेतील एक अतिशय गजबजलेला व्यस्त विमानतळ आहे

रोमन काळापासून बेरुत कला व शिक्षणाचे केंद्र आहे विविधता व उच्च दर्जा ह्यामुळे हे विद्येचे माहेरघरच आहे प्राथमिक व उच्च शिक्षण अधिक तर खाजगी

सस्थाकडे आहे लेबनान मधील आठ उच्च शैक्षणिक सस्था बेरुतमध्येच आहेत चार मुख्य विद्यापीठे-अमेरिकन युनिव्हर्सिटी ऑफ बेरुत (जगातील उत्तम श्रेष्ठ युनिव्हर्सिटीत हिची गणना होते) फ्रेंच सरकारने चालविलेली सेंट जोसेफ युनिव्हर्सिटी, लेबनीज युनिव्हर्सिटी आणि अरब युनिव्हर्सिटी (अलेक्झांड्रिया युनिव्हर्सिटीला जोडलेली) आहेत बेरुतमध्ये तीन म्युझियम्स, पधरा लायब्ररीज, आणि डझनावारी शैक्षणिक संस्था व सशोधन केंद्रे आहेत म्हणूनच बेरुतला पूर्वेकडील ऑक्सफर्ड असेही म्हणतात

गटे इन्स्टिट्यूट, जॉन केनेडी सेंटर, अरब कल्चरल क्लब, लेबनीज सेंटर्स ही सास्कृतिक केंद्रे आहेत शहरातील आर्ट गॅलरीजमध्ये पेंटिंग, शिल्पकला, फोटोग्राफीची प्रदर्शने भरविली जातात इटरनॅशनल ऑपेरा, बॅले नाटकं वगैरेमुळे शहरातील सांस्कृतिक चळवळींना उत आलेला असतो सर्वत्र उत्सवाचा जल्लोष चाललेला असतो शहरात ४५ थिएटर्स व वीसेक गार्डन्स आहेत

ऐतिहासिक दृष्ट्या लेबनानला भूमध्य सामुद्रिक संस्कृतीचा भला थोरला वारसा आहे भूमध्य सामुद्रिक सस्कृति म्हणजे फोनेशियन, ग्रीक, रोमन, प्राचीन इजिप्शियन आणि अरब संस्कृतीचा सुंदर समन्वय एकोणिसाव्या शतकात लेबनीज भाषाशास्त्रज्ञ, अरबी साहित्याच्या उत्थापनाचे आघाडीचे वीर होते खलील जिब्रान, जॉर्जेस, मायकेल चिन्हासारख्या साहित्यिकाच्या कृतींचे फार मोठ्या प्रमाणावर जागतिक अनुवाद होऊन त्याना आंतरराष्ट्रीय किर्ती मिळाली आहे झाजल (महाकाव्य) तर फारच उच्च अभिरूचीचे आहे

रात्री आकठ भोजन व भरपूर विश्राती घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही बाहेर पडलो 'शॉपिंग' हा महान शब्द वापरण्यास मी धजावत नाही कारण आमचं शॉपिंग म्हणजे तुळशीबाग किंवा पुण्याच्या लक्ष्मीबाई रोड प्रकारचेच दिल्लीलासुद्धा एखाद्या पजाबी मैत्रिणीबरोबर 'शॉपिंग'ला जाण्यास मी घाबरते क्रॉकरी, इम्पोर्टेड साड्या, लहान मुलाचे कपडे, इम्पोर्टेड कापड, लोकर, स्वेटर्स कुठे चागले व स्वस्त दरात मिळतात हे बरोबर हेरून ह्या बायका रणरागिणीच्या, किल्ले सत्तावीस सर करण्याच्या आवेशात त्या दुकानात जातात मग अगोदर आलेल्या गिऱ्हाईकाला धाब्यावर बसवून, व्यवस्थित बार्गेनिंग करून खरेदी करतात त्याचा तो आवेश पाहून माझ्या दिव्य दृष्टीला त्याच्या हातातील चादबीबी, झाशीच्या राणीची तलवार गरगर फिरताना दिसू लागते बिचारा दुकानदार! 'असूनि खास मालक घरचा, म्हणति चोर त्याला' अशी अवस्था होते त्याची ! एकदा मी आणि माझी मैत्रिण ज्योत्स्ना भिडे करोल बागेत शॉपिंगला गेलो तिची मुंबईला बदली झाली होती 'चल ग, दिल्लीच्या काही खासियती घेऊ या' म्हणून आम्ही निघालो ५० रु. रीक्षाचे खर्च करून 'रोशन दी कुल्फी खाऊन आमच्या स्वाऱ्या फक्त नाड्याचे एक बडल घेऊन परतल्या मी आपल तिच सान्त्वन केल, 'जाऊ दे ग अग,

आजकाल सगळीकडे सगळं मिळतं दिल्लीच काय मोठस अपरूप !'

इकडे देशोदेशींच्या आकर्षक मालाने लहडलेल्या दुकानात आम्ही फक्त दोन यांत्रिक हालचाली करणारी केकाटणारी कुत्री घेतली ह्या तीन मजली खेळण्यांच्या प्रचंड दुकानात पुण्याच्या मडईच्या गणपतीच्या मूर्तीएवढे एक प्रचड टेडी बाजार होते किंमत फक्त ५००० पौंड मोठ मोठाल्या बॅगा -(ब्रीफ केसेस नाहीत-आपल्याकडील गरीब स्मगलर ब्रीफकेसेस नोटांसाठी वापरतात) भरून नोटाची गलेलठ्ठ पुडकी सभाळीत. अरबाच्या खरेद्या चालू होत्या अशा प्रचड रकमा मोजण्यासाठी यंत्रे लावलेली होती (Notes Counting machines) ह्यावरून खरेदी किती प्रचंड प्रमाणात होत असेल ह्याची कल्पना येते चेक देण्याची पद्धत दिसली नाही कितीही मोठी रक्कम असो बहुधा रोखच दिल्याचे पाहिले नोटा न मोजता इतक्या सहजतेने फेकल्या जात होत्या की जस काही दोन पैशाच्या कोथिंबीरीच्या जुडीचे पैसे फेकले जात आहेत आपण एखादी नोट द्यायची झाली तरी तीनदा मोजणार, न जाणो एखादी चिकटून बिकटून जास्त तर जाणार नाही ना ही धास्ती ! मुसलमानी नियमाप्रमाणे चोरी केल्यास हात तोडीत असल्याने येथे चोऱ्या होत नसाव्यात शिवाय प्रत्येक जण खोऱ्याने पैसे मिळवीत असल्याने चोऱ्या होत नसाव्यात चोरीचे प्रलोभनही रहात नसावे एकूण बेरुतचे रस्ते म्हणजे मोठमोठाली दुकाने, हॉटेल्स, कॅसिनो-सर्वत्र खादाडपणा व प्रणय ह्याना उत आलेला !

लेबनीज लोकही सेमेटीक वशाचे असून अगदी लखलखीत गोरेपान आहेत पण त्याच्या गोरेपणात युरोपियन लोकांप्रमाणे गाजरासारखा लालिमा मिसळलेला आहे बहुधा अरब, फ्रेंच व रोमन लोकाचा वर्णसकर होऊन कलमी आब्याची ही नवीन पिढी तयार झाली असावी लेबनीज, पलेस्टाईन तरुणी अतिशय सुंदर असतात उंच बाधा, गोंडस गुलाबी वर्ण, रेखीवपणा, असे पूर्व व पश्चिमेचा सगम झालेला त्यांचे सौंदर्य नक्कीच लक्ष वेधून घेते पुढे लग्नानतर पोराबाळयाच्या रगाड्यात लवलवणाऱ्या ह्या चवळीच्या शेंगा भोपळे बनतात ते वेगळे ! त्या बुरखा वापरीत नाहीत त्याचे पोषाख अत्याधुनिक वाटले, ह्या बायका बहुधा मेकअप करण्यातच सारा दिवस घालवीत असाव्यात जितक्या मुली होतील तेवढे चागले असा स्त्री जातीला आनद वाटणारा हा एकमेव देश आहे कारण त्यांना वेश्याव्यवसायाला लावून खोऱ्याने पैसा मिळविता येतो इतर सर्वच अरब देशांपेक्षा लेबनीज लोक हे अधिक सुशिक्षित, सुसस्कृत व उच्च अभिरूचीचे वाटले पाश्चात्य सस्कृतीचा ही ह्याच्यावर इतर अरब देशापेक्षा अधिक प्रभाव दिसला कारण ह्याच्यावर वारवार झालेली परकीय आक्रमणे हॉटेलातसुद्धा खाण्या-पिण्याची भरपूर रेलचेल व चगळ दिसली खाद्य पदार्थांचे विविध प्रकार, काकड्या, सत्री, सफरचदे सुकामेवा आदी पदार्थांनी खच्चून भरलेली दुकाने पाहून तोंडाला पाणी सुटते

रात्री आम्ही येथील प्रसिद्ध कॅसिनो पहाण्यास जाणार होतो त्यापूर्वी हे कोणाबरोबर तरी येथील एक म्युझियम पहाण्यास गेले होते मी तयार होऊन ह्यांची वाट पहात टी व्ही लावून बसले होते तेवढ्यात दारावर 'टकटक' झाली पहाते तर एक हसतमुख देखणा मनुष्य दारात उभा

May I Come in?

मी त्याला सोफ्यावर बसविले हा जॉर्डनचा रहिवासी असून सध्या जर्मनीमधील एका एअर लाइन्समध्ये पायलेट होता त्याला चागले इग्लिश बोलता येत असल्यामुळे मला हायसे वाटले कारण ह्या अरब कट्रीजमध्ये इग्रजी फार कमी लोकाना येते लॅटीन स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, अरबी ह्या भाषाच अधिक चालतात आम्हा भारतीयाना मात्र 'वाघिणीच्या दुधा'ची घुटी जन्मत' पाजली जात असल्यामुळे इग्रजी अधिक जवळची वाटते नाहीतर देशात मोडकं तोडकं अरबी व अधिक भावमुद्रा, हातवारे, ह्यावर काम भागवावे लागते हा अराफत खूप बोलका होता त्याने येथील रिती रिवाज, राजकारण वगैरेची बरीच माहिती दिली मीही त्याला भारतासबधी बरेच काही सागितले इदिरा गाधीविषयीसुद्धा त्याला कुतूहल मिश्रित आदर दिसला मग बोलता बोलता तो एकदम म्हणाला, 'मी आता पर्यंत बऱ्याच 'नॅशनॅलिटीज' स्त्रियाचा अनुभव घेतला आहे पण अजून भारतीय स्त्रीचा काही मला अनुभव नाही '

मी चमकले तो काही माझा विनयभग वगैरे करणार नव्हता पण भारतीय स्त्रिया इतक्या स्वस्त नसतात, त्यांना सर्वांपेक्षा आपल्या शीलाचे जास्त महत्त्व असते हे त्याला पटवून द्यायलाच हवे होते नाहीतर इतर देशात तो असंच भारतीय स्त्रीविषयी तुच्छतेने अवहेलनेने बोलला असता आपण आपला देश सोडून दुसऱ्या देशात जातो तेव्हा आपण केवळ पर्यटक नसतो तर आपल्या देशाचे प्रतिनिधित्वही करीत असतो स्वदेशाची मान खाली जाईल असे कधीही वागू नये मी शांत पण ठाम स्वरात म्हटले, 'आमचा देश महाराणी पद्मिनीचा, नीरजा मिश्राचा आहे पॅन ॲम च्या ह्या एअर होस्टेस चे नाव ऐकल असेल ना तुम्ही ? हेच विधान दुसऱ्या देशातील नागरिकाने तुमच्या पत्नीबद्दल किंवा बहिणीबद्दल केले तर कसे वाटेल ?' तो उमजला, मी सुटले

उजळणाऱ्या मेणबत्तीप्रमाणे वाटणाऱ्या हिरव्यागार वृक्षानी आच्छादिलेल्या डोंगरदऱ्या चादण्यात चमकत असलेले लाबच लाब पसरलेले पण वर खाली होणारे ते रेशमी तुळतुळीत डांबरी रस्ते, गर्द पालवीतून पाझरणाऱ्या चंद्रकिरणाच्या कवडशाच्या वेलबुट्टीने सजलेली रस्त्याची किनार--- ! निसर्गाचे हे अद्भुत लावण्य नजरेत साठवीत रात्री आठ वाजता आम्ही टॅक्सीने कॅसिनोला पोहोचलो भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर एका उंच उच कड्यावर हा जगप्रसिद्ध कॅसिनो आहे हा ला-वेगास (अमेरिका) व झामुनी (फ्रान्स) ह्या जगातील दोन मोठ्या कॅसिनोजनंतर तिसऱ्या नबरचा कॅसिनो आहे इथले

जुगार कोट्यावधि डॉलर्सची उलाढाल घडवून आणतात अगदी एका रात्रीत मध्यपूर्वेतील धनाढ्य दिलदार जरी मुख्य गिऱ्हाईके असली तरी जगातून सर्व भागातून लोक येथे येतात उन्मत्त, वासना उद्दीपित करणारे कॅबरे सर्वप्रथम येथेच सुरु झाले मग हॅम्बुर्ग, पॅरीस आणि जगभर पसरले लंडनमधील ब्रिटीश उमरावाच्या इस्टेटी जशा अरब धडाधड विकत घेतात त्याचप्रमाणे पैशाच्या तालावर या गौरांगनामदालसांना नाचविण्यात अरबाना फार मोठेपणा वाटतो साहजिकच प्रवासी लोकांचा येथे वर्षभर मेळावा असतो

टॅक्सीतून उतरल्याबरोबर समोर पसरलेल्या अथांग सागराचे गुढरम्य दर्शन झाले सागराविषयी मला लहानपणापासूनच आकर्षण वाटते जन्मोजन्मीचे ऋणानुबंध जोडले आहेत त्याच्याशी मानवी मैत्री फसवी असते पोकळ असते पण हा अक्षयमित्र कधी दगा देईल असे वाटत नाही सागराच्या गहन गंभीरतेने मी अंर्तमुख होते त्याच्या ह्या सळसळणाऱ्या लाटा पाहिल्या की अनंत स्मृतींची पाखर गुजार करू लागतात त्याची असीमता, अथांगता पाहिली की एक अद्भूत विचार एक अनोळखी गंधर्व नगरी दृष्टीसमोर साकारू लागते असे हे अज्ञात गूढतेचे अवगुंठन तो कशाला घेतो ? ओळखीचा वाटण्यापूर्वीच तो असा अनोळखी होऊन का बसतो ? त्याच्या ह्या विशाल चंदेरीपसाऱ्यावर अशी कातर हुरहुर का रेंगाळते ? कुठे आहे त्याचे गुढ ?

त्या चिन्मयानंदाला बाहेर सोडून आम्ही आत प्रवेश केला आणि कॅलिडोस्कोप फिरविल्यावर आकृतिबंध बदलतो त्याप्रमाणे बाहेरील सात्विक गुढ तापसी वातावरणाचे एकदम राजविलासी इंद्रपुरीत रुपांतर झाले एका अतिविशाल हॉटेलमध्ये पाऊल रुतेल इतके गुबगुबीत, दुलदुलीत, लाल, निळ्या, पिवळ्या रंगाचे मखमली गालिचे ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरले होते

बेल्जम कट ग्लासेसची झुंबर लक्षलक्ष दिव्यानी लखलखत होती भिंतीवर उत्तमोत्तम पेंटींग्ज आणि बेल्जमचेच बिलोरी आरसे चमचमत होते अगदी कागदाचेच वाटावे इतक्या कडक इस्त्रीच्या गणवेशात वेटर्स इकडून तिकडे लगबग करीत होते अगदी अरेबियन नाईट्सची आठवण करून देणाऱ्या साकी मोठ्या नाजो अदाओसे मद्याचे चषक भरीत होत्या पाँटीॲक निशान, फोर्डसारख्या महाकाय गाडीतून विलासधर, लक्ष्मीधर उतरत होते (मला वाटत मर्सिडीज येथे गरीब लोक वापरीत असावेत) प्रत्येकाच्या हातात नोटानी ठसाठस भरलेली बॅग, त्याच्याबरोबर त्याच्या रंभा उर्वशी, तिल्लोत्तमा, मेनका-त्या त्याच्या धर्मपत्नीच असाव्यात-असा भारतीय मध्यम वर्गीय कायदा येथे दिसला नाही त्याच्या सळसळत्या रेशमी मखमली वस्त्रानाही हिरे मोती माणकं जडविली होती त्यातून आणि त्याच्या अंगावरील लखलखणाऱ्या आभूषणातून झुंबरांचा प्रकाश परावर्तीत होऊन लखलखत दैदीप्यमान किरण फुटत होती गरमागरम खाद्य पदार्थातून निघणाऱ्या सुगंधी वाफा

उंची सिगार्सचा कडवट मधूर गंध, इन्टिमेंट चार्ली, वेलवेटी, ख्रिश्चन डोअर निना-रिकी आदी उंची परफ्युम्सचा मंद मंद सुगंध आणि ऐश्वर्याचा धूर याची सरमिसळ, उंची क्राकरीचा मधून किणकिणाट हास्यविनोदाची थुईथुई उडणारी कारंजी, यंत्रातून पडणाऱ्या नाण्याचा खणखणाट, द्युताचा उन्माद, विषयोभोगाची उत्कंठा, दुःख अभाव, निराशा ह्यांचे नाव तरी ऐकले होते का ह्यांनी ? चौऱ्याऐंशी लक्ष योनी फिरवून मिळालेल्या मनुष्यजन्माचा येथे पुरेपुर उपभोग घेतला जात होता त्यात यौवनाचा उन्माद -

Flowers will bloom again another day,

Man has never his youth again

कुबेराची अलकानगरी अशीच असेल का ? तो जन्मत विख्यात 'एल-डो-रॅडो' असेच असेल का ? या प्रत्येक नलाच्या मनात शिरलेला कली ह्यांना कुठे घेऊन जाणार ? मध्येच कोणाला तरी जॅकपॉट लागल्याने हर्षवायूचा उन्मादात त्या लक्ष्मीधराने आपल्या हातातील नोटाची भरलेली बॅग आपल्या माशुकेच्या डोक्यावर उपडी केली-मग काय विचारता ?—— उन्मादपूर्ण आरोळ्या, जल्लोष--- !

पैशाचा हा इतका प्रचंड प्रमाणातील दौलतजादा पाहून मला अगदी शिसारी आली मी त्या हॉटेलच्या बाहेर येऊन व्हराड्यात उभी राहिले मला वाटत विधात्याने प्रारंभी सुंदर सुवासिक कोमल फुले निर्माण केली त्यावेळी सृष्टीत दुसरे तिसरे काही नव्हते पण पुढे फुलाची इतकी गर्दी झाली की विश्वाच्या आवारात न मावण्याइतका सौंदर्याला उत येऊन, सौंदर्याच्या ह्या फाजील अतिरेकातून कुरूपतेचा जन्म झाला सुवासाच्या अमर्यादेत, भेसळ दुर्गंधी झाली तसाच हा संपत्तीचा, विलासाचा अतिरेक वाटत नाही का ?

बाहेर आल्यावर वाऱ्याच्या थंडगार झुळुकेने बरे वाटले समोर अथांग भूमध्य सागर पसरला होता लाल मखमली काळ्या निळ्या कांजीवरमसारख्या-- । त्याने मला दिलासा दिला का म्हणून करावा मी त्याचा उबग ? पैसा तोच असतो त्याचा विनिमय करण्याची प्रत्येकाची कल्पना वेगळी असते माझ्या जिप्सी नवऱ्याला इतका पैसा मिळाला तर तो आपले फाटके कपडे सावरीत (हो, कपड्याचा आनंदच आहे आमच्याकडे । कपड्यासाठी पैसे खर्च करणे म्हणजे उधळपट्टी । बनियन फाटला तरी करोडोंका नुकसान झाल्यासारखा आठ दिवस सुतकात असतो बिचारा) जगाच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रवासच करून असतो अगदी महागड्या (स्वित्झर्लंडमधेसुद्धा) हॉटेलमध्ये सुद्धा राहील लहानपणी ह्यांची आई बहुधा बाळाला थोपटून निजवताना ! 'दमादम मस्त कलंदर' हे अंगाई गीत म्हणत असावी इतकी मस्त कलंदर वृत्ती ।

मला जर एवढा पैसा मिळाला तर मी गंगाधर गाडगीळ, गोखले, कानिटकर, पु.ल, तेंडुलकरच काय पण जगातील सर्व अगदी सिंहली, स्वाहीली भाषेतील लोकांनासुद्धा आपल्या प्लॅटिनमच्या कपाटात बंदीस्त करेल त्याला चांगले कोहिनूरहून मोठ्या हिऱ्याचे कुलूप लावून त्याची सोन्याची रत्नजडीत गलेलठ्ठ चावी कमरेला लटकवून मोठ्या तोऱ्यात ह्या मंडळीसमोर उभी राहिल मग बिचारे पु.ल आपल्या ड्युक्स नोजवरील जाडजुड फ्रेम व भिंगाच्या चष्म्यातून आपले एक हजार वॉल्ट पॉवरचे प्रखर नेत्र गरगर फिरवून म्हणतील,

'बाई, होशील बर तू सुंदर, पण हे असल भयानक प्रवासवर्णन लिहू नकोस कृपा कर माझं पूर्वरंग, अपूर्वाई निदान डोळ्याखालून तरी घाल ग बयो' तेंडूलकर आपली गुजराल टाईप दाढी कुरवाळीत मिश्किल घारे डोळे बारीक करीत 'अर्धसत्याकडून पूर्ण सत्याकडे कसे जावे' किंवा 'वल्लभभाईनंतर कोणाला पाठंगुळी घ्यावे' ह्याचा निवांतपणे विचार करीत बसतील कारण इतका निवांतपणा त्यांना फक्त माझ्या कपाटातच मिळेल कानिटकर रायगडानंतर बरेच दिवसांनी निवांतपणे कोणाला खडबडून जागे करावे ह्याचा खल करतील गाडगीळ आपल नुसतंच एक खुसखुशीत हास्य फेकतील शटल कॉकसारख सज्ञाप्रवाही-पण त्यांत सागर मे सागर सामावलेला असेल

माझ्या अंगात असं 'शेख-मोहमद-मुंगेरीलाल' च जुळं संचारल असताना कसल्याशा चाहुलीने मी मागे वळून पाहिले पहाते तर एक भला दांडगा अरब आपली जिवणी ह्या कानापासून त्या कानापर्यंत फाकवीत आपली ब्रीफकेस उघडून उभा।

'फूलूस, मादाम !'

पहाते तर ब्रीफकेस नोटांनी शिगोशिग भरलेली म्हणजे काय। हा महाभाग आपल्याला विकत बिकत तर घेत नाही ना ? मला फसकन् हसू फुटल आमच्या आखल्या कर्णिक घराण्यात आणि माझ्या आईच्या माहेरच्या प्रधान-देशमुख वरडोलकर इतक्या प्रचंड मोठ्या खानदानामध्ये हुंडा देऊन नवरा नामक कमाऊ, टिकाऊ आणि साता जन्माचा बॉडीगार्ड प्राणी कोणी विकत घेतला नव्हता, आणि हा प्राणी माझ्यासारख्या निकम्म्या, बावळट, टाकाऊ, प्राण्याला पैसे देतोय ! 'तुला कोणीही पळवणार नाही निर्धास्त रहा आणि चुकून पळविली तर दुसऱ्या दिवशी आणून पोचती करतील' असं माझा नवरा नेहमी म्हणत असतो माझ्या चेहऱ्यावर कळत न कळत उमटलेला हसू पाहून त्याची भीड चेपली आणि तो काही तरी भराभर 'कट्टकडकट्ट' करू लागला सावकाश बोललेलं अरबी मला समजत पण ह्या पठ्ठ्याची तर ओरिएण्ट एक्सप्रेस अगदी विदाउट ब्रेक तुफान वेगात धाडधाड दौडत होती आता कुठे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येऊन मी टरकले माझ्या अंगाला दरदरून घाम फुटला आत हॉलमध्ये इतका जल्लोष चालला होता की मी ठणाठणा पांचजन्य फुकला असता तरी कोणाला ऐकू आला नसता मी

मोडक्या तोडक्या अरबी भाषेत 'ला ला' (नाही, नाही) करीत नकारात्मक मुंडी हालवीत होते. 'मी त्यातली नाही' हे मला सागायचे होते तर ह्या सौदागराने ब्रीफकेसचा दुसरा कप्पा उघडला देवा रे। सुदैवाने 'धावत येई सख्या यदुराया' हा माझा धावा ऐकून आमचा टॅक्सीवाला धावत आला आणि त्याने रागाने काही कडकड केली बहुधा त्याच्या आया-बहिणींचा उद्धार केला असावा तसा तो खांदे उडवीत चालता झाला म्हणजे 'पुण्यप्रभाव' नाटकामधील वसुधरा बनून ह्या वृदावनाचे मी हृदय परिवर्तन केले असे नाही तू नहीं और सही, और नहीं और सहीं। जगात माणुसकी फार महाग आहे, दुर्मिळ आहे पण माणसाचे, त्यातल्या त्यात स्त्रीचे शरीर ही फारच स्वस्त व सुलभ-सहजसाध्य वस्तु आहे टॅक्सीवाल्याने, अस एकटच बाहेर येऊन उभी राहिल्याबद्दल मला चागल फैलावर घेतल ह्या विलक्षण प्रसगातून मी एवढच तात्पर्य काढल, स्त्रीची इच्छा नसेल तर ऐहिक भोग, ऐश्वर्य, विलास विषयोपभोगाने थबथबलेल्या ह्या देशात कोणी तिच्या अगालाही हात लावू शकत नाही आणि अध्यात्म, उदात्त उच्च आदर्शाचे पोवाडे गाणाऱ्या शभर कोटींच्या आमच्या देशात स्त्रीची इच्छा असो वा नसो ती विकली जाते हो, अगदी अगदी अग्निब्राह्मणाच्या साक्षीने पाणिग्रहण करून तिच्या सरक्षणाची हमी घेतलेला तिचा पति, जन्मदाता पिता किंवा दर राखी पौर्णिमेला रक्षा-बधनापुरतच हूमायूँ कर्णावतीच्या आदर्शाचे पोवाडे गाणारे तिचे भाऊसुद्धा हे पुण्यकर्म करतात

राजेशाही ऐश्वर्याचे विविधरगी आणि विविध ढगी सोहाळे पाहून, अनुभवून आम्ही ह्या गधर्वनगरीला रामराम करून परत निघालो वाटेत एक ॲक्सिडेंट झालेला दिसला त्यात असाच एक वाटेवरचा वाटसरु मृत्युमुखी पडलेला दिसला त्या बेवारशी प्रेताची कोणालाच ओळख लागत नव्हती माझ्या अंगावर शहारे आले आपणही परदेशात रहातो, आपल्यालाही अस बेवारशी मरण येण्याची शक्यता आहे नको रे बाबा! आपल्या देशात, जन्मभूमीच्या माडीवर, स्वकीयाच्या सहवासात मरण येऊ दे

आम्ही निघालो, त्या सुमारासच युद्धाचा परत आगडोंब उसळला आम्ही येण्यापूर्वी प्रवेश बदच होता जणु आमच्यासाठीच चार दिवस प्रवेश खुला झाला होता युद्धाने ह्या सुदर नितान्त रमणीय देशाची धूळधाण उडाली आहे इस्त्राइलची भूमी ही अरबाची असून त्यावर ज्यू लोकांनी वसाहत केली ह्या ज्यू लोकाना अरबांनी हाकलून दिले व पॅलेस्टाइनचा प्रश्न निर्माण झाला ह्या पॅलेस्टाईन अरबाना शेजारचा लेबनान देश हल्ले करण्यास फारच सोईचा होता त्यामुळे पॅलेस्टाइन लोकाचे तळ लेबनानमध्ये झाले, व त्याना नेस्तनाबूद करण्यासाठी इस्त्राइलचे हल्ले लेबनानवर सुरू झाले व ज्या लेबनीज लोकाना सुरा, सुदरी, सपत्ति, ऐषोआरामाशिवाय दुसरी जिंदगी माहित नव्हती त्याना आता एकदम खडतर दिवस आले आहेत ही एवढी युद्धे कशासाठी? सत्तालालसा-पाशवी महत्त्वाकाक्षा बेरुतमध्ये ख्रिश्चन मुस्लिमाला मारत होता, मुस्लीम

ख्रिश्चनाला शेवटी एक वेळ अशी आली की ख्रिश्चन एकमेकाना मारायला लागले व मुस्लीम त्याच्याच लोकाना नाव धर्माच अन खच प्रेतांचा त्यांची उपासमार होत आहे, सगळ्या बेरुतभर युद्ध पेटले आहे, घरादारावर नांगर फिरला, जिकडे पहावे तिकडे आग, जाळपोळ, तोफगोळ्याच्या निशाण्या व प्रेताचे ढीग भिंतींवर तोफगोळ्यानी भोक पडली बेरुतमधील लोक आता या विध्वसासकट जगायला शिकले आहेत कलकत्याला नक्षलवाद्याच्या काळात बाजारात एकीकडे बॉम्ब पडला तरी बगाली गृहिणी शातपणे मासळीची खरेदी करीत असलेले चित्र प्रसिद्ध झाले होते त्याप्रमाणे येथेही बॉम्ब पडण ही नाविन्याची गोष्ट राहिली नाही बॉम्ब पडतो, इमारती कोसळतात पाच मिनिटात परदेशीआलिशान मोटारी रस्त्यावर दिसतात व्यापारी गाडीतून उतरतात परदेशी वस्तु रस्त्यावरच विकतात पुन्हा गोळीबार किंवा बॉम्ब पडेपर्यंत हा बाजार चालतो पूर्णपणे उध्वस्त झालेल्या इमारतीत शातपणे धदा करणारा शिंपी येथे पाहिला याच विश्वासात एका जोडप्याने लग्नही आटपल म्हणे ! सगळ्या मध्यपूर्वेत बेरुतचे लोक उच्च शिक्षित व पुढारलेले असल्यामुळे अशा लोकांचे दुबई, कुवेत, बहारीनसारख्या देशात मोठ्या प्रमाणावर पलायन सुरु झाले ह्या लोकांनी ह्या नवीन देशात आपला चागला जम बसविला, पैसे व प्रतिष्ठा मिळविली पण 'आम्हाला हे काही नको, आम्हाला आमच्या बेरुतला परत जायला मिळाले तरच आम्ही खरे सुखी होऊ.' असे म्हणत अगदी साध्या साध्या गोष्टींसाठी 'आपल्या बेरुत' ची आठवण काढून त्यांना ओक्साबोक्शी रडताना आम्ही दुबईला पाहिले आहे गोव्याचा मनुष्य गोव्याबाहेर कसा समुद्रातून काढलेल्या ताज्या मासोळीसारखा फडफडतो किंवा काश्मिरमध्ये काश्मिरी गुलाबासारखाच प्रफुल्लित, टवटवीत असलेला काश्मिरी मनुष्य काश्मीरच्या बाहेर कसा सुकून जातो तशीच तडफड, तशीच तगमग लेबनीज माणसाच्या मनाची चालली आहे माणूस केवळ देशभक्तीनेच देशासाठी मरतो हे खरे नाही पिढ्या न् पिढ्या, शतकानुशतके मायभूमीच्या मातीशी आपल्या पार्थिव शरीराची माती एकजीव झालेली असते, ती परकीय देशातील मातीत सहजासहजी एकजीव होऊ शकत नाही

युद्ध चालू झाल्याने बेरुतचा हवाई अड्डा बद झाल्यामुळे आम्ही बेरुतहून परत दमास्कसला टॅक्सीने आलो व सीरियन एअरवेजने दुबईला रवाना झालो

* * *

# अना ओहीब अल इराक

ता-ही, तौ-ली-ह, शांग-ती-हा, फा-ही-यान, श्वानचांग, इत्सिंग आणि लक्ष्मण भास्कर जावडेकर लहानपणी चिनी प्रवाशांच्या नावांची यादी आम्ही घोकत असू वरील प्रवाशांनंतर मला वाटतं आमच्या पतिराजाचच नांव घेतल तर योग्य ठरेल इतर कसलाही शोक नाही पण प्रवासाचा मात्र भरपूर शोक कपड्यालत्त्याची आवड तर इतकी दिव्य की नोकर कोण व मालक कोण हे ओळखणही कठीण (त्यांच्या मते, विद्वत्तेचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर इतके दिसते की ते न ओळखणाराच मूर्ख) त्यांच्या नशीबात प्रवासही भरपूर म्हणूनच मॅनेनयजाटिससारख्या भयानक राक्षसाने त्याचे दोन्ही कान हिरावले, अग गलीत पलीत पिण्ड् अशी अवस्था केली तरी कपनीने सहा महिन्यासाठी आपले पोस्टींग केल्याचे ऐकूनच त्यांचे डोळे लखलखू लागले माझे मन मात्र ह्याचा अपंगपणा, इराक-इराण युद्धाच्या ज्वाला ह्यामुळे दही खाऊं मही खाऊ करीत होते पण वीर भारतीय नारीची प्रतिमा मी कशी बरे डागाळीन? शिवाय ह्यांचे न्यूरोफिजिशीअन कर्नल डॉ सुरींनीही हिरवा झेंडा दाखविला मागे इजिप्तला जाताना बगदादचा व्हिसा न मिळाल्यामुळे सहा तास एअरपोर्टवर खादीची चळवळ करीत बसावे लागले होते तेव्हा चुकलेला योग आता जुळून आला आमच्या कपनीने २९ सप्टेंबरचे तिकीट अगदी कन्फर्म झाल्याचे कळविले

बऱ्याच दिवसानी जायचे असल्यामुळे घराची खूपच आवराआवर करावी लागली गरम कपडे, कपाटे, स्टोअर, गाद्या सगळीकडे गॅमॅक्सिन पावडरीचा मारा केला तेला-तुपासून सगळे खाण्यापिण्याचे पदार्थ मैत्रिणींना वाटून टाकले आणि २८ तारखेला दुपारी कपनीच्या मॅनेजरचा फोन आला 'तुमचं तिकीट कन्फर्मड नव्हते, सबब तुम्ही उद्या जाऊ शकत नाही' विचार करा आमची काय अवस्था झाली असेल। घरात धान्याचा कण नाही सर्वत्र गॅमॅक्सिन पावडर मारलेली डाळ, तादूळ थोडं थोडं तरी आणता येईल पण तेल तुप सुट कस आणणार? नाईलाजाने ज्याना मी तेल, तूप दिल होतं त्याच्याकडून परत घे दान, दे दान करून थोडस मागून घेतलं शेवटी सहा ऑक्टोबरला आमचं जाण्याचं अगदी नक्की झाल, आणि आमच घोड एकदाच गगेत न्हायलं

दुपारी तीन वाजता आम्ही एअरपार्टवर पोहोचलो सामानाचे वजन केले जास्त वजन भरल्याने १२०० रु जास्त भरावे लागणार होते मग घरच साजुक तूप, वाल, लोणची, मसाले असं बरचस सामान आम्हाला पोहोचविण्यास आलेल्या ह्याच्या मित्राना वाटून टाकल ते बॅचलर असल्यामुळे त्याची दिवाळीच झाली

आमचे प्लेन जबो असून अगदी फुल होते त्यावेळी इराकमध्ये अनेक प्रकल्प चालू होते इराक सरकार बांधकामावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत होते पण त्यासाठी त्यांच्याकडे पर्याप्त मनुष्यबळ, तज्ज्ञ नसल्यामुळे भारत, पाकिस्तान, तुर्कस्तान सारख्या देशातून लोकाना पाचारण करण्यात येते ह्या येणाऱ्या लोकाना इराक एअरवेज, इराकी विमान कंपनीने गेल्यास व्हिसा देते आमच्या विमानात जास्त गर्दी कार्पेंटर, मिस्त्री वगैरे लोकाची होती जास्त लोक पजाबी होते मुबई जशी मिनी मुबई आहे तसे इराक 'मिनी पजाब' आहे हवाई सुंदऱ्या ह्या लोकाशी अतिशय तुच्छतेने व तुसडेपणाने वागत असलेल्या पाहून मला खूप वाईट वाटले वास्तविक त्याच्या दृष्टीने सर्व प्रवासी सारखेच असले पाहिजेत हेही लोक पूर्ण पैसे भरून आलेले असतात बिचारे खूप व्यवस्थित व सभ्यपणाने वागतात पण आम्हाला एखाद्या मत्र्याने किंवा प्रसिद्ध अभिनेत्याने विमानात दारू पिऊन धिंगाणा केलेला चालतो ह्या जगात प्रतिष्ठा फक्त सत्ता व पैशाने मिळते हिऱ्या-रत्नाप्रमाणे लखलखणारी 'सा रम्या नगरी दुबई' अगदी डोळे भरून पाहिली जुन्या मैत्रिणींना वरून 'टाटा' केले बिचाऱ्यांना कल्पनाही नसेल हेमा आपल्या डोक्यावरून उडत गेल्याची

बरोबर साडेपाच तासानी म्हणजे रात्री ९ वाजता आमचे विमान बगदाद विमानतळावर उतले आम्हाला प्रथम घड्याळ २ ॥ तास मागे करावे लागले कस्टमसाठी कस्टम काउटरवर गेलो तर तेथे भली थोरली रांग। आमचा नबर येईपर्यंत बहुधा फटफटल असत पण पाहिल तर बायकाची राग वेगळी होती माझा तिसरा नबर लागला सगळ्या जगात बहुधा बगदाद असा एकच विमानतळ असा आहे की तेथे बायकासाठी कस्टम व इमिग्रेशनची वेगळी रांग असते ह्या सव्यापसव्यातून बाहेर पडून सामान ताब्यात घेतल्यावर आम्ही आमच्या कपनीच्या माणसांचा शोध घेऊ लागलो पण एकमेकाचे दर्शन कधीच न झाल्यामुळे त्याला ओळखणार तरी कसे ? बहुतेक कंपनीचे लोक आपापल्या कपनीचे कार्ड डोक्यावर घेऊन फिरतात तसाही कोणी प्राणी आढळेना तेव्हा हेच आपल्या कंपनीचे कार्ड डोक्यावर घेऊन फिरू लागले पण काही प्रतिसाद मिळेना रात्रीचे दहा वाजलेले आम्ही नवीन त्यात हे ठार बहिरे अनोळखी प्रदेश, भाषेची अडचण मोठी पचाईत पडली पण सुदैवाने एका हॉटेलचा एजंट आमच्या कपनीला ओळखत होता त्याने कंपनीच्या मॅनेजरला फोन केला अर्ध्या तासात मॅनेजर गाडी घेऊन आला त्याला आमच्या येण्याचा टेलेक्स मिळाला नव्हता असो कारमध्ये बसल्यानंतर अधारात त्या गूढरम्य दिसणाऱ्या बगदादकडे मी पहात राहिले, एकटक हेच ते हरून-अल-रशीद, सालादीस नबुचदेसर, हमुराबी सारख्या शूर न्यायप्रिय शासकाचे बगदाद, सिंदबादचे बगदाद-लैलाचे माहेरघर एकेकाळी खोमानीच्या वक्रदृष्टीचा बळी आणि आज स्वतःला 'अह ब्रह्मास्मि' समजणाऱ्या अमेरीकेच्या मार्गातील भली थोरली

इराक शब्दाचा मूळ अर्थ आहे उगम अरबी भाषेत ह्या देशास 'अल-मजम्हरिया अल इराकिया' असे म्हणतात (Republic of Iraq)

मेसापोटेमियन संस्कृती, सुमेरियन, बाबिलोनियन संस्कृती इतकी जुनी आहे ख्रि पू जवळ जवळ ५०० वर्षानंतर इराण व इतर राष्ट्रानी ह्या भागाचा कब्जा घेतला इ.स ६३७ मध्ये मुस्लीम अरबानी हा भाग जिंकला सन १६३८ मध्ये ऑटोमन तुर्कांनी ह्यास जिंकून आपल्या साम्राज्यात ह्याचा समावेश केला पहिल्या महायुद्धात ब्रिटीशानी तुर्कस्थानाकडून इराक घेतले १९२० मध्ये इराक ब्रिटीशांचे माडलिक राष्ट्र झाले इराकी लोकानी आपला पहिला माडलिक राजा म्हणून फैजल ह्यास निवडले लीग ऑफ नेशन्सने १९३२ मध्ये मांडलिकत्व रद्द केले व जागतिक सघटनेत एक स्वतंत्र राज्य म्हणून इराकला मान्यता दिली १९४१ मध्ये इराकी सैन्यानी सरकार ताब्यात घेतले ह्या सघटनेने जर्मनीची बाजू घेतली पण ब्रिटीश सेना व जॉर्डन अरबांनी ह्या जर्मन पुरस्कर्त्या सघटनेची हकालपट्टी केली दुसऱ्या महायुध्दात १९४३ मध्ये इराकने जर्मनी, इटली, व जपानविरुद्ध युध्द पुकारले १९४५ मध्ये इराक युनायटेड नेशन्सचा सभासद झाला इस्त्राइलच्या नव्या राज्याच्या उभारणीस विरोध करण्यासाठी इराक १९४८ नंतर अरब लीग राष्ट्रास जाऊन मिळाले

इराकमध्ये राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्राचा प्रमुख मानला जातो केन्द्रीय मत्रीमंडळाचा प्रमुख म्हणून पतप्रधानाची नेमणूक करणे हा त्याचा अधिकार असतो इराक रिपब्लिकने नवीन संसदीय व्यवस्था सुरु केली सार्वत्रिक निवडणुका सुरु झाल्या २० वर्षांवरील सर्व पुरुषास मतदानाचा अधिकार आहे १९५८ मध्ये महिलांनासुद्धा मत देण्याचा अधिकार मिळाला कॉन्झर्वेटिव कॉन्स्टिट्यूशनल युनियन पार्टी ही सर्वात मोठी राजकीय पार्टी आहे. नॅशनल डेमॉक्रेटिक, इडिपेंडण्ट, युनायटेड पॉप्युलर फ्रंट, नेशन सोशालिस्ट ह्या इतर राजकीय पार्ट्या आहेत

स्थानीय सरकार - इराकची १४ लिवाज किंवा जिल्ह्यात विभागणी करण्यात आली आहे प्रत्येक 'लिवा' वर एक मुटासारिफ (गव्हर्नर) असतो लिवाजची क्वाधाप्ट (gudhes) मध्ये विभागणी करण्यात येऊन त्यावर क्वामाक्वाम्स (Quimma quams) किंवा कमिशनर असतो म्युन्सिपालटीमध्ये मेयर आणि स्थानीय निवडून आलेले कौन्सिल असते

इराक हा देश आशियाच्या दक्षिण-पश्चिम भागात असून अरब देशांचा उत्तर-पूर्व भाग इराकने व्यापला आहे इराक हा देश मेसापोटेमिया ह्या नावाने प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. मेसापोटेमिया हा फ्रेंच शब्द 'दुआब' ह्या अर्थी आहे तुर्कस्तानच्या पहाडी इलाख्यात उगम पावलेल्या तैग्रीस व युफ्रेटिस ह्या नद्यांचा २००० मैल लांब व १००

मैल रुद दुआब म्हणजे मेसापोटेमिया सुमारे ५०० वर्षांपासून हा दुआब सपन्न म्हणून प्रसिद्ध आहे बगदाद,करबला,हिला ही गावं हिरवीगार दिसली नजफ मात्र वैराण आहे इराकच्या उत्तरेला तुर्कस्थान,पश्चिमेला सीरिया-जॉर्डन,सौदी अरेबिया,दक्षिणेला कुवेत, अरेबियन गल्फ व पूर्वेला इराण असून इराक, आशिया-अफ्रिका व युरोपचा सेतू आहे बगदादाहून ओरिएण्ट एक्सप्रेसने थट युरोपला जाता येते

इराकचे क्षेत्रफळ ४३८,४४६ स्क्वअर किलोमीटर आहे म्हणजे हा देश तसा खूप मोठा आहे पण त्याच्या १/३ क्षेत्रफळाइतकी हा दुआब इराकची ९५% वस्ती सामावून घेतो बाकीचा भाग वैराण व मरुमय आहे इराकची लोकसख्या एक कोटी तीस लाख आहे त्यातील ऐंशी प्रतिशत अरब,त्यानतर कुरदीश,तुर्कीमन,आरमेनियन व इतर येतात अधिक लोक मुस्लीम आहेत व मुस्लीम हा राष्ट्रीय धर्म आहे नतर ख्रिश्चन, येजडीज (उत्तर इराक) सबीअन्स (दक्षिण इराक) हे धर्म येतात मुख्य भाषा अरबी आहे

इराकचे हवामान विषम आहे उन्हाळ्यात ५८ सें.ग्रे व हिवाळ्यात ४ अश पर्यंत तापमान जाते पाऊस हिवाळ्यात पडतो उत्तर इराकला बर्फ पडते हवा निरोगी,रोगराई येथे नाही डास असले तरी ते मलेरियाचे नाहीत त्यामुळे मलेरिया असलेल्या देशातून येणाऱ्या लोकांची कसून वैद्यकीय तपासणी होते

इराक मध्ये डोंगर,पठारे,टेकड्या भरपूर आहेत जसजसे उत्तरपूर्वेकडे जावे,तसतसे पर्वत उच उत्तुग होत जातात हीलकुर्द हे सर्वांत उच शिखर आहे (उंची ३६०० फूट) ब्रॉडिस्ट,सुरयादिमा,कींडील,बिखैर,बाकीरमन हे महत्त्वाचे पर्वत आहेत दक्षिणेला यावे तसतसा सपाटीचा प्रदेश येतो इकडे अल-हवा जिया, अल-हॅमर, अल-सा दिया हे दलदलीचे भाग आहेत तुर्कस्तानला उगम पावलेल्या तैग्रीस व युफ्रेटिस ह्या प्रमुख मोठ्या नद्या आहेत, कुरनालला ह्यांचा सगम होऊन शाट-अल-अरब (Shatt-Al-Arab) ह्या नावाने ती अरेबियन गल्फला जाऊन मिळते तैग्रीस १४१८ किलोमीटर लाब व युफ्रेटिस १२०० किलोमीटर लाब आहे, सावा शारी ही नैसर्गिक सरोवरे तर थारथार,अल-रझाझा,हवानिया,दर्बन्दीखान दोरून ही कृत्रिम सरोवरे आहेत पठारी प्रदेशातील पाणथळ जागा मच्छीमारीसाठी प्रसिद्ध आहेत अल-हवानिया,सफार दालमाज,सादीया ह्या पाणथळ जागा मच्छीमारीसाठी प्रसिद्ध आहेत

प्राचीन काळापासून हा दुआब सुपीक व संपन्न आहे शिवाय जुलै १७३० च्या क्रातीनतर शेतकीच्या कायद्यात सुधारणा झाली शेतकीच्या आधुनिक तात्रिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला सामुदायिक शेतीवर भर देण्यात आला उत्तर व दक्षिण इराकला शेती जास्त प्रमाणात होते दक्षिणेकडे बसऱ्याजवळ गहू,तांदूळ,कापूस होतो बार्ली,मका, आळशी, तंबाखू उत्तरेला होतो डाळी मात्र दिसत नाहीत फक्त मसुरीची डाळ दिसते बदाम,पिस्ते भरपूर होतात ताडाचे झाड हे जगातील सर्वांत जुने झाड असून जगातील

४०% खजूर इराकमध्ये होतो खजुराची ३८% झाडे (३ कोटी ३० झाडे) इराकमध्ये आहेत खजुराचे ५३१ प्रकार येथे होतात उत्तरेला व पूर्वेला खजुराची घनदाट जंगले असून इराकमध्ये दरसाल ३,५०,००० टन खजूराचे उत्पादन होते आपल्या नारळासारखाच खजूर हा येथे कल्पवृक्ष मानला जातो खाण्यात खजूराचा उपयोग होतोच शिवाय खजूराच्या पानाचा झाडू करतात जळणासाठी उपयोग करतात, तरट करतात, रोट्या बनविण्यासाठी जो तदूर असतो त्यालही खजूराच्या पानाचा उपयोग करतात म्हणूनच घरोघरी खजूराची पाने गच्चीवर वाळविण्यासाठी ठेवलेली दिसतात उत्तरेकडे लोकर खूप होते इराकी गालीचे इराणी गालीच्याएवढे प्रसिद्ध नसले तरी चागले असतात इराकला भूमिगत पाणी भरपूर आहे हे पाणी उन्हाळ्यात वर येते त्याची मीठागरे करतात हे मीठ आपल्याकडील पूर्वीच्या खडेमीठासारखे काळपट असते भाज्या भरपूर व ताज्या होतात कोबी, गाजर, मुळे ह्याचे आकारमान आपल्याकडील ह्याच भाज्याच्या दुप्पट तिप्पट असते १५ किलो वजनाचा पानगोभीचा गड्डा पाहून मी थक्क झाले प्रत्येक घरात डाळिंब, द्राक्षं, कलिंगड, अजीर, पीअर्स, सत्री, मोसबी, खजूर, लिंब ह्याची झाड असतात लिंब तर फारच रसाळ असतात गुलाब, डेलिया, सुर्यफूल, झेंडू वगैरे फुलं भरपूर प्रमाणात व आपल्यापेक्षा खूप मोठ्या आकाराची असतात सूर्यफूल तर जवळ जवळ ताटाएवढे असते प्राण्यामध्ये कुत्री, माजरी, कोंबड्या भरपूर असतात येथे सापही खूप आहेत आम्ही घरात रहाण्यास गेल्यावर पहिल्याच दिवशी आमच्या घरात साप निघाला होता रस्त्याने चालताना वाळूतसुद्धा सापाच्या खुणा दिसतात

इराकच्या सर्व शहरातून उद्योगधदे पसरलेले आहेत टेक्स्टाइल सिमेंट, ज्यूट, व्हेपर्स, खाद्यान्न, खजूर उत्पादन, डेअरी, वनस्पती तेल, सॉफ्ट ड्रिंक्स, दारू, सिगारेट्स, पेपर, औषधे, साखर, काचसामान, शेतकीची मशीन्स, कार्स, फर्टिलायझर्स, हस्तकला, सोनं, चादी, ताब्याचे काम आदि सर्व उद्योगधंद्यांस १७३० जुलैची क्राती वरदान सिद्ध झाली तेलाच्या उत्पादनात इराकचा पाचवा नंबर आहे अलतामीम, बसरा, मिसाक, निनेव्हला तेलाचे उत्पादन होते अल-मिशारकला सल्फेट व अल-अन्वरला फॉस्फेट मिळते

इराकची राजधानी बगदाद इराकच्या मध्यावर आहे तैग्रीस नदीवर निदान आठ पूल तरी बगदादला पाहिले जुने व नवीन बगदाद असे दोन ठळक भाग दिसतात जुन्या बगदादचा तैग्रीस नदीचा किनारा पहाण्यासाठी आम्ही खूप उत्सुक होतो खलीफा हरून-अल-रशीद ह्या किनाऱ्यावरून वेष पालटून किती वेळा गेला असेल ह्याचे कुतूहल होते प्रत्यक्ष किनारा इतका घाण व दलदलीचा होता की खलीफा ह्या किनाऱ्यावरून एकदाच गेला असावा व चिखलात रूतून बसला असावा असे वाटले नवीन बगदाद मात्र आधुनिक, स्वच्छ व प्रचंड आहे ७० लाख लोकसंख्येचे हे गाव बरेचसे दिल्लीसारखे वाटते प्रशस्त रुद रस्ते, जागजागी मोठाले चौक, वरून खाली सुळसुळणारे

फ्लाय ओव्हर्स शहराची व्यस्तता दर्शवितात ह्या चौकात इराकी शिल्पाचे नमुने व रोषणाई असते सादम स्ट्रीट ही मुख्य बाजार पेठ आहे पण दुबईसारखी मालाची रेलचेल दिसली नाही सैनिक स्मारक प्रचड कुत्र्याच्या छत्रीसारखे (मशरुम) आहे बहुतेक पंचताराकित हॉटेल्स ह्याच भागात आहेत आपल्या ओबेराय हॉटेलचे एक हॉटेल रशीद येथेच आहे स्ट्रॅन्ड, मरीन ड्राईव्हसारखा हा रस्ता फारच स्वच्छ व सुदर आहे ह्याच्या दुसऱ्या टोकाला बगदाद विश्वविद्यालय होऊ घातले आहे

बगदाद नतर दुसरे महत्त्वाचे शहर बसरा हे बंदर असून ते दक्षिण इराकची राजधानी आहे खजूराची वने व कालवे ह्यासाठी बसरा प्रसिद्ध आहे पूर्वी येथे मोत्याचा धदा प्रचड प्रमाणात चालत असे बसऱ्याला अजून ३००० वर्षापूर्वीची मातीची घरे दिसतात इराकचे हेच एकमेव बदर आहे ह्याच्या महत्वपूर्ण स्थानामुळे इराण्यानी हे बंदर घेण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला बसऱ्याहून बगदादला गाडीने एका रात्रीस जाता येते

मोसल ही उत्तर इराकची राजधानी म्हणता येईल पहाडी इलाक्यामुळे हवा थड असते इथे इराक सरकारचे मोठे पर्यटन केन्द्र आहे सध्या येथे तैग्रीस नदीवर धरणाचे मोठे काम चालू होते बगदाद-युरोप रेल्वे-मार्गावरील हे महत्त्वाचे शहर आहे हे मोठे व्यापारी केन्द्र व ऐतिहासिक शहर आहे येथील ऐतिहासिक सिताडेल वास्तुविद्येचा उत्कृष्ट व वैभवशाली नमुना आहे सालादीन साराराश, शाक्लावर, हज-उमराँ, दरबाद्रीराथन, जिंदीयान ही उन्हाळ्याची पर्यटन केन्द्रे आहेत

हीला हे बाबील राज्याचे केन्द्रीय शहर आहे जगप्रसिद्ध बाबीलॉन शहर हे हीलाच्या अगदी जवळ आहे ख्रि पू २३५० मध्ये वसलेले हे शहर अनेक साम्राज्याची राजधानी होती बाबीलॉनियन सस्कृती आपल्या सिंधु सस्कृतीसारखीच प्राचीन (ख्रि पू. ५००० वर्षापूर्वीची) व संपन्न सस्कृती होती युफ्रैटिस नदीच्या किनाऱ्यावर पुरातन बाबीलॉनची राजधानी वसली होती ही जागा सध्याच्या हीला ह्या गावापासून सहा मैल अतरावर आहे हीला-बगदाद रस्त्यावर हीलापासून सहा मैलाच्या फाट्यावर पुरातन बाबीलॉन पद्धतीची कमान आहे तिच्या आतील सर्व परिसरात पूर्वीच्या बाबीलॉनची राजधानी आहे जगातील सात आश्चर्यांपैकी एक The Hanging Gardens of Babylon हे ह्याच ठिकाणी आहे आता येथे बागा वगैरे नाहीत पण प्रचड उत्खनन चालू आहे जर्मन पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी ह्याचा शोध लावला, सशोधन केले व त्याच्या आधारे पूर्वी असलेली वास्तु जशीच्या तशी उभारण्याचे काम चालू केले हा प्रकल्प खूप मोठा आहे पण UNO कडूनही मदत होते ह्या परिसरात बाह्य प्रवेश कमान, उत्तर कमान, गोलाकार स्टेडीयम, राजमार्ग, राजांचे विश्रामस्थान, दरबार चौक, हँगिग गार्डन, व सुप्रसिद्ध The Lion of Babylon असे प्रमुख अवशेष अजूनही सुस्थितीत आहेत ५००० वर्षापूर्वी इतके नीट, आखीव-रेखीव राजधानीचे गाव असावे हेच ह्या आश्चर्याचे कारण आहे राजमार्गावर

दोन्ही बाजूला असलेल्या ५०-५० फूट उंच वीटाच्या भिंती अजून शाबूत आहेत, व अजूनही ती चित्रे चांगल्या अवस्थेत आहेत राजमार्ग हा डाबरी रस्त्या सारखा (Asphathe Road) दिसतो राजाचे विश्रामस्थान असे बनविले आहे की जाड भिंतीतून पुरेसा उजेड तर येतोच पण नैसर्गिक वायुवीजनामुळे (Ventilation) फार थंड वाटते हल्लीची वातानुकूल पद्धती (Air Conditioning) पण इतकीआरोग्यदायी व कार्यक्षम असू शकत नाही झुलत्या बागा (Hanging Gardens) हा भाग मात्र नष्ट झाला आहे कदाचित् उत्खननानंतर अवशेष उपलब्ध होतील युफ्रेटिस नदी प्रवाह बदलते म्हणून हा भाग नदीत बुडाला असावा अशी शास्त्रज्ञाची विचारसरणी आहे ह्या Hanging Gardens च्या वरच्या बाजूला The Lion of Babylon चे शिल्प सुस्थितीत आहे बॉबिलॉनकालीन हा सिंह आपल्या परिचित सिंहापेक्षा निराळा आहे त्याला बॉबीलॉनचा रक्षक मानला आहे त्याने एक मनुष्य (शत्रू) पायाखाली तुडवला आहे गोलाकार स्टेडियमची रचना व स्टेज ह्याची इतकी शास्त्रोक्त सांगड आहे की अद्यावत स्टेडियम लाजेने माना खाली घालतील स्टेजच्या मागे कलाकार लोकाच्या रहाण्याच्या, नेपथ्याच्या खोल्या आहेत बॉबीलॉनमध्ये प्रवेश करण्याच्या आधी एका चौकावर बॉबीलॉनच्या राजाचा १०० फूट उंचीचा भव्य पुतळा आहे हा सर्व परिसर नालंदच्या उत्खननाची आठवण करून देतो ५००० वर्षांपूर्वीचं हे स्थापत्यशास्त्र पाहून मति गुग होते

बॉबीलॉनचे दुसरे ऐतिहासिक महत्त्व जगज्जेत्या सिकंदरच्या थडग्यासाठी आहे हिंदुस्थानातून परत जाताना सिकदर बॉबीलॉन येथे मृत्यु पावला ह्या थडग्याची जागा आम्हाला शोधता आली नाही सिकदर ग्रीक, तुर्कस्थान, इराक, इराण अफगाणिस्तान मार्गे आला व हा मार्ग शतकानुशतके खुष्कीचा झाला बॉबीलॉनच्या ह्या परिसरात इराक सरकारने मोटेल्स बांधली आहेत रात्री चांदण्यात हा गूढरम्य परिसर मनाला विषण्ण करतो, तरीसुद्धा त्याचे गूढ आकर्षण वाटते प्रश्न पडतो

Who is Playing this Secret melody,

And pouring out her sorrows thus-

प्रसिद्ध लैला-मजनू जोडीतील लैला बसऱ्याची तर कैस (मजनू) हील्याचा रहिवासी होता

खुद्द हिल्याजवळ तेलाच्या मोठमोठाल्या खाणी आहेत तैग्रीस-युफ्रेटिसचा दुआब फार अरुंद आहे. करबलाजवळ रझाझा ह्या ठिकाणी ह्या दोन नद्या खूप जवळ येतात त्यांना जोडणारा एक कालवा (Cannal) करून Balancing Reservoir केला आहे ह्यामुळे एका नदीचे पाणी दुसऱ्या नदीत जरूपुरते सोडता येते हा Reservoir म्हणजे इराकचे प्रमुख पाणी पुरवठा केन्द्र आहे शेतीसाठी हा उपयोगात आणता येतो रझाझा

लेकमध्ये बोटिंगची सोय आहे जवळच इखादिर नावाच्या खेडेगावात प्राचीन राजवाडा आहे ह्याचा मातीच्या भिंती ५० फूटापेक्षा सलग उच्च आहेत आत मोठे पटागण आहे भिंतीच्या कडेने खोल्या आहेत इराक हा प्राचीन देश असल्याचे ऐतिहासिक अवशेष सर्व इराकभर मिळतात किरकूट समारा, हमरा, अखील अशा अनेक ठिकाणी भग्नावशेष दिसतात ह्या बाबतीत हा दुआब इजिप्तच्या (The Valley of the King) सारखा आहे

सुवर्ण-त्रिकोण (Golden Trangle) नजफ-खुफा-करबला ह्या तीन धार्मिक ठिकाणाच्या वर्णनाशिवाय इराकचे वर्णन अधूरे राहील नजफ येथे दुसरा खलीफा इमामअलीचे थडगे आहे तर करबला येथे हसन-हुसैन ह्या त्याच्या मुलांची थडगी आहेत खुफा येथे एक मोठी मशिद आहे ती बहुधा अगोदर बांधली गेली व नंतर नजफला दुसरी बाधण्यात आली करबला धरून ह्या तिन्ही मशिदींची रचना एकसारखी आहे मुख्य गाभाऱ्यात चांदीच्या पेटीत शव ठेवलेले असते घुमट व आजूबाजूला त्रिकोणी लोलकाचे अप्रतिम काचकाम आहे प्रकाशात विविध रगांनी मशिद उजळून येते, सप्तरंगाची उधळण होते तर दिवसाउजेडी लखलखीत चादीचे छप्पर असावे असे वाटते आत सर्वत्र पाऊल रुतेल इतके गुबगुबीत गालीचे पसलेले असतात जागजागी कपाटात कुराणांच्या प्रती ठेवलेल्या असतात कोणीही (पण अर्थात् मुसलमानांनी) आत जाऊन कुराणाचे पाठ करावे हे आपले सरळ मशिदीत घुसून मुस्लीम रिवाजाप्रमाणे या अल्ला पद्धतीने हात वर करून, डोळे मिचमिचे करून फिरून आले मला मात्र कुंकवावरून मी मुस्लिम नाही हे ओळखून 'काफर काफर' करीत बाहेर थाबविण्यात आले सौदी अरेबीयालाही मक्का, मदीना ह्या त्याच्या पवित्र स्थानी आत कबरीपर्यंत हिंदू जाऊ शकत नाही, दुरुस्तीसाठीही हिंदू इंजिनियर्सना मज्जाव आहे आणि आपल्या राज्यभूमींवर त्यानी खुशाल बाबरी मस्जिद ठेवावी! निधर्मी राज्य आहे ना आमचे! तीन ताड पूर्वजाचे तीन फूटी पुत्र आम्ही! आम्हाला धर्म नाही, स्वाभिमान नाही, तत्त्व नाहीत, देशप्रेम नाही-फक्त खुर्ची आणि सत्ता तेवढी समजते अल्लाच्या देशात रामभक्तांचा असा घोर अपमान पण रामाच्या देशात मात्र अल्ला शिरजोर! कुठे तरी एक दोहा ऐकला होता

'राम माँगे दाना, अल्ला माँगे रेवडी,
और अल्लाकी रेवडी चुक गयी तो
राम से कहें कि अपना दाना हमें देव।'

रामाच्या देशात रामाला दाणा व अल्लाला रेवडी मिळते शिरजोर अल्ला आपल्या सर्व रेवड्या हादडून रामाचा दाणा हिसकावून मटकावतो पण अळी मिळी गुप चिळी! तोंड उघडणाऱ्याला 'सांप्रदायिक' म्हणून शिवी दिली जाते, असो हे रामायण खूप मोठे आहे

ह्या मशिदींच्या चोहो बाजूस चार मोठ मोठे दरवाजे असतात व सर्व बाजूंनी मोकळी जागा ठेवून थडगे असते ह्या मोकळ्या जागेत लोक बसून कुराण वाचतात, गप्पा मारतात, गावाच्या उचापतीही करतात आपल्याकडे देवळात बसून म्हाताऱ्या बायका जशा वाती वळत आपापल्या सुनांची गाऱ्हाणी सागतात तसे इकडेही अरबी सासवा तोच कार्यक्रम मशिदीत बसून मोठ्या चवीने पार पाडीत असतील भिंतीला लागून असलेल्या खोल्यात दुकाने व यात्रेकरूंच्या रहाण्याची सोय आहे प्रवेशद्वाराजवळ पादत्राणे साभाळण्याची नि शुल्क सोय आहे आत धूप-उदाचा मद मंद सुगध दरवळत असतो आतमध्ये गेल्यावर आपल्याकडील पडे लोकाप्रमाणेच येथे ही मुल्ला-मौलवींचा तांडा मागे लागतो काही दिले नाही की अरबी शिव्याचा भडीमार-दिल्लीला राहून पजाबी शिव्या शिकले त्याप्रमाणे येथेही मुक्रीह, कथाब, आहमाक, आदीम अल शडर वगैरे काही शिव्याचे प्रशिक्षण घेतले सर्व मशिदींचे घुमट सोन्याने मढविलेले आहेत इराकच्या सध्याच्या परिस्थितीत युद्ध धर्मासाठी लढले जात आहे हे भासविण्यासाठी सद्दाम हुसैन सतत ह्या मशिदींची दुरुस्ती, सुधारणा करून मोठा खर्च करतो हसन-हुसैन व इमाम अलीला मानणारे शिया असतात सबब ह्या भागात शियांची वस्ती पुष्कळ आहे खोमानी शिया होता करबला घेतल्याखेरीज खोमानी युद्ध थाबविणार नव्हता करबलाच्या मशिदीत नमाज पढून आपण मरणार असे त्यांनि जाहीर केले होते अर्थात् स्थानिक शियावर कडक नजर ठेवली जात असे युध्दात मेलेल्या असंख्य वीरांचे मुडदे करबल्याला एका मोठ्या मैदानात पुरण्यात आले होते आता जागेअभावी नजफलाही पुरण्यास, सुरुवात केली होती गेल्या सहा वर्षात इराकला युद्धात इतके लोक मारले गेले की ही स्मशानभूमि साऱ्या जगात पहिल्या क्रमाकाची ठरेल

इराकमध्ये प्रवेश केल्यावर सात दिवसाच्या आत वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागते ही तपासणी झाल्यावरच रेसिडन्स व्हिसा मिळतो नाहीतर फार कडक शिक्षा व दड होतो त्याप्रमाणे परीक्षा उरकून आम्ही व्हिसा मिळविला व आम्ही करबला येथे रहावे असे ठरले घर मिळेपर्यंत दहा दिवस आम्हाला हॉटेलमध्ये रहावे लागले, शेवटी एकदाचे घर मिळाले हा घरमालक दिसतो आपल्या मुक्री ह्या अभिनेत्यासारखा (मुक्रीही अरबच आहे) दिसायला.आम्ही त्याला मुक्री म्हणत असू येथे घरे खूप मोठी व दिल्लीपेक्षा स्वस्त आहेत प्रत्येक घरापुढे बाग, ड्राय वे, वर द्राक्षाच्या वेलींसाठी केलेला मडप, प्रशस्त व्हराडा ह्यामुळे घर खूप शोभिवत दिसतात मुक्रीच्या घरात आम्ही दोन महिने काढले नतर ते घर आम्हाला सोडावे लागले कोणत्याही परदेशी माणसाला घर देताना घरमालकाला पोलिसांची परवानगी काढावी लागते आमच्या मुक्रीने ती घेतली नसल्यामुळे पोलिसानी त्याला ताबडतोब आम्हाला काढून टाकण्यास सांगितले जवळच आम्हाला दुसर घर मिळाले हे घर एका पोलीस ऑफिसरचेच असल्यामुळे काही अडचण

आली नाही आमचा आणि पोलिसाचा 'जनम जनम का रिश्ता' असावा नाहीतर नेहमी पोलीसाचचं घर आम्हाला कसे मिळते ? काश्मीरलाही आमचा घरमालक पोलीस होता, दिल्लीचा घरमालक तर आय जी आहे ह्या घरात तीन मोठ्या बेडरूम्स, मोठा ड्रॉईंग हॉल, ड्रेसिंग रुम, सुदर बाग आणि शिवाय बॉम्बहल्ला झाला तर लपण्यासाठी मोठे तळघर होते, वर गच्ची होती, कामाला नोकर मिळत नसल्यामुळे एवढे मोठे घर साफ ठेवणे कठीण जाई, पण त्यामुळे माझे बाळसे आपोआपच उतरलं

घर मिळाल्यावर घराच्या सामानाच्या कटकटी सुरु झाल्या येथे फर्निचर आपल्या दसपट महाग आहे पण कपनीने आम्हाला भरपूर फर्निचर दिले होते त्यामुळेच मला भेटायला येणाऱ्या अरबी बायकाच्या तोंडाला पाणी सुटे फक्त कुलर आणि फ्रीज स्वस्त वाटला साधी दुलई ८०० रु बाजारात ॲल्युमिनिअमची भाडी मिळतात ती जपानी स्टीलच्या भावात मिळतात, तो भाव वाजवी असतो पण क्रोकरी मात्र खूप महाग आहे (एक बाऊल सुमारे १५० रु टीसेट ५०० रु) चिमटा, गाळणे ह्या वस्तु मिळतच नाहीत एकदा बगदादला एका स्टोअरमध्ये गाळणे दिसल्यावर मला अगदी कोलबसाला अमेरिका सापडल्याचा जितका आनद झाला असेल तेवढा झाला दुबईला बाजारात खराटा दिसल्यावरही अशाच तऱ्हेचा हर्षवायू होऊन मला आर्कीमिडीजसारखे 'युरेका युरेका' म्हणून ओरडावेसे वाटले होते ३५ रु चे गाळणे मी अगदी दागिन्यासारखे जपून वापरीत असे तवा, कढई, पोळपाट, लाटणे ह्या वस्तु आम्हाला साइटवर बनवून घ्याव्या लागल्या मात्र केशर खलण्याच्या लहान पितळी खलबत्त्यापासून १० किलो वस्तु खलता येईल एवढे मोठे खलबत्ते येथे सर्रास मिळतात बहुतेक सर्व बाजार येथील मुख्य मशिदीजवळ असतो त्याला 'सूक' असे म्हणतात ह्याचे स्वरूप आपल्या कडील तुळशीबागेसारखे असते इराक-इराण ह्या गेली ५/६ वर्षे चाललेल्या युद्धामुळे इराकची परिस्थिति खूप हलाखीची झाली आहे डॉलर मिळत नसल्याने व असलेले युद्धात सपल्यामुळे बाहेरून हल्ली येथे काहीही येत नाही त्यामुळे दुधाची पावडर, चहा, अंडी, चिकन, लोणी आदि वस्तु सापडत, मिळत नाहीत ह्या वस्तू बाजारात आल्या तर प्रथम स्थानिक (वतनी) लोकांस, मग आम्हा 'अजनबी' लोकास हे अगदी रास्तही आहे आज प्रत्येक घरातील पुरुष, मुल देशासाठी रक्त साडत आहेत त्याच्या परिवाराची काळजी सरकारने घेतलीच पाहिजे आमच्याकडे ह्याच्या अगदी उलट अतिथी देवो भव ही आमची सस्कृति पण त्याचा किती अतिरेक दिल्लीला दुकानदार आपल्याकडे चक्क दुर्लक्ष करून बाहेरच्या लोकाच (विशेषत गोऱ्या कातडीच) लांगून चालन करताना पाहून तळपायाची आग अगदी मस्तकाला जाते

ह्या दैनंदीन वस्तू मिळविण्यासाठी सरकारी दुकानात आपले नाव नोंदवावे लागते तूप भरपूर स्वस्त मिळते पण तेल मिळत नाही कधी तरी कॉर्न ऑईलच्या बटल्या येत

मग आम्ही त्यावर आधाशासारखी झडप घालीत असू.पार्टी बिर्टीला किंवा कोणाच्या घरी गेल की हीच चर्चा 'आज मला अंडी मिळाली बरं का' 'अग,आज लोणी आल आहे बाजारात' 'निडोचा डबा मला नजफहून कोणाला तरी सागून मिळाला ' अशा वेळी मला भरगच्च मालाने लहडलेली दुबईची सुपरमार्केट्स डोळ्यांसमोर येत आता खूप परदेशी कपन्या आल्यामुळे त्या कंपन्यांना कुवेतहून डाळी, मसाल्याचे पदार्थ चहा, दुधाचे डबे मागविण्याची परवानगी मिळाली आहे सोनाराची दुकाने मात्र सुवर्णालकारांनी खच्चून भरलेली असतात बाजारात भाजी घेण्यास गेलो की आम्ही खुणेने हे पाहिजे म्हणून सागत असू मग तो भाजीवाला किंमत सांगताना आपल्या जवळचे नाणे काढून दाखवी पण भाजी कमीत कमी दोन किलो घेतलीच पाहिजे त्यापेक्षा कमी मागितली तर पैसे काढून फेकून देतात बटाटे क्वचित् येत आले की वाऱ्यासारखी बातमी पसरे मग त्या दिवशी बटाटानवमी साजरी होत असे .बटाटेसुद्धा कमीत कमी दहा किलो घेतले पाहिजेत गव्हाचे पीठ सुट्टे मिळत नाही ८० किलो बटाट्याचे पोते घेतले पाहिजे ह्या अरबांचे सगळेच अचाट आता इन मिन दोन माणसांनी ८० किलो आट्याने काय आंघोळ करायची ? मग मी आमच्या कंपनीच्या मेसमधून दरमहा १० किलो आटा व दोन किलो बटाटे मागवत असे कुकिंग गॅस मात्र स्वस्त व विपुल प्रमाणात मिळतो आम्हाला आमची कपनी गॅस पुरवीत असे पण एकेका इराकी माणसाच्या घरी ८-९ सिलेंडर्स पडलेली असत गॅसची शेगडी सुद्धा प्रचड मोठी बाजाराचे दृश्य साधारणपणे आपल्याकडील खेडेगावच्या बाजाराप्रमाणेच तशीच गर्दी गोंगाट, लाउड्स्पीकरचे कर्णकटु कर्कश्श सगीत, रिकामटेकड्या टारगट लोकाचे अड्डे हॉटेलात किंवा दुकानात बंद काचेच्या पेट्यात किंवा उघड्यावर जिलबी किंवा नारळाच्या लाडवांसारखी मिष्टान्ने, त्यावर घोंघावणाऱ्या माशा, रस्त्यात कुठेही बसून खुब्बुस (अरबी रोटी) व बिन दुधाचा चहा ढोसणारे लोक भांडाभांडी, आया-बहिणीचा उद्धार, बाचाबाची ।

इराकमध्ये 'बाथ' (Bath) ह्या कम्युनिष्ट पक्षाचे नियंत्रण आहे. रशिया, चीनला नसतील इतकी कडक नियत्रणे येथे आहेत परदेशी लोकांवर तर फार कडक नजर असते म्हणून इराकी पुरुष परदेशी लोकांच्या घरी जाण्यास बिचकतो आम्हाला येणारी व आमची जाणारी पत्रे फोडून वाचली जात पत्राबाहेर पाठविणाऱ्याचा पत्ता जरूरी असे एकदा मी भारतात माझ्या बहिणीला डॉ सरोज तासकर - हिला पत्र लिहिले व बाहेर from Hema Javdeker असे लिहिले लगेच पोलिस कंपनीच्या ऑफिसमध्ये आले व Who is Hema Javdeker? म्हणून चौकशी करु लागले 'त्या आमच्या कन्सलटन्ट इजिनिअरच्या पत्नी आहेत ' असा त्यांना खुलासा करण्यात आला तसे त्यानी विचारले 'Then Who is Urmila Javdeker?' माझे पासपोर्टवर कागदोपत्री नाव उर्मिला आहे पण सर्वजण मला 'हेमा' ह्या माहेरच्या नावानेच ओळखतात, त्यामुळे तेच नाव मी

जास्त वापरते पोलिसांना वाटले असावे की हेमा नामक कोणी मातहारीची कन्या लपून छपून आपल्या देशात घुसली की काय ! मोठ्या मुश्किलीने ह्या दोन व्यक्ती एकच अशी त्याची समजूत पटली.(माझी मात्र अजूनही पटत नाही)

एकदा मि राजु नावाचा भारतीय मनुष्य शेजारधर्म म्हणून शेजारी राहणाऱ्या इराकी माणसाच्या अंत्येष्टीला गेला तो मनुष्य प्रतिपक्षाचा होता हे ह्याला माहितही नव्हते व याचे त्याला काहीही सोयर सुतक नव्हते पण ह्याच मुद्यावर बिचाऱ्या राजूला तुरुंगात टाकण्यात आले भारतीय राजदूतानी स्वत रदबदली केली,तेव्हा त्याला सोडण्यात आले करबल्याला आमच्यासमोर टी.व्ही.मध्ये काम करणारी बाई रहात होती 'तुम्ही भारतीय स्त्रियासबधी टी.व्हीवर माहिती द्या, आम्ही तुमचा इंटरव्ह्यू घेऊ' असे ती मला म्हणाली, पण आमच्या कंपनीच्या मॅनेजरने सपशेल मोडता घातला 'तुम्ही काहीतरी बोलून जाल (माझ्या बाबतीत त्याला ह्याबद्दल पूर्ण खात्री असावी) आणि कपनीच्या मागे नसत लफड लागेल टी.व्ही.वर तुम्हाला काय चमकायच असेल ते भारतात जाऊन खुशाल चमका'

इराकी लोक हे अतिशय प्रेमळ, शात व अगत्यशील वा दुबईतील अरब हे तुसडे, गर्विष्ठ व स्वत ला आपल्यापेक्षा श्रेष्ठ समजणारे आहे 'हमारे टुकडोंपर तुम पल रहे हो' हा तुच्छतेचा भाव त्याच्या चहऱ्यावर दिसतो पण इराकला आम्हाला उलटा अनुभव आला करबल्याला घरात रहायला गेल्या गेल्या दुसऱ्याच दिवशी शेजार पाजारच्या बायका घरी येऊ लागल्या रिक्त हस्ते नाही कोणी केक घेऊन, तर कोणी खीर, कोणी मटण घेऊन येत असत दुसऱ्या गल्लीतील बायकासुद्धा त्यांच्या सणावारी 'अल्लाह रसूल' म्हणून काचेच्या मोठ्या बाऊलमधून खीर घेऊन येत एवढी तुपाने थबथबलेली खीर कोण खाणार म्हणून आमच्या कपनीच्या बॅचलर मुलाना द्यावयास जावे तर त्याच्याकडेही अशीच वाडगाभर खीर आलेली मग मला गाडगीळांच्या 'बडू आणि बटाटे पोह्याची' आठवण होई.

ह्या बसायला आलेल्या बायकाना आपल्याबद्दल फार कुतूहल सर्वात पहिला प्रश्न त्या करीत, 'तुम्ही गाईच मास का खात नाही ?' मी त्यांना सांगितल 'आम्ही गाईला माता मानतो' 'मग दूध कस पिता गाईच ?' 'आईच दूध नाही का पीत ? पण आईच मास खातो का आपण ?' यावर त्याची समजूत पटल्यासारखी वाटे माझ मोडक तोडक अरबी, जास्त खाणाखुणाच्या भाषेतच आम्ही बोलत असू आमच्या कपनीची बॅचलर मुल अगदी अस्खलित अरबी बोलत त्याना नेहमी आश्चर्य वाटे, आमचे प्रेमळ सवाद, तास न् तास चालतात तरी कसे 'काही तरी चुकीच बोलून आपली भाभी गोत्यात तर येणार नाही ना' अशी धास्ती वाटत असेल बिचाऱ्याना रस्त्याने येता-जातासुद्धा ओळख नसली तरी प्रेमाने हसून 'मरहबा' (Welcome) करीत दुकानात किंवा कोणाच्या घरी गेलं की 'सबा-अल-खैर, अहलेन वा सहलेन' (Good Morning! Welcome) म्हणून

मोठ्या आपुलकीने व आदराने बोलत,की वाटे खरच आपण कोणी महान् IMP व्यक्ती, आहोत की काय ! आपला उल्लेख 'अल हिन्दी' किंवा 'अजनबी' म्हणून करीत लहान मुल मात्र 'आम्ही दिसले की हॅलो-डिस्को डान्सर' म्हणून ओरडत कारण मिथुन चक्रवर्तीचा डिस्को डान्सर सिनेमा येथे नुकताच येऊन गेला होता 'ह्या'ना ऐकू येत नाही (हौवा अत्राश) धड चालताही येत नाही हे कळल्यावर तरी इतक्या लाब दूर देशात आल्याने 'ह्या'च्या हिमतीचे व जिदीचे त्यांना खूप कौतुक वाटत असे व हे जवळपास एकटे गेले की येताना रस्त्यावर खेळणारी लहान मुलसुद्धा ह्याचा हात धरून घरी पोहोचवीत आमच्या घरमालकाचा बारा वर्षाचा मुलगा नेहमी म्हणत असे, 'आंटी, मी मोठा झाल्यावर 'अल हिन' ला जावून डॉक्टर होणार आणि मग 'खाल' (चाचा) च्या कानाचा इलाज करेन' त्याच्या ह्या नुसत्या बोलण्यानेच मला इतक बर वाटत असे !

आमच्या घराजवळचा एक दुकानदार नाना पळशीकरसारखा दिसे म्हणून त्याला आम्ही नाना पळशीकर म्हणत असू हा दुकानदार अत्यत लहरी, चक्रम व तुसडा होता मनात असल की 'रफीक अल हिंदी' म्हणून आम्हाला डोक्यावर घ्यायचा पण एरवी दुधाचे डबे, अडी असली तरी 'हालीब माकू, बैदा माकू' म्हणून 'माकू माकू' (माफ करा) करीत आम्हाला कटवायचा इतर दुकानदारानी 'तुम्ही त्याच्या दुकानात का जात नाही' म्हणून विचारले मी नाक मुरडून म्हटले, 'हौवा मजनून' सर्वजण खो खो हसू लागले बहुधा कोणालाच तो आवडत नसल्याने त्याला मी पागल ठरविल्याने त्यांना मनातून गुदगुदल्या झाल्या असाव्यात असो 'पानी तेरा रंग कैसा' असा अस्मादिकाचा स्वभाव असल्याने कुठेही आमचा सूर जुळतो मग भाषेची अडचण येत नाही की धर्माची तफावत जाणवत नाही आमच्या घराच्या मागे राहाणाऱ्या इराकी कुटुम्बाशी माझी खूप मैत्री झाली होती त्याच्या मोठ्या मुलीला थोडफार इग्लीश येत होत तिच नाव फातिका ती आणि शौजेन, सना, इश्राका ह्या तिच्या धाकट्या बहिणी एकापेक्षा एक देखण्या होत्याच पण त्याची आई सर्वात अधिक देखणी होती हे लोक इतर इराकी लोकाच्या मानाने गरीब असले तरी घरात उत्तम क्रॉकरी, तीन टी.व्ही सेट्स, व्हिडीओ, सबध घरात इराणी कारपेट्स, किचनमध्ये एक उभा मोठा फ्रीज व एक आडवा (हॉटेल किंवा दुकानात असतो त्याप्रमाणे पेटीसारखा लाबलचक) फ्रीज होता हा बहुधा प्रत्येकाच्या घरी वस्तूचा साठा करण्यासाठी असतो ह्या मुलींना मी थोडफार हिंदी शिकवलं त्या 'नमस्ते' करू लागल्या गमत म्हणून त्याना पाकीजा मधील 'यूँही कोई मिल गया था सारी राह चलते चलते' हे गाणही शिकवलं फातिकाला साडी नेसायची फार हौस तिला एकदा साडी नेसवली कुंकू लावल इतकी सुरेख दिसली मला त्या 'दिदी' म्हणत मग त्यांची आई म्हणाली, 'माझ्या मुलींनी तुला मोठी बहिण मानल आहे आता आमच घर तुझ हक्काच माहेर झालं, आपल लिंबाच लोणच त्या 'हार हार' करीत (तिखट तिखट) आवडीने मिटक्या

मारीत खात एके दिवशी रात्री १० वाजता फातिकाची आई माझ्याकडे आली व मी लिंब आणली आहेत, चल आता शिकव मला ते लोणच असं म्हणून मला घेऊन गेली जवळ जवळ १२ ॥ पर्यंत कापणं, चिरण, रस काढण' मसाला भरण अस सर्व साग्रसगीत बाळतपण उरकीत १५ किलो लिबाचे लोणचे आम्ही बरणीत भरले १०/१५ दिवस त्या बरण्या उन्हात ठेवण्यासही मी सांगितले त्यांच्या घरी तदूर लावला की गरमागरम खरपूस खुब्बुस (नान ह्या पजाबी रोटीसारखी) आमच्याकडे आलेच हा एक खुब्बुस जवळ जवळ दोन फूट व्यासाचा असे आपण जेमतेम १/४ खाऊ शकू, पण एक अरब चार चार अगदी सहज खातो खादाडपणा हा अरबाचा विशेष जागजागी असलेल्या बार-बे-क्यू वरील सळयावर चागल्या भरपूर लोणी व तिखट-मीठ चोपडलेल्या गुबगुबीत ४/५ चिकन्स एक अरब लिलया खातो दुपारी चार वाजता जरी कोणाकडे गेल तरी गरमागरम मटण-रोटी खाण्याचा आग्रह बर,नाही म्हटलं तर 'हो आम्ही मुसलमान ना, म्हणून खात नाही तुम्ही 'असा पेंच तयार फातिकाची आई कधी डबाभर अस्सल टर्कीश कॉफी तर कधी सुकामेवा अस नेहमी काही ना काही पाठवीत असे पित्त खवळणे व पोटशूळ हे माझे दोन चिरकालीन शत्रू त्यावेळी तर ती खूपच मदत करीत असे एवढ प्रेम माया व कौतुकाच्या मखरात स्वदेशातसुद्धा कधी कोणी मला बसविले नाही येताना सुद्धा त्यानी मला एक सुंदर शाल दिली त्याच्या प्रेमाने ऋण मी कसे फेडणार ? पण काही ऋण मिरविण्यातच शान असते नाही ?

इराकी बायकांची रहाणी अगदी पाश्चात पद्धतीची आहे, बायका सर्रास सिगारेट्स पितात थोडसं बाहेर जायचं तर मस्काऱ्यासकट सपूर्ण मेकअप, बॉब, फ्रॉक्स, उंच टाचाचे सँडल्स. प्रत्येक बाई नखशिखान्त सोन्याने मढलेली असते एवढा सगळा जामा निमा करून त्यावर बुरखा घेतात ! हा बुरखा डोक्यापासून सर्व शरीर झाकतो तोंड मात्र उघडे असते ह्या बुरख्याला 'ओबाया' म्हणतात खुफा-नजफ व करबला ही त्याची धार्मिक ठिकाणे असल्याने येथे बारा वर्षांच्या वरील मुलींस ओबाया सक्तीचा आहे बगदाद, बसरा, मोसल वगैरे ठिकाणी ऐच्छिक आहे कितीही श्रीमती असली तरी धुणी भाडी, स्वयपाक, झाडझुड वगैरे सर्व घरकाम गृहिणीच करते घर फारच सुदर ठेवतात खोल्या खोल्यातून सुदर फ्लॉवरपॉट्स मधून आकर्षक, पुष्परचनेचे प्रकार दिसतात बागासुद्धा रगीबेरंगी, टप्पोऱ्या फुलानी बहरलेल्या असतात रीक्षा किवा सायकल रीक्षासारखी वाहने नसल्यामुळे कित्येक बायका गॅस सिलेंडर लाथाडत नेताना दिसतात (रिकामा सिलेंडर डोक्यावरून घेऊन जाताना) जवळ जवळ प्रत्येक कोपऱ्यावर उकिरडा असतो रस्त्याला नाव नाही ! घरनबर अरबीत असल्यामुळे आपल्या ओळखीच्या घराची खूण म्हणजे त्या घराचा उकिरडा हे आम्ही लक्षात ठेवले होते वास्तविक प्रत्येक खाबावर कचरापेटी लावलेली असते पण त्या रिकाम्याच असतात

इराकमध्ये सध्या शिक्षणाचा प्रसार खूप जोरात चालू आहे बगदादला हल्ली बऱ्याच लोकाना इंग्लीश येत असले तरी करबल्याला पुरुष, बायका, लिंग, सर्वनाम ह्यात प्रचंड ब्रह्मघोटाळा करून एखादं वाक्य बोलतात He is my Wife असं एखादी बाई लाजत मुरकत कौतुकाने सांगत असता त्या दिशेला पाहिलं तर दाढी मिशावाला एखाद्या दाडगा Husband उभा असतो चिकन (कोंबडी) ला किचन म्हणतात येथील अरबही संगीतप्रेमी आहेत पुरुष युद्धावर गेले असल्याने सर्व कामे बायकावर पडली आहेत दुकानात, ऑफिसात सर्वत्र बायकाचाच वापर दिसून येतो तरी सुद्धा बायकांची स्थिति फार दयनीय आहे चुलत भाऊ-बहिणींचे लग्न उत्तम समजले जाते लग्नात मुलीच्या मताला किंमत नसते आमच्या मुक्रीच्या मुलीच्या लग्नाला मी गेले होते एक 'अजनबी' लग्नाला आल्यामुळे त्याचा व फातिकाच्या कुटुबियांचा भाव खूपच वधारला गर्दी हटवून मला अगदी नवऱ्या मुलीजवळ (आरस) खुर्ची देण्यात आली जेथे बायका बसतात तेथे पुरुषांना जाण्यास मज्जाव असतो पण खास परवानगी देऊन काही तरूण मुलामुलींचा नाच माझ्यापुढे ठेवण्यात आला मधूनच नवऱ्या मुलामुलीचे नातेवाईक (जास्त करून मुलाची आई) बायका, मैत्रिणी जीभ टाळूला लावून 'ओळळळ' अशी आरोळी ठोकत हिला 'हळयूर' असे नाव आहे ही 'हळयूर' शुभशकुनाची मानली जाते आपल्याकडे बंगालमध्ये सुद्धा असा रिवाज आहे

लग्नात इराकी लोकात फार रिवाज नसतात मुलाकडचे लोक येऊन मुलीच्या बापाला पैसे (मेहेर) देऊन मुलगी घेऊन जातात एक खारे जेवण होते बस, ही मेहेरची पद्धत आपल्याकडे ही मुस्लिम समाजात आहे पण फरक असा की आपल्याकडे तो मेहेर मुलीच्या नावाने ठेवतात अरब लोकात तो पैसा मुलीचा बाप आपल्यासाठी खर्च करतो मुलीला सासरी जन्मभर 'तुला आम्ही विकत घेतले आहे' ही जाणीव देऊन वागविले जाते तिला मारहाण होते, खूप काम करावे लागते तिला कसलेही स्वातंत्र्य नाही, बहुपत्नीत्वाची चाल आहेच

हल्ली सर्व तरुण पुरुष युद्धावर गेल्यामुळे तरूण मुलींच्या विवाहाचा प्रश्न फारच बिकट होऊन बसला आहे मुलांकडून शादी पैगाम येत नाहीत वाढते वय, शिक्षण नसल्यामुळे नोकरी नाही मन गुतविण्यासाठी वाचनाची आवड नाही, बाहेरच्या जगाशी विशेष ओळख नाही अशा तरूण मुलीत घोर निराशा पसरली आहे गुलाब पुष्पासारख्या टवटवीत, सतेज दिसणाऱ्या मुली थोड्याच दिवसात निस्तेज, फिकट, कुण्ठाग्रस्त व चिडचिड्या दिसू लागतात फातिका, शौजेन तर नेहमी माझ्याजवळ येऊन रडत 'दिदी, आम्हाला इराकी नवरा नको फार दुष्ट असतात आम्हाला इंडियाला घेऊन चल हिन्दी माणसाशी आमचे लग्न लावून दे' अशा नैराश्याने कुंठित झालेल्या मुली मग बाहेरुन नोकरीसाठी आलेल्या तरूण मुलाच्या प्रेमात पडतात काही जणी वेळ घालण्यासाठी

करमणुकीचे साधन म्हणून हा खेळ मांडतात तर काही खरोखरंच अगदी आकण्ठ गुतून जातात ही मुलसुद्धा घरापासून दूर आल्यामुळे होमसीक होऊन त्यांच्या प्रेमपाशात गुरफटून जातात. पण ह्या बाबतीत ह्या देशाचे नियम अतिशय कडक आहेत कुठलाही परदेशी मनुष्य इराकी मुलीबरोबर लपून छपून भेटताना पकडला गेला तर त्याला लोक दगडाने ठेचून किंवा गोळ्या घालून ठार मारतात त्या मुलीला व्यभिचारिणी ठरवून तिचे कधी लग्न होत नाहीच पण अशा व्यभिचारिणी मुलींची स्वतत्र वसाहत केली आहे तिकडे तिची पाठवणी होते व वेश्याव्यवसायाशिवाय तिला दुसरा तरणोपाय नसतो एखाद्या परदेशी युवकाने हिंमत करून उघडपणे एखाद्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा तिच्या आई-बापाजवळ व्यक्त केली तर आधी त्याला मुसलमान व्हावे लागते त्याचा पासपोर्ट काढून घेण्यात येतो त्याला इराकी नागरिक व्हवे लागते, स्वदेशाला मुकावे लागते

इराकी, लोक एकंदरीत आनंदी, खेळकर, आलेल्या सकटास तोंड देण्यास समर्थ व धैर्यशील आहेत त्यांचे काही हावभाव मोठे मजेशीर वाटले. तुमचे म्हणणे मला कळले नाही ह्या अर्थी ते एकदम दचकल्यासारखी मान हलवून प्रश्नार्थक दृष्टीने, आपल्याकडे पहातात (इंग्लीशमध्ये सॉरी किंवा हिंन्दीत 'जी' किंवा मराठीत 'काय' ह्या अर्थी) 'अमुक गोष्ट मला माहिती नाही' ह्या अर्थी तोंड रडके करून पेंचून हाताच्या मुठी वळवून दर्शवितात 'जरा थाबा' असे चुचकारल्यासारखे करून पंजाची मूठ करून किंवा दोन बोट जुळवून दाखवितात 'मी तुमचे काम नक्की करतो' ह्या अर्थी धाडकन् हाताची मूठ छातीवर आपटून जिम्मेवार म्हणून आश्वासन देतात फूटबॉल हा इराकी लोकाचा अत्यत प्रिय खेळ आहे. त्यात त्याचा पहिला नबर फूटबॉल ची मॅच टी.व्ही वर असली की अगदी लोळक घालेल्या म्हाताऱ्या कोताऱ्या सुद्धा टी.व्ही समोर ठाण माडून बसतात

दळणवळणाचे मात्र इराकमध्ये खूप हाल दिसले सिटी बसेस आपल्याकडील डबल डेकर सारख्या असतात त्याही एअरकंडीशण्ड असतात पण फ्रिक्वेन्सी फार कमी कमी लोकसंख्या हे कारण असावे शिवाय बहुतेक लोकांच्या आपापल्या गाड्या असतात एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी 'मिनी' बसेस जास्त दिसल्या रेल्वे आता कोठे फैलावत आहे पूर्वी मोसल-बगदाद-बसरा एवढीच होती आता भारतीय कंपन्या रेल्वेचे जाळं फलावत आहेत पण गाडीत गर्दी दिसत नाही। कुठल्याही परदेशी कंपन्याना जुन्या गाड्या, जुनी यत्रसामग्री, काहीही इराकमध्ये ठेवता येत नाही ते सर्व एक तर कुवेतमध्ये तरी न्यावे लागते किंवा परत आपापल्या देशात त्याचप्रमाणे स्टिरिओसारखी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू इराकच्या बाहेर नेण्यास परवानगी नाही तिकडे विकत घ्या, वापरा व तिकडेच विकून टाका एअरपोर्टवर कस्टमजवळ अधिकारी स्टिरिओ स्टिरिओ म्हणून ओरडतच असतो जर कोणाजवळ तो आढळला तर त्याचे

काहीही न ऐकता तो हिसकावून घेतला जातो

आम्हा भारतीयाचे जीवन इराक मध्ये Open air Jail प्रमाणे होते येथे नोकरीनिमित्त खूप भारतीय लोक आहेत ते दूर दूर पसरले आहेत त्यामुळे भेटीगाठी कमी होतात टेलिफोन डिरेक्टरीत कोणाचा फोन नंबर शोधायचा म्हटले तर फोन घरमालकाच्या नावाने डिरेक्टरी अरबीत बगदादमध्ये तरी बरेच सोशल लाईफ आहे पण करबल्याला काहीच नव्हते इंग्रजी वर्तमानपत्रेसुद्धा येत नसत मग पुस्तके मॅगझिन्स तर दूरच इंडियातून आणलेली पुस्तके, मासिके एकमेकांकडून आणून आम्ही अगदी पुरवून वाचीत असू. टी.व्ही वर फक्त अरबी कार्यक्रम शुक्रवारी अरबी सिनेमा असतोच आम्ही बघत असू. युद्ध चालू असल्यामुळे टी व्ही वर सतत राष्ट्रीय समरगीते इकडे तिकडे फिरण्यावरही नियत्रणे आहेत खाण्यापिण्याचे हालच आहेत रोज रोज तीच ती मसुरीची डाळ खाऊन आम्ही कटाळलो होतो एकदा कधी नव्हे ती सठीषण्मासी कोणी तरी थोडीशी तुरीची डाळ दिली होती त्या दिवशी आम्ही अगदी अभ्यगस्नान करून सणावाराच्या गोडाधोडाच्या जेवणासारखे तुरीच्या डाळीचे हिंगाच्या खमग वासाचे पिवळे धमक,वरण करून भरपूर जेवलो करबल्यात फक्त आमच्या कंपनीत २/३ बायका होत्या बाकी सर्वांनी लढाईमुळे आपली कुटुबे घरी पाठविली होती ह्या सर्वामुळे वेळ फार कंटाळवाणा जाई

इराकला महागाई वाढत आहे इराकचा एक दिनार म्हणजे भारतीय ३२ रुपये होतात पण खुद्द इराकमध्ये दिनारला काहीच महत्त्व नाही किंमतही नाही एका मजूराला रोज तीस रूपये रोजी द्यावी लागते, तर गवडी ७० दिनार घेतो पण ह्याचा अर्थ गवडी रोज २५०० रु घेतो असो नाही कारण आपल्याकडे २५०० रु रोज म्हणजे राजेशाही जीवन होईल इराकमध्ये ७० दिनार म्हणजे ७० रु रोजपण होत नाहीत परदेशी चलनावर कडक नियत्रण असल्यामुळे डॉलर पौंड वगैरे बदलून मिळणे फार कठीण आहे त्यामुळे काळ्या बाजारात काम करणारे लोक खूप मिळतात इराकी दिनार इराकशिवाय कोणी घेत नाही

एकूण इराकच्या युद्धजन्य परिस्थितिमुळे प्राप्त जीवनास आम्ही कंटाळून गेलो होतो मोठा बंगला, गाडी, सवडीने करता येण्याजोगे कामाचे स्वातत्र्य असूनही आम्ही सतुष्ट नव्हतो माणसाला अन्न, वस्त्र व निवाऱ्याशिवाय आणखीही बरेच काही लागते ह्याची जाणीव अशा प्रसंगी होते त्याचप्रमाणे अशा देशात मरण आले तर ते बेवारशाप्रमाणे होते इकडे मोठ्या रस्त्याने मोटरी २०० कि.मी वेगाने जात असतात अशा गाड्याखाली कुत्री रोज चिरडली जातात, त्याना उचलून बाहेर फेकून देण्यात येते आपण जर येथे मेलो तर असेच होईल असे वाटते स्वदेशात मित्रांच्या गराड्यात मरण येणे ही फार समाधानाची गोष्ट असते मदर-टेरेसा असे मरण कित्येक बेवारशी लोकाना

अनुभवण्याचे सुख देते.

सुदैवाने ह्याचे काम आटपून भारतात परत जाण्यासाठी आम्ही करबल्याहून बगदादला आलो येथे ह्याचे ७/८ मित्र होते ते सर्व ह्यांना भेटण्यासाठी आले हा दिवस आमचा सोनियाचा दिवस म्हणून सर्वांनी साजरा केला सगळे जण आमच्याकडून तुरुगातून सुटलेल्या कैद्याकडे इतर कैदी हेव्याने असूयेने बघतात तसे बघत होते आता ह्यांना येथे रहाण्याची कोणीसक्ती केली होती का ? पण थोडाफार पैसा कमवून ठेवेपर्यंत ही काळ्या पाण्याची शिक्षा भोगलीच पाहिजे दुसरे महत्त्वाचे कारण असे की इराक हा एकमेव देश आहे की इराक सोडतानाही व्हिसा लागतो हा नसेल तर इराकमधून बाहेर पडता येत नाही (कम्युनिस्ट राजवट) त्यामुळे आपण तडकाफडकी इराक सोडून जाऊ शकत नाही पाचवर्षाच्या वर कोणीही इराकमध्ये राहू शकत नाही पाच वर्षे पूर्ण झाली की त्याला किमान दोन वर्षे इराकच्या बाहेर काढावी लागतात मग वाटल्यास तो इराकमध्ये परत येऊ शकतो आम्हाला विमानतळावर सोडण्याची व्यवस्था ह्याच्या मित्रानीच केली शिवाय बरोबर एक चलाख मनुष्य दिला एअरइंडियाची जम्बो फ्लाइट ५०० माणसे वजन करण्यासाठी रागेत उभी ह्याच्या विकलाग अवस्थेमुळे आम्हाला ती भली मोठी रांग मोडून थेट काउटरपर्यंत जाता आले विमा सुटण्यास दोन तास होते तोपर्यंत विमानतळावरील Duty free दुकाने पाहिली पण काहीच सामान नव्हते बहुसख्य प्रवासी भारतीय होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बायकापोरांना भेटण्याचा आनद दिसत होता आटोकाट प्रयत्न करूनसुद्धा तीस दिनार शिल्लक उरले ते फेकून देण्यापेक्षा सेट्स, किमती सिगार्स घेतल्या तेवढाच वसूलीचा आनद. विमान अगदी वेळेवर सुटले छोट्याशा खिडकीतून मी व्याकूळ होऊन सागराला आळवीत होते

ने मजसि ने परत मातृभूमिला सागरा प्राण तळमळला ।

सहा महिने बंद असलेले दिल्लीचे घर साफ करताना, गच्चीत बसून आरामात चहाचे घुटके घेतांना इराकमधील रायआवळ्या सारख्या खारट-तुरट गोड आठवणी घोळवताना एकच ओळ सारखी गुणगुणावीशी वाटत होती,

'हम को है प्यारी हमारी गलियाँ !'

* * *

# आखात पेटले आहे

होय आजही परत आखात पेटले होते ती आग अजून धुमसत आहे हे राष्ट्राच्या जिवंतपणाचे प्रतिक आहे

दहा वर्षापूर्वी आखातात असाच भडका उडाला होता इराक-इराण युद्ध इराक सुन्नी आहे तर इराण शिया आहे शियांचे परमपवित्र स्थान करबला हे इराक्याच्या ताब्यात असल्याने इराण्यांचा जळफळाट होतो कुर्दुस्तान हा काश्मीरसारखाच निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रदेश दोघानाही हवा आहे त्याचप्रमाणे आखातावर प्रभुत्व कोणाचे असावे हाही वादाचा विषय आहे कधी कधी ह्या युद्धाचा मोठा भडका उडतो तर कधी दोन्ही बाजू शात असतात, म्हणून ह्याला वॉर न म्हणता बॅटल म्हणावे लागेल आम्ही तेथे असताना एकदा बगदादवर जोराचा बॉम्ब हल्ला झाला होता, व त्या रात्री आम्हालाही जुजबी सामान घेऊन तयार रहाण्यास सागितल होत अशा आणिबाणीच्या परिस्थितीत इराक एअर बेज लगेच बद करतात व ट्रकने सौदी अरेबिया किंवा जॉर्डनमार्गे परदेशी लोकाना परत पाठवितात कपनीच्या सर्व सामानाची लीस्ट सरकारकडे दिली जाते व ते त्याच्या सुरक्षिततेची हमी घेते पण सुदैवाने दुसऱ्याच दिवशी इराकी लोकांनी इराणचे हल्ले परतवून लावले इराकची लोकसख्या १ ॥ कोटी तर इराकची पाच कोटी, त्यामुळे १ इराणीस ३ इराकी ह्या हिशोबाने मृत्यु होत असल्याने इराकची स्थिति अतिशय हलाखीची झाली होती अल्प लोकसख्या असल्यामुळेच इराकमध्ये संततिनियमन नाही उलट लोकसख्या वाढावी म्हणून जास्त सतति असणाऱ्या लोकास सरकार बक्षीस जाहीर करते करबला हे त्यांचे सर्वात पवित्र स्थान आहे युद्धात वीरगति प्राप्त झालेल्या योद्धांना करबला येथे पुरण्यात येते बाजार तेथेच असल्यामुळे स्त्रियाचा आक्रोश हृदय पिळवटून टाकीत असे पंधरा वर्षाच्या वर सर्व पुरुषांना आळीपाळीने युद्धावर जाण्याची सक्ती आहे आमच्या बेकरीवालीची तिन्ही मुलं मोसलला (उत्तरेकडे) तर नवरा बसऱ्याला (दक्षिणेकडे) युद्धावर गेला होता कर्ते पुरुष तरूण मुल युद्धावर गेल्यामुळे शहरात फक्त बायका, लहान मुल, वृद्ध व अपग माणसे दिसतात दुकान ऑफिस वगैरे सर्व व्यवहार बायकाच पहातात लोकसख्या कमी असली तरी इराकचे वायुदल फारच सुसज्ज व युद्धनिपुण आहे त्यांना प्रशिक्षण भारतीय हवाई दलाकडून मिळाले ही गोष्ट अभिमानाने नमूद करावीशी वाटते युद्धातून पळून आलेल्या भगोड्या पळपुट्यांस अतिशय हालहाल करून मारण्यात येते 'असे पळपुटे बाजीराव कुठे लपून तर बसले नाहीत ना म्हणून अधून मधून बसेस, ट्रक्स, मोटारी त्याचप्रमाणे खाजगी घराची सुद्धा अगदी कसून तपासणी

घेण्यात येते फक्त व्यापार उदीमासाठी इराकी माणसास इराकच्या बाहेर जाण्यास परवानगी आहे टुरिस्ट म्हणून मजा मारण्यास तो युद्धजन्य परिस्थितीत इराकच्या बाहेर जाऊ शकत नाही -

युद्धामुळे मनोबल खचू नये म्हणून लोकाना खूप मवलती देतात घर, दुकान फुकट देतात रेशनच्या वस्तू अगदी स्वस्तात देतात मनोबल वाढाव म्हणून टी व्ही वर सतत देशभक्तीपर गाणी दाखवतात इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसैनचे फोटो तर ठिकठिकाणी लावले होते देशासाठी स्त्रिया पिशव्या भरभरून सुवर्णालकार दान करीत प्रथम इराकमध्ये खूप इराणी रहात पण युद्धानंतर सर्वांना हाकलून देण्यात आले खुद्द खोमेनी ३५ वर्षे इराकमध्ये नजफला प्रोफेसर होता व करबल्याला ही बरेच दिवस राहिला होता म्हणे तोच खोमोनी आता आपल्या रक्ताचा प्यासा बनलेला पाहून इराक्याचा अगदी जळफळाट होत होता इराकचे मुख्य उत्पादन तेल आहे त्याच्या मोठाल्या खाणी हीलाच्या बाजूला आहेत इराकने सिरीयातून भूमध्य समुद्रावर तेल पोहोंचविण्याच्या मोठमोठाल्या पाईप लाईन्स टाकल्या होत्या पण सिरीयाशी वितुष्ट आल्यामुळे आता तेल तुर्कस्तानातून नेण्याचे काम चालू आहे

इराक-इराण युद्ध-विराम झाला होता थोड्या फुटकळ चकमकी सोडल्यातर आखात तसे शात शात होते पॅलेस्टाइन-इस्त्राईलच्या कुरापती, कोपरखळ्या अधून मधून होत पण नूतन वर्षाची सुरवातच आखातात फुकलेल्या पाञ्चजन्याने झाली तेथे परत आगडोंब उसळला अग्निनारायण खवळले खाडीमधून अक्राळविक्राळ ऑक्टोपससारखा वडवानल फणा काढून फुफकारू लागला. साऱ्या पेट्रोलचा भडका उडाला कोणी लावली ही आग ? कोणी धरले हातात कोलीत ? कोणी ओतले आगीत तेल ? कसा उडाला एवढा भडका ?

## युद्ध सुरु का झाले ?

दोन ऑगस्ट १९९० ला इराकने कुवेत आपल्या ताब्यात घेतले व ते सोडण्याचे नाकारले त्यामुळे सास्कृतिक, आर्थिक, राजकीय दृष्ट्या सर्व जगावर आधिपत्य गाजविणाऱ्या पाश्चात्य सार्वभौमत्वाला तडा गेला, 'अहं ब्रह्मास्मि' समजणारी अमेरीका खवळली प्रथम युनोने नाकेबदी केली व १५ जानेवारी १९९१ पर्यंत इराकला कुवेत सोडण्याचा आदेश दिला ११ डिसेम्बरला कुवेतमधून आपले सैन्य काढून घेण्याची सद्दाम हुसैनने सशर्त तयारी दर्शविली पण १४ डिसेंबरला 'आखाती प्रदेशातील तेल-क्षेत्रावर परकीय शक्तींचे नियत्रण आम्ही मुळीच मान्य करणार नाही' अशी सद्दाम हुसैनने घोषणा केली बुधवार तारीख १६-१-९१ रोजी सकाळी १० ॥ वाजता युनोने दिलेली 'ती' ऐतिहासिक मुदत संपली तोपर्यंत साऱ्या जगाचा श्वास वरच्यावर ठेवणाऱ्या इराकने कुवेत सोडले नाही आणि युद्धाला तोंड फुटले

## इराकने कुवेत का ताब्यात घेतले ?

इराण-इराक युद्धात तेलाचा बाजारभाव एका बॅरेलला २५ डॉलर्स होता पण कुवेत ने अमेरीका आणि इतर दोस्त राष्ट्रांच्या दबावाखाली एका बॅरलला १९ डॉलर्स ह्या भावाने तेल विकले त्यामुळे इराकचे प्रतिबॅरल ६ डॉलर्सप्रमाणे नुकसान झाले त्याचप्रमाणे कुवेतची इराकी सरहद्दीवर असलेली रुमैला तेल खाण कुवेतच्या बाजूने तेल काढले गेल्यामुळे कमकुवत झाली ही खाण कुवेतपासून इराकपर्यंत सलग्न आहे त्यामुळे एका टाकीत दोन पाईप लावले आणि एकाच पाइपने पाणी काढले तरी टाकी खाली होते तसे झाले इराणी आखातात जाण्याचा बसरा हा एकच मार्ग होता कुवेत घेतल्यावर आखाती देशावर आपले वर्चस्व स्थापन करणे हाही इराकचा एक हेतु होता इराक-इराण युद्धात कुवेतने इराकला अब्जावधि डॉलर्स दिले हे परत देण्याचा काही इराकचा विचार नव्हता आमचेच तेल चोरून त्याचे पैसे आम्हाला कर्जाऊ दिले हा इराकचा कुवेतवर आरोप होता

पण कुवेत हे स्वतंत्र राष्ट्र असल्यामुळे आपले तेल ते कसेही वापरू शकत होते म्हणून इराकला वरील आरोप उघड उघड करता येत नव्हता सबब कुवेत हा इराकचाच दक्षिण प्रात अनेक शतके होता तो ब्रिटीशानी तोडून स्वतंत्र केला आता सगळीकडे ब्रिटीश सोडून गेल्यावर जसे अनेक प्रदेश मूळ देशांना मिळाले तसे कुवेत सुद्धा इराकला मिळाले पाहिजे, होते, ते ब्रिटीशानी केले नाही म्हणून इराकला करावे लागले, ह्यात आक्रमण कोठे आले असा इराकचा दावा आहे

इस्राइलने अरबी भूमि बळकावळी तरी ते आक्रमण होत नाही मग कुवेतवर आक्रमण करण्याचा प्रश्नच येत नाही जर इस्रायलने अरबांची भूमि सोडली तर इराक कुवेत सोडेल असा पेंच सद्दाम हुसैनने अमेरीकेला टाकला होता असे करून त्याने तमाम मुसलमान राष्ट्राची सहानुभूति मिळवून आपली बाजू बळकट केली होती

## इराकचे असे धैर्य का झाले ?

अमेरीकेला मध्य पूर्वेमध्ये रशियाला शह देण्यासाठी एखादे बलवान राज्य पाहिजे होते, तसा प्रयत्न त्यानी इराणमध्ये केला इराणला बळकटही केले पण पुढे शहाची राजवट सपुष्टात येऊन इराणच अमेरीकेवर उलटले म्हणून इराणला धडा शिकविण्यासाठी अमेरीका, फ्रान्स आदि राष्ट्रांनी इराकला अद्यावत् शस्त्रे पुरविली सौदी अरेबिया, कुवेतनेही भरपूर पैसा ओतला त्यामुळे इराक-इराण युद्धाचा सगळा खर्च दुसऱ्या राष्ट्रानीच केला इराकला तशी काहीच तोशीस पडली नाही खोमेनीची कट्टर मुसलमानी

यत्रणा इराणमध्ये आल्याने इराण अमेरीकेविरूद्ध गेले तेव्हा अमेरीकेला कट्टर मुसलमानी संस्कृती नको आहे इराणनतर इराकने कट्टरपणाचा हा भार आता केवळ स्वत च्या फायद्यासाठी घेतला आहे नाहीतर आतापर्यंत इराक काही कट्टर मुस्लिम राष्ट्र नव्हते इराकने भारताला काश्मीर प्रसगी पाकिस्तानविरूद्ध मदतही केली आहे सौदी अरेबिया, कुवेत, बहारीन ही राष्ट्रे ह्या कट्टर मुस्लिम सस्कृतीच्या विरुद्ध आहेत कारण तेवढा कट्टरपणा त्या 'शेख राज्यांना धोक्याचा वाटतो म्हणून ही राष्ट्रे इराकविरूद्ध उभी राहिली इराक-इराण युद्धाचा (Shatt-Al-Arab) आठ वर्षांचा काळ इराकने आपली स्थिति मजबूत करण्यात उपयोगात आणली त्याचा वायुदल भारताने सुधारला होता इराकचे आर्मी-डेलीवृत्तपत्र 'अल-क्वासदीया' म्हणाले होते,

We have agreed the challenge not for war but to save the world from the American Wolf

## अमेरीकेची भूमिका

कुवेतमध्ये तेल नसते, कुवेतची भौगोलिक स्थिति इतकी महत्त्वपूर्ण नसती तर असे एक काय दहा कुवेत जरी इराकने गिळकृत केले असते तरी बुशच्या तीर्थरूपांचे काहीही जात नव्हते पण असे उघडपणे सागून जागतिक पाठिंबा कसा मिळाला असता ? तेव्हा निर्बल कुवेतला आक्रमक इराककडून सोडविले नाही तर सर्वत्र निर्बल देश परत गुलाम होतील असा नैतिक दावा अमेरिकेने लावला आहे इराकने इस्त्राइलचा प्रश्न निर्माण करून अमेरीकेला अधिकच पेंचात टाकले होते वास्तविक पहाता इस्त्रायल जर युद्धात भाग घेईल तर इराकला लढणे कठिण गेले असते तरी पण इस्त्राइलवर इराकने आपणहून हल्ला केला आणि इस्त्राइलला प्रतिहल्ला करता येणार नाही अशी त्याची मुस्कटदाबी करून टाकली होती कारण इस्त्राइल अमेरीकेबरोबर लढले तर अमेरीका मुस्लिम राष्ट्राना खच्ची करण्यासाठीच हे सर्व करीत आहे व इस्त्राइलला मदत करीत आहे हा सद्दाम हुसैनचा आरोप सत्य सिद्ध झाला असता म्हणून अमेरीकेने इस्त्राइलला मैदानात उतरू दिले नाही व जागाच्या दृष्टीने इस्त्राइल हे सहनशील व सोशीक राष्ट्र झाले होते

साऱ्या जगाने, कुवेत घेतल्याबद्दल इराकच्या नावाने खडे फोडले कुवेत 'जेहत्ते काळाच्या ठायी' इराकचा भाग होता पण आता त्याचे काय ? 'जेहत्ते काळाच्या ठायी' गोवाही भारताचा एक भाग होता पण साडे चारशे वर्ष पोर्तुगीजानी त्याच्यावर राज्य केले मग तो आपण कसा घेतला ? का रक्त साडले त्यासाठी ? सालाजारलाही कुवेतच्या शेखसारखे एखादे बुजगावणे उभे करता आले असते गोव्याची आम जनता तर प्रथम भारतात येण्यास नाखुषच होती 'बरा होता आमचा पाखला' अशीच त्याची भावना होती दीव, दमण पाँडेचरीचा ताबा तरी आपण का घेतला ?'

सगळ्या जगाचा पोटशूळ उठला होता तो स्वार्थासाठीच मानवता, शांति वगैरे सर्व धारण केलेले मुखवटे होते रशियाने अफगाणिस्तानवर कब्जा केला तेव्हा ही बहुराष्ट्रे गप्प का बसली? कित्येक अफगाणी निर्वासित झाले आता परवडत नाही म्हणून रशियाने अफगाणिस्तान सोडला तो भाग निराळा पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग बळकावला तर युनो 'हा त्यांचा आपसी मामला' असे म्हणून काणाडोळा करते चीनने तिबेट घेतले तेव्हा कुठे गेला होता बहुराष्ट्रांचा धर्म? उलट प नेहरूनीसुद्धा 'घेऊ दे' चीनला तिबेट तिकडे तर गवत सुद्धा उगवत नाही' म्हणून हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवलेच ना? तिबेटी लोकानी आपल्या शांत, सोशिक कष्टाळु स्वभावाने आपल्या देशाबाहेरील भारत, हॉलंड, स्वित्झर्लंड, जर्मनसारख्या देशात आपला जम बसविला हे खरे पण आज प्रत्येक तिबेटी मनुष्य-मग तो सुशिक्षित असो अथवा अशिक्षित' अगदा तिबेटच्या बाहेर वाढलेला त्यांचा नवी पिढीसुद्धा मायदेशी परत जाण्यासाठी तळमळत असते आणि नेहरूच्या नावाने खडे फोडीत आहे तिबेटमध्ये चीन घुसल्यावर भारताला कसा धोका निर्माण होईल ह्याचे आकलन नेहरूंना कसे झाले नाही? आपणही एके दिवशी सकाळी उठून सिक्कीम हा भारताचा २२ वां प्रांत आहे असे जाहीर केले ना? इस्राइल तर दुसऱ्या महायुद्धानंतर जन्मलेले राष्ट्र आहे. हिटलरने 'ज्यू' लोकाचे 'शिरकाण' केल्यावर वणवण भटकणारे ज्यू इस्राइलला एकत्र झाले पण त्यांना अरबाना हुसकून लावून पॅलेस्टाइनमध्ये आपला झेंडा रोवायचा काय अधिकार होता? मला ह्या राष्ट्राबद्दलही आदर आहे इस्राइल जॉर्डनसारखी जाज्वल्य देशप्रेम असणारी छोटी छोटी राष्ट्रे आज ठामपणे उभी राहून आपली 'आन' मिरवीत आहेत, कुठल्याही प्रकारची नारेबाजी न करता स्वदेशहित चिंतन करणारी, तिच्या विना दुजी कथा न आवडून घेणारी ही ज्वलन्त अस्तित्ववादी राष्ट्रे आहेत.

## सद्दाम हुसेन हुकूमशहा आहे का?

सद्दाम हुसैनने बळजबरीने, दंडेली करून आपल्या देशातील लोकाच्या ह्या होमकुण्डात आहुत्या दिल्या, तो हुकूमशहा आहे असा त्याच्यावर आरोप केला जातो हुकूमशहा मुस्लिम राजवटीला धार्जिणा नाही ती खरोखरच जिवंत व ज्वलन्त राष्ट्रे आहेत इतिहासही हेच सागतो ते स्वहित, देशाचे हित, धर्माचे हित प्रथम पहातात इजिप्तचे प्रेसिडेंट अन्वर सादत-साऱ्या जगाने ह्याचा शांतिदूत म्हणून गौरव केला पण त्यांची नीति त्याच्या लोकांना न आवडल्याने त्यांचा खून झाला ना? नासरचे काय झाले? मुजीबुर रहमानचे काय झाले? ते तर बगला देशचे शिल्पकार? इरशाद सरकारला का उलथून पाडले? सौदी अरेबियाच्या किंग फाएदचा का खून झाला? पाकिस्तानमध्ये काय घडते? हुकूमशहा जन्म घेतात लोकशाहीचा मखमली 'लिट्ल रेड हूड' पांघरणाऱ्या

भारत देशात

सद्दाम हुसैन हुकूमशहा असता तर खोमेनीने त्याचा केव्हाच बळी घेतला असता 'मला फक्त सद्दाम हुसैन हवा आहे, त्याचे शिर मला आणून द्या, मी इराकवरील आक्रमण थाबवितो ' असे म्हणत म्हणत खोमेनी पैगबरवासी झाला त्याला इराणच्या ताब्यात देणे इराकी लोकांना अवघड नव्हते इराक-इराण युद्धाच्या वेळी मी इराकमध्ये होते देव मानून लोक त्याची कशी पूजा करीत, देशासाठी पिशव्या भर भरून दागिने कसे देत हे मी पाहिले आहे लोक कसे झुजत होते हे मी पाहिले आहे करबलाला हसन हुसैनच्या कबरींजवळ पडलेले प्रेताचे ढीग मी पाहिले आहेत काळे बुरखे घातलेल्या वीरागना धैर्याने हसतमुखाने घर-दुकान-ऑफिस साभाळताना दिसत बाथ सरकार त्यांची सर्वतोपरी काळजी घेते तेथे साध्या ट्रक ड्रायव्हरचे घर आपल्याकडील लक्षाधिशापेक्षाही सुसज्जित असते वाटीभर दूध महादेवाच्या पिंडीवर वाहून गाभारा तुडूब भरवणाऱ्या त्या वृद्ध स्त्रीप्रमाणे प्रथम आपल्या घराचे पोट भरावे मग दुसऱ्याची उठाठेव करावी रीगनची परराष्ट्र नीति भलेही आपणास जाचक वाटो, पण अमेरीकन माणसाच्या हिताची होती, म्हणूनच तो दोनदा निवडून आला ना ? इराकमधील प्रत्येक माणूस सद्दाम हुसैनच्या मागे ठामपणे उभा होता 'आम्ही तेलाच्या सरोवरावर उभे आहोत त्याला आग लावून देऊ ठीक आहे त्यात आमचीही राख होईल पण 'It is better to be a dead lion than a living dog' हे एका इराकी प्रोफेसराचे उद्गार होते इराक केवळ लैला मजनूचा देश नाही तर हरून अलरशीद सालादेऊनवचदेसर व हमुराबीचा ही देश आहे 'शेळी होऊन दोनशे वर्ष जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन दिवस जगणं' बेहतर असे म्हणणारे टिपू तेथे आजही मौजूद आहेत

## युद्धाचा पवित्रा व परिणाम

हा एक प्रचंड द्युत होता दोन्ही पक्षांचा मान, प्रतिष्ठा, धन, अहम् पणाला लागली होती पश्चिमी वर्चस्वाला पूर्वेने प्रचड हादरा दिला होता चव्वेचाळीस दिवस इराकने युद्धाला तोंड दिल्याने बुशचा भडका उडाला होता इराकच्या अकरा लाख खड्या कसलेल्या सैन्याला अद्यावत् शस्त्रास्त्रानी परिपूर्ण असूनसुद्धा आपल्याला तोंड देणं कठीण जाईल कारण युद्धाचा निर्णय शेवटी जमिनीवरच होतो, आकाशात नाही हे बुश जाणून होता खरं युद्ध तर झालच नाही कारण बुशने जमिनीवरील युद्ध टाळून हवाई हल्ल्यावर अधिक जोर दिला

अमेरीकेच्या तुलनेत आपण हवाई हल्ल्यात अगदीच नगण्य आहोत हे ओळखून, अमेरीकेने कितीही हवाई हल्ले केले तरी आपण त्याला तोंड द्यायचे नाही, जमिनीवरसुद्धा मैदानात तोंड द्यायचे नाही तर गनिमी काव्याने खदक युद्ध लढून अमेरीकेस जेरीस आणायचे, सध्या वेळ काढूपणा करायचा उन्हाळा व उन्हाळी वाळूची वादळे सुरु झाली

सगळ्या जगाचा पोटशूळ उठला होता तो स्वार्थासाठीच मानवता, शाति वगैरे सर्व धारण केलेले मुखवटे होते रशियाने अफगाणिस्तानवर कब्जा केला तेव्हा ही बहुराष्ट्रे गप्प का बसली ? कित्येक अफगाणी निर्वासित झाले आता परवडत नाही म्हणून रशियाने अफगाणिस्तान सोडला तो भाग निराळा पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग बळकावला तर युनो 'हा त्यांचा आपसी मामला' असे म्हणून काणाडोळा करते चीनने तिबेट घेतले तेव्हा कुठे गेला होता बहुराष्ट्राचा धर्म ? उलट पं नेहरूंनीसुद्धा 'घेऊ दे' चीनला तिबेट तिकडे तर गवत सुद्धा उगवत नाही' म्हणून हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवलेच ना ? तिबेटी लोकानी आपल्या शांत, सोशिक कष्टाळु स्वभावाने आपल्या देशाबाहेरील भारत, हॉलड, स्वित्झर्लंड, जर्मनसारख्या देशात आपला जम बसविला हे खरे पण आज प्रत्येक तिबेटी मनुष्य-मग तो सुशिक्षित असो अथवा अशिक्षित' अगदी तिबेटच्या बाहेर वाढलेली त्यांची नवी पिढीसुद्धा मायदेशी परत जाण्यासाठी तळमळत असते आणि नेहरूंच्या नावाने खडे फोडीत आहे तिबेटमध्ये चीन घुसल्यावर भारताला कसा धोका निर्माण होईल ह्याचे आकलन नेहरूंना कसे झाले नाही ? आपणही एके दिवशी सकाळी उठून सिक्कीम हा भारताचा २२ वां प्रात आहे असे जाहीर केले ना ? इस्राइल तर दुसऱ्या महायुद्धानंतर जन्मलेले राष्ट्र आहे हिटलरने 'ज्यू' लोकाचे 'शिरकाण' केल्यावर वणवण भटकणारे ज्यू इस्राइलला एकत्र झाले पण त्याना अरबाना हुसकून लावून पॅलेस्टाइनमध्ये आपला झेंडा रोवायचा काय अधिकार होता ? मला ह्या राष्ट्राबद्दलही आदर आहे इस्राइल जॉर्डनसारखी जाज्वल्य देशप्रेम असणारी छोटी छोटी राष्ट्रे आज ठामपणे उभी राहून आपली 'आन' मिरवीत आहेत, कुठल्याही प्रकारची नारेबाजी न करता स्वदेशहित चिंतन करणारी, तिच्या विना दुजी कथा न आवडून घेणारी ही ज्वलन्त अस्तित्ववादी राष्ट्रे आहेत

## सद्दाम हुसेन हुकूमशहा आहे का ?

सद्दाम हुसैनने बळजबरीने, दंडेली करून आपल्या देशातील लोकाच्या ह्या होमकुण्डात आहुत्या दिल्या, तो हुकूमशहा आहे असा त्याच्यावर आरोप केला जातो हुकूमशहा मुस्लिम राजवटीला धार्जिणा नाही ती खरोखरच जिवत व ज्वलन्त राष्ट्रे आहेत इतिहासही हेच सागतो ते स्वहित, देशाचे हित, धर्माचे हित प्रथम पहातात इजिप्तचे प्रेसिडेंट अन्वर सादत-साऱ्या जगाने ह्याचा शांतिदूत म्हणून गौरव केला पण त्यांची नीति त्याच्या लोकाना न आवडल्याने त्यांचा खून झाला ना ? नासरचे काय झाले ? मुजीबुर रहमानचे काय झाले ? ते तर बंगला देशचे शिल्पकार ? इरशाद सरकारला का उलथून पाडले ? सौदी अरेबियाच्या किंग फाएदचा का खून झाला ? पाकिस्तानमध्ये काय घडते ? हुकूमशहा जन्म घेतात लोकशाहीचा मखमली 'लिट्ल रेड हूड' पांघरणाऱ्या

भारत देशात

सद्दाम हुसैन हुकूमशहा असता तर खोमेनीने त्याचा केव्हाच बळी घेतला असता 'मला फक्त सद्दाम हुसैन हवा आहे, त्याचे शिर मला आणून द्या, मी इराकवरील आक्रमण थांबवितो ' असे म्हणत म्हणत खोमेनी पैगंबरवासी झाला त्याला इराणच्या ताब्यात देणे इराकी लोकाना अवघड नव्हते इराक-इराण युद्धाच्या वेळी मी इराकमध्ये होते देव मानून लोक त्याची कशी पूजा करीत, देशासाठी पिशव्या भर भरून दागिने कसे देत हे मी पाहिले आहे लोक कसे झुजत होते हे मी पाहिले आहे करबलाला हसन हुसैनच्या कबरींजवळ पडलेले प्रेताचे ढीग मी पाहिले आहेत काळे बुरखे घातलेल्या वीरागना धैर्याने हसतमुखाने घर-दुकान-ऑफिस सांभाळताना दिसत बाथ सरकार त्यांची सर्वतोपरी काळजी घेते तेथे साध्या ट्रक ड्रायव्हरचे घर आपल्याकडील लक्षाधिशापेक्षाही सुसज्जित असते वाटीभर दूध महादेवाच्या पिंडीवर वाहून गाभारा तुडूंब भरवणाऱ्या त्या वृद्ध स्त्रीप्रमाणे प्रथम आपल्या घराचे पोट भरावे मग दुसऱ्याची उठाठेव करावी रीगनची परराष्ट्र नीति भलेही आपणास जाचक वाटो, पण अमेरीकन माणसाच्या हिताची होती, म्हणूनच तो दोनदा निवडून आला ना? इराकमधील प्रत्येक माणूस सद्दाम हुसैनच्या मागे ठामपणे उभा होता 'आम्ही तेलाच्या सरोवरावर उभे आहोत त्याला आग लावून देऊ ठीक आहे त्यात आमचीही राख होईल पण 'It is better to be a dead lion than a living dog' हे एका इराकी प्रोफेसराचे उद्गार होते इराक केवळ लैला मजनूचा देश नाही तर हरून अलरशीद सालादेऊ नवचंदेसर व हमुराबीचा ही देश आहे 'शेळी होऊन दोनशे वर्ष जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन दिवस जगणं' बेहत्तर असे म्हणणारे टिपू तेथे आजही मौजूद आहेत

## युद्धाचा पवित्रा व परिणाम

हा एक प्रचड द्युत होता दोन्ही पक्षांचा मान, प्रतिष्ठा, धन, अहम् पणाला लागली होती पश्चिमी वर्चस्वाला पूर्वेने प्रचड हादरा दिला होता चव्वेचाळीस दिवस इराकने युद्धाला तोंड दिल्याने बुशचा भडका उडाला होता इराकच्या अकरा लाख खड्या कसलेल्या सैन्याला अद्यावत् शस्त्रास्त्रानी परिपूर्ण असूनसुद्धा आपल्याला तोंड देण कठीण जाईल कारण युद्धाचा निर्णय शेवटी जमिनीवरच होतो, आकाशात नाही हे बुश जाणून होता खरं युद्ध तर झालच नाही कारण बुशने जमिनीवरील युद्ध टाळून हवाई हल्ल्यावर अधिक जोर दिला

अमेरीकेच्या तुलनेत आपण हवाई हल्ल्यात अगदीच नगण्य आहोत हे ओळखून, अमेरीकेने कितीही हवाई हल्ले केले तरी आपण त्याला तोंड द्यायचे नाही, जमिनीवरसुद्धा मैदानात तोंड द्यायचे नाही तर गनिमी काव्याने खदक युद्ध लढून अमेरीकेस जेरीस आणायचे, सध्या वेळ काढूपणा करायचा उन्हाळा व उन्हाळी वाळूची वादळे सुरु झाली

की (इराकमध्ये उन्हाळ्यात ५७ ५८८ तापमान असते.) की अमेरीका रडकुडीला येईल तेव्हा आपली स्थिती मजबूत करायची व जागतिक मत आपल्याकडे वळवून घ्यायचे असा इराकने पवित्रा घेतला होता पण —

द्युतामध्ये कधी मनासारखे दान पडत नाही, पत्त्यामध्ये कधी मनासारखी पाने येत नाहीत, कयास चुकतात, मनुष्यही घोडचूक करतो इस्राइलच्या बाबतीत इराकची अटकळ चुकली इस्राइल युद्धात पडले असते तर युद्धाचे स्वरूपच वेगळे झाले असते त्यात इराक चे 'पानिपत' झाले अन्न, औषध, गोड पाणी ह्याचा इराकमध्ये तुटवडा पडला पानिपतमध्ये जे गिलच्यांनी मराठ्याचे केले तेच येथे इराकचे झाले बहुराष्ट्र सैन्याने इराकची रसद तोडली बुश रडीचा डावही खेळला 'आमचे इराकशी काही वैर नाही, त्याला नेस्तानाबूत करण्याचा आमचा मुळीच हेतु नाही आमच मुख्य ध्येय 'बिचाऱ्या' कुवेतला स्वतत्र करण आहे ! असा साळसूदपणाचा आव आणणाऱ्या बुशने सिव्हिल एरियावर अमानुषपणे हल्ले करून बगदाद, बसरा, करबल्याचा कचरा केला अनेक लोकाचे, लहान मुलाचे बळी घेतले त्यामुळे आपले लोक वाचविण्यासाठी सद्दामला शरणागती पत्करावी लागली सर्व अटी मान्य करून सद्दामने शरणागती पत्करली 'डीव्हाइड अँड रूल' ही पाश्चात्य नीति येथेही सफल झाली जॉर्डनशिवाय एकही अरब राष्ट्र त्याच्या मदतीस आले नाही सद्दामची मोठी चूक म्हणजे कुवेतमधील तेलाच्या खाणींना लावलेल्या आगी त्यामुळे पर्यावरणाचा गभीर प्रश्न निर्माण होऊन त्याच्या विषयीची जागतिक सहानुभूति नष्ट झाली

ज्या पाश्चात वर्चस्वाचे आशियातून उच्चाटन करण्यासाठी आशियातील जवळ जवळ प्रत्येक राष्ट्राला शतकानुशतक झगडाव लागलं तेच पाश्चात्य वर्चस्व आज आशियात परत घुसलं आहे, आशियातील एकाही राष्ट्राला ह्याची जाणीव कशी होतं नाही ? कुवेत अमेरीकेच्या हातातील पूर्णपणे बाहुलं बनेल इराकमध्ये त्यानी दुफळी माजविलीच आहे सद्दामचा काटा काढण्यासाठी अमेरीका इराकी लोकानाच भडकावीत आहे कुर्दीश लोक बंड करून उठलेच आहेत त्याच्याकडून बुश त्याचा सफाया करेल, स्वत नामानिराळा राहून सद्दामची नजर कुवेतनतर सौदी अरेबियाकडे वळेल व हळू हळू सर्व जगावर इस्लामचा पगडा बसेल निर्बल कुवेतचा ताबा घेतला म्हणून इराकला धडा शिकवला, पण अमेरीकेने पुढे हेच केले, राजनितीच्या रेसलींगमध्ये कॅशियस क्ले बनलेल्या बुशला धडा कोण शिकवणार ? हाही एक चिंतनीय प्रश्न आहे

पॅलेस्टाइन प्रश्न आतरराष्ट्रीय स्तराला आणण्याचे इराकने स्तुत्य कृत्य केले आता हा प्रश्न आतरराष्ट्रीय पातळीवरून सोडवला जाईल असे युनो सेक्रेटरी जनरल कूलेर ने मधाचे बोट लावले होते त्याचे काय ? जर बुशने निर्बल राष्ट्रांचा 'यदुराया' बनण्याचे कंकण हाताला बाधल असेल तर त्याने आता चीनकडे बघाव लाखो तिबेटी लोकाचा आक्रोश ऐकावा व चीनच्या तावडीतून तिबेट स्वतत्र करावं

की (इराकमध्ये उन्हाळ्यात ५७ - ५८८ तापमान असते.) की अमेरीका रडकुंडीला येईल तेव्हा आपली स्थिती मजबूत करायची व जागतिक मत आपल्याकडे वळवून घ्यायचे असा इराकने पवित्रा घेतला होता पण ---

द्युतामध्ये कधी मनासारखे दान पडत नाही, पत्त्यामध्ये कधी मनासारखी पाने येत नाहीत, कयास चुकतात, मनुष्यही घोडचूक करतो इस्त्राइलच्या बाबतीत इराकची अटकळ चुकली इस्त्राइल युद्धात पडले असते तर युद्धाचे स्वरूपच वेगळे झाले असते त्यात इराक चे 'पानिपत' झाले अन्न, औषध, गोड पाणी ह्याचा इराकमध्ये तुटवडा पडला पानिपतमध्ये जे गिलच्यांनी मराठ्याचे केले तेच येथे इराकचे झाले बहुराष्ट्र सैन्याने इराकची रसद तोडली बुश रडीचा डावही खेळला 'आमचे इराकशी काही वैर नाही, त्याला नेस्तानाबूत करण्याचा आमचा मुळीच हेतु नाही आमच मुख्य ध्येय 'बिचाऱ्या' कुवेतला स्वतंत्र करण आहे ! असा साळसूदपणाचा आव आणणाऱ्या बुशने सिव्हिल एरियावर अमानुषपणे हल्ले करून बगदाद, बसरा, करबल्याचा कचरा केला अनेक लोकाचे, लहान मुलाचे बळी घेतले त्यामुळे आपले लोक वाचविण्यासाठी सद्दामला शरणागती पत्करावी लागली सर्व अटी मान्य करून सद्दामने शरणागती पत्करली 'डीव्हाइड अँड रूल' ही पाश्चात्य नीति येथेही सफल झाली जॉर्डनशिवाय एकही अरब राष्ट्र त्याच्या मदतीस आले नाही सद्दामची मोठी चूक म्हणजे कुवेतमधील तेलाच्या खाणींना लावलेल्या आगी त्यामुळे पर्यावरणाचा गभीर प्रश्न निर्माण होऊन त्याच्या विषयीची जागतिक सहानुभूति नष्ट झाली

ज्या पाश्चात वर्चस्वाचे आशियातून उच्चाटन करण्यासाठी आशियातील जवळ जवळ प्रत्येक राष्ट्राला शतकानुशतकं झगडावं लागल तेच पाश्चात्य वर्चस्व आज आशियात परत घुसलं आहे, आशियातील एकाही राष्ट्राला ह्याची जाणीव कशी होत नाही ? कुवेत अमेरीकेच्या हातातील पूर्णपणे बाहुल बनेल इराकमध्ये त्यांनी दुफळी माजविलीच आहे सद्दामचा काटा काढण्यासाठी अमेरीका इराकी लोकानाच भडकावीत आहे कुर्दीश लोक बड करून उठलेच आहेत त्याच्याकडून बुश त्याचा सफाया करेल, स्वत नामानिराळा राहून सद्दामची नजर कुवेतनतर सौदी अरेबियाकडे वळेल व हळू हळू सर्व जगावर इस्लामचा पगडा बसेल निर्बल कुवेतचा ताबा घेतला म्हणून इराकला धडा शिकवला, पण अमेरीकेने पुढे हेच केले, राजनितीच्या रेसलींगमध्ये कॅशियस क्ले बनलेल्या बुशला धडा कोण शिकवणार ? हाही एक चिंतनीय प्रश्न आहे

पॅलेस्टाइन प्रश्न आतरराष्ट्रीय स्तराला आणण्याचे इराकने स्तुत्य कृत्य केले आता हा प्रश्न आतरराष्ट्रीय पातळीवरून सोडवला जाईल असे युनो सेक्रेटरी जनरल कूलेर ने मधाचे बोट लावले होते त्याचे काय ? जर बुशने निर्बल राष्ट्रांचा 'यदुराया' बनण्याचे कंकण हाताला बाधल असेल तर त्याने आता चीनकडे बघावं लाखो तिबेटी लोकांचा आक्रोश ऐकावा व चीनच्या तावडीतून तिबेट स्वतत्र कराव

युध्द केव्हाही वाईट त्याचे परिणाम सर्व जगाला भोगावे लागतात राजधुरीणाच्या प्रशासकाच्या लठ्ठालठ्ठीत सामान्य जनता नेहमीच भरडली जाते तरीही अठ्ठावीस बलाढ्य राष्ट्राना निधड्या छातीने तोंड देणाऱ्या इराकसारख्या ज्वलत, जिवंत, स्वाभिमानाने व राष्ट्राभिमानाने ओथबलेल्या चिमुकल्या राष्ट्राविषयी, इराकी लोकाविषयी मला नेहमीच प्रेम व आदर वाटेल -नाम अना ओहीब अल इराक ! अना मोहेब इरकी येथील वीर- वीरांगनाना म्हणावेसे वाटते हझान सैदान अल इराक ! वायदान अल इराक ! (गुडलक इराक, चीअर यू इराक !)

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# काहिरा

केल्याने देशाटन, पडीत मैत्री, सभेत सचार ही आर्या मी लहानपणापासून ऐकत होते देशाटन झाले, नाना देशीचे नाना लोक पाहिले, पडित मैत्री झाली, सभेत सचारही झाला पण आता आम्हाला चातुर्य किती आले देव जाणे !-लोक दुबईला जाऊन बराच पैसा घेऊन येतात, पण आम्ही मात्र गल्फमध्ये मिळालेली सपत्ती ईजिप्त, सीरिया, युरोप, अमेरीका भ्रमण करून भूमध्य, अटलाटीक व पॅसिफीक महासागरास अर्पण करून अलो हो, स्वदेशी बँकाना ओझं नको उगीचच असो दुबईत आल्यावर प्रथम आम्ही दर शुक्रवारी (येथे शुक्रवारी सुट्टी असते) अबुधाबी, अजमन, रास-अल-खेमा, ओमल गवन, खोरफक्कान अशी U A.E मधील सर्व प्रेक्षणीय स्थळ पाहिली नंतर आमच्या इराणला जाण्याचा बेत होता पण तेव्हा इराणला कडाक्याची थडी असल्याने आम्ही आमचा मोर्चा ईजिप्त बेरूत दमास्कसकडे वळविला

शनिवारी पहाटे ३ ॥ वाजता आम्ही घर सोडल विमानतळावर पोहचता पोहचता आम्हाला जरा उशीरच झाला होता इमिग्रेशनमधून आत शिरता शिरता 'लक्ष्मण-उर्मिला' असा आमच्याच नावाचा पुकारा माइकवरून चाललेला कानावर पडला उर्मिला हे माझे सासरचे नाव पासपोर्टवर, कागदोपत्री आहे मला वाटत रामायणातसुद्धा असा 'लक्ष्मण-उर्मिलेच्या' नावाचा उद्घोष झाला नसेल तो ह्या यावनी म्लेंछाच्या भूमीवर झाला शेकडो नजरांच्या सगिनी आमच्यावर रोखल्या गेल्या आम्ही पटकन Security मध्ये घुसलो एवढा आटापीटा केला पण फ्लाईट लेट झालीच आम्ही जाणार, मग ती लोकल असो पंजाब मेल असो अथवा हे इराक एअर वेज चे जम्बो असो ते वाहन जावयाला सुद्धा लाजवीलसे नखरे करीत उशीर करणारच चांगले पाऊण तास उशीराने विमान एकदाचे हलले आमच्या वाटणीच्या एअर होस्टेसेस-हवाई पऱ्या, हवाई असल्या तरी पऱ्या म्हणण्याच्या लायकीच्या नव्हत्या कामातही विशेष चपळाई दिसत नव्हती

आम्हाला ब्रेकफास्ट बरा दिला इराकमधील वेळेप्रमाणे आम्ही सकाळी सहा वाजता बगदादला पोहोचलो बगदाद अधिक पश्चिमेला असल्यामुळे घड्याळ एक तास मागे करावे लागले येथे तपमान ४ सेंटीग्रेड होते त्यामुळे चागलीच हुडहुडी भरली हरून अल-रशीदचे बगदाद पहाण्याची फार इच्छा होती पण Visa नसल्यामुळे चार-पाच तास एअर पोर्टवरच काढावे लागले तऱ्हेतऱ्हेचे प्रवासी पहाण्यात वेळ मजेत गेला इराकी लोक युरोपियन लोकासारखेच गोरेपान, उंच धिप्पाड तरतरीत आहेत भाषा अरबीच आहे साफ सफाई सारखी चाललेली असते झाडूवाल्या बायकासुद्धा गोऱ्यापान व्यवस्थित जामानिमा केलेल्या, अगदी मुस्काऱ्यासकट सपूर्ण मेकअप केलेल्या पाहून मला माझ्या गबाळ्या अवताराची लाज वाटली. काश्मीरमध्ये भिकारणीही किती सुदर असतात। खाण-पिण हा अरबी लोकाचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे एअर पोर्टवरही आम्हाला भरपूर नाश्ता दिला पेट्रोल भरण्यात अरब लोक पटाईत आहेत ना, पण तितकीच त्याची किंमत वसूल करण्यातही इटर नॅशनल एअरपोर्ट म्हणजे निरनिराळ्या रगाची व वेशभूषेची रगपचमीच असते हापूसच्या रसरशीत आब्यासारख्या शेंदरी जपानी बायका तर स्ट्रॉबेरीच्या रगाचे अमेरिकन्स , जर्मन्स व इग्लिश लोक, मध्येच काळ्या टपटपीत मनुकासारखे निग्रो तर क्वचित काळ्या टप्पोऱ्या काबुली द्राक्षासारखे भारतीय लोक दिसत होते

अखेर आमच्या फ्लाइटची वेळ झाली इराक एअरवेजची गमत म्हणजे विमानातील सीट्सना नंबर्स नव्हते त्यामुळे विमान लागल्याबरोबरच लोकांची (अगदी शिस्तप्रीय इग्लीश लोकाचीसुद्धा) खिडकीची जागा पकडण्यासाठी ही झुंबड उडाली आपल्याकडे सिनेमागृहात खुर्च्यांना नबर्स नसले की कशी झुबड उडते, ढकलाढकली होते, त्याची मला आठवण झाली, आश्चर्य म्हणजे विमान अगदी व्यवस्थित वेळेवर सुटले हवाई पऱ्याही सुदर असून बिजली चपळाईने काम करीत होत्या विमानातून ती इतिहास प्रसिद्ध तैग्रीस नदी पाहिली ह्याच नदीच्या काठाकाठाने राजा हरून-अल-रशीद जात असे (इतिअरेबियन नाइट्स) बगदाद-कैरो तीन तासाची फ्लाइट आहे भू-मध्य समुद्र पाहून डोळ्याचे पारणे फिटले पण हे जग इतके विशाल व सुदर आहे की काय काय पाहून पारणे फिटले म्हणायचे। भू-मध्य समुद्राचा रग इतका अस्मानी आहे की आकाशाचे प्रतिबिब खाली पडल्यासारखे वाटते निळ्याभोर पाण्याला लालसर वाळूचा किनारा, निळ्या रेशमी काजीवरम् साडीला लाल चुटूक मखमली काठ लावल्यासारखा दिसतो

'शेवटी एकदाचे कैरो आले (घड्याळ आणखी एक तास मागे करावे लागले) ५००० वर्षापूर्वी वसलेली मिस्त्र सस्कृतीची शान मिरविणारी ही चित्रमय नगरी विमानातून चैत्रगौरीच्या हळदीकुकवाच्या आराशीसारखी विलोभनीय वाटली ईजिप्तसाठी Visa विमानतळावरच मिळतो बगदादचा Visa मिळविण्यासाठी दोन

महिने आधी खटपट करावी लागते त्यात हल्ली नवीन कायद्याप्रमाणे ज्यांच्या पासपोर्टवर इस्राइल चे endorsement असेल त्यांना कोठल्याही अरब राष्ट्रात प्रवेश मिळत नाही आम्ही आलो तेव्हा कैरोला ॲफ्रो-अरब समीट चालू असल्यामुळे हॉटेलमध्ये जागा मोठ्या मुश्किलीने मिळाली दिवसाला ८० रु दर असलेले हे 'खानखलीली' हॉटेल भारतातील त्याच दराच्या हॉटेलच्या मानाने अगदी रद्दी वाटले डेल्टा-टूर सर्व्हिस बरोबर आम्ही आमचा येथील कार्यक्रम ठरविला ह्या कंपनीचे ऑफिस एअर-पोर्ट वरच आहे

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रथम आम्ही ईजिप्त-म्युझियमला भेट दिली आतापर्यंत पाहिलेल्या म्युझियमपेक्षा हा वेगळा वाटला त्यात इतर म्युझियमप्रमाणे जुनी शस्त्रास्त्रे भांडी कुंडी, दागदागिने कपडे तर आहेतच शिवाय ३५०० वर्षापूर्वीच्या मानवी देहाला व्यवस्थित जतन केलेले आहे पिरॅमिडच्या पोटात खोल जागी मुद्दाम बांधून काढलेल्या कोठ्यामध्ये खास प्रक्रिया करून जतन करून ठेवलेली हजारो वर्षापूर्वीची प्रेते सापडली ह्याच त्या ममीज 'ममी' हे नाव मुळात फारसी 'ममिया' म्हणजे डाबर, बिट्युमेन ह्या अर्थाच्या शब्दावरून आले आहे ममीमध्ये प्रेताच्याभोवती डाबरात भिजविलेल्या कापडी पट्ट्या गुंडाळलेल्या असल्यामुळे अशी प्रेते सापडल्यावर अरबी लोकांना हे डाबराचेच ठोकळे आहेत असे वाटले पुढे डांबरी पट्ट्याच्या आत प्रेते आढळल्यावर अरबांनी मेण व डाबरी वस्त्रात सुरक्षित जतन केलेले प्रेत ह्या अर्थी ममी या शब्दाचा वापर सुरु केला व तोच शब्द पुढे पुढे रुढ झाला

इजिप्शियन संस्कृतीमधील लोकांचा मरणोत्तर जीवनावर दृढ विश्वास होता माणूस मरण पावला तरी त्याचा आत्मा दिवसभर इतस्तत भटकतो आणि रात्री पुन्हा आपल्या मृत शरीरात येऊन विसावतो अशी त्यांची कल्पना होती त्यामुळे ही शरीरे नष्ट होऊ न देता जतन करून सुस्थितीत राखून ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो अगदी सुरवातीच्या काळात माणूस मेल्यावर त्याचे शरीर नुसतेच वाळूत पुरून ठेवत असत दिवसभर वाळू अत्यंत तापत असल्यामुळे शरीरातील सर्व जलांश उडून जाऊन शरीर लाकडासारखे कोरडे, शुष्क व कडक बनत असे पुढे पुढे ही प्रेते पेटीत ठेवण्याची पद्धत सुरु झाली पण पेटीत ठेवलेल्या प्रेतातील सर्व जलांश निघून गेल्यावर ती शरीरे कुजू लागत, म्हणून नंतर अशा शरीरात 'मसाला' भरून ती जतन करण्याची पद्धत सुरु झाली

ममी करण्यासाठी माणूस मरण पावताच त्याच्या नाकातून आणि टाळ्यातून भोक पाडून त्यातून मेंदूचा सर्व मऊ भाग खरवडून टाकीत त्याचप्रमाणे पोटाच्या डाव्या कुशीत खालच्या बाजूने सुमारे १० से.मी लांबीची लांब चीर घेऊन त्यातून पोटातील सर्व पचनेन्द्रिये, जठर, यकृत, प्लीहा लहान व मोठे आतडे त्याचप्रमाणे हृदय व फुप्फुस हे सर्व भाग काढून घेत हे सर्व अवयव वेगवेगळ्या चार पात्रामध्ये जतन करून ठेवत हे अवयव

काढून रिकाम्या झालेल्या जागी ते मीठ, सोडियम कार्बोनेट, सोडियम नायट्रेट इत्यादि क्षार भरून ठेवत ह्या क्षारांमुळे सर्व जलाश व इतर द्रव्ये शोषली जाऊन शरीर अगदी शुष्क होई शरीर पुरते सुकल्यानंतर त्याला सुगंधी द्रव्याने स्नान घालून सर्वांगावर पाईन वृक्षाच्या राळेचा द्राव फासून ठेवीत शरीरातील रिकाम्या जागेत तसेच तोंडाचे आत लिनन कापडाचे बोळे खुपसून शरीराचा आणि चेहऱ्याचा आकार मुळच्यासारखाच दिसेल असे करीत पोटावरील चीर शिवून बंद करून टाकीत आणि नंतर सर्व शरीराभोंवती राळ, मेण, डाबर ह्यांच्या मिश्रणात भिजवलेली लिनन कापडाची निरुंद खूप लांबलचक पट्टी बँडेजप्रमाणे पक्की लपेटून टाकीत ही पट्टी शरीराभोवती लपेटणे हे फार मोठे कौशल्याचे काम असते ही पट्टी खूपच लांब म्हणजे काही ममींच्या बाबतीत अडीच किलोमीटर (२५०० मीटर) इतकी लांब असल्याचे आढळले आहे ह्या सर्व क्रिया होण्यासाठी ७० दिवस लागत

एकीकडे या क्रिया चालू असतानाच ममी ठेवण्यासाठी ममीच्या आकाराची लाकडाची सुबक शवपेटी तयार करण्याचे काम होई या पेट्या उच्च दर्जाच्या, मजबूत, टिकावू लाकडाच्या असून त्याच्या बाहेरच्या बाजूवर त्या व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना चित्रीत करून ठेवलेल्या असत थडग्यात शवपेट्या ठेवताना शवपेटीबरोबरच त्या व्यक्तीच्या रोजच्या वापरातील वस्तू, कपडे जडजवाहर, सोने नाणे इत्यादि वस्तू ठेवल्या जात आजवर अशा शेकडो ममी सापडलेल्या असून जगातील बहुतेक पुराणवस्तु संग्रहालयात एखादी तरी ममी ठेवलेली आढळते कित्येक ममींच्या शरीरावरच्या लिननच्या पट्ट्या काळजीपूर्वक सोडवून आतील शरीराची सविस्तर तपासणी करण्यात आली आहे, पण त्याहीपेक्षा अलीकडे विकसित करण्यात आलेल्या क्ष किरण तपासणीच्या तंत्राने ममी न उघडताही आतील शरीराची संपूर्ण तपासणी करण्यात येते त्या पद्धतीने अनेक ममींची तपासणी केली आहे ह्या तपासणीत सध्या प्रचलित असलेले अनेक रोग आणि विकार तीन ते चार हजार वर्षांपूर्वीही होते असे आढळले आहे दुसऱ्या रॅमसेसच्या ममीची तपासणी केल्यावर त्याचे बहुतेक सर्व दात किडलेले असून हिरड्याना गळव झाल्याच्या खुणा आढळल्या दुसऱ्या एका राजाला पोलिओ झाला असल्याचे आढळले संधिवात, अर्थ्रायटीस हा विकार अनेक ममींमध्ये आढळला

त्याची जतन करण्याची प्रक्रिया फारच मनोरंजक आहे प्रथम त्या मृतदेहाला विशिष्ट औषधाने आंघोळ घालीत त्यानंतर सोन्याची बोटे अंगुष्ठाने, अगदी संपूर्ण सोन्याचे कवच करून झाकून टाकीत नंतर अनेक प्रकारच्या सुवासिक सेंट्स शिंपडलेल्या कापडात ठेवीत ती पेटी एका दुसऱ्या पेटीत असे चार वेळा करीत चौथी पेटी संपूर्ण सोन्याने मढवून मग ती एका दगडी पेटीत ठेवीत व ती दगडी पेटी

भुयारासारखा रस्ता करून पिरॅमिडमध्ये ठेवीत तेथे ठेवल्यावर तो रस्ता एका प्रचंड शिळेने बंद करून टाकीत

ह्या ममीचा रक्षणकर्ता देव, कुत्र्याच्या रूपात मानला गेला आहे (God Anubis) त्याची प्रचंड मूर्ति म्युझियममध्ये आहे प्राचीन इजिप्शियन धर्माची कल्पना हिंदु धर्म व प्राचीन ख्रिश्चन धर्माशी मिळती जुळती आहे आपल्याकडे मत्स्यावतार, वराह अवतार कूर्मावतार, नृसिंह-अवताराची जशी कल्पना आहे तशी इजिप्तमध्येही निरनिराळ्या कृत्याचे देव आहेत उदा ममीचा रक्षणकर्ता देव कुत्र्याच्या रुपात खेकडा, कासव, साप वगैरेंनाही ईश्वराचा अंश समजून त्याची पूजा केली जाई निरनिराळ्या पक्षांना दाणापाणी दिले नाही तर ते आपले अनिष्ट करतील ह्या भीतीने त्याची नीट उपासना केली जाई बुपास्टीच्या मांजरास कैरोमध्ये अजूनही समारंभपूर्वक जेवण दिले जाते आपल्याकडे दक्षिणेला महाबलीपुरमजवळपक्षीतीर्थम नावाचे स्थान आहे तेथे दोन गरूड पक्षांना आज हजारो वर्षे जेवण देण्याची प्रथा चालत आली आहे सर्पदेवता (AESULAPIUS) तर येथील राजघराण्याचे दैवत होते प्रत्येक ममीच्या कपाळावर सर्पाकृति चिन्ह आहे जो राजा युद्धात मारला जाई त्याची ममी करीत नसत राणी क्लिओपाट्राची ममीही दिसली नाही, पुष्कळशा ममीज् पॅरीस, रोम व इंग्लंडच्या म्युझियममध्ये नेल्या गेल्या आहेत प्राचीन काळातील अस्सल सोन्याचे दागिनेही येथे जतन करून ठेवलेले आहेत त्याचप्रमाणे राजा तुत्खामेनचे चंदनी लाकडाला सोन्याच्या पत्र्याने मढविलेले रत्नजडित सिंहासन', त्याचे प्रवासी पलंग, त्याचा खजिना, त्याच्या नेहमीच्या झोपण्याच्या सोन्याच्या कॉट्स, अत्ताराचे मोठमोठाले संगमरवरी बुधले सर्व काही जतन करून ठेवलेले आहे

म्युझियम मधून आम्ही सिताडेलला निघालो वाटेत कैरो शहराचे सम्यक् दर्शन होत होते मला तर राहून राहून दिल्ली आणि कलकत्त्याची आठवण होत होती लिबरेशन स्क्वेअर तर अगदी कलकत्त्याच्या चौरंगी सारखा आहे तशाच खच्चून भरलेल्या बसेस, व ट्रॅम्स, ताज्या ताज्या गुबगुबीत डबलरोट्याचे हारे घेऊन चाललेले पाववाले शाळेस रोज जाताना मज विघ्ने येती नाना'असे डोक्यात घेऊन रमत-गमत चाललेली गोरीपान कुरळ्या केसाची गोंडस अरबी बालके, घाईघाईने ने घरकाम आटपून धावतपळत ऑफिसात जाणाऱ्या महिला, दुधाच्या मोठमोठाल्या बरण्या सायकलीला लटकावून चाललेले दूधवाले दिसले ह्या दूधवाल्याच्या बरण्याचा आकार सर्वत्र एकच कसा ह्याचे मला कोडेच आहे मग तो हॉलंडचा असो वा डेन्मार्कचा, बनारसी भैय्या असो वा चाळीसगावचा भाऊ असो सर्वांच्या बरण्या अगदी एका मुशीतून काढल्यासारख्या असतात

ऐंशी लाख वस्ती असलेल्या कैरो शहराचे नाईल नदीमुळे दोन भाग झाले आहेत

एका बाजूला नवीन वसलेले कैरो तर दुसऱ्या बाजूला जुने कैरो नाईल नदीनेच ह्या शहराला जीवनदान दिले असल्याने प्रत्येक ईजिप्शियन तिच्या बद्दल (नील हे नाईल चे अरबी नाव) येता जाता, कृतज्ञता व्यक्त करीत असतो कैरो शहराचे मूळ अरबी नाव 'काहिरा' असे आहे नाईल नदीवर असंख्य कालवे काढून त्यावर शेती, फळाफुलाच्या बागा पिकविल्या जातात म्हणून कैरो शहर हे नेहमी हिरवेगार व समृद्ध दिसते नाईल नदीच्या किनाऱ्यावरच ६०० फूट उंचीचा कैरो टॉवर असून त्याच्यासमोर ५०० फूट उंच कारंजे थुईथुई नाचत होते सिताडेलला प्राचीन किल्ले, मशिदी, चर्च व राजवाड्याचे भग्नावशेष आहेत त्यापैकी कॉप्टिक चर्च बघण्यासारखे आहे हे इ स ४ थ्या शतकात बाधण्यात आले होते ह्याच्या भिंतीवरील खोदकामात येशु ख्रिस्त विजयानंदात जेरूसलेमध्ये प्रवेश करीत असून येथे सेंट सर्जीसला विश्राती घेत असल्याची चित्रे खोदलेली आहेत

तुलून ही प्राचीन मशिदीपैकी एक आहे ही मशीद इ स ८७९ मध्ये ईजिप्तचा सामर्थ्यशाली सम्राट इब्ज तुलून ह्याने बाधली. हिच्या भितीवरील नक्षीकाम अतिशय नाजुक आहे प्राचीन मुस्लिम शिल्पाचा हा एक सुंदर नमुना आहे हिचा साधेपणा व भव्यता कोणाचेही मन आकर्षून घेते

सुलताना हसनचा मॉस्क तुलून मॉस्क नतर ५०० वर्षांनी म्हणजे १४ व्या शतकाच्या प्रारंभी बाधण्यात आला ह्याची वैभवशाली व भपकेबाज बाधणी फारच चित्तवेधक असून त्याच्या त्या प्रचड अॅल्युमिनिअमच्या दाराचे नक्षीकाम फारच सुदर आहे

सुलतान हसन मॉस्कच्या पुढे शेवटचा राजा फरूख ह्याच्या वडिलाचा-मोहम्मद अलीचा टोम्ब आहे येथे कापडाचे बूट घालून आत जावे लागते हा टोम्ब अर्वाचीन इटालीयन चर्चसारखा आहे अब्बास पाशाने ह्याचे अलाबास्टर दगडाचे मूल्यवान स्तम्भ चोरून लाकडाचे रगीत खांब तेथे ठेवले येथे चार इमामाचे चार खांब आहेत मुख्य टोम्ब १८० फूट उंच आहे ह्याच्या आतील काम म्हणजे अरबी शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे हड्या झुमराच्या लखलखाटात ते नक्षीकाम अतिशय विलोभनीय दिसते इग्रजानी ह्यातील खूपसे दिवे फोडून टाकले कैरोच्या बहुतेक जुन्या इमारतीत गॉथिक आर्ट दिसते

सिताडेलहून आम्ही जगातील सात आश्चर्यांपैकी एक मोठे आश्चर्य होय ! ते प्रसिद्ध गीझा पिरॅमिड्स-पहाण्यास गेलो लहानपणापासून ज्यांची वर्णने डोळ्यानी वाचत होतो आणि कानानी ऐकत होतो ते विश्वविख्यात अद्भुतरम्य स्वप्न आपण थोड्याच वेळात 'ह्याचि देही ह्याचि डोळा' बघणार ह्या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता हर्ष, उत्सुकता, व विस्मय-भावनाचा हा त्रिवेणी सगम उत्कटतेच्या चरणसीमेला जाऊन माझे हृदय धडधडत होते शरीरातील अणुरेणु रोमांचित झाला होता सपूर्ण काया थरथरत होती

अनेक पिरॅमिड्सपैकी आता मोठे फक्त तीन (राजा चेऑप्स चा दुसरा कॅफ्रीनचा व तिसरा मायसेरीनसचा) व लहान सहाच उरले आहेत सर्वात मोठा पिरॅमिड ४०० फूट उंच आहे

पिरॅमिडला आश्चर्य मानण्याचे कारण म्हणजे दोन दगड जोडण्याचा जो मॉर्टर (गिलावा) असतो तो येथे कोठेही दिसत नाही वीस वीस टन वजनांचे दगड ४०० फूट उंचीपर्यंत रचत नेणे व तेही क्रेनसारखे अवजार नसताना ह्यावर प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय विश्वास बसणेच कठीण आहे एवढ्या प्रचंड बाधकामास भक्कम पाया कसा काय करायचा ह्याबद्दलचे ज्ञानही त्यात दिसून येते त्याचप्रमाणे २५ फूट अतर (स्पॅन) व त्यावरील प्रचण्ड वजन पेलणाऱ्या त्रिकोणी कमानी (आर्चेस) ह्या सर्व गोष्टी म्हणजे स्थापत्य शास्त्रातील एक महान्-आश्चर्य आहे ममी हे मृत शरीर न मानता ते जिवत शरीरच आहे अशी प्राचीन ईजिप्शीयन लोकाची कल्पना असल्यामुळे त्याला हवा मिळण्यासाठी सपूर्ण पिरॅमिड्स मधून झरोके (Ventilation) ठेवले आहेत पिरॅमिड्सच्या तळाशी ममी आत नेण्यासाठी १८० पायऱ्यांचे भुयारी रस्ते आहेत तो संबंध रस्ता आम्ही ओणव्याने गेलो आतमध्ये ममी ठेवण्याच्या जागेव्यतिरिक्त मोठ मोठाले हॉल आहेत दीडशे वर्षांपूर्वी एका इटालियन इंजियनियरने वर येण्यासाठी दुसरा एक Short-Cut तयार केला (मेहरबानी) नाही तर परत १८० पायऱ्या चढण्याच्या कल्पनेनेच पायात गोळे आले

पिरॅमिड्सच्या जवळच पाव मैलावर Sphinx (स्त्रीमुखी सिंह) आहेत तेथे जाण्यासाठी काही शौकीन उंटावरचे शहाणे बनतात पण मग हाडे खिळखिळी झाली की पस्तावतात हा स्फिन्क्स २० फूट उचीचा असून ममीचा रक्षण करणारा देव आहे (The Guard of Plateau) पण ह्याचे तोंड स्त्रीचे का ह्याचे इतिहासकारानाही कोडे पडले आहे काहींचे म्हणणे सौंदर्य व बुद्धिमतेचे प्रतीक म्हणून स्त्रीचे मुख आहे (चला, कोणी नाही तरी प्राचीन ईजिप्शियन लोकांनी तरी स्त्रीला बुद्धी असते हे कबूल केल्याबद्दल समस्त स्त्री-जातीतर्फे मी त्याचे आभार मानले) स्फिन्स ह्याचे धड सिंहाचे म्हणजे शक्तीचे प्रतीक असत डोक माणसाच म्हणजे बुद्धीचे प्रतीक असत अरबांनी ह्यास 'अबूल-हावल' असे नाव दिले आहे प्राचीन ग्रीक ह्यास स्फिन्क्स असे म्हणतात कारण हिचे त्यांच्या प्राचीन देवतेशी साम्य आढळते त्या देवतेचे धड सिंहीणीचे व छाती व चेहरा एका सुदर स्त्रीचा आहे ग्रीक पुराणात एक अशी दंतकथा आहे की ही देवता उच पर्वतांच्या खिंडीच्या तोंडाशी बस्तान ठोकून, येणाऱ्या जाणाऱ्यास प्रश्न विचारत असे की असा कोणता प्राणी आहे जो सकाळी चार पायांवर, दुपारी दोन पायावर व संध्याकाळी तीन पायांवर चालतो त्या व्यक्तीस उत्तर देता आल नाही तर ती तिला गट्टम करून टाकीत असे ऑडिपस तेथून थेब्सला जात असता स्फिन्क्सने त्यालाही हा प्रश्न विचारला ऑडीपसने बरोबर उत्तर दिले - तो प्राणी म्हणजे मनुष्य कारण मनुष्य लहानपणी हातापायावर रांगतो तरुणपणी दोन

पायावर उभा रहातो व म्हातारपणी काठीचा आधार घेतो त्याने अचूक उत्तर दिल्याने देवतेने रागाने डरकाळ्या फोडीत दगडावर डोक आपटून जीव दिला इजिप्शीयन स्फिन्क्स प्रश्न विचारीत नाहीत त्यांना ग्रीक स्फिन्स्कप्रमाणे पखही नाहीत व ती पवित्र तीर्थस्थानाचे रक्षणकर्ते असतात त्याच्या पायाशी नाग असतो ती Horus ह्या देवतेचे प्रतीक समजण्यात येई अलगीझा ह्या सर्वात मोठ्या पिरॅमिडजवळ सर्वात मोठा स्फिन्क्स आहे त्याला जवळ जवळ ४८००, वर्षे झाली त्याचे डोक व शरीर एका भरीव खडकातून खोदण्यात आल असून पजे व पाय दगडाचे आहेत त्याच्या शेपटीस असलेले नागाचे तोंड ह्या पुतळ्याचे दुरात्म्यापासून रक्षण करण्यासाठी आहे ह्याचे मस्तक नागाच्या फण्याने सुशोभित केले आहे १९८७ मध्ये ह्या स्फिन्क्सच्या डागडुजीसाठी कॉन्फरन्स भरविण्यात आली वादळ,पावसाने ह्याच्या मानेस तडा गेला आहे शिवाय त्याच्या ६५० पौंड (३०० किलो) वजनाच्या दोन मोठ्या स्लॅब्सुद्धा कोसळत आहेत हे ढासळलेले बुरुज पुढच्या ध्वसाचे सूचक आहेत अनेक तज्ञ ह्याचा पुढचा ध्वस टाळण्याचे प्रयत्न करीत आहेत येथे खुर्च्या ठेवून रात्री प्रकाश झोतामध्ये गूढ सगीताच्या पार्श्वभूमीवर पिरॅमिड्स व स्फिन्क्स बघण्याची व्यवस्था सरकारने केली आहे (Sound and Light)

पिरॅमिड्स पाहून थकून आम्ही पोटपूजेस लागलो कडकडून भूक लागली होती भोजनात रोट्या, बेसनाची चटणी, सॅलेड, भात, शीश कबाब, कलेजी, सत्री व अस्सल टर्कीश कॉफी असा खासा ईजिप्शियन बेत होता आमचा अतरात्मा तृप्त होऊन अन्नदात्यास मनापासून आशीर्वाद देऊन आम्ही सक्कारा येथे गेलो ही जुन्या राजाची स्मशानभूमि आहे येथेही तीन-चार पिरॅमिडस आहेत पण आम्ही एकच पिरॅमिडच्या आत गेलो (कारण परत १८० पायऱ्याची चढउतर) येथील ममीज म्युझियम मध्ये हलविण्यात आल्या आहेत पण ज्या दगडी पेट्या आहेत त्या मानवी शरीराच्या आकाराच्या खोदल्या आहेत भितींवर Fresco Painting केलेले आहे त्यावर निरनिराळे पक्षी, राजदण्ड, गाई बैल वगैरे प्राणी खोदलेले आहेत ह्या स्मशानभूमीतच ती इतिहास प्रसिद्ध दीडशे फूट खोल असलेली विहीर आहे प्राचीन काळी राजा मेला की त्याच्या मृत शरीराबरोबर मूल्यवान कपडे, दागदागिने, खाण्यापिण्याचे सामान एका लाकडी फळीवर बाधत व त्या राजाबरोबर त्याच्या राणीलाही बसवीत तिचे कपडेही ठेवीत व ती फळी ह्या विहीरीत सोडून देत सतीच्या चालीसारखाच हा प्रकार झाला, नाही का ?

सक्काऱ्याहून आम्ही मेम्फीसला निघालो वाटेत वीटाचे प्रचड कारखाने, शेती, मळे लागले मेम्फीस ही ईजिप्तची राजधानी होती आता तेथे काही भग्नावेषाखेरीज काही नाही दुसऱ्या रॅम्सेसचा आडवा ७० फूट लाबीचा प्रचण्ड पुतळा तेथे आहे तो पाहून मला तजावरयेथील श्रीरंगपट्टणच्या देवळातील शेषपायीविष्णूच्या पुतळ्याचीआणि बँकॉकमधील बुद्धाच्या आडव्या पुतळ्याची आठवण झाली राजाचे तीन मोठे भव्य

आहेत- एक येथे, दुसरा कैरो रेल्वे स्टेशनजवळ, तिसरा पॅरिसमध्ये आहे बाकी लहान लहान तर अनेक आहेत येथील प्रचण्ड अलाबास्टर दगडाचा स्फिन्क्स इ स १८५१ मध्ये सेरपॉम ह्या इतिहास सशोधकास सापडला गीझा पिरॅमिड्स सरळ आहेत तर सक्कारातील पिरॅमिड्समध्ये टप्पे टप्पे आहेत

रात्री ९ ॥ वाजता आम्ही येथील 'सहारा सिटी' नावाच्या एका प्रसिद्ध नाईट क्लबमध्ये गेलो क्लबचे नाव काढताच मला ओळखणारी समस्त पुणेरी व दिल्लीकर जनता नाक मुरडून म्हणेल, 'हेमा फारच वाह्यात झाली हो ! दारू सुद्धा पीत असेल नाही तरी आधी चहा ढोसतच होता' पण घाबरू नका नाईट क्लब म्हटले की आपल्याकडे फार वाईट दृष्टीने पाहिले जाते तो झगमगाट, ती उत्तानता कामुक कॅबरे डान्सर्सचे उन्मादक रूप, अश्लील हावभाव, मदिरा व मदिराक्षीच्या अमलाने धुदफुद झालेले विलासी लक्ष्मीधर असे वातावरण असते, जेथे चागल्या घरातील स्त्रिया जाऊ शकत नाहीत पण येथे तसे नाही येथे नाईट क्लब म्हणजे बायका पोरासह मजेने वेळ घालविण्याचे मनोरजनाचे स्थान म्हणूनच बघितले जाते हे नाईटक्लब सरकारी परवाने मिळवूनच चालतात एका रगीबेरगी तंबूत मद मंद दिवे लावले होते असख्य लोक सहकुटुम्ब सहपरिवार आले होते हिरवेगार भरजरी पोषाख केलेले परिचारक इकडून तिकडे लगबगीने वावरत होते लोक मजेने समोरील खाद्यपेयांचा सावकाश समाचार घेत 'शो' सुरु होण्याची वाट पहात होते खाद्य पदार्थांची टेबले नेहमीसारखी ठोकळेबाज लाकडी नसून जर्मन सिल्वरचे नक्षीदार, मोठे चकचकीत गोलाकार थाळे होते टेबलाच्या मध्यभागी स्टेज होते आणि एकदम दिवे मालविले गेले व दुसऱ्याच क्षणी दिवे लागल्यावर स्टेजवर एक नीलपरी थरकत असलेली दिसली तिच्या देहावर फक्त दोन जरतारी वस्त्रे होती पण कोणत्याही प्रकारची कामुकता अथवा उत्तानता तिच्या हावभावात दिसली नाही आपल्याकडे भरतनाट्यम कथ्थक नृत्याला जे स्थान आहे तेच ईजिप्तमध्ये बॅली नृत्याला आहे विशिष्ट तालासुरावर अवयवाच्या लयबद्ध मोहक हालचाली व स्नायूवरील विलक्षण ताबा ही ह्या नृत्याची वैशिष्ट्ये फारच प्रेक्षणीय वाटली लहान मुलाचेही कसरतीचे प्रयोग झाले एक पाच-सहा वर्षांची मुलगी स्वत भोवती जवळ जवळ पाऊण तास सगीताच्या तालावर फिरत होती तिचे ते गरगर फिरणे पाहून मलाच भोवळ आली शेवटी फिरताफिरता आपला स्कर्ट काढून फिरता छत्रीसारखा डोक्यावर घेतला त्यानतर दोन अफ्रीकन मुली व एक पुरुष ह्याचे नृत्य झाले त्याचे तर जमिनीवर पायच ठरत नव्हते व सर्व शरीर रबराचेच आहे की काय असे वाटत होते थोड्या वेळाने तो पुरुष सुमारे आठ इंच उंचीच्या पट्टीखालून तिला स्पर्शही न करता चालत गेला हा कार्यक्रम पहाटे जवळ जवळ चार वाजेपर्यंत चालतो पण आम्हाला दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता अलेक्झान्ड्रियाला जायचे असल्याने नाइलाजाने आम्ही बारा वाजता उठलो बाहेर

चागलाच गारठा होता टिपूर चादण्यात कैरो नगरी एखाद्या निद्रिस्त सुदरीप्रमाणे दिसत होती वाटेत परत पिरॅमिडचे दर्शन झाले सन्याशाप्रमाणे स्थितप्रज्ञ, गूढ, भव्य, अनाकलनीय हजारे वर्षे ईजिप्तच्या उत्कर्ष ह्रासाचे, हर्ष-खेदाचे साक्षीदार–।

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता आम्ही अलेक्झाड्रियाला निघालो आमच्या बरोबर श्री फरूख नावाचे एक पाकिस्तानी गृहस्थ आणि डॉ सोळखी व त्याच्या पत्नी इतके लोक होते परदेशात आपण राजकीय भेदभाव पार विसरून जातो देश दोन असले तरी आपली सस्कृती एक आहे हीच जाणीव फक्त रहाते इतकेच नाही तर दुबईमध्ये किती तरी उच्चभ्रू पाकिस्तानीं स्वतःला भारतीय म्हणवून घेत असल्याचे आम्ही पाहिले आहे असो। अलेक्झाड्रियाला जाताना वाटेत वीटाच्या मोठाल्या भट्ट्या, कापसाची अर्धवट फुटलेल्या भरगच्च पांढऱ्याशुभ्र बोंडानी बहरलेली, सरसोच्या पिवळ्या धमक फुलानी घमघमलेली सरसोची शेते लागली इजिप्त कापसाची फार मोठ्या प्रमाणावर निर्यात करतो मॉनिफेह येथे कापसाच्या मोठाल्या गिरण्या आहेत वाटेत एक गोष्ट मला फार खटकली शेतामध्ये स्त्रिया काम करीत होत्या जवळील विहीरींवर काही तरूण मुली पाणीही भरीत होत्या। आमचे फारूख भाई ह्या 'गाव की सुदर गोरी' बघून पाघळले व त्याना इशारे करू लागल। अरब देशात चोरी, बायकाची छेडछाड वगैरेसबधी कायदे किती कडक आहेत, हे माहित असता परक्या देशात ते असला मूर्खपणा करीत होते आमचं नशिब बलवत्तर म्हणून कोणाच्या लक्षात ही गोष्ट आली नाही, नाहीतर ओल्याबरोबर सुकेही जळते ह्या न्यायाने आमचा त्याचा बादरायणही सबध नसता त्याच्या उपद्व्यापांची झळ आम्हालाही लागली असती शिवाय आपण परदेशात केवळ प्रवासी म्हणूनच जात नसतो तर आपल्या देशाचे आपल्या सस्कृतीचे प्रतिनिधित्व ही करीत असतो हे प्रत्येक टुरिस्टने लक्षात ठेवले पाहिजे आपल्या देशाची मान खाली जाईल असे वर्तन कधीही करू नये

मॉनिफेहला उतरून आम्ही एका रेस्टॉरन्टमध्ये चहा घेतला आम्हाला पाहिल्याबरोबर तेथील एका म्युझिक-रूम मध्ये रेकॉर्ड वाजू लागली

'मेरे मन की गगा और तेरे मन की जमुना का,

बोल राधा बोल सगम होगा की नहीं।'

हिन्दी गाणे ऐकून आम्हाला खूप गमत वाटली हिंदी गाणी व हिंदी चित्रपट मध्यपूर्व आशियात खूप लोकप्रिय आहेत दमास्कसमध्ये किती तरी लोक मोडक्या तोडक्या इग्लीशमध्ये विचारीत 'कोठून आलात?' 'इदीया'? 'इदीया-शम्मी कपूर?' 'अयाय्या-सुक्कू सुक्कू?' रोममध्ये एका हॉटेलमध्ये आमची स्पॅगेटी काट्याला गुडाळून तोंडात सोडण्याची कसरत चालू असता एका लेबनीज वेटरने सागितले, 'तुमच्याकडे' किती देखणे नट-नट्या आहेत! साधना, धर्मेन्द्र, देव आनद, —। मग तो

लाजत लाजत म्हणाला 'सर्वजण म्हणतात की मी देवआनंदसारखा दिसतो' सुंदर रोमसारख्या शहरात एक देखणा लेबनीज स्वतःला देवआनदसारखा दिसण्यात किती धन्यता मानतो हे पाहून मला त्या सदाबहार कलाकाराचा हेवा वाटला

जवळ जवळ १२ ॥ वाजता आम्ही अलेक्झांड्रियाला पोहोचलो अलेक्झांड्रिया भू-मध्य समुद्राच्या काठी सिकंदरने वसविलेले एक शात व टुमदार शहर आहे येथील घरे, इमारती, लोक, रस्ते एकूण सर्व वातावरणावर ग्रीक व रोमन सस्कृतीचा पगडा दिसतो प्रथम आम्ही मोन्टाझा पॅलेस पहाण्यास गेलो हा राजा फरूखचा राजवाडा आहे पण तो आतून पहाण्याची परवानगी नसल्यामुळे आमची घोर निराशा झाली, मात्र तेथील उद्यानातून भू-मध्य समुद्राचे निळेशार सौंदर्य पोटभर पाहून घेतले लहानपणापासून सागराचे मला विलक्षण आकर्षण आहे तो मला माझा एक अभिन्न मित्र वाटतो मानवी मैत्री धोका देते पण हा कधीही धोका देणार नाही असा मला त्याच्याबद्दल विश्वास वाटतो सागराच्या गभीरतेने मी अंतर्मुख होते कधी बेलगाम महाभूताच्या प्रचड तांडवात, कोसळणाऱ्या आभाळाखाली उसळणारा हा अवखळ सागर पाहिला की मला भयानक उत्पातात निर्माण होणाऱ्या व्यामोहामुळे भिरभिरणारं माझं स्वतःचच जीवन दर्शन घडते, आणि असा हा प्रशात महासागर पहिला की सारे अपराध पोटात घेणाऱ्या वत्सल पित्याच्या आठवणीने उर भरून येतो

मोन्टाझा पॅलेसवरून आम्ही पॉम्पी पीलर बघण्यास गेलो २६ मीटर उच व २६० टन वजनाचा हा प्रचंड पीलर रोमन सिनेटर पॉम्पी ह्याने पहिल्या शतकात आपल्या विजयाची निशाणी म्हणून उभारला चितोडचा विजय स्तम्भही असाच आहे पॉम्पी पीलरचे दगड आस्वानहून आणवले गेले हा पीलर तीन प्रचड ग्रेनाइट खडकानी बनविला गेला आहे वरच्या बाजूस पिर्डेस्टल आहे येथे सेरापियम मदिराचे भग्नावशेष आढळतात शिवाय तीन प्रचण्ड 'स्फिन्क्स येथेही आहेत

येथून बदराजवळील काटाकोम्ब ह्या ठिकाणी गेलो येथे 'कोम-एल-शुकाफा' राजाच्या सबध घराण्याची थडगी आहेत एक प्रचड खडक १०० फूट खाली खोदून त्यात ममीज ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. आतील भिंतींवर फुले निरनिराळे पशु-प्राणी, प्राचीन देव-देवता खोदलेल्या आहेत फुलाचे हार तर अगदी खरे खुरे वाटतात ह्या खडकांच्या वर ८५ मीटर उच एक टॉवर असून त्यावर दगडाचे एक प्रचण्ड घड्याळ आहे प्राचीन शिल्पकलेचे कौतुक करावे तितके थोडेच 'अबु-एल-अब्बास-एल-मोर्सी' चा मॉस्क शहराच्या मुस्लिम अवशेषापैकी एक आहे आपल्याकडील दिल्लीच्या जुम्मा मशीदीसारखीच किंवा कलकत्त्याच्या ना खुदा मशिदीसारखीच भव्यता हिच्यातही आहे पण येथील सर्व मशिदीच काय मध्यपूर्वेतीलच सर्व मशीदींचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वांना एकच मिनार असतो आपल्या

कंडील मशीदींना चार चार मिनार असतात

आता आम्ही परतीची तयारी सुरु केली जेव्हा केव्हा मी अशी ऐतिहासिक स्थळे पहाते, तेव्हा तेव्हा माझा मनोरथ वेगाने भूतकाळाकडे धाव घेतो बनारसला रस्त्यावरून चालताना, अरे ह्याच भूमीवरून राजा हरिश्चन्द्र, गोस्वामी तुलसीदास, कबीर भारतेन्दु हरिश्चन्द्र चालले असतील ह्या कल्पनेने त्यांच्या पावन पदस्पर्शाने पुनीत झालेली माती मी मोठ्या श्रद्धेने उचलते हळदीघाटीचे विलोभनीय सौंदर्य पहाताना मला एकदम आपापल्या सैन्यासह हत्तीवरून येत असलेला जहांगीर आणि आपल्या आवडत्या चेतकराजवर स्वार झालेला महाराणा प्रताप दिसू लागतो त्या वीरपुगवाला आपल्यामध्ये सामावून घेणारी हळदी घाटीची अक्षरश: पीतवर्णीय असलेली माती मी श्रद्धापूर्वक बाटलीत भरून घेते आताही अलेक्झांड्रियाच्या रस्त्यावरून चालताना मला सारखे वाटत होते अरे, ह्याच रस्त्यावरून सर्व जगाला नमविणारा जगज्जेता सिकदर दमदार पावले गेला असेल

सौ सोळंखीने मला दिवास्वप्नातून गदागदा हलवून जागे केले.वाटेमध्ये आम्हाली नाईल नदीचे मुख पहाण्यास मिळाले.अलेक्झांड्रियालाच नाईल नदी भू-मध्य समुद्रामध्ये विलीन होते तेव्हा तिचे स्वरूप फारच विराट व भव्य दिसते एरवी नाईल नदीचे पात्र गंगा ब्रह्मपुत्रेच्या मानाने फारच लहान आहे. परतीच्या वेळी आमच्या गाईडने गाडी दुसऱ्या मार्गाने आणली जाताना आम्ही निसर्ग सौंदर्याने नटलेल्या नाईलच्या खोऱ्यातून गेलो होतो आता परत येताना अगदी रखरखीत, ओसाड, वैराण वाळवंटातून चाललो होतो वाटेत एखादा तुरळक उंट दिसत होता आमचा गाइड अब्दुल फारच बोलका व मनमोकळा होता मधून मधून तो इजिप्शियन लोकांच्या चालीरीतींची माहिती देत होता इजिप्तमध्ये स्त्रियांचा खूप सन्मान केला जातो.त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य आहे येथे Dignity of Labour आहे हॉटेल्समध्ये वेट्रेस पर्यटकांसाठी गाइड, सेल्समन अशी सर्व प्रकारची कामे स्त्रिया करतात एकत्र कुटुम्ब पद्धती येथे अजूनही आहे माझ्या घरात माझी पत्नी नोकरी करीत असली तरी कुटुम्ब प्रमुख माझी आईच आहे व तिचा निर्णय अंतिम मानला जातो बहुपत्नीत्वाची चाल आता कमी झाली आहे मागासलेल्या लोकात अजून ही आहे हुंडा (मेहेर) मुलीच्या पित्यास मुलाकडून मिळतो संतति-नियमनाचा हल्ली जोरात प्रचार चालला आहे। कैरोमध्ये आपल्यासारख्या फॅमिली प्लॅनिंगच्या जाहिराती लावलेल्या आम्ही पाहिल्या होत्या बोलता बोलता त्याने अरब-ईस्त्राइल-पॅलेस्टाइन राजकारणाची ही थोडीशी मीमांसा केली तो म्हणाला "ह्या सर्व राजकारणात इजिप्तला खूप सहन करावे लागले आहे हे ब्रिटीश लोक महाधूर्त असतात नाही? जाता जाता ते काही तरी कळ लावून फूट पाडून जातात; तुमच्या येथे हेच झाले ना?" आम्ही व श्री फारूख एकमेकांकडे बघून हळूच हसलो त्या हास्यातच मूक संमति होती

साडे आठ वाजता आम्ही कैरोला पोहोचलो गरम पाण्याने हमाम घेऊन (अरब देशात आल्यापासून हमाम, गुसल, लाजिम, माफीश, मरहबा, इन्शाल्ला, अल्ला करीम वगैरे शब्द सहज तोंडात बसून जातात 'हमाम' वगैरे शब्द वापरल्याने मला तर राणी हॅटशेप शिवा 'किंवा क्लिओपाट्रा' झाल्यासारखे वाटते बाई) स्वतःला निद्रादेवीच्या कुशीत लोटून दिले कारण दुसऱ्या दिवशी सकाळी सहाच्या फ्लाइटने आम्हाला लक्झरला जायचे होते

पहाटे तीन वाजता रिसेप्शनिस्टला आम्हाला उठवायला सागून ठेवले होते पण आम्हालाच त्याला फोन करून उठवून चहा पाठविण्यास सागावे लागले नळाला गरम पाणी येत नव्हते चहा घेऊन आलेल्या परीचारकास मी मोडक्या तोडक्या अरबीत सागितले

'आरीद माई' (मला पाणी पाहिजे आहे)

त्याने लगेच तुरूतुरू जाऊन नळ खोलून दाखविला परत मी हातवारे करीत (कारण बोली भाषेचे दारिद्र्य ही आदी भाषा नेहमीच झाकून टाकते) सागितले,

'ला ला ! माई साखन लैजेल गुसल ! (नाही, आघोळी साठी गरम पाणी हवे आहे) तेव्हा कुठे त्याची ट्यूब पेटून त्याने खालून दोन भाडी गरम पाणी आणून दिले मी त्यास 'शुकरन' (Thank you) म्हटले हे माझी अरबी भाषेशी चाललेली झुज मजेत पहात होते

बरोबर पाच वाजता डेल्टा-टूर ची गाडी हॉटेलच्या दाराशी हजर झाली पच पच प्रांतःकाळी कैरोच्या रस्त्यावरून जाताना मोठी मजा वाटत होती विमानतळावर गाडी उभी करताना आमच्या ड्रायव्हरने एका टॅक्सीला धडक दिली लगेच त्या टॅक्सीचा मालक व इतर टॅक्सी-ड्रायव्हर्सअस्तान्या सरसावून धावून आले व वय पक्षाधिक शतम् च्या जोशात आमच्या ड्रायव्हरवर, टुरिस्ट-व्यवस्थापकावर तुटून पडले (एरवी ते आपापसात कितीही गुत्थमगुत्थी करीत असोत) बराच वेळ अरबी भाषेत कडकड झाल्यावर व्यवस्थापकाने त्याची 'माफीश' मागून नुकसान भरपाई देण्याचे कबूल केले व आम्ही विमानतळाकडे वळलो पांच वाजता सुद्धा चागलीच वर्दळ होती MU३२१ ने आम्ही लक्झरला पोहोचलो तेथून फेरी बोटने नाईल नदी ओलाडून आम्ही 'दर-एल-बहारी' व 'मादीनेत थेब्स' ह्या राजघराण्याच्या भूमीवर पदार्पण केले (The Valley of the kings) आमच्याबरोबर गाइड म्हणून 'नगवा' नावाची एक मुलगी देण्यात आली होती नगवा म्हणजे मधुर आवाज नावाप्रमाणेच तिचा आवाज अतिशय मधुर होता येथे बऱ्याच मुली गाइडचा धदा करतात The Valley of the kings ला अजठा -एलोरा प्रमाणेच एकूण २३ गुहा आहेत येथे तुत्खामेन राजाचे धडगे आहे बाकी सर्व ममीज् म्युझियममध्येहलविण्यात आल्या असल्या तरी ही एकच ममी येथे अजून

चिरनिद्रा घेत आहे भिंतींवर अगदी उच घुमटावरही पेंटिंग केले असून ते अगदी उत्तम अवस्थेत आहे कालपुरूषाची उणीपुरी चागली ५००० वर्षे सुद्धा त्याच्यावर आपला ओरखडा सुद्धा उमटवू शकली नाहीत की त्याचे रग फिके करू शकली नाहीत ह्या भिंतीवर सूर्य, चद्र, गाय, माजर निरनिराळे पक्षी प्राचीन इजिप्शियन देवता लाल, हिरव्या, पिवळ्या, निळ्या रंगात चित्रित केल्या आहेत सर्प देवतेस पथप्रदर्शक मानले जात असल्याने तिचे चित्रण तर सर्वत्र प्रामुख्याने दिसून येते अजुनही इजिप्तमधील सर्प पंथीय लोक महासर्पाची पूजा करतात युद्धाच्या दृष्टीनेही ह्या गुहाचा उपयोग केला जात असे शत्रूला फसविण्यासाठी मध्येच खड्डे केले असून त्यात सैनिक लपून बसत भूल भुलैया सारखे रस्तेही आहेत पुढे रोमन सैनिकानी ह्या गुहा जाळण्याचा प्रयत्न केला त्यामुळे काही भिंती व छत काळे पडले

येथून आम्ही 'दर-एल-बहारी' ला गेलो येथे मोठमोठ्या खांबांचे भग्नावशेष आहेत जगातील पहिली राणी हॅटशेपसूट हिचा भव्य पुतळा येथे आहे ह्या येथील तिच्या इतर पुतळ्यामध्ये तिला दाढी लावलेली आहे मुळातच कणखर असलेली ही राणी पुरुषासारखी खोटी दाढी लावून राज्य करीत असे दुसऱ्या रम्सीसचा १००० टन वजनाचा एक भव्य पुतळा येथे आहे ब्रिटीशाच्या इतिहासात चार्लस्, रीटर्ड व जॉर्ज सारखे धुमाकूळ घालीत असतात त्याप्रमाणेच हे रम्सेस राजे इजिप्तमध्ये सचार करीत असतात त्यातल्या त्यात हा दुसरा राम्सेस तर 'जेथे जातो तेथे तू माझा सागाती' ह्या पक्तिप्रमाणे सपूर्ण इजिप्तभर आपल्याला पाठपुरावा करून छान कपनी देतो येथून आम्ही लक्झर टेंपल पहाण्यास गेलो हि मदिर आमेनोफीस ने इ.स पू १४१७-१३७९ ह्या काळात बाधून 'आमेन-रा'च्या 'थेबन' परपरेला दिले ह्यात दुसऱ्या रम्सेसने खूप सुधारणा करून ह्याचा विस्तार वाढविला

दुपारी जेवण झाल्यावर व्हिक्टोरिया करून आम्ही लक्झर मंदिरापासून दीड-दोन मैलावर असलेले करनाक मदिर पहाण्यास गेलो करनाक हे नाव इराण मधील 'कबरनाक' नावाच्या मदिरावरून पडले ओरिसातील 'कोणार्क' मदिराप्रमाणेच हे सूर्यमदिर आहे रामेश्वर किंवा श्रीरगम् मदिराप्रमाणेच ह्याचाही विस्तार खूप मोठा आहे ह्याच्या आवारात मोठाली खेडेगाव वसविलेली असून यास सातव्या शतकातील मुस्लिम साधु अबु-अल-हाजीजी ह्याचे नाव पडले ह्याचे थडगे दुसऱ्या रम्सेसने बाधले असून ते मदिराच्या आवारात मूळ जमिनीच्या ५० फूट उंचीवर आहे ह्या मदिरात मोठमोठाले १३४ खांब १६ रागामध्ये प्रेक्षकास खडी तालीम देतात मधले कॉलम्स २७ मीटर उच असून बाजूचे १५ मीटर उच आहेत त्याच्या मधोमध दोन मोठे विजय स्तम्भ आहेत (चितोडगडच्या विजय स्तभाप्रमाणे) हे एका सलग दगडाचे असून ह्याची उची १०० फूट व वजन ३०० मण आहे आस्वानहून आणलेल्या ग्रॅनाईट दगडानी हे बनविले आहेत

दुसऱ्या रम्मेसचे दोन अवाढव्य पुतळे येथेही आहेत हे देऊळ एका पिढीत झाले नसून अनेक राजानी बाधले आहे मारगिरगिस ह्या देवतेची खूप चित्रे येथे रगविलेली आहेत हा अमन-रा (सूर्यदेवता) चाच अवतार आहे सैय्यद-एल-बेदावी हा ओसिरीसचा अवतार होय व त्याचा उत्सव येथे वर्षातून दोनदा साजरा होतो ह्यास सर्व जगाच्या उत्पत्तीचे प्रतीक मानतात स्तंभावर स्त्रिया मृत शरीरास कवटाळून आक्रोश करीत आहेत स्त्रिया सतान प्राप्तिसाठी प्राचीन देवतास प्रदक्षिणा घालीत आहेत व इच्छित फल प्राप्त झाल्यावर आनदाने कृतज्ञता व्यक्त करीत आहेत अशा तऱ्हेची अनेक चित्रे येथे रगविलेली आहेत आपल्याला अजठा-वेरूळचे नवल वाटते पण येथे तीन-चार हजार वर्षापूर्वीचे पेंटींग अजून जसेच्या तसे आहे रग जराही विटले नाहीत खरच येथे एकदा पौर्णिमेच्या रात्री यावयास पाहिजे चंदेरी चद्रिकेच्या प्रकाशात ही रगीबेरगी चित्रे किती विलोभनीय दिसत असतील! येथील अरब शिल्प तर काही ठिकाणी गॉथिक शिल्पावर ही मात करते असो मी काही चित्रकला-शिल्पशास्त्राची तज्ज्ञ नाही पण सौंदर्याची उपासक मात्र आहे आणि प्रत्येक सवेदनशील मनुष्यास वस्तुगतातील व्यक्ताव्यक्त सौंदर्य वेचण्याचे उपजत ज्ञान असते सौंदर्य हा प्रचड सर्वस्पर्शी शब्द आहे भरपूर मेहनत करून घामाचा वर्षाव करीत दुपारच्या भाजणाऱ्या उन्हात विश्राति घेणारा गरीब श्रमिकसुद्धा सौंदर्याने चमकत असतो व त्याला मायकेल एंजेलोसारखे चित्रकार 'सिएस्टा' ह्या अजरामर कृतीत उतरवितात निष्पाप बाल्य किवा अवखळ, मादक तारूण्य म्हणजेच सौंदर्य नव्हे एखादा रविंद्रनाथ, एखादा वॉल्ट व्हटमन खरोखरीच वृद्ध झाले म्हणजे त्याच्या सौंदर्याला हिशोबच नसतो, तुलनाच नसते मोजमाप नसते

The Valley of the Kings चा निरोप घेऊन आम्ही कैरोस परतलो मला आस्वान येथील अबु-सिंबल हे मदिर बघण्याची खूप इच्छा होती आस्वान धरणाच्या पाण्याखाली ही देवळे बुडून नाश पावण्याची वेळ आली असता UNO तर्फे ही जशीच्या तशी उचलून सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आली आपल्याकडे सुद्धा नर्मदासागर व सरदार सरोवर ह्या नर्मदेवरील बहुचर्चित प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी नर्मदा तटावरील अदभुत आदिम शिल्प-म्हणजे साठ फूट लाबीचे व ७-८ फूट परिघाचे पचकोनी खाब, नदीच्या पात्रातील शिळेची प्रचंड दगडी भांडी, पाटे, वरवटे पुरातन मातीचे महाल वगैरे धरण पूर्ण होण्यापूर्वी दूर सुरक्षित ठिकाणी हलविता येणार नाही का ? सस्कृतीचे हे जुने शिल्प वाचले पाहिजे असो आस्वान येथे दुसऱ्या महायुद्धात मृत्युमुखी पडलेल्या बऱ्याच सैनिकांची थडगी येथे आहेत पण वेळेअभावी तेथे जाता आले नाही त्याच प्रमाणे जगप्रसिद्ध सुवेझ कालवाही पहायचा होता सुवेझ कालवा हा भू मध्य समुद्र व ताबडा समुद्र ह्याना जोडतो हा कालवा लेसोस नावाच्या एका फ्रेंच इजिनियरने बाधला असून स्थापत्यशास्त्राचे हे एक आश्चर्य आहे दोन्ही टोकाची पातळी समान नसल्यामुळे

कालव्यात वॉटर लॉक्स निर्माण करून बोट वर खाली उचलून एका टोकापासून दुसऱ्या टोकास जाते ह्यामुळे युरोपला जाण्याचा मार्ग जवळ जवळ निम्म्याने कमी झाला आहे पूर्वी अफ्रिकेला वळसा घालून जावे लागे

दुसऱ्या दिवशी सकाळी लाबच्या ठिकाणी जायचे नसल्याने आम्ही अगदी आरामात उठून तयार झालो व ५०० फूट उंचीच्या कैरो टॉवरवर गेलो तेथे गेल्यावर कोणाच्याही तोंडून उत्स्फूर्त उद्गार निघतील,OH Cairo!

सहाशे फूट उचीवरून सर्वत्र कैरो नगरी अतिशय बारीक, नाजूक, भरगच्च कलाकुसरीचे डिझाईन असलेल्या मखमली गालीच्याप्रमाणे आपल्यासमोर उलगडलेली दिसते ते प्रेसिडेंट हाऊस,ते टी.व्ही सेंटर,हिल्टन हॉटेल,U.A.R ची ती भव्य इमारत नाइट क्लब्ज, हिरवीगार मैदाने नाइल नदीवरील असख्य कालव्याचे जाळे, आखीव रेखीव रस्ते, पूल, त्यावरील खेळण्याप्रमाणे तुरुतुरु धावणाऱ्या बसेस, मोटारी आणि ह्या सर्व खेळाकडे स्थितप्रज्ञाप्रमाणे पहाणारे ते पिरॅमिड्स !

तेथील फिरत्या रेस्टॉरन्टमध्ये आम्ही जेवण घेतले व पायीपायीच बाजारात हिंडलो येथे कातड्याच्या वस्तु फार छान मिळतात बाजार अगदी खच्चून भरलेला दिसला उपहारगृहे तर खाण्यापिण्याच्या वस्तूनी व माणसानी दुथडी भरून वहात असतात खाण्यापिण्याची येथे रेलचेल असल्यामुळे लोक एकदरीत आनंदी उत्साही, धष्टपुष्ट व कलाप्रिय आहेत इग्लीशपेक्षा येथे फ्रेंच, स्पॅनिश व इटालियन भाषांचा सर्रास वापर करण्यात येतो इकडील अरेबियन भाषेला लखनवी हिन्दीप्रमाणे माधुर्य आणि शान आहे प्रेसिडेंट अन्वर सादतच्या भाषणाने ह्याची प्रचीतिही आली येथील पुरुष सुट बूट (कोणी डोक्याला फर कॅप) व बायका फ्रॉक, बॉबकट व उच टाचांचे बूट घालतात सिगारेट्स सर्रास ओढतात येथे पाश्चात्य सस्कृतीचा पगडा असला तरी लोकाचे मन इजिप्शियन आहे जुन्या बायका फ्रॉकवरून झिरझिरीत बुरखा घेतात किंवा डोक्याला रुमाल बाधतात

सध्याकाळी सातच्या फ्लाइटने ह्या रम्य नगरीस अलविदा (वखान्नक) करून आम्ही दमास्कस (सीरिया)ला निघालो विमानाच्या छोट्याशा खिडकीतून कैरो नगरीचे दिवे हिऱ्या-रत्नाप्रमाणे झगमगत होते ती अनेक वशाच्या उत्कर्ष व ऱ्हासाची अनेक आक्रमकाच्या आवक-जावकाची अनेक धर्मांच्या सघर्षाची साक्षीदार नील नदी

फॅरोहाची पवित्र भूमि पुढे पुढे अधार ।

* * * *

# सदाफुलीचा देश

प्रभु सृष्टीचा रंगारी,

तऱ्हे तऱ्हेचे रंग भरी।

खरोखर ईश्वराच्या सृष्टीत किती विविधता, किती रंग। निसर्गातही आणि निसर्गाच्या लाडक्या पुत्रात-मानवातही रुक्ष रखरखीत, वालुकामय देशातून-खजूराच्या देशातून आता आम्ही हिरव्यागार पाचूच्या देशात, नारळी पोफळी, अननस पपनसाच्या देशात जाणार होतो उंच, धिप्पाड काहीशा क्रूर आणि उग्र वाटणाऱ्या अरबांच्या देशातून, ठेंगण्या ठुसक्या गोंडस, प्राजक्ताच्या फुलासारख्या नाजुक, कोमल, बकुळ फुलासारख्या दळदार, सुगंधी, सदाफुलीसारख्या प्रसन्न स्मितहास्याने डवरलेल्या लोकांच्या देशात जाणार होतो मध्यपूर्वेकडून दक्षिण पूर्वेकडे येईपर्यंत निसर्ग, मानव, त्यांचा धर्म, वंश सर्वच किती बदलले होय, आता आमचा मोर्चा वळला बँकाक -हाँगकाँग -सिंगापूरकडे

अशा प्रवासासाठी जरा चौकसपणा दाखविला तर हजारो रुपये वाचू शकतात उदा दिल्लीहून बँकॉक - हाँगकाँग - सिंगापूरचे तिकीट सुमारे ७३०० रुपये आहे पण मुंबईहून सुमारे ८६०० रुपये पडतात बँकॉक - हाँगकाँग - सिंगापूर हा प्रवास बँकाक -सिंगापूर -हाँगकाँगपेक्षा अधिक स्वस्त पडतो प्रत्येक विमान कंपनीचे तिकीट निराळे असू शकते कारण त्यांचे मार्ग निराळे असू शकतात ट्रॅव्हल एजंट्स विमान कंपन्यापेक्षा कमी दरात तिकीट देऊ शकतात त्यांना मिळणाऱ्या कमिशनमध्ये कपात करून ते तिकीट देतात पण पैसे रोख घेतात चेक किंवा ड्राफ्टने घेत नाहीत हे फार धोक्याचे असते अशा तिकीटातून बऱ्याच वेळा कन्फर्मड् बुकींग नसते किंवा चेंज ऑफ फ्लाईट असते त्यामुळे वेळेचा अपव्यय होऊन अनेक अडचणी येतात थायलण्डचा व्हिसा आम्ही दिल्लीला थाई एम्बसीत घेतला हा व्हिसा प्रत्येकी ८० रुपये भरून मिळतो सर्व तयारी करून बरोबर तहानलाडू भूकलाडू घेऊन आम्ही सिद्ध झालो

आमची फ्लाईट रात्री दोनची होती पण आम्ही नऊ वाजताच जाऊन विमानतळावर मुक्काम ठोकला सर्व सव्यापसव्य होऊन आम्ही इमिग्रेशनमध्ये आलो नेहमीप्रमाणे आमची फ्लाईट लेट झालीच आजूबाजूला बरेचसे थाई प्रवासी होते काही थायलंडलाच स्थायिक झालेले, पिढ्यान पिढ्या तेथे राहिलेले भारतीयही होते त्यातीलच एका पंजाबी बाईने थायलंडची बरीच माहिती दिली ती मोडक तोडक हिन्दी पण अस्खलित थाई भाषा बोलत होती त्या सर्वांच्या 'इंग-इंग' 'वांग-वांग' करीत थाई भाषेत गप्पा रंगल्या

होत्या मी आपली त्या सर्वांकडे बावळटासारखी टकमक बघत राहिले. कारण इंग्रजी सोडून इतर कोणतीही परकीय भाषा बोलणारा मनुष्य मला ग्रेट वाटतो.

रात्री दोनला सुटणारे आमचे विमान आता ह्यापेक्षा दिरगाई करणे शक्य न झाल्याने अगदी नाइलाज झाल्यासारखे सकाळी साडेसहाला सुटले. तरी बरं हे एअर-फ्रान्सचे विमान होते. दिल्ली-बँकॉक प्रवास साडेचार तासांचा आहे. बँकॉकला पोहोचल्यावर आम्हाला घड्याळ दोन तास पुढे करावे लागले. येथील डॉन माँग (don mong) हा विमानतळ जगप्रसिद्ध असूनसुद्धा आधुनिक सुखसोईने युक्त नाही. विमानातून सरळ एअर टर्मिनलला जाण्यासाठी एअरो ब्रीज नाहीत. बसने जावे लागते. विमानतळही काही विशेष प्रेक्षणीय नाही. त्यामानाने आपला नवा इंदिरागांधी इंटरनॅशनल एअरपोर्ट फारच सुंदर झाला आहे. विमानतळापासून शहर सुमारे ३० किलोमीटर दूर आहे. टॅक्सीने १०० ते ३०० बाथ लागतात. बाथ हे थाई नाणं आपल्या ६० पैसे किंमतीचे आहे. विमानतळाहून बसेस मिळतात. त्या चार बाथ घेतात. बसस्टॉपवरील एका माणसाने गावात जाणाऱ्या बसचा नंबर सांगितला. आम्ही पटकन् त्या बसमध्ये चढलो. बस ड्रायव्हर व कंडक्टर दोघी महिला होत्या. कंडक्टर जवळ एक लांबलचक पत्र्याचे नळकांडे होते. त्यात सुट्टे पैसे व तिकीटे ठेवण्याची सोय होती. प्रत्येकाजवळ जाऊन ती ते नळकांडे खुळखुळवी. आपल्यासारखा 'टकटक' करणारा तुटक चिमटा नव्हता) व तिकीटे देई. बस एखाद्या स्टॉपवर थांबवून सुरु करते वेळी ती 'हाइ' असे काहीतरी सुरेल आवाजात ओरडत असे. तिचा हा सिग्नल मिळताच बस सुरु होई. प्रत्येक क्षेत्राची आपली एक अलग दुनिया असते नाही ? उद्या बस कंडक्टर्स व ड्रायव्हर्स ह्यांची जागतिक परिषद भरली तर त्यांनासुद्धा किती तरी गोष्टींची देवाण घेवाण करता येईल. आपल्याकडे दक्षिण भारतात मद्रास, महाबलीपुरमकडे कंडक्टरानी 'राइट' असा सांकेतिक शब्द ठेवला आहे तर गोव्याकडे त्यांच्या सरळ स्वभावानुसार ते बाळबोधपणे 'राब रे'(थांब) 'वच रे' करीत असतात. काही ठिकाणी बसस्टॉपला स्वतःच गमतीशीर नाव ठेवतात तर काही ठिकाणी तोंडात बोटं घालून मस्त झकास शिट्टी वाजवतात. आपल्या परिषदेत ह्या संकेताची व इतर अनेक गोष्टींची ते देवाण घेवाण करतील. मला वाटत, साहित्य सम्मेलनापेक्षाही ही सम्मेलनं अधिक खेळीमेळीची होतील. असो. मोठ्या रुबाबात आम्ही बसने निघालो खरे, पण कोणत्या स्टॉपवर उतरावयाचे ते आम्हाला सांगता येईना. इंग्रजी, बसमधील थाई लोकांना कळेना. शेवटी आम्ही बाजारात उतरून गेलो. सुदैवाने आमच्याकडे आम्हाला ज्या हॉटेलमध्ये जायचे होते त्याचे दिल्लीत नाव व फोन नंबर घेऊन ठेवला होता. एका थाई दुकानदाराला तो नंबर दाखवून आम्ही हॉटेलशी संपर्क साधला व मॅनेजरला आम्ही कसे यायचे ते थाई भाषेत दुकानदाराला समजावून सांगण्याची विनती केली. त्याप्रमाणे हॉटेल मॅनेजरकडून त्या दुकानदाराला थाई भाषेत निरोप मिळाल्याने त्याने आम्हाला

कागदावर पत्ता लिहून दिला व रिमझिम पावसात तो पत्ता टॅक्सी ड्रायव्हरला दाखवून आम्ही एकदाचे त्या राज्यसभामित्र हॉटेलमध्ये येऊन थडकलो आपल्याला कोठेही जायचे असेल तर तो पत्ता थाई भाषेत लिहून घेणे आवश्यक आहे त्यामुळे वेळ व त्रास वाचेल

आम्ही हॉटेलमध्ये पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते गरमागरम चहा व हल्कासा नाश्ता घेऊन आम्ही ताणून दिली, कारण गेली रात्रभर जागरण व आता इतकी वणवण झाली होती की डोळे उघडे ठेवण्याचे सुद्धा त्राण राहिले नव्हते सध्याकाळी सात वाजता उठून आघोळ पाघोळ करून आम्ही ताजेतवाने होऊन खाली लाउजमध्ये आलो लाउजमध्ये मखमली गालीचे, मखमली सोफे, सॅटीनचे पडदे, हड्या, लखलखती झुबरे, भव्य तैलचित्रे ताज्या टवटवीत पुष्पगुच्छानी लहडलेले मोठमोठाले ब्राझचे फ्लॉवर पॉट्स, सोनेरी नक्षीदार चौकटीतील पुरुषभर उचीचे आरसे सर्व मोठा वैभवशाली थाट होता रिसेप्शनिस्टने गोड हसून अगदी आपल्यासारखे हात जोडून 'नमस्ते' म्हटले थाई लोक आपल्यासारखेच हात जोडून अभिवादन करतात 'नमस्ते' मात्र आम्ही हिन्दी म्हणून जो तो भेटल्यावर म्हणे (थाई भाषेत 'वदे' किंवा 'सवादी' म्हणतात) थोडा वेळ तेथे बसून आम्ही टि व्ही पाहिला ह्यानी दुसऱ्या दिवशीच्या टूर्स ठरविल्यानतर आम्ही हॉटेलच्या उपहारगृहाकडे गेलो तेथील रिसेप्शनिस्टशी पुढे माझी चांगली दोस्ती झाली अत्यत मधुर व थडगार पाईनॅपल ज्यूस घेऊन नतर भरपूर नारळाचा रस व चिंच घातलेले झणझणीत कोळबीचे कालवण आणि गरमागरम भात खाऊन माझा चान्द्रसेनीय कायस्थ आत्मा तृप्त झाला हो, लग्न ब्राह्मणाशी झाले तरी पिंड पडला सी.के.पी मूळ स्वभाव जाईना जेवण झाल्यावर मी परत लाउजमध्ये थायलडचा नकाशा पाहू लागले

थायलड हे दक्षिण पूर्व आशियातील राज्य असून चीन व भारतापासून सारख्याच अतरावर आहे ह्याच्या पश्चिमेला आणि उत्तरेला ब्रह्मदेश, उत्तर व उत्तरपूर्वेला लाओस व व्हिएटनाम, पूर्वेला काम्पोचिया व दक्षिणेला मलेशियाची हद्द लागते जवळ जवळ ५१४००० चौरस किलोमिटर आहे

ह्या देशाचे चार ढोबळ आकार पडतात १) मध्यवर्ती प्रदेश - बॅंकॉक ह्याच भागात आहे हा प्रदेश जगातील सर्वात अधिक भात पिकविणारा प्रदेश आहे म्हणूनच थायलडला 'राईस-बाउल' असेही नाव आहे येथे हवा साधारण गरम व आर्द्र असते २) उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश - येथेच प्रवाशाचे आवडते चाग-माई (Chang mai) हे ठिकाण आहे ३) उत्तरपूर्व भाग - हा सर्वात अधिक लोकसख्येचा प्रदेश आहे येथे पुष्कळसा प्रदेश वालुकामय असून तो लोओस व काबोडियापर्यंत पसरलेला आहे सुमारे ५६०० वर्षापूर्वी जगातील पहिली सस्कृती येथे भरभराटीस आली ४) दक्षिणेकडील

हिरवागार ट्रॉपिकल भाग

थायलंडची हवा समशीतोष्ण आहे तपमान एप्रिलमध्ये ३५.५ सें व डिसेम्बर मध्ये १६.७ से असते येथे भारतासारखेच तीन ऋतु आहेत उन्हाळा मार्च ते मे पर्यंत, पावसाळा मे ते ऑक्टोबर व हिवाळा नोव्हेंबर ते फेब्रूवारीपर्यंत असतो अनुकूल हवामान व पाण्यामुळे येथे बारा महिने 'हिरवे हिरवे गार, हरित तृणाच्या मखमलीचे गालीचे' अथरलेले असतात भारतासारखेच तपमान असल्यामुळे भारतातील सर्व पीके येथे होतात नारळ, भात, केळी, फणस ह्यांचे मुबलक उत्पादन येथे होते पपई, केळी, पेरू, अननस ही फळे अतिशय रसाळ असतात तांदूळ हे निर्यातीचे प्रमुख उत्पादन आहे थाई कापूस ही प्रसिद्ध आहे उत्तरेकडील डोंगराळ भागात थोडीफार सफरचंद व स्ट्रॉबेरी होते उत्तरपूर्वेकडील फळांच्या बागा आहेत रबराचे मळे आहेत समुद्रकिनाऱ्यावर मासे मिळतात ह्याच भागात चांगल्या प्रतीचे कथीलही मिळते

बँकाक हे पूर्वेकडील कॉस्मॉपॉलिटन शहर असून त्याची लोकसंख्या साठ लाख आहे सध्याच्या चक्री घराण्यातील पहिल्या राजाने १७८२ मध्ये ह्याचा थायलंडची राजधानी म्हणून स्थापना केली बँकॉकचे मूळ नाव 'स्तन कोसीन' असे होते नंतर हे नाव मागे पडून 'क्रून थेप' (The City of Angles) हे नाव पडले आज हे आशियाचे प्रवेशद्वार आहे डॉन माँग इटरनॅशनल एअरपोर्टवरून रोज निरनिराळ्या ४३ एअर लाईन्सची विमाने जातात थायलंड भारतापेक्षा फार लहान असले तरी भारतात नाहीत एवढ्या हॉटेल रुम्स येथे आहेत सुमारे ४० लाख प्रवासी दरवर्षी येथे येतात (म्हणजे भारतात तिप्पट) पण येथील पर्यटन व्यवस्था इतकी सुदर आहे की कसलाही त्रास होत नाही हॉटेल, टॅक्सी, बस, गाइडस् नियोजित सहली ह्या सगळ्यांचे जाळे इतके कार्यक्षम आहे की प्रशसा केल्याखेरीज रहावत नाही आम्ही आमच्याच हॉटेलमध्ये असलेल्या नियोजित सहलींची व्यवस्था करणाऱ्या माणसाला गाठून फ्लोटिंग मार्केट, देवळे व राजवाडे येथील टूर्स ठरविल्या ह्या माणसाकडे स्वतःचे काही नव्हते तो फक्त कमिशन घेणारा होता त्याने फोनवर टॅक्सी स्टॅन्डला आमच्या हॉटेलवर टॅक्सी पाठविण्यास सांगितले अगदी ठराविक वेळेला टॅक्सी आली व आम्हाला 'रीव्हर सिटी' ह्या नदीच्या धक्क्यावर घेऊन गेली त्याने आम्हाला बोटीत बसविले व ह्याच ठिकाणी मी तीन तासांनी येईन असे सांगितले व तो निघून गेला त्याप्रमाणे आम्ही सहल आटपून आल्यावर पाहिले तर तो हजरच होता त्याने दुसऱ्या टॅक्सीवाल्याला गाठून आमची मंदिराची सहल सुरु केली ही सहल संपवून आम्हाला हॉटेलवर भोजनासाठी सोडले दुपारी राजवाड्याची सहल करणारी टॅक्सी आली व तिने राजवाड्यात असलेल्या गाईडच्या ताब्यात आम्हाला दिले सध्याकाळी त्या गाइडने आम्हाला आमच्या हॉटेलवर सोडले ही सर्व व्यवस्था इतकी उत्तम व कार्यक्षम होती की आमचे एक मिनिट वाया गेले नाही

इकडे टॅक्सीला मिटर नसते दरवेळी भाडे आधी ठरविले जाते भाषेचीसुद्धा मोठी अडचण पडते पण ह्या नियोजित व्यवस्थेमुळे आमच्या सर्व सहली अगदी आरामात झाल्या

बँकॉकची खरी शोभा नदीच्या आसपास आहे संबध बँकॉक शहरभर वहाणारी चाओ फ्राय (Chao-Fraya) नदीवर व तिच्यावरील असख्य कालव्यावर बँकाकचे जीवन आहे ह्या देशात पाणी भरपूर असून नदीवर होड्यातच बाधलेली किंवा नदीकाठी उभारलेली लाकडी घरे दिसतात' वाटेत मीठागरेसुद्धा लागली तेथे समुद्राच्या पाण्यापासून मीठ वेगळे करून पाकीटात घालून विक्रीला ठेवतात नदीकाठी उभारण्यात आलेल्या ह्या लाकडी घराच्या दैनदीन गरजासाठी होडीतून भाजी, मसाले, तादूळ वगैरे माल विक्रीसाठी येतो ह्यालाच 'फ्लोटींग मार्केट' म्हणतात असा एक मोठा तरगता बाजार चाओ-फ्राया नदीच्या कालव्यावर आहे (थोनबरी येथील वातसाओ थगहींग) ही तरगती दुकाने काश्मीरमधील शिकारा पद्धतीची आहेत बँकॉकच्या 'रिव्हर सिटी' ह्या धक्क्यावरून थोनबरी फ्लोटीग मार्केटला जाणाऱ्या होड्या मोटरबोटी, मिळतात. थोनबरी हे बँकॉकपासून २० किलोमीटर अंतरावर आहे आम्ही मोटरबोटीत बसल्यावर हात जोडून आमचे स्वागत करण्यात आलें नतर आम्हाला कमळाची फुले, पिवळी धमक रसरशीत, ताजी इलायची केळी व रसाळ लीची (फुकट ह) देण्यात आली हवा थड पावसाळी-म्हणजे माझी अत्यत प्रिय-चौखूर उधळण्यासारखी केरळ, गोव्याची आठवण करून देणाऱ्या दुतर्फा असलेल्या हिरव्या हिरव्या राजस लोभस गोंडस रसबाळ्या केळी-नारळीच्या हिरव्यागार सृष्टिसौंदर्याची सलामी घेत, केळी खात खात आमचा प्रवास मजेत चालला होता वातावरण अगदी शात व निस्तब्ध होते अधून मधून आमच्यासारख्या पर्यटकानी भरलेल्या मोटरबोटी किवा कमलपुष्पे व इतर माल पिकणाऱ्या रगबेरगी पोषाखातील कमलमुखींच्या होड्या लागत होत्या

ह्या दोन तासाच्या प्रवासात आम्हाला वाटेत अरुण ग्रॅन्ड पॅलेस, एमेराल्ड बुद्ध ही देवळे दुरुन दिसली शहराचे औद्योगिक विभाग, पॉश वस्ती असलेला भाग पण दिसला पण ह्या सर्वात अधिक रोचक वाटला ग्रामीण विभाग थायलडवर आता पाश्चात्य सस्कृतीचा प्रभाव पडला आहे पण ह्या ग्रामीण लोकानी आपली पूर्वापार सस्कृती आज शतकानुशतके जतन करून ठेवली आहे नदीला लागून असलेली ही लाकडाची घरे साधी पण अतिशय स्वच्छ सुबक व नीटनेटकी असतात बोटीतून त्यांची व्यवस्थित भांडी व कपबशा लावलेली स्वयपाकघरे, भाडी, घासणे, झाडाझुड, कपडे धुणे वगैरे शांतपणे चाललेले असते तसे प्रत्येक घराच्यापुढे (नंतर ऑफिसेस, दुकाने ह्यांच्यापुढे सुद्धा दिसले) एक छोटेसे सुबक मंदीर दिसत होते ती आपापल्या अभिरूचीनुसार व कुवतीनुसार नटविलेली होती शिवाय प्रत्येक घरासमोर जवळ जवळ एक मनुष्य

आरामात झोपू शकेल इतके मोठमोठाले प्रचड हंडे ठेवलेले दिसले त्यात पावसाचे पाणी पिण्यासारखे नसते

थोनबरीला जाण्यापूर्वी 'पाश्चर इन्स्टिट्यूट' चे स्नेकफार्म लागले ह्यात कितीतरी नाग, अगदी जातिवंत कोब्रा - इकडे तिकडे सुळसुळत होते उन्हात त्याची सुवर्ण काया व कृष्णकाया नजर न ठरण्याइतकी चमचमत होती त्याच्यापासून विष मिळविण्यासाठी त्यांना रोज दूध पाजले जाते ह्या विषाची अत्यंत मूल्यवान व दुर्मिळ लस तयार करतात पाश्चर इन्स्टीट्यूटच्या पुढेच जगातील सर्वात मोठे क्रोकोडाईल फार्म आहे

थोनबरी फ्लोटींग मार्केटमध्ये रेशमी व सुती कपडे, हँडीक्राफ्ट्स, नायलॉनचे कपडे, चामड्याच्या वस्तू, वगैरेंचे नुसते ढीगच्या ढीग पडले होते पण किंमती फार अव्वाच्या सव्वा वाटल्या ह्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स गुड्स बँकॉकला न घेता हाँककाँगला घ्याव्यात निरनिराळ्या कालव्यातून सुमारे दोन तास सहल करून आम्ही परत रीव्हर सिटी ह्या धक्क्यावर आलो चाओफ्राया ह्या नदीचे पूर्ण नाव मेनाम चाओ फ्राया (सर्व श्रेष्ठ जलमाता) असे आहे नदीला माता मानण्याची कल्पना भारतीय सस्कृतीचाच प्रभाव दाखविते ह्या नदीवर पसरलेल्या असख्य कालव्याच्या जाळ्यामुळे (Klong) बँकॉकला 'पूर्वेकडील व्हेनिस' असेही म्हणतात ही सहल आटपून आम्ही भोजनासाठी परत हॉटेलमध्ये आलो दुपारी आम्हाला देवळाच्या सहलीला जायचे होते

सम्राट अशोकाच्या काळात (ख्रि पू २६७-२२७) ख्रि पू. तिसऱ्या शतकात थायलडमध्ये बुध्द धर्माचा प्रसार झाला नाखोन पॅथम येथे २३०० वर्षापूर्वी भारतातून येथे आलेल्या पहिल्या बौद्ध धर्म पथकाचे चित्र आहे १२७ मीटर उच असलेले हे मदिर (फ्रा-पॅथॉम) थायलड मधील सर्वात उंच मदिर आहे ह्याचे सोन्यासारखे चमचमणारे कोन चीनमधून आणलेल्या चमकदार सोनेरी टाइल्सने बनविले आहेत प्रवेश द्वारापाशी बुद्धाचा उभा पुतळा आहे येथील विहार प्रंचड मोठे असून त्यात अनेक हॉल व खोल्या आहेत मदिरासमोर मोठा बाजार आहे राज्यधर्म म्हणून थेरावदा बुद्ध धर्म (९०%) ओळखला जातो तरी ६ टक्के मुस्लीम व दोन टक्के ख्रिश्चनधर्मीय लोकसुद्धा येथे आहेत नैतिक बळ आणि सामाजिक सबध वाढविण्यासाठी, आध्यात्मिक उत्तेजन व कलेच्या उत्तेजनासाठी बौद्ध धर्माचा व ह्या स्मारकाचा उपयोग झाला थायलडमध्ये असलेल्या जवळ जवळ ३६५ देवळांमुळे अनेक सुदर कला कृतींचा जन्म झाला थाई भाषेत मदीर ह्या अर्थी 'वात' (Wat) हा शब्द आहे हे 'वात' इतके असख्य आहेत की पहाला पहाता खरोखरीच वात येतो त्यातील प्रमुख 'वात' - वात फो (Temple of the Reclining Buddha), वात साकेत (With the Golden Mount) वात सुथाट (With Giant Swing), वात त्रिमित (Golden Budd ha) वात बेन्चामाबोफीट (Marble Temple), वात अरुण (The Temple of Dawn) आणि वात काएओ (एमेराल्डबुद्ध)

ही प्रमुख मदिरे आहेत म्हणून बँकॉकला The City of Angles असेही म्हणतात

ग्रँड पॅलेसच्या दक्षिणेला रीक्लाइग बुद्धाचे (वात फो) मदीर आहे ही उजव्या कुशीवर एका हातावर मस्तक ठेवून झोपलेल्या बुद्धाची मूर्ति जगातील बुद्धाच्या प्रचड मूर्तीपैकी एक आहे ही बुद्धाच्या महानिर्वाणाच्या वेळची (२५०० वर्षापूर्वीची) असून हिची लाबी सुमारे १०० फूट आहे मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव शांत, सौम्य आणि प्रसन्न आहेत हिच्यावरील सोन्याचा पत्रा आता जागोजागी तुटला आहे बुद्धाच्या पायाभोवती मोत्याची माळ गुंडाळलेली असून त्याच्या जीवनातील निरनिराळे महत्त्व पूर्ण प्रसग तेथे चित्रित केले आहेत ह्या मूर्तीची प्रचड भव्यता मनाला भारून टाकते ह्या आडव्या मूर्तीला पाहून तजावर, इजिप्तमधील दुसऱ्या रॅमसेसच्या आडव्या मूर्तीची आठवण येते हे मदिर बघण्यासाठी वेळ रोज सकाळी ८ ते ५ पर्यंत आहे ह्याचे प्रवेशपत्र ऑफिस बिल्डींगमध्येच मिळते प्रवेश फी दहा बाथ असून ती मदीराच्या मेन्टेनन्ससाठी उपयोगात आणतात

'वात त्रिमित' मध्ये साडे पाच टन वजनाचा शुद्ध सोन्याचा बुध्द आहे मार्बल टेम्पलमध्ये सर्व सगमरवरी दगडाचे काम असून येथे निरनिराळ्या अवस्थेतील सुमारे चाळीस बुद्ध प्रतिमा आहेत हे दगड इटलीतून आणण्यात आले होते वात सुथाटच्या समोर बामरग माँग रोडवर जायट स्वींग आहे हा झोपाळ्याचा कार्यक्रम हिदू धर्माप्रमाणे वर्षातून एकदा साजरा होतो ह्या सोहळ्यात भाग घेण्यासाठी भगवान शकर मदीरात येतात असा समज आहे त्यावेळी दोन टीम्स तयार करण्यात येऊन ते आपल्या दातात पैशाने भरलेली बॅग पकडण्यासाठी जास्तीत जास्त उच उच झोके घेत असत (ती बॅग आपल्या कडील दही हडी सारखी उचावर टागलेली असे) ह्या खेळात भाग घेणाऱ्याना व प्रेक्षकानाही सभवणारा धोका लक्षात घेऊन १९३० मध्ये ह्या सोहळ्यास बंदी घालण्यात आली उत्कृष्ट भित्ती चित्रासाठी वात सुथाट प्रसिध्द आहे पश्चिम जर्मनीच्या मदतीने त्याची डागडुजी केली जाते

येथे बौद्ध धर्माचे वर्चस्व असले तरी हिंदू धर्म व हिंदू संस्कृतीचा पगडा असलेला ही दिसून येतो थाई रामायण तर विश्वविख्यात आहे गणपतीची मूर्ति कित्येक ठिकाणी दिसते हिदू संस्कृतीचा थायलडवर प्रभाव दाखविणारे नाव म्हणजे फिस्णुलोक (विष्णुलोक) येथील राजाची नावे सुद्धा पहिला राम, दुसरा राम अशी इग्लडच्या हेन्री प्रमाणे नऊ रामापर्यंत आहेत रिपुदमन, राजदमारी वगैरे हिंदू नावे रस्त्याना दिलेली आढळतात राम, सीता, हनुमान ही दैवते तर ह्या भागात म्हणजे थायलड, मलेशिया, सिंगापूर बाली-इत्यादी ठिकाणी सर्वत्र आढळतात आपल्या रामलीलेसारखे इकडेही रामकथेवर कार्यक्रम होतात चाओ-फ्राया नदीच्या पलीकडे वात अरुण (Temple of Dawn) आहे, आपल्याप्रमाणेच अरुण हा येथेही सूर्याचा सारथी मानला जातो इन्द्र

देवतेलाही खूप मान आहे वात अरुण मदीराचा विशेष म्हणजे त्याचा काम्बोडीयन शैलीसारखा असलेला उच कळस ही थाई मदिरे मात्र द्रविड सस्कृतीसारखी आहेत येथील प्रचड पौराणिक मूर्ति पाहिल्या की लहानपणी पाहिलेल्या पाताळ भैरवी, अही-मही, सुदोपसुंद किंवा रावणासारखे भयानक राक्षस किवा कथकली नृत्यातील मुखवट्याची आठवण येते त्यामुळे देवळामध्ये प्रसन्न वाटण्याऐवजी प्रथम दर्शनी भितीच वाटते राम,सीता, लक्ष्मण ह्यांच्या ठिकठिकाणी असलेल्या प्रचड मूर्ति म्हणजे आपल्याकडील शूर्पणखा,रावण,त्राटिका ह्या मडळींना थोडी फार प्लास्टिक सर्जरी करून ठेवल्याप्रमाणे वाटतात

ग्रॅंड पॅलेस व त्यात असलेले एमेराल्ड बुद्धाचे रायल टेम्पल फारच प्रेक्षणीयच आहे ह्या राजवाडा चाओ-फ्राया नदीच्या काठावर ना-प्रालार्न रोडवर आहे चक्री राजानी १७८२ साली ह्याच्या बाधकामाची सुरवात केली,त्याने बँकॉक ह्या समुद्र किनाऱ्याजवळील एका छोट्याशा खेडे गावाची आपली राजधानी म्हणून निवड केली ह्या ग्रॅन्ड पॅलेसचे क्षेत्रफळ २१८,४०० स्क्वे मीटर आहे चारही बाजूनी भितींचे कपाउड, कचेऱ्या आणि एमेराल्ड बुद्धाचे मंदिर आहे मुख्य प्रवेशद्वाराच्या आत प्रवेश केल्यावर तीन इमारतींचे समूह दिसतात डाव्या बाजूला महामतियन समूह, मध्यभागी चक्री-महाप्रसाद आणि उजव्या बाजूला डुइस्ट महाप्रासाद समूह आहे

चक्री महाप्रसाद समूहाच्या इमारतीमध्ये ६ व्या रामराजाने आतील हॉलमध्ये मोठा घुमट बाधला त्यावर भारतातील वैदिक देवताच्या, सयामी सकल्पनेच्या स्वरूपात चित्रीकरण पेंटींग केले त्या देवताना साऱ्या विश्वाचे सरक्षक मानले त्याने पूर्वेला इन्द्र, पश्चिमेला वरुण, उत्तरेला अग्नी, व दक्षिणेला यम ह्या मडळींची सरक्षक म्हणून नेमणूक केली त्या देवताच्या मूर्तींच्या खाली दहा सदगुणाचा उल्लेख केला पूर्वेला इन्द्र-दानम् शीलम् । व पश्चिमेला ज्ञानम् मानवता तपम् । दक्षिणेला अज्जावम् (सचोटी), मदावम् शाति, अहिसा । उत्तरेला अक्कोधम् अविरोधम् १७८२ सालापासून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंतचे इमारती शिल्प येथे आढळते,सर्वात प्रेक्षणीय १८ व्या शतकातील चक्री थ्रोन हॉल व ड्युइस्ट थ्रोन हॉल आहेत ह्यापैकी दुसरा युरोपियन व थाय शैलीचा सुदर सगम आहे सिरॅमिक्सचा प्रयोग, शिंपल्याचे जडावाचे काम, पौराणिक व पैशाचीक राक्षसी मूर्तींवरील दिवाणे आमइखास सारख्या हॉल्समध्ये दिसतात दरबार हॉलशिवाय ह्या आवारात थडगी, राजाची निवासस्थाने सुद्धा आहेत

उत्तरेकडील एमेराल्ड बुद्धाचे (थाईमध्ये ह्यास वात प्रा-काऊ असे म्हणतात) सुदर मदिर राजघराण्यासाठी बांधण्यात आले आहे विहार शिल्पातील सर्व सौंदर्य ह्यात एकवटले आहे हिरव्या जेडमधून कोरलेली ही बुद्धाची मूर्ति राज्याचा सरक्षक म्हणून मानण्यात येते सन १४६४ मध्ये चैनराइ येथे ही मूर्ति सापडली बुद्ध धर्माचे जुने अवशेष ठेवणाऱ्या ठेवण्याच्या खोलीवर (चेदी) एकदम वीजेचा झोत पडल्यामुळे ही प्रकाशात आली

नंतर पुष्कळ काळ तिची इकडे तिकडे भ्रमती झाली पहिल्या राजरामने बँकॉक वसवल्यावर व ग्रॅन्ड पॅलेस बाधल्यावर ह्या मूर्तीची प्रतिष्ठापना येथे करण्यात आली ह्या मूर्तीस राष्ट्रीय सन्मान मिळत असून बुद्धाच्या स्मृतिदिनी लोक श्रद्धेने येथे येतात ह्या दिवशी ह्या मूर्तीस सोन्याच्या पारंपारिक वेदीवर रथाच्या आकाराच्या वहानात (थाइ-बौसबोक-संस्कृत-पुष्पक) प्रस्थापित करण्यात येते

ह्या राजवाड्यातील अनेक इमारती द्रविड व पाताळ सस्कृतीचे प्रतीक असून त्या फार भडक वाटतात ह्यामध्ये मुख्यत' सोन्याचा वर्ख व काचेची कलाकुसर केली आहे नागदेवतेस रक्षक मानण्यात येऊन प्रत्येक मूर्तीच्या डोक्यावर नाग दर्शविला आहे त्याचप्रमाणे जागजागी वानर पण उभी केली आहेत गॅलरीजमध्ये रामजन्मापासून, कुभकर्ण,इंद्रजित,राम-रावण युद्धापर्यंतचे प्रसग चितारले आहेत ह्याच परिसरात बोन्साय पद्धतीने अनेक झाडाची लागवड केलेली आढळली नारळ, फणस, आवे, लिंब, ह्यानी लहडलेली ती बटुमूर्ति झाडे दृष्टीला सुखवतात खरी पण जाणून बुजून त्याना छाटून त्यांची वाढ खुटविणे हा अमानुषपणाच नाही का? गुलाबाच्या फुलाचे गार्डन पाहून मला इग्लडमधील विंडसर कॅसलच्या अप्रतिम सुदर रोश गार्डनची आठवण आल्यावाचून राहिली नाही हॉलडला ट्युलीप पुष्पाचे पसरलेले घनदाट रगीबेरगी मळे पाहून जस वेड व्हायला होतं त्याचप्रमाणे येथे ताज्या टवटवीत, दवबिंदूनी डवरलेल्या, टपोऱ्या लाल, गुलाबी,पिवळ्या पाढऱ्या,केशरी अशा विविधरगी गुलाबाचा फुललेला मळा पाहून होत मग मनात हळूच डोकावते फुलांच्या मळ्यात स्वच्छन्दपणे विचरणारी ती My Fair Lady

बौद्ध धर्माच्या ह्या देवळामध्ये भिक्षूचे जीवन व्यतीत होत असतेच पण ह्या थाय देवळाचा पारंपारिक उपयोग माहिती देणारे स्थान, शाळा, हॉस्पिटल, डिस्पेन्सरी, व कम्युनिटी सेंटर म्हणूनही उपयोगात आणण्यात येत असे काही लोक आपली ऐहिक कर्तव्ये पूर्ण केल्यावर उर्वरित आयुष्य भिक्षूचे जीवन जगण्यासाठी येथे येऊन रहातात तर काही वर्षातील ठराविक काळ भिक्षूचे जीवन जगण्यासाठी मठात येऊन रहातात खुद्द राजासुद्धा पंधरा दिवस भिक्षू होऊन येथे रहातो व उपवास करणे,भिक्षा मागणे,धर्मग्रथाचे पठण करणे वगैरे भिक्षूची कर्तव्ये करतो थाई मदिरात आपल्याप्रमाणे बाहेर पादत्राणे काढून जावे लागते कोणतीही बुद्ध मूर्ति असो,मग ती लहान असो अथवा तुटलेली असो, ती पवित्र मानली जाऊन तिच्यावर चढण्याची, तिचा फोटो घेण्याची किंवा कोणत्याही प्रकारे तिचा अपमान करण्याची परवानगी नसते मदिरात स्त्री-पुरुषाना योग्य पोषाख करूनच जावे लागते शर्ट काढून उघड्या अंगाने,शॉर्टस किवा मिनी,हाफपॅन्ट,स्लीवलेस ब्लाउज घालून जाण्याची सक्त मनाई आहे

दुसऱ्या दिवशी बँकॉकपासून वीस मैलावर असलेल्या रोझ गार्डनला आम्ही भेट

दिली हा पार्क फारच सुंदर असून तळी, कारंजी हजारो प्रकारच्या गुलाबाच्या फुलाची येथे चांगली निगा राखण्यात आली आहे येथे गोल्फ कोर्सही आहेत रात्री येथे थाई लोकांची नृत्य, शास्त्रीय नृत्य थाई बॉक्सिंग, विवाह पद्धती, तलवारीची द्वंद्व युद्धे, इत्यादि मनोरजनात्मक कार्यक्रम होतात

रोझ गार्डनहून आम्ही थायलडची जुनी राजधानी अयुथ्य (अयोध्या) बघण्यास गेलो सन १३५० पासून पुढील चार शतके ही थायलडची राजधानी होती पुढे १७६७ मध्ये ब्रह्मदेशाने हिचा सपूर्ण नाश केला जुने अयुथ्या एक सुदर शहर होते इग्लीश, डच, स्पॅनिश, पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे अनेक देशातील लोकानी व्यापारासाठी आपली जहाजे येथे ठेवली होती येथे बुध्दाची मंदीरे, मुसलमानाच्या मशिदी, ख्रिश्चन लोकांची कॅथेड्रल्ससुद्धा होती येथील राजा नाराइ व फ्रान्सच्या चौदाव्या लुईमध्ये राजनैतिक सबधसुद्धा होते १६ व्या शतकात एका जर्मन प्रवाशाने ह्या शहरास पूर्वेकडील व्हेनिस म्हटले होते पुढे तीच उपमा बँकॉकला देण्यात आली ह्या ठिकाणी सध्या राजघराण्याचे, उन्हाळ्यात रहाण्याचे राजवाडे आहेत

बँकॉकच्या दक्षिणपूर्वेस पट्टाया नावाचे शहर सी-बीचसाठी प्रसिद्ध आहे आम्ही धरून बँकॉकमध्ये येणारा प्रत्येक प्रवासी येथे आल्याशिवाय राहात नाही बँकॉक-पट्टाया अतर १५० कि.मी आहे सुखमवीट रोडवर यकामाई स्टेशन (थायलडमधील पुष्कळशी नाव ताई, माई ह्या आपल्या आया बहिणींच्या नावावर सुरु होतात किंवा संपतात यकामाई, चांगमाई, सुखताई, शगताई इत्यादि) यकामाईवरून सकाळी ६ ॥ वाजल्यापासून रात्री १० ॥ पर्यंत अर्ध्या अर्ध्या तासांनी बसेस निघत (दोन्ही बाजूचे राउंड तिकीट माणशी १०० बाथ) येथे रस्ते फार चांगले आहेत ट्रॅफीकसुद्धा शिस्तबद्ध वाटला आपल्यासारखा त्यात माणसानी हाकणाऱ्या (Pesicab) हातरीक्षा येथे दिसल्या दुतर्फा हिरवीगार, केळी, अननस, नारळाच्या बागा दिसतात पेट्रोल पंप किंवा डिपार्टमेंट्स स्टोअर्समधून ताज्या फळाचा थडगार मधुर रस फुकट देतात रस्त्याच्या कडेला असलेले बसस्टॉप्स, आपल्याकडील पूर्वीच्या धर्मशाळेसारखे दिसतात अडीच तासांचा हा प्रवास कसा वेळ जातो हेच कळत नाही चुटकीसरसा होऊन जातो

पट्टायात अधिकतर मोठमोठी हॉटेल्स बीच रोडवर आहेत स्वस्त हॉटेलस् पट्टायाच्या उत्तरभागात मिळतात मोठ्या हॉटेल्समधून वातानुकूलीत यत्रे, सुदर बागा, नोंगिग, ट्रेल्स, टेनिस कोर्ट, स्विमीग पूल वगैरेंची सोय असते श्रीमंत लोकासाठी खाजगी बीच असलेली आलिशान हॉटेल्स पण आहेत भाड्याने बगले पण मिळतात पट्टाया हा थायलडचा 'रिव्हिएरा' असून येथे नुसते बीचवर पहुडले तरी वेळ कसा जातो कळत नाही, बीचवर आरामखुर्च्या टाकलेल्या असतात चौपाटीवरील भेळपुरी नारीयल

पानीप्रमाणे येथेही शहाळी व इतर खाद्यपदार्थ विक्रेते घिरट्या घालू लागतात सुरक्षित भागात पोहताही येते वॉटर स्कूटर चालविणे तर येथील सर्वात मोठा करमणुकीचा खेळ आहे ह्यासाठी तासाला २५० बाथ द्यावे लागतात प्रथम तासभर पुरेल इतके पेट्रोल स्कूटरच्या टाकीत असल्याची खात्री करून घ्यावी दुसर म्हणजे आपल्याला नीट पोहता येणही अत्यावश्यक असत त्याचप्रमाणे स्कूटर चालविताना आसपास पोहणाऱ्याचीही दखल घ्यावी लागते नाही तर बिचाऱ्याना दुखापत होते वॉटर-स्कीइगची सुद्धा सोय आहे कोणी साहसी वीर पॅरा-सेलींग करून 'पछी बनूँ उडती फिरूँ मस्त गगन में' ची हौस भागवून घेतात ह्यासाठी रंगीबेरगी पॅराशूटस देण्यात येतात आणि खाली पाण्यातून दोरीने ओढणारी बोट (tow boat) सुरु झाल्याबरोबर तो मनुष्य एकदम हवेत उच उच तरगू लागतो रगीबेरगी टम्म फुगलेल्या पॅरेशूट सकट निळवंतीसारख्या निळ्या मखमली आसमानात पाचूसारख्या हिरव्याकंच सागरावरून तरगणारे हे औटघटकेचे राजहस बीचवरून बघतानाच इतकी मजा वाटते तर त्यांना तरगताना किती मजा वाटत असेल। पट्टायाला उत्कृष्ट चविष्ट 'सी फूड' मिळते शिवाय येथे फ्रेंच, इटालियन, स्वीस, जर्मन, हंगेरीयन, स्कँडिनेव्हियन, इग्लीश, इंडियन, पाकिस्तानी, जपानी, चायनीज रेस्टॉरन्टस्, कॉक्टेल्स, डीस्कोथिक्स, नाइट-क्लब्ज, सुपर क्लब्ज् रात्री झगमगत असतात सर्वोत्कृष्ट भोजन, सुरा, सुरागना व सगीत ह्याची लयलूट असते

पट्टायाच्या जवळ चाथाबरी येथे उत्कृष्ट रत्ने मिळतात, तेथील धबधबा, ऐतिहासिक अवशेष व थायलडमधील सर्वात मोठे चर्च आहे बँकॉकच्या आसपासही इतर प्रेक्षणीय स्थळे खूप आहेत बँकॉकच्या पश्चिमेला १३० किलोमीटरवर काचान्बुरी नावाचे स्थान आहे येथे क्वी -याई (Kwae Yai) आणि क्वी-नॉई (kwae Noi) ह्या दोन नद्यांचा सगम आहे ह्या शहराजवळच दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानी लोकाच्या आज्ञेवरून दोस्त राष्ट्रातील कैद्यांनी बाधलेला सुप्रसिद्ध 'ब्रीज ऑन द रीव्हर क्वाय' आहे जवळ जवळ १६०० युद्धकैदी गुलाम म्हणून काम करताना ब्रह्मदेशाला जाणाऱ्या 'डेथ-रेल्वे' वर मृत्युमुखी पडले गावाबाहेर ह्यांची स्मशानभूमि आहे दुसऱ्या महायुध्दाच्या सुमारासच झालेल्या एका अपघातात युद्धकैद्यांना अश्म युगातील काही महत्त्वाची शस्त्रे सापडली येथे नितात रमणीय नैसर्गिक जगल लेणी व धबधबे आहेत थोनबरीवरील स्टेशनवरून काचान्बुरीला तीन गाड्या जातात चरन्सतवंग रोडवरून अर्ध्या अर्ध्या तासाने बसेस सुटतात (अधिक माहितीसाठी फोन ४११ -३१०२) ईजिप्तला गेल की प्रसिद्ध सुवेझ कॅनॉल, राजस्थानला गेलं की हल्दीघाटी अशा स्थानाप्रमाणेच ज्यांना खरोखरच इतिहासाची आवड आहे त्यानी 'ब्रीज ऑन द रीव्हर क्वाय' पहाण्याची संधि घालवू नये शिवाय ब्रिटीशाच्या तावडीतून आपली अतिशय नाट्यपूर्ण रीतीने सुटका करून जपानशी सपर्क साधून नेताजी सुभाषचद्र बोस ह्यांनी बँकॉकमध्ये आजाद हिंद

सेनेचे केन्द्र उघडले.थायलंड,सिंगापूर वगैरे भागातील भारतीयाना एकत्र करून त्यानी 'चलो दिल्ली' अशी जी सिंहगर्जना केली ती ह्याच बँकॉकमधून म्हणून माझ्या दृष्टीने खरेदीपेक्षा बँकॉकचे महत्व ह्या कारणामुळे आहे

थायलडच्या उत्तरभागात चागमाई हे ७०० वर्षांपूर्वीचे समुद्रसपाटीपासून १००० फूट उचीवरूल अत्यंत सुपीक प्रदेश आहे चागमाई सुंदर हवा,सुदर ऐतिहासिक मदिरे, रमणीय निसर्ग व सुंदर स्त्रियाबद्दल प्रसिद्ध आहे म्हणूनच थाई लोक ह्यास मोठ्या अभिमानाने 'नॅशनल शाग्रिला' असे म्हणतात चागमाईला ज्या पर्वताने वेढले आहे त्याचा प्रारंभ हिमालयाच्या खालच्या पायथ्यापासून होतो येथे तिबेटी-ब्रह्मी अशा अनेक पहाडी जमाती आहेत चागमाई उत्तरेकडील स्वतत्र राज्याची राजधानी होती ह्या राज्यात तेव्हा पश्चिम लाओस व ब्रह्मदेशाचा काही भाग होता म्हणून चागमाईने आपली अशी स्वतंत्र सस्कृती जतन केली आहे चांगमाई वेशभूषा, चागमाई नृत्य, चांगमाई शिल्पकला-चित्रकला प्रसिद्ध आहे येथील लाम-पाग ह्या गावी बर्मी पद्धतीची मदिरे आहेत येथे टिकवूडचे फर्निचर, चिकण मातीची भाडी, चादीचे दागिने, हातमागावर विणलेले थाय सिल्क व इतर अनेक पहाडी जमातीच्या कलाकुसरीच्या वस्तु मिळतात फ्रा-बुद्धावट बँकॉकपासून १२० किलोमीटर उत्तरेला असून ३५० वर्षापूर्वी एक शिकारी हरणाची शिकार करण्यास आला असता त्याला एक मोठ्या आकाराच्या मानवी पावलाच्या आकाराच्या तळ्यात औषधी गुण आढळ्यामुळे तो बुद्धाच्या पावलाचा ठसा असावा असा समज आहे

सुखथाई (बुद्धाच्या प्रचड मूर्तीचे भग्नावशेष) फुकट किंवा फोकट (सुदर समुद्र किनारा,सिंगापूर एवढ्या आकारमानाचे थायलड मधील सर्वात मोठे बेट) हुआ-हीन,की सामु इ अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत

थायलड हे जणु सस्कृती वितळवणारे एक भांडे आहे कारण दक्षिण पूर्व आशियातील चिनी,खेमर,मलावी,पर्शियन लाओस,बर्मी,भारतीय,पाकिस्तानी असे अनेक लोक येथे येऊन ह्या मातीशी एकरूप,एकजीव झाले आहेत त्यामुळे मूळ थाई मनुष्य शोधणे कठीण आहे थाई भाषा सायनो-तिबेटी ग्रूपमधून आली आहे अल्पसख्याक लोक दक्षिण चीन व उत्तर पश्चिम व्हिएटनामची भाषा बोलतात मोठ्या शहरात इग्रजी भाषेचा वापर करण्यात येतो थाई भाषा एक पूर्ण विकसित भाषा असून इजिनिअरींग,वैद्यकीय शिक्षणसुद्धा थाई भाषेत दिले जाते भारतीय लोकांना थाई भाषेत 'काक' (kaak) म्हणतात

व्हिएटनाम युद्धात अमेरिकेचे मोठमोठे लष्करी तळ येथे होते अजूनही अशा तळाची रॉयल्टी हे थायलडचे मोठे उत्पन्न आहे अतिशय वेगवान अमेरिकन व जपानी बनावटीच्या गाड्या, वातानुकूलित टॅक्सीज, भव्य डिपार्टमेंटल स्टोअर्स, बादशाही

हॉटेल्स पावलोपावली विद्युदणूचे दर्शन ही सर्व अमेरीकेचीच कृपा आहे आतापर्यंत कम्युनिझम येथे जवळ जवळ नव्हताच अलीकडे तो डोक वर काढू लागला आहे सर्व सामान्य माणूस राजकीय भानगडीत पडत नाही, थायलंडच्या उत्पन्नाचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे परदेशी प्रवाशानी ह्या देशात खर्च केलेला पैसा परकीय प्रवासी यावेत म्हणून थाई सरकारने अनेक आकर्षणे निर्माण केली प्रवाशासाठी खास 'नाइट-लाइफ' म्हणजे ख्याली खुशालीची केन्द्रे उघडली त्याची सुरूवात व्हिएतनामी युद्धाच्या काळात झाली युध्द जर्जर अमेरिकन सैनिकाच्या करमणुकीसाठी येथे अनेक सुखसोई करण्यात आल्या मग त्या सुखाने मिळणाऱ्या पैशाची चटक राष्ट्राला लागली

पाश्चात्य प्रवासाचे येथील एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे मसाज करणाऱ्या बायका हा प्रतिष्ठित नावाखाली चाललेला वेश्या व्यवसाय आहे अशा निदान ६०००० मालीशवाल्या बायका (वेश्या) आहेत ह्या मसाजच्या जाहिराती हॉटेलच्या खोलीत टाकून जातात 'आपल्याला अजून खूप प्रवास करायचा आहे तेव्हा तुम्हाला चागला मसाज करून घ्यायचा असेल तर घ्या म्हणजे प्रवासाने अग ठणकणार नाही' अस मी बावळटासारख ह्याना सुचविणार होते पण 'सहसा विधदीत न क्रिया' हा भारवीचा श्लोक आठवून गप्प बसले 'मसाज' चा खरा अर्थ कळल्यावर आपण गप्प बसलो हे कधी नव्हे ते चागले कृत्य केले अस वाटून स्वतःची पाठ थोपटली नाही तर एरवी माझ्याजवळ हाताला लागेल असे एक अदृश्य धुपाटणे नेहमी टागलेले असते अनेक वेळा ते काढून स्वतःला धोपट धोपट धोपटण्याची वेळ नेहमीच येते मी नेहमीच आपल्या चुका कबूल करून कडकलक्ष्मीसारखी स्वतःला आसूडाने झोडपत असते

थायलडचे एक वैशिष्ट्य म्हणजे भारत, ब्रह्मदेश, सिलोन ह्या देशाप्रमाणे येथे कधीही साम्राज्यवाद आला नाही ह्याचा ह्या लोकांना सार्थ अभिमान आहे येथे साक्षरतेचे प्रमाण ८० टक्के आहे बहुतेक वृत्तपत्रे थाई भाषेत असतात रस्त्यावर बाजारात, दुकानावर पाटयाही थाई भाषेत असतात थाई लिपीही तामीळ, मल्याळम्, किंवा बगालीसारखी गोल गोल वळणाची आहे 'बँकॉक पोस्ट' व 'नेशन' ह्या इंग्रजी दैनिकाचा खप कमी असला तरी त्याचे महत्त्व अधिक आहे विशेषत 'बँकॉक पोस्ट' हे समतोल विचाराचेच निर्भय दैनिक आहे लोकहिताच्या दृष्टीने ते सरकारवर अनेकदा टिका करते पण सरकारी धोरणास पाठिंबाही देते

थायलंडमध्ये बऱ्याच प्रमाणात मातृसत्ताक पध्दती आहे स्त्री हीच कुटुब प्रमुख असते वाडवडिलांच्या सम्पत्तीचा वारसा पित्याकडून मूलाकडे न जाता मातेकडून मुलीकडे जातो याचा परिणाम म्हणजे एकदर सामाजिक जीवनावर स्त्रियाचे वर्चस्व व प्रभाव आहे हॉटेल्स, उपहारगृहे, सार्वजनिक बसेस, डिपार्टमेंटल स्टोअर्स, शिक्षक, टॅक्सी ड्रायव्हर्स सर्वत्र स्त्रियाच दिसतात शिवाय मोटारी, वातनुकूलित यंत्रे, वगैरेच्या

आयातीमुळे थायलडमध्ये हल्ली अतिशय महागाई झाली आहे ह्यामुळे सुद्धा स्त्रियाना घराबाहेर पडून कामे करावी लागतात येथे हुडा पद्धती असून आपला हुंडा मुलीला स्वत ला मिळवावा लागतो आमच्या 'राज्यसभा मित्र' हॉटेल्स ची रिसेप्शनिस्ट नुकतीच बाळतपणाची रजा संपवून कामावर रूजू झाली होती त्यामुळे घरकाम, लहान मुल व नोकरी अशी तिहेरी तारेवरची कसरत करताना तिची फार त्रेधा उडत असे मग ती दुपारी तीन ते रात्री दहापर्यंत नोकरी करीत असे तेवढ्या वेळात नवरा मूल साभाळत असे रात्री १० वाजता एकटे-दुकटे जायला तुला भीति वाटत नाही का ?' असे मी तिला विचारले ती म्हणाली, 'येथे गुन्हेगारीचे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे मुळीच भीति वाटत नाही ' आपण टुरीस्टसुद्धा रात्री बेरात्री निश्चिंत मनाने फिरू शकतो भीक मागणे हाही गुन्हा समजला जात असल्याने भारतात सुकाळ असलेला भिकारी हा प्राणी येथे दिसला नाही

थाई लोक अतिशय शिस्तप्रिय, शातताप्रिय, रुढीप्रिय आहेत सौंदर्य, कला, स्वच्छता व टापटीप, नीटनेटकेपणाचे ते भोक्ते आहेत दुसऱ्याच्या भावनाची व इच्छेची कदर व इज्जत करून ते सामाजिक स्थैर्य राखतात राजघराण्याचा प्रत्येक थाई मनुष्य आदर करतो उद्धटपणा, भाडखोरपणा हे लोक मुळीच खपवून घेत नाहीत मदिर, मशीदीप्रमाणेच कोणाच्याही घरात गेले तर बूट चपला बाहेर काढून ठेवाव्या लागतात पाश्चात्य देशाप्रमाणे युवा-युवतीचे उन्मुक्त प्रदर्शन, सार्वजनिक ठिकाणी शृगार-चेष्टा इकडे कौतुकास्पद समजल्या जात नाहीत कुठल्याही वस्तूकडे किंवा व्यक्तीकडे लाथेने निर्देश करणे गर्हणीय समजले जाते मस्तक हा त्यांच्या दृष्टीने शरीराचा सर्वात महत्त्वाचा, श्रेष्ठ व आदरणीय भाग असल्यामुळे मित्रत्वाच्या नात्याने सुद्धा कोणी मस्तक थोपटलेले त्यांना आवडत नाही बॉक्सिग, शॅडो प्ले, टार्को (बास्केट बॉल सारखाच एक खेळ) पतग उडविणे, बोट रेस हे त्याचे प्रिय खेळ आहेत उन्हाळ्याच्या दिवसात पतंग उडविणाऱ्या दोन टीम्स असतात पुरुषांची (चूला) व स्त्रियाची (पाकपाओ) ह्या दोघात टक्कर होते

थायलड हा शेतकी प्रधान देश आहे भल्या मोठ्या हॅटस् घातलेले शेतकरी शेतात काम करताना सर्वत्र दिसतात ८० टक्के लोक शेती व तत्सम धंद्यात गुतलेले दिसतात भरपूर पाणी, धनधान्याची सुबत्ता निसर्ग संपन्नता ह्यामुळे एकूण लोक शांत, समाधानी व सदैव हसत मुख दिसतात आपण काही माहिती विचारली तर काम सोडून तत्परतेने दुकानाबाहेर येऊन हसतमुखाने मार्गदर्शन करतील भाषा येत नसेल तर नम्रपणाने, प्रसन्न हास्याने मान हलवून सुचवतील येथे सदैव वहाणाऱ्या निर्मल हास्याच्या झऱ्यामुळे ह्या देशाला 'स्मित हास्या' चा देश (Land of Smiles) किंवा 'सदाफुलींचा देश' असे म्हणावेसे वाटते खरोखर खळाळता आनंद, हर्ष, उल्हास त्याच्या नसानसातून पाझरत असतो आपण भारतीय मात्र संतोष, आनंद, सुखाच्या अत्युच्च क्षणीसुध्दा आपल्या चिता, दुःख विसरत नाही त्या क्षणीसुद्धा दु खाचे सावट आपल्या चेहऱ्यावर असते

अशुभाची पाल आपल्या मनात चुकचुकते 'आपण आपल्या दुःखाच जास्तच प्रदर्शन करतो का ? निपुत्रिकेने आकाश कोसळल्यासारखा सुतकी चेहरा करून बसलेच पाहिजे का ? विधवेने शोकमूर्ति दिसलेच पाहिजे का ? दुसऱ्या देशात विधवा, निपुत्रिका ओळखू नरी येतात का ?

आपल्या उमद्या उत्साही आनंदी स्वभावानुसार थाई लोक हे अतिशय उत्सवप्रिय आहेत त्यांचे बहुतेक सर्व उत्सव धर्म, भातशेती व राजघराण्याशी संबंधित असतात माखा बुचा हा त्यांचा पहिला महत्त्वपूर्ण उत्सव बुद्धपौर्णिमेला असून जवळ जवळ बुद्धाचे १२५० शिष्य बौद्ध धर्माची शिकवण ऐकण्यासाठी जमतात. नॉर्थ साराबुरीला बुद्धाच्या पवित्र पावलाजवळ फ्रा बुध्द बाहट उत्सव साजरा करण्यात येतो चक्री डे हा चक्री राजघराण्याचा संस्थापक दिन म्हणून सहा एप्रिलला साजरा करण्यात येतो १३ एप्रिलला सगोक्रान हा राष्ट्रीय पारंपारिक पाडवा चागमाईला तीन दिवस दणदणीतपणे साजरा करण्यात येतो त्या मेळ्याला खेळीमेळीच्या स्नेहसमेलनाचे स्वरूप येऊन खेळ, गमत जमत, एकमेकावर पाणी उडविणे वगैरे प्रकार चालतात विशाखा बुद्ध हा मेमध्ये बुद्धजन्मदिन साजरा करण्यात येतो 'लाय क्रथोंग' हा थाई लोकाचा सर्वात सुदर सोहळा असतो हा नोव्हेम्बरमध्ये येतो दरवर्षी पौर्णिमेच्या चदेरी बरसातीमध्ये थाई नाविक केळीच्या पानाच्या कमळाच्या आकाराच्या छोट्या छोट्या होड्या घेऊन नद्या, नाले, कालवे, सरोवरातून, झऱ्यातून सैर करतात व एक पेटवलेली मेणबत्ती, फूल व एक नाणं त्या जलाशलायाला अर्पण करतात असे केल्याने जलदेवता प्रसन्न होते व आपली सर्व पापे धुऊन काढली जातात अशी त्यांची समजूत आहे फुलवेड्या थायलडच्या 'योनबुदा' ह्या सणात स्त्रिया आपल्याकडील दीपदानाप्रमाणेच कमलपुष्पे पाण्यात सोडतात बुद्धाच्या पुनरागमनाच्या स्वागतार्थ साधारण हातभर लाबीच्या नावा केल्या जातात व त्या पाण्यात सोडून त्याच्याबरोबर कमळेही सोडतात. ब्रिटीश लोकांप्रमाणेच राजघराण्यावर ह्या लोकाचे अतिशय प्रेम व असीम निष्ठा राजाराणीचे वाढदिवस सणासारखे साजरे करण्यात येतात ह्याशिवाय असन्हा बुचा, खाओ फान्सा, ओक फान्सा, द ब्रीज ऑन द रीव्हर क्वाय वीक असे एक ना अनेक सणांचे व सस्मरणांचे जल्लोष वर्षभर चालूच असतात हत्ती हा थायलडचा अतिशय लाडका प्राणी त्याच्या सन्मानार्थ २१ व २२ नोव्हेम्बरला हत्तींचे विविध खेळ आयोजित करण्यात येतात ह्या वेळी गजराज फुटबॉल खेळतात रस्सीखेच सुद्धा खेळतात खरच जगण्यांचा आनद कसा लुटावा हे थाई लोकांकडून शिकावे लुम्फिनी व रात्साडेमन स्टेडियमवर थाई बॉक्सिग वर्षभर चालूच असते थायलडचे विश्वविख्यात स्वर्गीय उन्मुक्त नाईट-लाइफ फाटफोंग न्यू फेचाम्बुरी रोड व अशोक (सुखमवीट) येथे बघावयास मिळते

थायलंड मध्ये काही ठिकाणी एक विचित्र प्रथा आढळली काही भागात मृत शरीर जाळलं किंवा पुरलं जात नाही ते एका उंचावरील वास्तूत दोन वर्ष ठेवण्यात येतं त्या माणसाच्या (मृत) पत्नीला त्या शवाबरोबर एक वर्ष झोपावं लागतं दोन वर्षानंतर त्या माणसाचे नातेवाईक तेथे जमतात प्रत्येकजण येताना बरोबर रेडे घेऊन येतो जो सर्वात जास्त रेडे आणेल त्याला त्या मृताच्या संपत्तीतील सर्वाधिक वाटा मिळतो एका मोठ्या समारंभात त्या रेड्यांना झुंजवलं जातं रक्त तापलेलं असतानाच लहान मूल बांबूने त्यांना ढोसतात, त्याचं रक्त बाहेर काढतात, ते तो गतप्राण होईपर्यंत नंतर त्या पोकळ बांबूतच त्या रेड्याचं मांस शिजवून गावजेवण होतं सगळं आटपल्यावर त्या मृत व्यक्तीचा पुतळा बनवून शहराबाहेर एका खंडहरप्राय जागेत ठेवला जातो गावातल्या अनेक मृतांचे पुतळे तेथे ओळीने उभे असतात

आपल्याकडे उत्तरेला जशी चहाफराळाची दुकाने, पंजाबी धाबे पावलोपावली दिसतात, त्याप्रमाणे येथेही दर दहा पावलांवर खाण्यापिण्याची, चहा फराळाची खच्चून भरलेली दुकाने आढळतात रस्त्याच्या कडेलासुद्धा बायका मोठमोठाले तवे टाकून आपल्याकडील आलू-टिकिया वाल्यासारख्या झारा-उलथन त्यावर ठणठण आपटीत बसलेल्या दिसतात आमच्या 'राज्यसभा मित्र' हॉटेलात 'क्लिअर सूप' हा एक सूपचा प्रकार फारच चविष्ट वाटला ताज्या भाज्यांच्या स्वाद, मीठ, मीरपुड ह्यामुळे त्या सुपाची नैसर्गिक चव फारच छान लागत होती दुसर एक 'सुग टॉम याम' (प्रॉन सुप) 'नाम प्रीक' (प्रॉन सॉस)' 'काई-ई-रावान्' हे प्रकार सुद्धा बरे वाटले, जेवणात भात ही मुख्य डिश असते दक्षिणेकडे किंवा गोव्याला जसा भाताचा डोंगर समोर ठेवतात तसेच येथेही भाताच्या ढीगाला तोंड द्यावे लागते स्वयंपाकात आपल्याप्रमाणे नारळ, चिंच, गुळ, शेंगदाणे ह्यांचाही सर्रास वापर केला जातो दिल्लीप्रमाणे तळलेले मासे येथेही रस्त्यावर विकत मिळतात भाज्याप्रमाणे डाळीचे पीठ कालवून त्यात तिखट मीठ घालून हे मासे खरपूस तळतात दुसरा एक दोशासारखा पातळ धिरड्याचा प्रकार असतो मैद्याच्या पीठाचे हे पापुद्रासारखे दोसे भाज्या, चिकन , पोर्क किंवा फिशचे तुकडे भरून स्प्रींग रोलप्रमाणे तळून घेतात येथे भाज्या खूप कोवळ्या, नरम, ताज्या, लुसलुशीत व चविष्ट मिळतात बोटाएवढी लहान लहान मक्याची कोवळी कणसे तर फारच गोड लागतात भाज्याप्रमाणे फळाचीही रेलचेल आहे कापलेल्या अननसाच्या गाड्या ठिकठिकाणी उभ्या असतात अननस इतका रसाळ व मधुर असतो की त्याचा रस ठिबकून कपडे खराब होऊ नयेत म्हणून त्याच्या बरोबरच प्लॅस्टिकच्या पिशव्या व ग्लासही देतात पेरू व जाब सुद्धा जवळ जवळ नारळाएवढे मोठे असतात अनेक ठिकाणी फळाचे रस फुकट देतात आंबेसुद्धा अतिशय मधुर व रसाळ असतात साखर व गुळ घालून शिजविलेल्या भाताच्या ढीगावर आंब्याचा रस ओतलेल्या भाताचे थाळे दुकानात हारीने मांडून ठेवलेले

दिसतात लोक अतिशय आतिथ्यशील वाटले हॉटेलचा वेटरसुद्धा आग्रह करकरून वाढे आपल्याकडे कित्येकदा वेटर 'कधी एकदा ह्या हावरटाच खाण संपतय' ह्याची वाट पहात असतात चमचा खाली ठेवण्याचा अवकाश, बशा उचलून झालेच पसार

बँकॉकला खरेदी काय करावी हा प्रश्न पडतो खर म्हणजे खरेदीपेक्षा प्रेक्षणीय स्थळ बघण्यात आम्हाला अधिक आनद वाटत असल्याने ह्या प्रश्नाचा विशेष गांभीर्याने आम्ही कधी विचार केला नाही थोडीफार जी खरेदी केली ती हाँगकाँगलाच म्हणून जे केवळ खरेदीसाठी बँकॉक-हाँगकाँग-सिंगापूरची टूर करतात त्यांनी खरेदी हाँगकाँगलाच करावी येथे नायलॉनचे कपडे, थायसिल्क, कॉटन, चादीच्या वस्तु, पितळीच्या वस्तु, चिनी मातीच्या वस्तु, मुल्यवान खडे दागिने झगमगीत रगाचे हॅंडीक्राफ्टस् ह्याचा नुसता खच पडलेला असतो बाजार, वातानुकूलित दुकाने, बाटिक्स, भिंतीतील बीळासारखी दुकाने, मल्टीस्टोरीड डिपार्टमेंटल स्टोअर्स, सरकार मान्य इम्पोरियम्स सर्वत्र व्यवस्थित बार्गेनिंग चाललेले असते थाय सिल्क भारतीय सिल्क सारखे मुलायम व रीच वाटले नाही तर आपल्या रॉ सिल्कसारखे वाटले कॉटनचे कपडे, जेड, ऐमराल्डचे दागिने ह्याशिवाय येथे काही घेऊ नये थाई कॉटनचे कपडे फार मुलायम व स्वस्त वाटले, जेडचे दागिने एखाद्या सरकारमान्य फॅक्टरीत घ्यावे (तेथेही फुकट ऑरेंज ज्यूस मिळाला) कापडाचा, शिंप्याचा बहुतेक सर्व धदा दिल्लीच्या सरदारांनी व सिंध्यांनी काबीज केला आहे ह्या कापड बाजारात व इन्द्र मार्केट सुपर बाजारात खूप भारतीय दिसतात येथे भारतीय जेवणही मिळते, मजुरी करणारे भारतीय जवळ जवळ एक लाख आहेत

खुद्द बँकॉक शहर हे खूप पसरलेले आहे, वहातुक प्रचड वेगाने होते ठिकठिकाणी ओव्हर ब्रिज बाधले आहेत पादचाऱ्याना ह्यांचाच उपयोग करावा लागतो बँकॉकला प्रवासी महत्त्व येण्याचे दुसरे कारण म्हणजे बँकॉक-सिंगापूर-हाँगकाँग ह्या त्रिकोणातून मोठ्या प्रमाणात होणारे इलेक्ट्रॉनिक गुड्सचे स्मगलिंग भारताला अत्यंत लाजिरवाणी गोष्ट म्हणजे हे स्मगलिंग करणारे बहुताशी भारतीय असतात मजूर लोकांना (ह्यात परदेशी जाण्याची हाव असलेली तरुण मुलेच जास्त) बँकॉक-सिंगापूर-हाँगकाँग ही तिकीटे फुकट देण्यात येतात त्याना तेथे खर्चासाठी थोडे फार पैसे देण्यात येतात, आणि त्याच्याबरोबर व्हिडिओ, टि.व्ही वगैरे पाठवून कस्टम चुकवून भारतात मोठ्या प्रमाणावर फायद्यात विकण्यात येते आम्हाला बँकॉकच्या हॉटेलात असा धदा करणाऱ्या माणसाची बायको भेटली. तिने हा व्यवहार कसा शिताफीने करण्यात येतो हे इतक्या निर्लज्जपणे सांगितले की मला आपण भारतीय असल्याची लाज वाटली प्रथम येथे भारतीयांना व्हिसा लागत नव्हता पण आता सुरु झाला आहे कारण आपले दात व आपलेच ओठ, जैसी करनी वैसी भरनी

बँकॉक सोडताना विमानतळावर Departure Tax आपल्या कडील Airport

Tax प्रमाणे द्यावा लागतो हा माणशी १५० बाथ आहे तसेच पैसे बदलताना नेहमी त्याची रिसीट जपून ठेवावी उरलेले पैसे बदलून घेताना असा पुरावा लागतो.

प्रेमळ, हसतमुख थाई लोकांचा पाहुणचार व निरोप घेऊन तेथील रसाळ मधूर स्मृति मन पटलावर कोरून ठेवीत ह्या चिरतरूण देशाला 'ला गोन' (Good Buy) करून आमच्या कॅथेपॅसिफिक विमानाने हाँगकाँगच्या टेकड्यांवर झेप घेतली


* * *




परदेशी कोकणदृश्य ?



पट्टाया थायलंड प्रवाशांनो, घ्या इथे विश्रांती



हाँगकाँग ड्रैगन बोट उत्सव



हाँगकाँग रेसकोर्स

# अलीबाबाची गुहा

खुल जा सिम सिम ... !

आणि मग एकदम जॅकपॉट लागल्यासारखा तो हर्षोन्माद ...। आमचे कॅथे पॅसिफीक विमान हळू हळू खाली येत होते ( ही विमान कपनी म्हणजे हाँगकाँगच्याच स्क्वेअर ग्रुपची आहे ह्या कंपनीच्या ह्या विमानातील व्यवस्था अगदीच भिकर होती दिल्ली-बँकॉक ही एअर फ्रान्स कपनी व सिंगापूर-दिल्ली ही KLM कपनी ह्याची व्यवस्था उत्तम होती) मी खिडकीतून खाली डोकावून पाहिले गर्द निळ्याशार सागराने वेढलेल्या टेकड्यांवर वसलेले हाँगकाँगचे पहिले दर्शन बेरूतला निसर्गाने मुक्त हस्ताने सौंदर्याची उधळण केली होती येथे मानवाने आपल्या कल्पकतेमधून शून्यातून सौंदर्य शिल्प साकारले होते-

बँकॉक-हाँगकाँग प्रवास अडीच तासाचा आहे येथील वेळ बँकॉकच्या पुढे एक तास आहे हाँगकाँगचा विमानतळ 'काई-ताक' (kai-Tak) हा जगातील मोठ्या विमानतळांपैकी एक असून अत्याधुनिक आहे डोंगर व समुद्र ह्यांच्या खोबणीत हा विमानतळ तयार करण्यात आला आहे सुमारे दोनशे खिडक्यावर एकाच वेळी इमिग्रेशन, कस्टमचे काम चालले होते ह्यावरून ह्याच्या प्रचण्डतेची कल्पना येईल जर पुढच्या प्रवासाचे कनफर्मड तिकीट असेल तर हाँगकाँगचा visa विनामूल्य मिळतो बॅगेज मिळण्यासही जास्त वेळ लागत नाही दिल्लीच्या मानाने लवकर सुटका होते विमानतळ ते कवलून भागाचा स्टार फेरीचा हा स्टॉप बसने दोन हाँगकाँग डॉलर्स (एक हाँगकाँग डॉलर = १ ८० भारतीय रूपये) खुद्द हाँगकाँग बेटावर जाण्यास पाच डॉलर्स लागतात हाँगकाँग बेट व कवलून ह्याना जोडणारा समुद्राखालचा एक बोगदा आहे टॅक्सीने गेल्यास ह्या बोगद्यातून जाण्यास वीस डॉलर्स लागतात पण बस-सेवा चांगली असल्याने टॅक्सीने जाण्याचा विचारही करू नये

'हाँगकाँगला हॉटेल्स बँकॉकपेक्षा महाग आहेत सबब तुम्ही गेस्टहाऊसमध्ये उतर'

अस आम्हाला सांगण्यात आले होते. चुगकिंग गेस्ट हाउस (नाथान स्ट्रीट) मध्ये १७० हाँगकाँग डॉलर्सना खोली मिळेल म्हणून आम्हाला सांगण्यात आले होते आम्ही विमानतळावरून ह्या हॉटेल्सना फोन केला. त्यांनी १८० रू दर सागितला आम्ही बसने त्या हॉटेलच्याजवळ उतरलो एक चिनी माणूस चुंगकिंगसारखे नाव असलेल्या गेस्टहाउसचे कार्ड घेऊन उभा होता एजंटने १२० डॉलर्सना हॉटेलमध्ये खोली देतो असे सागितले आम्ही म्हटलं, आधी खोली बघून मग सांगतो तो कबूल झाला अन् स्वारी लगेच खाद्यावर आमचे सामान टाकून तुरु तुरू निघाली आम्हाला खोली आवडली हॉटेलचे वातावरण अगदी घरगुती होते नाहीतर हाँगकाँग म्हटले की उभे रहातात हिन्दी चित्रपटातील स्मगलर्स, नाइट क्लब्स थोडी फार घासाघीस करून ११५ डॉलर्सना त्याने खोली दिली (एअर कडीशनर व अॅटच्ड बाथ सकट) आम्हाला भेटलेल्या एका मद्रासी कुटुंबाने सांगितले, टी.व्ही आणि अॅटच्ड बाथ नको असेल तर ५० डॉलर्सनाही खोली मिळते अर्थात् ए.सी नाही पण हाँगकाँग सारख्या ठिकाणी ए.सी घेणे जरूरी असते

ह्या चुगकिंग प्रकरणाचा नतर खुलासा झाला, चुगकिंग ह्या इमारतीत अनेक गेस्ट हाउसेस आहेत (निदान ५० तरी) पैकी एक चुगकिंग हाउस व आम्ही उतरलो ते 'जिन टी' गेस्ट हाउस, हे चुंगकिंग मॅन्शनमध्ये असल्यामुळे आम्ही हेच चुंगकिंग गेस्ट हाउस समजलो होतो अमा एकंदरीत 'बोहनी' तर चागली झाली होती स्थिर स्थावर झाल्यावर आम्ही हॉटेलच्या मालकाला चांगला 'पेशल' कडक चहा पाजायला सागितले थोड्या वेळाने मालकाच्या आई सुंदर नक्षीकाम असलेल्या अत्यत नाजुक आणि पातळ चायना टी-सेटमधून चिनी चहा घेऊन आल्या ही एक अतिशय प्रेमळ व हसतमुख चिनी बाई होती खोल्या अन् बाथरूम्स साफ करणे, स्वयपाक वगैरे कामे ती स्वत करीत असे आम्हाला पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या एकसारख्या लागत असलेल्या पाहून तिला मोठी मौज वाटे हे घाटी लोक दारू न पिता आपले ढसाढस पाणी काय ढोसतात बेड-टी साठी डॉलर्स (४रू.) दर होता फुकट नव्हता आघोळ पांघोळ करून आम्ही बाहेर फेरफटका मारण्यास निघालो हाँगकाँगमध्ये गॅसवर स्वयंचलित गरम होणारे गिझर्स पाहून मला व्हिएन्नाची आठवण झाली

चुंगकिंग मॅन्शनची ही टोलेजग इमारत एकूण आठ भागात विस्तारलेली होती. 'तुम्ही चार नबरची लिफ्ट व बी ब्लॉक लक्षात ठेवा, नाहीतर तुम्हाला गेस्ट हाउस सापडणार नाही' असे आम्हाला बजावण्यात आले होते तळमजल्यावर आल्यावर ह्या इमारतीचा प्रचड व्याप लक्षात आला खाली निदान २०० दुकाने, हॉटेल्स ह्या इमारतीचे दर्शनच मोठे नेत्रदीपक होते आम्ही उतरलो त्या भागात शेकडो सेंटर्स होती आम्ही अगदी भाबावून गेलो

हाँगकाँग (चिनी भाषेत हुसूआग-काग) ही ब्रिटीश क्राउन कॉलनी असून चीनच्या क्वागतुंग किनाऱ्यावर आहे. चिआंग ह्या नदीच्या मुखाचे हे चीनचे दक्षिण द्वार आहे ह्या भागात पेयेन नावाचे सुगधी झाड आहे त्यास हाँग असे म्हणतात. काँग म्हणजे बंदर म्हणून हाँगकाँग हे सुगंधी बदर आहे हाँगकाँग बेट हे सुमारे ३०० टेकड्याचे आहे हे मूळ चिनी भूमीपासून खाडीने वेगळे झाले आहे ह्याची भौगोलिक रचनाच अशी आहे की तेथे शहर वसविणे अत्यत अवघड काम आहे हे तीन प्रमुख भागाचे बनले आहे हाँगकाँग, कवलून व न्यू टेरिटरी किवा नवा प्रदेश चीनकडून ९९ वर्षांच्या लीजने ब्रिटीशांनी हे बंदर घेतले होते १९९७ मध्ये ही मुदत सपणार आहे जवळपास छोटी छोटी बेटे आहेत

हाँगकाँगच्या उत्तर पश्चिमेला १४५ किलोमीटर वर कॅन्टन हे चीनचे बदर आहे आणि पश्चिमेला नदीच्या मुखापलिकडे मकाउ हा पोर्तुगीज वसाहत आहे हाँगकाँगच्या ह्या छोट्याशा जागेवर कल्पक लोकांनी जगाच्या इतिहासातील सर्वात मोठा आर्थिक चमत्कार करून दाखविला आहे चीन व जपानच्या सान्निध्यामुळे हाँगकाँगला लष्करी महत्त्व फार आहे कौलून ह्याचा अर्थ नऊ ड्रॅगन्स पूर्वीच्या काळी जे चिनी प्रथम येथे आले त्याना आजूबाजूचे डोंगर ड्रॅगनसारखे दिसले म्हणून त्यानी त्या बेटाचे नाव कौलून असे ठेवले कौलून डोंगराच्या रागानी ह्या वसाहतीचे दोन वेगवेगळे भाग झाले आहेत बदराचा भाग व व्यापारी, औद्योगिक आणि रेसिडेन्सीअल भाग दक्षिणेला आहे आणि कृषिप्रधान भाग कटाक्षाने उत्तरेकडे ठेवण्यात आला आहे

हाँगकाँग उष्ण कटिबधाच्या अगदी उत्तरेला असल्याने येथे उन्हाळ्यात थोडे गरम व दमट हवामान असते व हिवाळ्यात थड आणि कोरडी हवा असते जुलैमध्ये तापमान २८ C आणि जानेवारीमध्ये १६ C असते सर्वसाधारणपणे वर्षाला ८५ " पाऊस पडतो जुलै व ऑक्टोबर मध्ये भयानक तुफान, वादळे होतात ह्या वादळामुळे हाँगकाँगचे खूप नुकसान होते

हाँगकाँगमध्ये जवळ जवळ काहीच पिकत नाही पिण्याचे पाणीसुद्धा त्याना चीनकडून विकत घ्यावे लागते खर म्हणजे येथे जंगल खूप होते पण शतकानुशतके त्याची काटछाट व जाळपोळ केल्यामुळे आता फक्त १३% भागात जगल आहे हल्ली पाइन, युकॅलिप्टस, केळी, काजू, पाम वृक्षाचा खजिना वाचविण्यासाठी जगलतोडीविरूद्ध कडक कायदे केले आहेत शेतीखाली सुद्धा एकूण फार कमी जमीन आहे येथे ३५ प्रकारचे सस्तन प्राणी आहेत गाई म्हशींना मुख्यत शेतीसाठी उपयोगात आणले जाते वाघुळ, जंगली हरणं, उदीर, खारी विपुल आहेत डुक्कर व पोल्ट्री खाद्यसामुग्रीसाठी उपयोगात आणण्यात येतात

हाँगकाँगची लोकसख्या ५० लाख आहे ८५% लोक शेजारच्या क्वांगतुग व

फुकीन भागातून आलेले चिनी आहेत खुद्द चीनमध्ये निरनिराळ्या भाषा व विभागाच्या लोकाचे मिश्रण असल्याने हे सर्व गट निरनिराळ्या जातीचे आहेत हाँगकाँगमधील इतर चिनी लोकांमध्ये हक्का जमातीचे लोक आहेत व मुख्यत' ते शेती करतात होक्लो व टका ह्या गटांचा मासेमारी हा खानदानी पेशा आहे चिनी लोकाशिवाय कॉमनवेल्थ देश, अमेरीका, पोर्तुगाल व जपानहून आलेले लोक येथे स्थायिक झाले आहेत हाँगकाँगमध्ये एकूण चौदा हजार भारतीय असून त्यात सिंधी, पंजाबी, लोक अधिक आहेत मराठी लोक नोकरी निमित्ताने आले आहेत तीन टक्के लोकसख्या शेती व मासेमारीवर अवलबून आहे येथे ४५००० छोटे मोठे कारखाने आहेत कायदा व सुव्यवस्था यासाठी ३५००० पोलिस आहेत येथे सुबत्ता असल्याने तर देशातून चोरून येणाऱ्या लोकांची सख्या खूप असते त्याचप्रमाणे हे जगातील रिएस्पोर्ट केन्द्र असल्यामुळे पोलिसाना अतिशय जागरूक असावे लागते येथे साक्षरता प्रमाण ९८% आहे पाचव्या वर्षापासून पधराव्या वर्षापर्यंत शिक्षण मोफत व सक्तीचे आहे ज्यांची मुल शाळेत जात नसतील त्याच्या आईबापांवर खटला भरण्यात येतो वृद्ध व बेकार लोकांना सरकराकडून भत्ता मिळतो भिकारी दिसत नाहीत

हाँगकाँगमध्ये एकूण ९७ वर्तमानपत्रे आहेत व ३८८ नियतकालिके प्रसिद्ध होत असून हे जगातील दुसऱ्या क्रमाकाचे खप असलेले बदर आहे (जपानचा पहिला क्रमाक। टाईम, न्यूजवीक, रिडर्स डायजेस्ट अशा अनेक प्रमुख पाश्चात्य नियतकालिकाच्या अतिपूर्वेकडील आवृत्त्या येथे होतात टी व्ही खाजगी व्यापारी सस्थाकडे आहे टी व्ही चे चार चॅनेल्स असून त्यापैकी दोन इग्रजी व दोन चिनी भाषेत आहेत प्रचलित सामाजिक विषय त्यात प्रभावीपणे हाताळले जातात हाँगकाँग हे जागतिक बदर असल्यामुळे १९४० ते १९५० च्या काळात येथे वेश्या व्यवसाय व व्यापार जोरात चालू होता 'द वर्ल्ड ऑफ सूझी वॅग' ही कादबरी व त्यावरून निघालेल्या चित्रपटावरून वेश्याची करूणाजनक स्थिति दिसून येते पण आता ह्या प्रकाराला कायद्याने आळा घालण्यात आला आहे त्यामुळे वेश्या व्यवसाय व नाइट लाइफ आता हाँगकाँगहून बँकॉकला हलली आहेत

आपल्या राजकीय कल्पनाप्रमाणेच येथील धार्मिक भावना सुद्धा फार गुंतागुंतीच्या आहेत लोकसख्येच्या जवळ जवळ १/१० भाग लोकांचा धर्म ख्रिश्चन आहे काही मुस्लिम सुद्धा आहेत गेल्या काही दशकामध्ये बौद्ध धर्म व तायो धर्म भरभराटीस आला असून त्याच्या मदिरांना चिनी लोकाच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे हे मासेमारीचे बदर असल्यामुळे समुद्र देवताना येथे फार मानण्यात येते ति-आन-हाउ (Tien Hou) ह्या समुद्र देवतेचे मंदिर जवळ जवळ सर्व मासेमारीच्या प्रवेश द्वाराजवळ आहे दरवर्षी तिचा जन्मदिन धुमधडाक्याने साजरा करण्यात येतो बंदरातील छोट्या छोट्या होड्यातच

कायम रहाणारे चिनी (पाण्यातून बाहेर येऊन जमीनीवर रहाणे ते अशुभ मानतात) लोक आपल्या होड्या सजवतात ह्या वेळी येथे मोठी जत्रा भरते ह्या जलदेवतेला प्रसन्न केले की ती सागरी तुफानांपासून रक्षण करते असा चिनी कोळ्याचा विश्वास आहे येथे एक गुरुद्वाराही दिसला मारूती, लक्ष्मी विष्णु, शिव-पार्वती, गणपती, ह्याचेही एक भव्य मंदिर आहे ह्या मदिरात भारतीयांची जन्माष्टमी, काली महोत्सव, गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून ह्या कार्यक्रमाची पूर्वसूचना रेडिओवरून देण्यात येते येथे महाराष्ट्र मंडळही असल्याचे ऐकले

हॉंगकॉंग हे पहिल्या क्रमांकाचे रिएक्स्पोर्टींग बदर आहे एका देशातून माल येथे येतो व तो दुसऱ्या देशात पाठविला जातो येथे काहीही पिकत नसले तरी न्यूयॉर्क व पॅरिसच्या खालोखाल जगातील सर्वात मोठी आर्थिक उलाढाल येथे होते त्यामुळे जगातील सर्व चैतन्य येथे एकवटल्यासारखे वाटते हॉंगकॉंग सोन्याच्या उलाढालीसाठी जगप्रसिद्ध आहे न्यूयॉर्क, लडन, झुरीच नतर ह्या बाबतीत हॉंगकॉंगचा नबर लागतो टी.व्ही वर अब्जावधि रुपयाच्या आर्थिक उलाढाली बद्दल तज्ञ माणसांच्या मुलाखती येत असतात हे हॉंगकॉंग टी.व्ही चे एक वैशिष्ट्य म्हणावे लागते आयात-निर्यातीचे प्रचंड उत्पन्न असल्याने इकडील रहाणीमान उच्च आहे.इजिनियर्स, चार्टर्ड अकाउटट ह्याना २० ते ३० हजार हॉंगकॉंग डॉलर्स (३५ ते ५० हजार रुपये) महिना पगार मिळू शकतो येथे मोठ्या प्रमाणात बहुमंझील (मल्टी-स्टोरीड) इमारतींचे काम चालू असते

कर-मुक्त खुली व सर्वात स्वस्त बाजारपेठ हे हॉंगकॉंगच्या विलक्षण भरभराटीचे रहस्य आहे इथे कोणालाही कसलाही व्यवसाय सुरु करता येतो, व्यापारावर व उद्योगधद्यावर कर नसला तरी त्याच्या वाढीमुळे जी इतर आनुषंगिक वाढ होते त्याचा अमाप फायदा सरकारला होतो १८९५ साली ब्रिटीशांनी चीनपासून हा भाग घेतल्यावर ह्याची त्यानी अतिशय पद्धतशीर व चिकाटीने वाढ केली येथे उंच सखल का होईना पण रेशमी रस्ते, बसेस, टॅक्सीज् व जमिनी खालची रेल्वे, एक बोगदा तर समुद्रसपाटीच्या खालून नेण्यात आला असून तो कौलून व हॉंगकॉंगला जोडतो (दुबईप्रमाणे)

हॉंगकॉंग बॅटरी व वीजेवर चालणाऱ्या खेळण्याचे जगातील सर्वात मोठे केन्द्र आहे तेथून टी.व्ही व्ही सी.आर, कॅमेऱ्यासारख्या वस्तूंचे फार मोठ्या प्रमाणात स्मगलिंग होते आमच्या चुगकिंग मॅंशनमध्ये निदान दहा चिनी मजूर ह्या वस्तु नीट पॅक करून विमान तळावर पोहोचविण्याचे काम करीत होते. एक मद्रासी आम्हाला आमच्याकडे काहीच सामान नसल्यामुळे तुमच्या सामानात आमच्या VCR चे खोके घ्या अशी विनति करीत होता ह्यानी त्याला साफ नकार दिला आम्हा भारतीयाना विदेशी वस्तूचे इतके आकर्षण वाटते ही मोठी लज्जास्पद गोष्ट आहे परदेशात हे फार जाणवते. विशेषत ह्या सर्व गोष्टी भारतात होत असताना आयातीपैकी सर्वात अधिक आयात जपानहून मग अमेरिका व

चीनहून होते भारतातून सालाना १०० कोटी रू ची आयात होते. त्यात कट डायमड इमिटेशन ज्वेलरी, काजू ह्याचा मुख्यत्वेकरून समावेश होतो चीन जपान, अमेरीकेहून होणाऱ्या आयातीत कापूस, कापड, तयार यत्रसामग्री, खाद्यपदार्थ व रसायने असतात येथे जगातील सर्वोत्कृष्ट तत्रज्ञान व तत्रज्ञ आहेत कारण वाटेल तेवढा पैसा ओतण्याची येथील उद्योग व व्यापाराची तयारी आहे म्हणून हाँगकाँग हा भव्य संधि मिळण्याचा देश आहे

बँकीगची हाँगकाँगएवढी अद्यावत् पद्धत इतरत्र कुठेही नाही प्रत्येक बँकेच्या इमारतीत रस्त्याच्या बाजूला एक खिडकी असते तो इटीसी (इलेक्ट्रिक टॉकींग कार्ड) असून वर्षभर हा काउटर उघडा असतो प्रत्येक खातेदाराजवळ एक कार्ड असते ह्या खिडकीच्या काचेच्या यत्रात कार्ड सरकवले की कॉम्प्युटरच्या सहायाने आपल्याला आपल्या खात्यात किती रक्कम असते हे कळते मग जेवढी रक्कम हवी असेल तेवढ्या आकड्याचे बटन दाबले की रोख रक्कम यत्रातून येते तेवढी रक्कम वजा करून उरलेल्या रकमेची चिठ्ठीही लगेच येते.

हाँगकाँगमध्ये बघण्यासारखे खूप आहे सृष्टिसौंदर्य, टेकड्या, समुद्र किनारे ह्याची अगदी लयलूट आहे

ओशन पार्कला सागरी जीवनाचे प्रात्याक्षिक दर्शन घडते येथे निरनिराळ्या ३०० स्पेसिज मधील तीस हजाराच्यावर मासे आहेत केबल-कार्स मधून इकडे तिकडे बागडण्यात मोठी मौज वाटते हाँगकाँग बेटाच्या दक्षिण बाजूला समुद्राच्या पाण्याच्या खोल किनाऱ्यावर एका विशाल कॉम्प्लेक्स मध्ये मोठा 'ओशन पार्क' तयार करण्यात आला आहे त्यात फनफेअरसुद्धा आहे . हे हाँगकाँगचे एक महत्त्वपूर्ण आकर्षण बनले आहे समुद्राच्या वर १४०० फूट उचीवर ताय-शू-वॅन ह्या दुसऱ्या टेकडीवर जाण्यासाठी केबल वायर आहे किंवा हलणारी शिडी आहे (escalator) हा जगातील सर्वात लांब आउट डोअर एस्कलेटर आहे ह्यात तासाला ४००० यात्री राहू शकतात ह्यावरून खालचे दृश्य फारच मनोहर दिसते

ह्या पार्कमध्ये नव्यानेच सुरु केलेला फनफेअर विभाग फार गमतीदार आहे ड्रॅगन नावाचा एक अक्राळ-विक्राळ प्राण्याच्या आकाराचा किनाऱ्याकडून समुद्राकडे नेणारा रोलर असतो हा प्रवास दोन अवाढव्य लूप्स व कॉर्क-स्क्रूच्या आधाराने केवळ अडीच मिनीटात होतो पण डोक्यावरील केस अक्षरक्ष ताठ होतात इतका रोमहर्षक व चित्तथरारक अनुभव असतो स्पायडर, क्रेझी गॅलन व मेरी-गो राउडसारखे नव्या धर्तीचे चक्र अशी इतर आकर्षणेही आहेत

हाँगकाँगचे सर्वात उच शिखर व्हिक्टोरिया पीक (१८०० फूट) येथे जाण्यासाठी प्रथम बस किंवा ट्रेनने पीक ट्रॅमला जावे लागते तेथून केबल कारने व्हिक्टोरिया पीकला

जाता येते येथून अद्यावत् इमारतींने गजबजलेल्या हाँगकाँगच्या ३०० टेकड्या, हाँगकॉग व कवलूनचा सुंदर देखावा पहाण्यासाठी टेलिस्कोप लावले आहेत येथे दुकाने व हॉटेल्स आहेत केबल-कारचे एकतर्फी तिकीट चार डॉलर्स आहे कवलून व हाँगकाँगमधील खाडी पार करण्यासाठी गोव्यासारख्या फेरी बोट असतात (एका वेळचे तिकीट ७० सेंट्‌ १-२ रुपये) हा दहा मिनिटाचा प्रवास बेटावरील सर्व उत्तुग गगनचुंबी इमारतींचे सम्यक, दर्शन घडवितो किती वेळी केला तरी कंटाळा येत नाही मी आपल्याबरोबर चहाचा ग्लास घेऊन फेरीत बसत असे ह्या फेरी बोटीच्या धक्क्याचे नाव 'स्टार फेरी' असे आहे ह्या ठिकाणी खाद्य पदार्थ ताजे व स्वस्त मिळत आम्ही आमच्या हॉटेलमध्ये फक्त सकाळचा चहा तेवढा घेत असू बाकीचे खाणे पिणे येथेच करत असू. चिनी शीडाच्या बोटी, रहदारी न्याहाळत गरमागरम चहाचे घुटके घेत तास न्‌ तास बसत असे देश, धर्म, भाषा, परिस्थिती वेगळी असली तरी माणसाचा मूलभूत स्वभाव, भावना, समस्या ह्या एकच असतील का ? त्याची जडणघडण सुद्धा आपल्यासारखीच असते का ? असो तर्स आमच्या चुगकिंग मॅंशनमध्येच निदान ५ गेस्ट हाउसेस मधून भारतीय जेवण मिळत असे पण मला स्टारफेरीवरील कुरकुरीत लुसलुशीत बन्स व खीमा पफ्ज खूप आवडत केवळ एकदाच आम्ही येथील एका चागल्या पॉश हॉटेलमध्ये जेवायला गेलो, पण नतर परत काही आमचे असे धाडस झाले नाही

त्याचं असं झालं आपल्याकडे खुर्चीवर स्थानापन्न झाल्याबरोबर बेरा पाण्याचे ग्लास घेऊन हजर होतो येथे मागूनसुद्धा फुकटचे पाणी पाजले जात नाही मिनरल वॉटरला २० रू द्यावे लागले टेबलावरील टेबल क्लॉथचे पैसे मोजावे लागतात कटलेटबरोबर सॉस मागितले तर त्याचे पैसे अलग मला तर मद्रास कॅफेमधील अप्पुस्वामी आठवला वाटीतील साबार सपण्याचा अवकाश तत्परतेने गरमागरम साबाराने वाटी भरून आपल्या कर्तव्यपूर्तीच्या 'सात्विक' आनदात चटणी संपण्याची वाट बघत असतो, सपली रे सपली की चमचाभरून चटणी पडलीच पानात इटली मध्येही अशा अवगुठनवन्त टेबलाना 'कव्हर चार्ज' द्यावा लागतो आम्हाला तुमचा टेबलक्लॉथ नको असेही सागता येत नाही बिन कव्हर्सची टेबले वेगळी असतात एकदा माझा मामा रंगात येऊन आपल्या कॉलेजाच्या रम्य आठवणी सांगत होते पिढ्या-दर-पिढ्या रोमिओंचे मक्का मदिना असलेल्या पचसूत्री 'गुडलक' मध्ये आम्हा ४/५ मित्राचे टोळके जात असे 'एक कप चहा आणा, पाणी घ्या, पंखा लावा, पेपर द्या, सायकलींवर लक्ष ठेवा' अशी आमची कायम ऑर्डर असे आणि एवढी सेवा आम्ही फक्त २५ पैशात करून घेत असू मी मामाला म्हणे, 'मामा विसरा आता ते दिवस । गुजर गया वह जमाना ।' पण इकडे तर हाँगकाँग लुटावयास आलेल्या लुटारूनाही लुटण्याचा धदा तू डाल डाल, मैं पात पात। आलेल्या अनुभवावरून 'बरा आहे आपला देशी मामला'

म्हणत आम्ही त्या भारतीय हॉटेलाचे कायमचे गिऱ्हाईक झालो

येथील 'मुइ-फात' ह्या बौद्ध मठाचा परिसर अत्यंत शांत, रम्य व सुंदर आहे, हिरव्यागार गर्द वनश्रीत लपलेली रंगीबेरंगी पॅगोडा टाइप मठाची इमारत, मठाच्या बागेतील चित्रविचित्र आकाराच्या रंगीबेरंगी कुंड्या आणि बौद्ध भिक्षूंनी बनविलेले साधे पण रुचकर शाकाहारी भोजन लक्षात रहाते. शांतिन रेल्वेजवळ ४३ पायऱ्या चढून गेल्यावर बुद्ध-मंदिर लागते तेही बघण्यासारखे आहे. ह्यामध्ये १२८०० बुद्धाचे पुतळे आहेत. येथील नऊ मजली गुलाबी पॅगोडा ही बघण्यासारखा आहे

चिंग-चुंग मंदिर हे 'ताओ' धर्माचे मंदिर असून हिरव्यागार पाइन वृक्षांनी वेढलेले २०० वर्षांपूर्वीचे मंदिर आहे. ह्यावरील कलाकुसरीचे काम ३०० वर्षांपूर्वी पेकींगला केलेले आहे. त्याचप्रमाणे पांढऱ्या वाळूचा चुंग-शा बीच, ताइ-पो कारपेट फॅक्टरी, स्पेस म्युझियम, इस्लामिक सेंटर ही प्रेक्षणीय आहेत. इस्लामिया सेंटरमध्ये अरबी संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते. 'ऑ-बून-हॉ' गार्डन्स १९३५ मध्ये ऑ-बून-हॉ या स्थानीय पुराणवस्तु संशोधकाने तयार केली. ह्यामध्ये चिनी पुराणातील कथांमधील चित्रविचित्र आकाराचे अनेक पुतळे व दृश्य उभारण्यात आली आहेत. हे हाँगकाँग मधील एक विशेष प्रेक्षणीय स्थळ आहे. ह्यास टायगर बाम उद्यान असेही नाव आहे. हे रॉक-गार्डन असून डोंगराच्या उतरणीवर आहे. त्यात अनेक पॅगोडे, चिनी मूर्ति, धबधबे, निवडक फुलझाडे, फळझाडे लावलेली आहेत. साठ कोटी डॉलर्स खर्च करून तयार केलेलं हे उद्यान ह्या धनाढ्य व दानशूर माणसाने जनतेसाठी मोफत खुले ठेवले आहे. सध्या त्याची नात ह्या उद्यानातील एका प्रासादात रहाते. येथील स्वच्छता, टापटीप नजरेत भरण्यासारखी आहे. विशेषत: ॲबरडीन, ओशन पार्क, स्टॅन्ले मार्केट कॉजवे आणि रिपल्स हे तर स्वित्झर्लंडसारखेच आहेत. हाँगकाँगहून पेकींगची टूर आहे. पण ह्या टूरचा माणशी खर्च आठ दिवसांसाठी १२००० रु होता. त्यामुळे चंद्रावरूनसुद्धा दिसणारी जगातील सात आश्चर्यांपैकी एक चीनची भिंत पहाता आली नाही ही रुखरुख मनाला लागून राहिली. उरलेली सहा आश्चर्ये पिरॅमिड्स, स्फिन्क्स, ताजमहल, हँगिंग गार्डन्स ऑफ बॅबीलॉन, पिसाचा झुलता मनोरा एफेल टॉवर मी 'ह्याचि देही ह्याचि डोळा' पाहिली आहेत हेही नसे थोडके!

सूर्यास्त होताच शहरातील नवलाख दिवे लखलखू लागतात. लाल, हिरव्या, निळ्या, पिवळ्या जांभळ्या, गुलाबी रंगातील निऑन लाइटसच्या जाहिराती झगमगू लागल्यात. बंदराच्या दोन्ही किनाऱ्यावरील हॉटेल्समधून, बंदरातील चांदण्याचा सडा पाडणाऱ्या बोटीवरील लाइट्स सागराला दीपदान केल्याप्रमाणे लुकलुकत असतात. असं वाटतं काळ्याभोर मखमली अंधाराच्या डेरेदार वृक्षावर लाख लाख काजवेच चमचमत आहेत. ठिकठिकाणी प्रचंड मोठे 'आ' वासून जबडा पसरणारे महाकाय रंगीबेरंगी ड्रॅगन्स, रंगीबेरंगी भव्य पुतळे, उद्यानातही छोट्या छोट्या रंगीबेरंगी बल्बसच्या माळा सोडलेल्या

लखलखाट मोठा नेत्रदीपक असतो हा सगळा झगमगाट पाहून सहस्त्राक्ष इंद्राप्रमाणे आपल्याही देहावर हजारो डोळे का फुटले नाहीत? मयसभा अशीच असेल का? सुरलोक ह्याहून वेगळा काय असणार? रात्रीसुद्धा तरगती रेस्टॉरन्ट्स गजब ढाळत असतात ह्या साऱ्या आतिषबाजींमध्ये लोक नर्मविनोदाच्या फुलबाज्या, अनार सोडीत असतात त्याचे ते प्रसन्न उजळलेले फुललेले चेहरे पाहून वाटत, दु:ख, चिंता काळजी नावाच्या गोष्टींशी ह्या मडळींची तोंडओळख तरी आहे की नाही?

हाँगकाँग ही जगातील सर्वात स्वस्त व करमुक्त बाजारपेठ असल्याने जगाच्या कानाकोपऱ्यातून लक्षावधी प्रवासी दरवर्षी येथे येतात त्यामुळे जीवन विलक्षण गतिमान असते प्रवाशांचा कुभमेळाच येथे भरतो म्हणा ना! टी व्ही येथे साधारण ५०० रू पर्यंत मिळतो इलेक्ट्रॉनिक्स वस्तु, व्हिडीओ, कॅमेरे, मोटारी घड्याळे, पॉलिएस्टर साड्या, कपडे, परफ्युम्स, पाश्चात्य व पौर्वात्य दागिने, छत्र्या, पर्सेस, खेळणी ह्यांचा नुसता खच पडलेला असतो अस म्हणतात.'If you can't find it in Hong Kong it doesn't exist' तयार सूट आठ तासात शिवून मिळतो शिलाई फार स्वस्त असते कापडाचा बहुतेक सर्व धदा सिंध्याकडे आहे आता ह्यात सरदारजीही शिरले आहते हाँगकाँगला खरेदी नीट करायची असेल तर निदान ४/५ दिवस तरी पाहिजेत दुकाना-दुकानातून भावात खूप तफावत आढळून येतो ख्रिश्चन डाअर परफ्यूम ४०० डॉलर्स पासून २०० डॉलर्स पर्यन्त, चिनी छत्र्या १५ डॉलर पासून सहा डॉलरपर्यंत असे भाव, त्याच प्रतीच्या वस्तूंचे असू शकतात दागिन्याच्या दुकानात विक्रीच्या किमतीवर ७० % सूट म्हणून बोर्ड असतात अर्थात् प्रत्यक्ष किमत १/३ असू शकते

शॉपिंग सेंटर्स - सिम शात-सुई सिमशान सुई (पूर्व), सेंट्रल कॉजवे, स्टेन्ले मार्केट ही प्रमुख खरेदी केन्द्रे आहेत सिमशान सुई हा भाग नाथन् स्ट्रीटवर आहे ह्या भागात प्रत्येक इमारत ३०/४० मजली असून तिचा प्रचड विस्तार असतो हा सर्व भाग कवलूनमध्ये आहे तर हाँगकाँगमध्ये ऑफिसेस आहेत असे म्हणावे लागते प्रत्येक केन्द्राचे भाव निराळे असू शकतात आम्ही नाथन स्ट्रीटला एका मोठ्या दुकानात एक घड्याळ १२० डॉलर्सना पाहिले तेच घड्याळ सिमशात सुई (पूर्व) येथे ५९ डॉलर्सना होते नतर आम्ही चुगकिंग सेंटर मध्ये ते घड्याळ ७० डॉलर्सना पाहिले मी आपले अगाध व्यवहार ज्ञान पाजळण्यासाठी त्याचे ५९ डॉलर्स देईन असे मागितले आश्चर्य म्हणजे तोंडातील घास गपकन् गिळून (ती जेवत होती व आतापर्यंत आमच्या अनेक वस्तुंच्या भावाच्या चाभारचौकशाना फडतुस भारतीय म्हणून भाव न देता सथपणे रवथ करीत होती.) तत्परतेने घड्याळ पॅक करायला निघाली ह्यांनीही तितक्याच तत्परतेने खुलासा केला, आमचे कुटुम्ब ५० भारतीय रुपयांना (म्हणजे ३६ डॉलर्सना) ते घड्याळ मागतेय, शेवटी ४५ डॉलर्सना आम्ही घड्याळ घेतले

स्टेन्ले मार्केट हा समुद्र किनाऱ्यावरील एक कोळीवाडा आहे असे म्हणता येईल मला आपल्या करोल बागेतील आजमलखाँ मार्केटचे आठवण झाली छोट्या छोट्या

दुकानातून खूप स्वस्त वस्तू ठेवल्या होत्या, शुद्ध कॉटनचा अतिशय मुलायम असा टी शर्ट आम्हाला १० डॉलर्सना मिळाला (१६रु) आपल्याकडे साधा बनियनसुद्धा इतक्या स्वस्तात मिळणार नाही कवलून हाँगकाँगहून ह्या ठिकाणी बसने फक्त दोन डॉलर्समध्ये जाता येते शिवाय हॅपी व्हिला अॅबरडीन सारखी प्रेक्षणीय स्थळेही जाताना दिसतात

खरेदीच्या उन्मादाने लोक इतके बेभान होतात की वाटत, मुरारबाजी देशपांड्यासारखे त्याचे डोके उडवले तरी त्याची शरीरे खरेदीसाठी गरगर फिरतच रहातील खरेदीमध्ये लोकांच्या देहभान हरपण्याचे एक उदाहरण गंमत म्हणून सागते एक भारतीय बाई (बहुधा पजाबी असावी) एका दुकानाच्या शो-केसमधील दागिने पाहाण्यात इतकी मशगुल झाली होती की पाठीमागे वळून न पहाता नवरा समजून दुसऱ्याच एका माणसाचा हात खेचू लागली बिचारा बापडा, तो मनुष्य अवाक। भारतात बायका पुरुषांचा विनयभंग करतात की काय अशीही शंका त्याच्या मनाला चाटून गेली असेल खरेदीचा प्रत्येक क्षण बहुमूल्य आहे, वेळ थोडा आहे ह्याची जाणीव प्रत्येक प्रवाशाला असल्याचे दिसते सगळ्या जगातून येणारे प्रवासी बाजारावर तुटून पडतात पैसे देऊन होणारी ही लूटच नाही का? म्हणून हाँगकाँग म्हणजे लुटारूंचा कुंभमेळा वाटतो बरं दमवणूक झाली तर श्रमपरिहारासाठी खाद्यपेयाची रेलचेल। एका प्रचंड आइस्क्रीमच्या दुकानात केशरी, गुलाबी, हिरवी, पांढऱ्या, चॉकलेटी, बसती, इंद्रधनुषी रंगाची जवळ जवळ २०० प्रकारची आइस्क्रीम्स सुदर काचपात्रातून माडलेली होती लोक तेथेही हादडत होती तुटून पडणाऱ्या लोकांची तेथेही भाऊगर्दी।

हाँगकाँगमध्ये सात-आठ दिवस असे कापरासारखे फर्रर्कन् उडून गेले पहिले ४-५ दिवस मी बाहेरून आल्यावरच टी.व्ही समोर बसत असे पण शेवटचे २/३ दिवस मी दिवसासुद्धा टी.व्ही समोरून हलायला तयार नसल्याचे पाहून हे जाम वैतागले, 'हाँगकाँगला येऊन फक्त टी.व्ही समोर ठाण माडण्यासाठी एवढा पाण्यासारखा पैसा खर्च केला का?' असा ह्यांचा रोकडा सवाल ऐकून शेवटी मी गौप्यस्फोट केला, 'अहो, खोलीच्या बाहेर लक्ष्मण-रेषा ओलांडून बाजारात गेले ना की सारख काही ना काही तरी घ्यावेसे वाटते आणि अशी अमर्याद खरेदी शक्य नाही हे पण कळते त्यापेक्षा खोलीतच बसलेले परवडते' हो, दृष्टीआड सृष्टि ह्यांना कदाचित् गहिवरून आले असावे की आपण आगाखानचा नातू का झालो नाही? निदान विलीचा मुलगा तरी

अशा ह्या अलीबाबाच्या गुहेतील ४१ वा चोर बनून आम्ही परत त्या बेकार कॅथे पॅसिफीकने सिगापूरला निघालो हाँगकाँगमध्ये खरेदीला सर्व पैसे सपले तर एअर पोर्ट टॅक्स (माणशी १२० डॉलर्स) द्यायला पैसे रहाणार नाहीत ह्या सभाव्य धोक्यासाठी हाँगकाँग टूरिस्ट अॅथॉरिटी नेहमी एअरपोर्ट टॅक्सचे पैसे आधीच वेगळे काढून ठेवा अशा सूचना देणारे बोर्ड सर्वत्र लावून फार मोठे औचित्य दाखवते ह्यातच हाँगकाँगचा थोर महिमा आला, नाही का?

* * *

# जीवन में एक बार.... !

'पृथ्वीच्या पाठीवरील' अत्युच्च शिखरावर पाऊल ठेवणारा पहिला मानव म्हणून जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी आपले नाव कोरले जाईल' अशा आत्मसतुष्टीने तेनसिंगने आपला झेंडा रोवला आणि हाशहुश्श करीत निवान्तपणे इकडे तिकडे नजर टाकली पहातो तर एक अप्पुस्वामी हातात गरमागरम डोसा व वाफाळणाऱ्या साबाराची वाटी घेऊन स्वागतासाठी उभा असा, उडपी हॉटेलवर एक विनोद लहानपणी वाचला होता त्याचप्रमाणे जगात कोठेही उकडलेला भात व चटई पसरण्याची जागा असेल तर आपल्या स्वागतासाठी मद्रासी असणारच, पण एकटा दुकटा नव्हे तर फार मोठ्या संख्येने ही गोष्ट सिंगापूरच्या चागी (Changi) विमानतळावर उतरताक्षणीच आमच्या लक्षात आली खरोखर सिंगापूर हे भारतात नसलेले तामिळनाडू आहे

सिंगापूरचा 'चांगी' विमानतळ हा अगदी अद्यावत् आहे तेथील प्रचड प्रमाणातील मद्रासी कर्मचाऱ्यामुळे आपण मद्रासच्या विमानतळावरच आलो आहोत असे वाटते हा विमानतळ अतिशय आकर्षक व सर्व आधुनिक सुखसोईनी परिपूर्ण आहे शंभर खिडक्यांवर इमिग्रेशनचे काम करणारे सर्व कर्मचारी तामिळ होते सिंगापूरहून बाहेर जाण्याचे तिकीट असेल तर हाँगकाँग प्रमाणेच येथेही ताबडतोब विनामूल्य व्हिसा देतात प्रवासी कोण व तस्कर कोण हे कर्मचाऱ्याच्या सराईत नजरेला लगेच कळते आमच्याकडे पाहून कस्टम अधिकाऱ्यानी आमच्या सामानाला बोटही न लावता आम्हाला सोडले विमानतळावर हॉटेल्स, टॅक्सी, प्रवासी केन्द्रांची कार्यालये आहेत 'सिंगापूरला हॉटेल्स फार महाग आहेत व विमानतळसुद्धा खूप लांब आहे (२० किलोमीटर) तेव्हा तुम्ही गेस्ट हाउसमध्येच रहा व बसने गावात जा ' असा सल्ला आम्हाला हाँगकाँग सोडताना देण्यात आला होता तरीपण हॉटेल कार्यालयात हॉटेलचे दर पाहिले, व दोन माणसांच्या वातानुकूलित खोलीचा दर कमीत कमी ६४ सिगापूर डॉलर्स होता (१ सिंगापूर डॉलर = ५ ८० रू.) ह्या हॉटेलचे नाव 'ब्रॉडवे' होते व आम्ही बसनेच जाण्याचे ठरविले सिंगापूरला बस सर्व्हिस फार चागली आहे व स्वस्तही आहे जास्तीत जास्त तिकीट ८० सेंट्स एका सिलोनी मुलाने आम्हाला ब्रॉडवे दाखविले A C. अटॅच्ड बाथ, टीव्ही सकट ५० डॉलर्सना खोली मिळाली. चहापाणी झाल्यानंतर आम्ही World Cup पहाण्यात दग झालो. रात्री एक डॉलरमध्ये ढीगभर गरमागरम भात व भरपूर चिच व नारळाच्या रसात शिजविलेले आंबट तिखट सरग्याचे कालवण खाऊन परत World Cup पहात बसले.

'सिंग-गा-पोर' (Sing- ga-por) सिंग-अपोर (Sing apor) सिग अ पोर (Sing a por) हे दक्षिणपूर्व आशियातील एक स्वतत्र राष्ट्र आहे. हे ब्रिटीश वसाहतीचे व पूर्वेच्या लष्करी महत्त्वाचे ठाणे असलेले बेट आहे ह्याचे क्षेत्रफळ २२४५ स्क्वेअर मैल असून

जोहरच्या अगदी चिंचोळ्या सामुद्रधुनीने ह्याला मलाया द्विपकल्पापासून वेगळे केले एका दगडी कमानीच्या आत बरीच बेटे आहेत मलाक्काच्या सामुद्रधुनीने ह्यास सुमात्रापासून अलग केले

उत्तराकडील पाणथळ व दलदलीच्या प्रदेशामुळे ह्या बेटाचे चार विभाग झाले (१) मध्यवर्ती प्रदेश - बकीट-तिमाह जंगलाने आच्छादित (२) पश्चिमेकडील भाग कमी उंचीच्या टेकड्यांचा प्रदेश जंगलामुळे अलग झालेला हा अविकसित प्रदेश असून येथे घनदाट जंगले आहेत येथे रबर व भाजीपालाही लावण्यात आला आहे (३) पूर्वेकडील प्रदेश-येथे नारळाची लागवड करण्यात आली आहे (४) उत्तरपूर्व व दक्षिणेकडील रोडवर पाश्चात्य पद्धतीने बांधलेली वसाहत परंतु येथे चिनी लोक जास्त संख्येने रहातात पश्चिमेला काजी-जूरंग नद्यांवरील वसाहती आणि पूर्वेकडील सेरंगून कलांग नद्यांवरील वसाहती ह्या पुरामुळे तीन अलग बेटात विभागल्या जातात आधुनिक बंदरे व गोद्यांमुळे सिंगापूर नदीच्या मुखावरील टेकड्यावर वसलेले मूळ सिंगापूर शहर मनुष्यवस्ती वाढविण्यास मदत करते पूर्वेकडील जोहर सामुद्रधुनीवरील खोल पाण्यात नौदलाची उभारणी होते

सिंगापूर हा सिंहांचा देश आहे ह्याचे प्रतीक म्हणून खाडीवर सिंहाचा प्रचंड पुतळा आहे (Merlion) ह्याच्या डोळ्यातून व मुखातून रात्री झगझगीत प्रकाश झोत बाहेर पडत असतो सातव्या शतकामध्ये सिंगापूरचे नाव तेमासेक (समुद्रातील शहर) असून ते सुमात्राच्या श्रीविजय साम्राज्यातील एक महत्त्वाची बाजारपेठ होती १३ व्या शतकापर्यंत ते त्याच्या तीन राज्यांपैकी एक झाले एक आख्यायिका आहे- पालेंबंग (Palembang) चा राजपुत्र संगनील ह्या बेटावर आला असता त्याला एक विचित्र प्राणी दिसला त्याचे शरीर अतिशय बांधेसुद व सुंदर होते धड चमकदार लाल रंगाचे व शिर काळेभोर होते) त्याला वाटले तो सिंह आहे पण तो तेथील वाघ असावा त्यावरून ह्या बेटाचे सिंगापूरा (सिंहाचा देश) असे संस्कृत नाव रूढ झाले

चौदाव्या शतकापर्यंत सिंगापूर हे फक्त सिंगापूर नदीच्या मुखावरील एका खोदलेल्या दगडाच्या रुपातच अस्तित्वात होते जावा सुमात्राचे राजे चिनी आरमाराबरोबर ह्या प्रदेशावरील सार्वभौमत्त्वासाठी झगडत होते तेव्हा चीनचा अॅडमिरल 'चेंग-हो' हा होता त्यानंतर पुढील शंभर वर्ष सिंगापूर शहराचा विध्वंस होऊन तेथे घनदाट जंगल पसरले संपूर्ण १६ व्या शतकात डच, पोर्तुगीज, ब्रिटीशांनी येथे भेटी दिल्या तरीही सिंगापूर अज्ञाताच्या पडद्यामागेच राहिले १९ व्या शतकाच्या प्रारंभी फोर्ट कॅनिंगच्या किल्ल्यामध्ये मजा पाहीतची दोन सुवर्ण कंकण व इतर अलंकार मिळाले सन् १५५७ मध्ये डी-अलबुकर्कच्या नाजायज मुलाने गोव्याला पाठविलेल्या एका पत्रात

सिंगापूरचे 'a large and populour town as is attested by the great ruins visible still today' असे वर्णन केले आहे सन् १८११ मध्ये जोहारमधील १०० मलायी लोक आपल्या स्थानीय नेत्याच्या-तेमेग्गाँगच्या नेतृत्त्वाखाली सिंगापूर नदीच्या किनाऱ्यावर येऊन स्थायिक झाले सन १८१९ मध्ये सर थॉमस स्टॅमफोर्ड रॅफल्स सिंगापूरला ब्रिटीश कॉलनी वसविण्यासाठी व व्यापार वाढविण्यासाठी आला त्याने तेमेग्गाँगकडून जमिनीवरील अधिकार मिळविले आपल्या नऊ महिन्याच्या वास्तव्यात त्याने सिंगापूरला फ्री पोर्ट बनवून शहराचा विकास करण्याचे व त्यास दक्षिण पूर्व आशियातील एक प्रचड मोठी आतरराष्ट्रीय बाजारपेठ बनविण्याचे धोरण स्वीकारले सिंगापूर हे रॅफल्सचे राजकीय अपत्य बनले अर्थात् डच लोक त्याचे प्रतिस्पर्धक होतेच १८२४ मध्ये सिगापूर पूर्णपणे ग्रेट ब्रिटनला मिळाले व सुमात्रा डचाना मिळाले १९ व्या शतकात इस्ट इंडिया कपनीच्या ताब्यात सिंगापूर गेले व त्याचा व्यापार इतका फैलावला की ती दक्षिण पूर्व आशियातील सर्वात मोठी बाजारपेठ बनली चीनहून बोटी भरभरून चहा, चिनी मातीची भांडी, सिल्क व इतर मूल्यवान पदार्थ येत, इडोनेशियातून कापूर, शिसवीचे लाकूड, हस्तीदत, बोर्निओ, जावा सुमात्रातून मीर, लवगा, दालचिनी वगैरे मसाल्याचे पदार्थ, सुकामेवा, ब्राटिक टेक्स्टाइल्स येत असे जवळ जवळ ११० वर्षे ब्रिटीश कॉलनीने येथे सत्ता, वैभवाचा मनमुराद उपभोग घेतला सन् १९४२ मध्ये दुसऱ्या महायुद्धात विजेत्या जपानने ह्याचा ताबा घेतला १९४६ मध्ये सिंगापूरमधील नव्या पिढीने स्वायत्त सत्तेची जोरदार मागणी केली तीन जून १९५९ रोजी सिंगापूर एक स्वतत्र स्वायत्त राष्ट्र झाले आणि ली-काउन-यू हा एक अत्यत बुद्धिमान तरूण, धडाडीचा वकील सिंगापूरचा पंतप्रधान झाला सप्टेंबर १९६३ पासून ९ ऑगस्ट १९६५ पर्यंत सिंगापूर मलेशियन फेडरेशनचा एक भाग बनले, त्यानतर ते स्वतत्र लोकतत्र राष्ट्र म्हणून उदयास आले

सिंगापूर शहराचा दक्षिण किनाऱ्यावरील ३१ स्क्वे मैल भाग औद्योगिक व व्यापारी केन्द्र आहे, सर्वोच्च स्थान बूकीत तिमाह (५८१ फूट) आहे विषुववृत्ताहून उत्तरेकडे १०० मैलापेक्षाही कमी अंतर असल्यामुळे सिगापूरला उष्ण व दमट हवामान असते तापमान ७५ फॅ कमी व जास्तीत जास्त तापमान ८८ फॅ असते तसे हवामान बारा महिने एकच असते केवळ वाऱ्याच्या दिशा बदलल्या तर थोडा फार फरक पडतो त्यावेळी वादळे होतात येथे वर्षाला १०० इच पाऊस पडतो

सिंगापूरची लोकसख्या २५ लाख आहे त्यातील ७७% चिनी, १५% मलय, ६% भारतीय व पाकिस्तानी, २% युरेशीयन किंवा युरोपीयन्स आहेत सन् १८२१ मध्ये अमोयहून पहिला चिनी लोंढा येथे आला हॉकॉन्स व फुकेनहून व नंतर उत्तर क्वातुगहून हंक्का, केजीआ, खेहा ह्या भटक्या चिनी जमाती व दक्षिणेकडून कॅन्टोनेस वगैरे अनेक

चिनी जमाती येथे येऊन स्थायिक झाल्या व प्रत्येकीने व्यापाऱ्यांच्या एका विशिष्ट शाखेवर एकाधिकार केला येथील बहुतेक सर्व शिंपी, बूट बनविणारे, सुतार, लोहार कॅन्टोनेस व हक्काज् आहेत ली कींग सारखा व्यापारी आपल्याकडील कमरेच वस्त्र व लोटा घेऊन मारवाड सोडणाऱ्या व कलकत्ता-मुंबईला येऊन सुलेखा-दालमिया बनणाऱ्या व्यापाऱ्यांप्रमाणे अक्षरश अनवाणी पायाने सिंगापूरला आला व घाम गाळून आज तो रबराच्या व्यापाराचा अनभिषिक्त राजा बनला असून सिंगापूर युनिव्हर्सिटीचा कुलपती आहे

सिंगापूरमधील दुसरा मोठा समूह येथील मूळच्या रहिवाशांचा म्हणजे मलय लोकांचा आहे कित्येक शतकांपूर्वी अरबी संस्कृतीच्या प्रभावामुळे हे लोक इस्लामी धर्माचे झाले आहेत त्यांच्या जीवनावर धार्मिक शिकवणुकीचा आणि पारंपारिक मूल्यांचा चांगलाच पगडा असलेला दिसून येतो अत्यंत कर्मठ व सनातनी असले तरी हे लोक उत्सवप्रिय व आनंदी आहेत काम्पोंगला आपल्याला हे लोक खेड्यापाड्यांत उंच उंच बांबूवर बांधलेल्या (पूरापासून बचाव करण्यासाठी) लाकडी घरात रहाताना आढळतील मलायी स्त्री टाइट फीटींग असलेल्या (केबाया) कुर्त्यांवर एक लांब बाह्यांचे सैलसर जाकीट (बाजूकुरंग) घालते पुरुष सुद्धा सैलसर पॅटवर कॉलर नसलेले जाकीट (बाजू कुरंग) अशा आपल्या पारंपारिक वेषात आढळतात लग्नकार्यात किंवा धार्मिक उत्सवात (हरि राया पुसा) ते सर्वजण कमरेला एक सुंदर भरतकाम केलेले रेशमी वस्त्र (कैन साँगकेट) बांधतात

येथे आलेल्या भारतीयांपैकी बहुतेक दक्षिण भारतातून आलेले आहेत गुजराथी, सिंधी, शीख, पार्शी, सिलोनी सुद्धा आहेत सन् १८२५ नंतर ब्रिटीशांनी मोठ्या प्रमाणात येथे भारतीय मजूर आणले त्यांनी दलदल बुजवली, रस्ते, ब्रिजेस, सार्वजनिक इमारती, गव्हर्मेंट हाउस बांधले, सेंट अॅन्ड्रयूज् कॅथेड्रल बांधले त्यानंतर कारकून, अध्यापक, व्यापारीसुद्धा मोठ्या प्रमाणात आले येथे आपणांस फर्नांडीस, डिसूझा, परेरा, डीसील्व्हा सारखे हजारो पोर्तुगीजसुद्धा आढळतील मलाक्कामध्ये अशा मोठमोठाल्या पोर्तुगीज कॉलनीज आहेत, तेथील व गोव्यातील पोर्तुगीजांनी आशिया, भारतातील लोकांशी विवाहसंबंध प्रस्थापित करून नवीन पिढी तयार केली आहे येथे फ्रेंच, डच, बेलजियन्स सुद्धा आहेत

सिंगापूरला शेती विशेष होत नाही फळे मात्र विपुल प्रमाणात होतात डुरीयन (हे फुटबॉलच्या आकाराचे फणसासारखे काटेरी फळ असते) चिक्कू, सीताफळ, रामफळ, फणस, अननस, ताडगोळे, कलींगड, पपया (हे मूळ दक्षिण अमेरीकेतील फळ स्पॅनिश लोकांनी फिलीपाइन्सला आणले मग ते संपूर्ण दक्षिण पूर्व आशियात पसरले) बाजारात ३० सेंटला कापून, मीठ मीर भुरभुरवून फळ मिळतात फळांचे रसही भरपूर प्रमाणात व

स्वस्त मिळतात दुकानातून तर फुकट सुद्धा देतात

सर स्टोमफोर्ड रॅफल्सने सिंगापूरला आशियातील एक मोठे इम्पोरियम बनविले येथे प्रचंड प्रमाणात व्यापारी उलाढाली सुरू झाल्या इस्ट इंडीजहून, ब्रह्मदेशाहून, तांदूळ, थायलंडहून तांदूळ, टीक मलायाहून रबर आणि टीन, बोर्निओ व सुमात्राहून तेल एवढेच नव्हे तर युरोप, अमेरीका व पूर्वेकडील देशाहून अनेक प्रकारचा तयार माल येथे येऊ लागला जरी राजकीय दृष्ट्या हे मलायापासून अलग झाले असले तरी एक प्रमुख बंदर, प्रदीर्घ समुद्रपर्यटनामधील एक महत्त्वाचे जंक्शन, व प्रमुख व्यापारी केन्द्र म्हणून मलाया, दक्षिण पूर्व आशिया व इस्ट इंडिजच्या दृष्टीने ह्याचे फार महत्त्व होते १९५२ मध्ये सिंगापूरची आयात २८४९ लाख डॉलर्स व निर्यात २५४३ डॉलर्स पर्यंत पोहोचली. इंडोनेशिया, यू.के. व अमेरीका ह्या त्याच्या प्रमुख परकीय बाजारपेठा होत्या ह्याशिवाय सिंगापूरला अनेक स्थानीय उद्योगधंदेही आहेत. रबर मिल्स व रबराचे उत्पादन, मलाया चीन व दक्षिण अफ्रिकेतून आलेले टीन वितळविणे, वगैरे काम चालते ज्यूट मिल्स, तेलाच्या गिरण्या, प्लायवूड, फॅक्टरीज, अननसाचे पॅकबंद डबे करणे इमारतीच्या बांधकामास लागणाऱ्या साहित्याचे उत्पादन, मोटार कोच, इंजिनियरींग व फाउंड्री वर्क्स असे बरेच उद्योगधंदे येते चालतात

सिंगापूरची अर्थव्यवस्था फ्री-पोर्ट तत्त्वावर आज शतकानुशतके भरभराटीस आली आहे औद्योगिक सुरक्षितता आणि उत्कृष्ट कार्यक्षमता ह्यांचीही येथे उत्तम जोड मिळाली आहे फळबागा, नारळ, तंबाखूचे उत्पादन, कोंबड्या पाळणे, मासेमारी हेही महत्त्वाचे उद्योगधंदे आहेत

चिनी, तामीळ, मलायी, व इंग्लीश माध्यमाच्या अनेक सरकारी व खाजगी शाळा येथे आहेत, एकूण लोकसंख्येच्या २/३ भाग साक्षर आहे. 'युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर' ही सरकारमान्य व इंग्रजी माध्यम असलेली युनिव्हर्सिटी आहे 'नानयांग युनिव्हर्सिटी' मध्ये चिनी माध्यम आहे

सिंगापूर मध्ये ४९५ मैल लांबीचे सुंदर रेशमी डांबरी रस्ते सुळसुळीत असतात १६ मैल लांबीचा रेल्वेमार्ग मलाया व थायलंडशी जोडलेला आहे सिग्नल न बघता रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यास ५० सिंगापूरी डॉलर्स दंड होतो टॅक्सीज (वातानुकुलीत) बसेस उपलब्ध आहेतच पण साइट सींइंगसाठी भाड्याने कार्ससुद्धा मिळतात आपल्याला स्वत:ला कार चालवायची असेल तर इंटरनॅशनल कार-लायसन्स लागते, क्वचित् आपल्या देशातील लायसन्ससुद्धा पुरेसे होते येथील चांगी आंतरराष्ट्रीय विमानतळ जगातील महत्त्वपूर्ण चाळीस हवाई मार्गांशी जोडलेला आहे जवळ जवळ १० लाख प्रवासी दर वर्षी चांगी आंतरराष्ट्रीय विमानतळामधून प्रवास करतात बहुतेक देशात टॅक्सीज, कार्समधून टेलीफोनची सोय असतेच पण सिंगापूरच्या दूरसंचार

खात्याने हल्ली 'स्कायफोन' ही अत्याधुनिक सेवा आता विमानातील प्रवाशांसाठी सुरु केली आहे पॅसिफीक महासागराच्या परिसरातील देशातील दूरध्वनी विमानातील दूरध्वनीने जोडले जाऊ शकतील विमान उडत असता आतील प्रवासी ह्या खास संचाद्वारे मजेने आपल्या बायका पोरांशी गप्पा मारू शकतील सिंगापूर-मलेशियाची रहदारी म्हणजे मुंबई-पुणे प्रवासासारखी म्हणता येईल सीझन तिकीटाने जसा पुणे-मुंबई प्रवास होतो त्याप्रमाणे सिंगापूर-कुलालामपूर (मलेशियाची राजधानी) फ्लाइटची सीझन तिकीटे असतात ह्यास 'शटल-सर्व्हिस' म्हणतात! मलेशिया, थायलड, इंडोनेशिया ह्या देशावर सहज डोळा ठेवता येईल असे सिंगापूर हे महत्त्वाचे ठिकाण आहे २५ लाख वस्तीचे हे बेट गगनचुबी इमारतींनी गजबजलेल आहे न्यूयॉर्कच्या मॅनहटन विभागाची आठवण येते

सिंगापूर हे नाव वनराज सिंहावरून पडले हे प्रथमच सागितले सिंगापूर नदीवर ८ मीटर उचीचा सिंहाचा भव्य पुतळा बेटाच्या 'रक्षका' च्या स्वरूपात उभा आहे (Merlion) हा अर्धा सिंह व अर्धा मासा आहे सिंगापूरच्या प्रतीक स्वरूपात असलेल्या ह्या सिंहाच्या मुखातून व डोळ्यातून प्रखर वीजेचे झोत सोडण्यात येतात ह्याच्या सभोवती मोठा पार्क आहे ह्याच पार्कमध्ये 'जीवन में एक बार आना सिंगापूर' ह्या गाण्याचे शूटिंग झाले तेथून जवळच असलेल्या रोटन स्ट्रीटवर ट्रॅव्हलर्स चेक बदलून आम्ही समोर असलेल्या फिरत्या मनोऱ्यावरच्या हॉटेलमध्ये चहा घेत, सबंध सिंगापूरचे दर्शन घेतले ——ते अमेरिकन चर्च, 'तान-योक-नी' चे घर, नॅशनल म्युझियम, रॅफल हॉटेल, पार्लमेंट हाउस, व्हिक्टोरिया मेमोरियल——इ चे

सिंगापूरमध्ये उत्तमोत्तम चर्चेस, मदिर, बुद्ध मदिर, मशिदी अगदी गुण्यागोविन्दाने हातात हात घालून नादतात अब्दुल गफूर मॉस्क, अल-अब्रार मॉस्क हे बघण्यासारखे आहेत १८२३ मध्ये सेंट ॲन्ड्र्यूज चर्च स्वत रॅफलसने बांधले ह्याच्यावर दोनदा वीज कोसळली होती. ह्याच्या आतील भिती मद्रासी चुन्याने बनविल्या आहेत त्या इतक्या टणक आहेत की त्यावर ओरखडासुद्धा काढता येत नाही

टॅन्क रोडवरील चेट्टीयार हिंदू मदिर भारतातील चेट्टियार (सावकार) लोकांनी बाधले हे मंदिर म्हणजे भारतीय शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे त्याचे गोपुर २३ मीटर उंच आहे छत तर अनुपम सुदर आहे कमल पुष्प व लखलखत्या झुंबरांनी सजविलेल्या ह्या छतावर काचेची ४८ तावदाने असून त्यावर अनेक देवीदेवतांची चित्रे काढलेली आहेत सूर्योदय व सूर्यास्त दोन्ही वेळी सूर्याची किरणे परावर्तित होऊन छतावर असख्य अग्निपुष्प तेजाळतात प्रार्थनेच्या वेळी भारतीय संगीत व तबला वादन असते

सिआँग लीम मदिर हे सिंगापूरातील एक मोठे बौद्ध मंदिर आहे १८९८ ते १९०८ ह्या काळात दोन धनवान हॉकीन व्यापाऱ्यानी हे बाधण्यास आर्थिक सहायता केली

ह्यामध्ये थायलंड बुद्धाच्या सुदर प्रतिमा खोदण्यात आल्या आहेत ह्या मंदिराचे संपूर्ण नाव 'लीन शान शिआँग लीम शान झे' असे आहे ह्याचा अर्थ 'कमल पर्वतावरील बुद्ध मंदिर' ह्यामध्ये बोधिवृक्षराईमधील बुद्धाचा जन्म व दोन बोधिवृक्षामधील त्याच्या मृत्यूचे चित्रण करण्यात आले आहे रेसकोर्स रोडवरील 'साक्यमुनि बुद्ध गया' मंदिरामध्ये असख्य दिव्यांच्या लखलखाटातील बुद्धाचा १५ मीटर उंचीचा पुतळा आहे बुद्धाच्या जीवनातील अनेक संस्मरणीय प्रसंगाचे चित्रण येथे करण्यात आले आहे

ह्याच रस्त्याच्या पलिकडे ली ऑंग सॅन सी मंदिर आहे, ह्यास गुआन यीन (बोधीसत्त्व अवलोकितेश्वर) असेही म्हणतात ह्याच्या पवित्र वेदीवर अतिशय सुंदर फुलं खोदण्यात आली आहेत ह्या मंदीराच्या प्रवेशद्वाराजवळ दगडाचे सिंह रक्षक म्हणून उभे आहेत ह्याच्या गोलाकार खिडक्याना दिर्घायुष्य व सद्भाग्याचे प्रतिक म्हणून बाबूच्या कलाकृती लावण्यात आल्या आहेत

थिऑन हॉक केंग मंदिर (स्वर्गीय सौख्याचे मंदिर) हे तेलोक अयर स्ट्रीटवर आहे हा रस्ता एकेकाळी समुद्राचे प्रवेशद्वार होता सिंगापूरला आलेले नवागत प्रवासी आपल्या नव्याघरी सुखरूप, सहीसलामत पोहोचविल्याबद्दल ईश्वराचे आभार मानीत असत हे मंदिर १८४१ मध्ये पूर्ण झाले थिऑन हॉक केंग हे सिंगापूरमधील सर्वात प्राचीन चिनी मंदिर ह्या मंदिरामध्ये 'मा चाऊ फो' ह्या चिनी समुद्र देवतेचा सालंकृत पुतळा आहे हा पुतळा म्हणजे मंदिरातील असख्य कलाकृती व ऐतिहासिक नामावलींच्या खजिन्यातील एक महत्त्वपूर्ण कलाकृती आहे मंदिराच्या संस्थापकाची दीडशे वर्षापूर्वीची जुनी पिढीजात लेखशिला व कोनशिला येथे आढळून येते मंदिरात मोठे मोठे काळयाभोर लाखेने रंगविलेले ग्रेनाइटचे चमचमणारे खाब आहेत ह्या खाबाना मोठमोठ्या अक्राळविक्राळ दानवानी वेढले आहे

सिंगापूरमध्ये जवळ जवळ सहा महिने सतत पाऊस पडत असल्यामुळे सर्वत्र हिरवेगार,टवटवीत वातावरण असते विविध फुलानी डवरलेली विविधरंगी आकाराच्या कलाकृतींची सजविलेली असख्य उद्याने पर्यटकाच्या स्वागतासाठी खुल्या दिलांनी उभी असतात!चायनीज गार्डन (यू-हवा-यॉन) मध्ये जाताच आपण आपोआप भूतकाळाकडे खेचले जाऊन सग घराण्याच्या साम्राज्यात प्रवेश करतो पाच लाख डॉलर्स खर्च करून तेरा हेक्टर जमिनीवरील हे उद्यान पेकींगमधील उन्हाळी राजवाड्याची आठवण करून देते प्रवेशद्वाराची सप्तरंगी इन्द्रधनुषी नक्षीदार कमान, बाकदार ब्रीज पॅगोडाच जवळ विशाल प्रांगणातील थुई थुई नाचणारी कारंजी, त्यात फुललेली कमळ तळयामध्ये बोटींग, पॅडलींगची सुद्धा सोय आहे

जपानी गार्डन (सै वा एन) Garden of Tranquility हे जपान देशाबाहेरील जपानी संस्कृतीचे द्योतक असलेले मोठे गार्डन आहे ह्या गार्डनमध्ये मोठ्या कुशलतेने

जपानी वातावरण निर्मिती करण्यात आली आहे झुडपं,टेकड्या कलात्मकतेने बसविलेले दगडी कंदील,उत्साहाने खळाळणारी चहा फराळाची दुकाने,सर्व अतिशय साधेपणाने साकार केले आहे ह्या दोन्ही गार्डन्सची प्रवेश फी ५० डॉलर्स (सिंगापूरी) असून सकाळी ९ ते सध्याकाळी ६ पर्यंत ही खुली असतात

टायगर बाम उद्यानामध्ये (हॉ पार व्हीला) हाँगकाँगसारखीच राजघराण्याची चित्रे चितारली आहेत शिवाय बुद्धाचे विभिन्न मुद्रेतील मोठमोठे रंगीत पुतळे,वाघ,सिंह आदि जनावरांचे पुतळे,चिनी पुराणातील प्रसंग व व्यक्ती,मोठमोठे अक्राळविक्राळ ड्रॅगन्स येथे ठिकठिकाणी उभारले आहेत.

बॉटनिकल गार्डनसुद्धा ३२ हेक्टर जमिनीवर बनविले असून घनदाट जगल हिरव्यागार मखमली दुलदुलीत लॉन्स, स्फटिकासारख्या विशाल जलाशयांनी परिपूर्ण आहे तळ्यामध्ये चिनी बदके व शुभ्र राजहंस डौलात विहरत असतात, आत जगलामध्ये ५० मीटर उचीची घनदाट झाडी आहे ह्या गार्डनमध्ये २५० विभिन्न जातीची २५०० झाडे आहेत १८७७ मध्ये सर् हेन्री रीड्लने ब्राझीलहून आणलेले रबराचे झाड येथे लावले ह्या नमुन्यातून पुढे मलेशियन रबर व्यवसायाची भरभराट झाली

जू रोंग बर्ड पार्कसुद्धा प्रेक्षणीय आहे वीस हेक्टर जमिनीवर ३००० च्या वर सख्येतील पक्षाची रहाण्याची व्यवस्था करण्यात आली असून जगातील ३०० जातीचे पक्षी येथे अगदी गुण्यागोविंदाने नादतात ह्याच पार्कमध्ये तीस मीटर उच एक धबधबा आहे आम्ही गेलो तेव्हा नुकत्याच कोसळलेल्या पावसाच्या सरीने सारी वनश्री सुस्नात झाली होती सर्वत्र नव्या पालवीच्या रेशमी सळसळीचा हर्षकल्लोळ, जिकडे बघावे तिकडे वृक्ष-वल्लींच्या रूपाने फवारणारी जीवनरसाची हिरवी कारंजी थुईथुई थिरकत होती मेघ घुणघुणत होते वारा रुणझुणत होता दूरवर कुणीतरी पूरिया राग वाजवीत होता. रगीबेरगी मेघ स्वच्छन्दपणे विहरत होते गरूड,बहिरी ससाणे,काकाकुवा,पारवा, बुलबुल,मोठ्या चोंचीचे रगीबेरगी पक्षी— अरे ! तो अत्यत तेजस्वी रंगाचा,गळ्यावर निळ्याशार वीजेची झळाळी असलेला काळ्या हिऱ्यासारख्या गहिऱ्या नेत्राचा पक्षी कोण बरे ? ह्या पक्षाचा 'बर्ड शो' ही दाखविला शिवाय 'पोपटाची सर्कस' ही प्रेक्षणीय असे

सिंगापूरची 'झूलॉजीकल गार्डन्स' ही फार प्रेक्षणीय आहेत सिलेटर रिझर्व्हायरमध्ये ९० हेक्टर जमिनीवर अगदी शांत वातावरणात हा खुला जुहू आहे जवळ जवळ १७० विभिन्न जातीचे १६०० शेच्यावर प्राणी असून ६० विभिन्न विभागात त्यांची रहाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे जलाशयाच्या लाटांनी धरलेल्या तालात विहरणाऱ्या बदकाचे गभीर हुकार, हिरव्या कुरणात चरणाऱ्या नीलगाईच्या गळ्यातील घंटानाद कानाला मोहवीत होता, अमेरीकन रानमांजरे झाडाच्या मोठ्या खोडापाशी गुरगुरत होती दुरूनच एक नीलघोडा येताना दिसला कसा धुष्टपुष्ट व रेखीव, रूंद मानेवरील काळी

आयाळ निमुळता झळाळणाऱ्या केसाचा पुंज अजठ्यातील चित्रातील झुंजणाऱ्या बैलाची आठवण करून देणारे चित्ते, सैबेरीयन टायगर्स, तिबेट मलायन रानडुक्कर, काळभोर दाण्या वाघ, त्याचप्रमाणे डौलदार शुभ्र मोर, गुणी गोंडस हरिणशावकेसुद्धा

सिंगापूर जुहू प्रसिद्ध आहे आपल्या उत्तान ऑरग उतान ह्या बोर्निओ-सुमात्रामधील एप माकडाच्या संगोपनाबद्दल जगातील कुठल्याही जुहूपेक्षा ह्या जातीच्या माकडाची येथे फार मोठी वसाहत आहे दर मगळवारी व शनिवारी सकाळी तुम्ही ह्यापैकी एका मर्कटाबरोबर ब्रेकफास्ट घेऊ शकता ती काळीभोर माकडं डीनर सूट चढवल्याप्रमाणे दिसतात, डौलदार चालीने ती तुमच्या टेबलाजवळ येतील, आदबीने वाकून शेकहँड करतील तुम्ही त्यांना सीट ऑफर केल्यावरच खुर्चीवर बसतील खाताना त्यांची लखनवी नज़ाकत बघण्यासारखी असते.

सकाळी ९ ॥ वाजता हत्तींच्या कळपाच्या स्नानाचा कार्यक्रमही बघण्यासारखा असतो हत्ती इतका विनोदी, खेळकर, खट्याळ, अवखळ, खोडकर प्राणी दुसरा कोणी नाही सोंडेत पाणी भरून कधी कोणा सुंदरीला नेम धरून सचैल स्नान घडवील ह्याचा काही नेम नाही बिचारीला, ना मारो पिचकारी म्हणून विनविण्याचे सुद्धा भान रहात नाही थायलंडप्रमाणे येथेही क्रोकोडाइल फार्म आहे शेकडो सुसरी, मगरी, साप, पाली ह्यांचे कातडीसाठी सगोपन केले जाते दर रविवारी सकाळी आठ वाजता एखाद्या कॉफीशॉपच्या दाराशी पक्षाचे असंख्य पिंजरे घेऊन येऊन एखादा पक्षीवाला एक अपूर्व सगीताची महफिल रगवितो

सिंगापूरहून जवळपासच्या चांगल्या टूर्स म्हणजे कुकुप व मलक्का कुकुपची टूर सोमवार, बुधवार, शुक्रवार व रविवारी असते ह्यासाठी मलेशियाचा व्हिसा लागतो मलेशियाची सीमा ओलांडल्यानंतर जोहरच्या सुलतानाचा राजवाडा लागतो मग मलेशियातील तो सुप्रसिद्ध गवताळ प्रदेश येथे आपल्याला एका आगळ्या वेगळ्या जीवनाचा अनुभव येतो रबराच्या झाडाना कसं जोजवितात, पाम ऑईल कस काढतात, पारपारिक चिनी स्मशान कस असत, पारंपारिक मलायी गाव कसं असत अननस, कोको व कॉफीचे मळे कसे असतात हे सर्व प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळते

ऑरचर्ड एमेराल्ड हील रोडवरील पेराकन प्लेस (Peranakan Place) हे एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण आहे पेराकन सस्कृती मलाक्का व पेनागच्या सामुद्रधुनीमध्ये विकास पावली व हळू हळू ती सिंगापूरमध्ये प्रसृत पावली पेराकन लोकाना सामुद्रधुनी पुत्र किवा 'बाबा' असेही म्हणतात हे 'बाबा' आपल्या नोन्या (पाककला) भाषा, रगीबेरगी फर्निचर, शिल्पकला इत्यादिंबद्दल प्रसिद्ध आहे आपल्याकडील 'पार्सी '(बाबा) सस्कृति प्रमाणेच ही शेकडो वर्षे आपल वैशिष्ट्य टिकवून आहे 'बाबा' स्त्रिया एक सारोंग केबाया घालतात व पेरांकन स्लीपर्स (मणी लावलेल्या) व दागिने घालतात मलायी संस्कृतीचा

जपानी वातावरण निर्मिती करण्यात आली आहे झुडप, टेकड्या कलात्मकतेने बसविलेले दगडी कंदील, उत्साहाने खळाळणारी चहा फराळाची दुकाने, सर्व अतिशय साधेपणाने साकार केले आहे. ह्या दोन्ही गार्डन्सची प्रवेश फी ५० डॉलर्स (सिंगापूरी) असून सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत ही खुली असतात

टायगर बाम उद्यानामध्ये (हॉ पार व्हीला) हाँगकाँगसारखीच राजघराण्याची चित्रे चितारली आहेत शिवाय बुद्धाचे विभिन्न मुद्रेतील मोठमोठे रगीत पुतळे, वाघ, सिंह आदि जनावराचे पुतळे, चिनी पुराणातील प्रसग व व्यक्ती, मोठमोठे अक्राळविक्राळ ड्रॅगन्स येथे ठिकठिकाणी उभारले आहेत

बॉटनिकल गार्डनसुद्धा ३२ हेक्टर जमिनीवर बनविले असून घनदाट जगल हिरव्यागार मखमली दुलदुलीत लॉन्स, स्फटिकासारख्या विशाल जलाशयानी परिपूर्ण आहे तळ्यामध्ये चिनी बदके व शुभ्र राजहंस डौलात विहरत असतात, आत जंगलामध्ये ५० मीटर उचीची घनदाट झाडी आहे ह्या गार्डनमध्ये २५० विभिन्न जातीची २५०० झाडे आहेत १८७७ मध्ये सर् हेन्री रीड्लने ब्राझीलहून आणलेले रबराचे झाड येथे लावले ह्या नमुन्यातून पुढे मलेशियन रबर व्यवसायाची भरभराट झाली

जू रोंग बर्ड पार्कसुद्धा प्रेक्षणीय आहे वीस हेक्टर जमिनीवर ३००० च्या वर सख्येतील पक्षाची रहाण्याची व्यवस्था करण्यात आली असून जगातील ३०० जातीचे पक्षी येथे अगदी गुण्यागोविंदाने नादतात ह्याच पार्कमध्ये तीस मीटर उंच एक धबधबा आहे आम्ही गेलो तेव्हा नुकत्याच कोसळलेल्या पावसाच्या सरीने सारी वनश्री सुस्नात झाली होती सर्वत्र नव्या पालवीच्या रेशमी सळसळीचा हर्षकल्लोळ, जिकडे बघावे तिकडे वृक्ष-वल्लींच्या रूपाने फवारणारी जीवनरसाची हिरवी कारंजी थुईथुई थिरकत होती मेघ घुणघुणत होते वारा रुणझुणत होता दूरवर कुणीतरी पूरिया राग वाजवीत होता रगीबेरगी मेघ स्वच्छन्दपणे विहरत होते गरूड, बहिरी ससाणे, काकाकुवा, पारवा, बुलबुल, मोठ्या चोचीचे रंगीबेरंगी पक्षी— अरे ! तो अत्यंत तेजस्वी रगाचा, गळ्यावर निळ्याशार वीजेची झळाळी असलेला काळ्या हिऱ्यासारख्या गहिऱ्या नेत्राचा पक्षी कोण बरे ? ह्या पक्षाचा 'बर्ड शो' ही दाखविला शिवाय 'पोपटाची सर्कस' ही प्रेक्षणीय असे

सिंगापूरची 'झूलॉजीकल गार्डन्स' ही फार प्रेक्षणीय आहेत सिलेटर रिझर्व्हीयरमध्ये ९० हेक्टर जमिनीवर अगदी शात वातावरणात हा खुला जुहू आहे जवळ जवळ १७० विभिन्न जातीचे १६०० शेच्यावर प्राणी असून ६० विभिन्न विभागात त्यांची रहाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे जलाशयाच्या लाटानी धरलेल्या तालात विहरणाऱ्या बदकाचे गंभीर हुंकार, हिरव्या कुरणात चरणाऱ्या नीलगाईच्या गळ्यातील घंटानाद कानाला मोहवीत होता, अमेरीकन रानमाजरे झाडांच्या मोठ्या खोडापाशी गुरगुरत होती दुरूनच एक नीलघोडा येताना दिसला कसा धुष्टपुष्ट व रेखीव, रूद मानेवरील काळी

आयाळ निमुळता झळाळणाऱ्या केसाचा पुज अजठ्यातील चित्रातील झुंजणाऱ्या बैलांची आठवण करून देणारे चित्ते, सैबेरीयन टायगर्स, तिबेट मलायन रानडुक्कर, काळभोर ढाण्या वाघ, त्याचप्रमाणे डौलदार शुभ्र मोर, गुणी गोंडस हरिणशावकेसुद्धा

सिंगापूर जुहू प्रसिद्ध आहे आपल्या उत्तान ऑरंग उतान ह्या बोर्निओ-सुमात्रामधील एप माकडाच्या संगोपनाबद्दल जगातील कुठल्याही जुहूपेक्षा ह्या जातीच्या माकडाची येथे फार मोठी वसाहत आहे.दर मंगळवारी व शनिवारी सकाळी तुम्ही ह्यापैकी एका मर्कटाबरोबर ब्रेकफास्ट घेऊ शकता ती काळीभोर माकडं डीनर सूट चढवल्याप्रमाणे दिसतात, डौलदार चालीने ती तुमच्या टेबलाजवळ येतील, आदबीने वाकून शेकहँड करतील तुम्ही त्याना सीट ऑफर केल्यावरच खुर्चीवर बसतील खाताना त्यांची लखनवी नज़ाकत बघण्यासारखी असते

सकाळी ९ ।। वाजता हत्तींच्या कळपाच्या स्नानाचा कार्यक्रमही बघण्यासारखा असतो हत्ती इतका विनोदी, खेळकर, खट्याळ, अवखळ, खोडकर प्राणी दुसरा कोणी नाही. सोंडेत पाणी भरून कधी कोणा सुंदरीला नेम धरून सचैल स्नान घडवील ह्याचा काही नेम नाही.बिचारीला, ना मारो पिचकारी म्हणून विनविण्याचे सुद्धा भान रहात नाही थायलडप्रमाणे येथेही क्रोकोडाइल फार्म आहे शेकडो सुसरी, मगरी, साप, पाली ह्यांचे कातडीसाठी संगोपन केले जाते दर रविवारी सकाळी आठ वाजता एखाद्या कॉफीशॉपच्या दाराशी पक्षाचे असख्य पिंजरे घेऊन येऊन एखादा पक्षीवाला एक अपूर्व संगीताची महफिल रगवितो

सिंगापूरहून जवळपासच्या चागल्या टूर्स म्हणजे कुकुप व मलक्का कुकुपची टूर सोमवार, बुधवार, शुक्रवार व रविवारी असते ह्यासाठी मलेशियाचा व्हिसा लागतो मलेशियाची सीमा ओलाडल्यानतर जोहरच्या सुलतानाचा राजवाडा लागतो मग मलेशियातील तो सुप्रसिद्ध गवताळ प्रदेश येथे आपल्याला एका आगळ्या वेगळ्या जीवनाचा अनुभव येतो. रबराच्या झाडाना कसं जोजवितात, पाम ऑईल कस काढतात, पारंपारिक चिनी स्मशान कस असत, पारंपारिक मलायी गाव कस असत अननस, कोको व कॉफीचे मळे कसे असतात हे सर्व प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळते

ऑरचर्ड एमेराल्ड हील रोडवरील पेरांकन प्लेस (Peranakan Place) हे एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण आहे पेराकन सस्कृती मलाक्का व पेनागच्या सामुद्रधुनीमध्ये विकास पावली व हळू हळू ती सिंगापूरमध्ये प्रसृत पावली पेरांकन लोकाना सामुद्रधुनी पुत्र किवा 'बाबा' असेही म्हणतात हे 'बाबा' आपल्या नोन्या (पाककला) भाषा, रगीबेरगी फर्निचर, शिल्पकला इत्यादिबद्दल प्रसिद्ध आहे आपल्याकडील 'पार्सी '(बाबा) सस्कृति प्रमाणेच ही शेकडो वर्षे आपल वैशिष्ट्य टिकवून आहे. 'बाबा' स्त्रिया एक सारोंग केबाया घालतात व पेराकन स्लीपर्स (मणी लावलेल्या) व दागिने घालतात मलायी सस्कृतीचा

प्रभाव असूनही हे लोक स्वतःला चिनी म्हणवून घेण्यात भूषण मानतात ह्याच्या सस्कृतीमध्ये पाश्चात्य सस्कृतीचाही मिलाप दिसून येतो सिंगापूरला कित्येक ठिकाणी रोमन डोरीक कॉलम्स फ्रेंच विंडो असलेल्या घरात 'बाबा' सस्कृतीची दारं व रंगीबेरगी टाइल्सनी शोभा आणलेली दिसते एक 'बाबा शो-हाउस' आम्ही पाहिले

फाबर गार्डन व वर्ल्ड ट्रेड सेंटर एकमेकांशी रोपवेने जोडले आहे ट्रॉलीमधून सिंगापूरचे विहगम दृश्य दिसते (तिकीट ६ डॉलर्स) सेंटासा बेट हे सुद्धा सिगापूरचे एक प्रमुख आकर्षण आहे येथे बोट, बस, केबल कार सर्व प्रकारानी जाता येते येथे डिस्ने लँडसारख्या अनेक मनोरजक व चित्तथरारक गोष्टी आहेत येथे विविध प्रकारचे शिंपले, जिवत पोवळी मिळतात येथे कॉम्प्युटर नियत्रित पाण्याची कारंजी आहेत ती २२ मीटर उच उडतात, उसळ्या घेतात, नृत्य करतात, गरगर फिरतात, त्यातून मधुर संगीत निघते व रगीबेरंगी हिऱ्यामोत्याची रत्नाची उधळण होते आशियातील सर्वात मोठा किटकसग्रह येथे आहे त्यात विविध प्रकारची रंगीत फुलपाखरे, पतग, चतुर, काजवे ह्यांचा सग्रह आहे दगडाचे सग्रहालयही येथे आहे त्यात विविध आकार, प्रकार, जाती व रगाचे दगड आहेत येथील आठ लाख सिंगापूरी डॉलर्स खर्च करून तयार केलेल्या वॅक्स म्युझियममध्ये सिंगापूरची स्थापना व भरभराट केलेल्या व्यक्तींचे ९१ लाइफ साइज रगीबेरंगी मेणाचे पुतळे आहेत शिवाय दोन दालनामध्ये मेणाच्या पुतळ्याद्वारा ऐतिहासिक प्रसंगाचा टॅब्लो दाखवितात (तिकीट ४-५० सि डॉलर्स)

ह्या शिवाय मिंट कॉयन गॅलरी, सायन्स सेंटर, माउट फॅबस वगैरे अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत

सिंगापूर हे मुस्लीम राज्य असले तरी येथे मध्य पूर्वेकडील अरबी राज्यांसारखे खास मुस्लीम वातावरण नाही तर कॉस्मॉपॉलिटन वातावरण आहे अरब स्ट्रीटला मात्र मुस्लिम वातावरण दिसते तेथे नाव सुद्धा अरेबियन नाइट्‌ना अनुसरून देण्यात आली आहेत बगदाद, मस्कत, कदाराह—बीच रोडपासून अरब स्ट्रीट सुरु होतो येथे मुस्लिम परपरेला अनुसरून असलेल्या मालानी सुदर बाटिक, उत्कृष्ट मखमली व रेशमी कापड, कपडे बास्केट्स ह्यानी दुकाने लहडलेली दिसतात बगदाद स्ट्रीटला इडोनेशियन स्कार्फस, हाजी टोप्या, ज्वेलरी, परफ्युम्स प्रार्थनेच्या चट्या मिळतात बसरा स्ट्रीटला सुलतान मॉस्क आहे जालान सुलतानला अनेक अरबी, इंडोनेशियन, मलायी, भारतीय मुसलमानांची कापडाची दुकाने आहेत, येथेच मुसलमानांचे ऐतिहासिक कबरीस्तान आहे नॉर्थ ब्रिज रोडला जगातील सर्वात मुल्यवान लाकडाचे (अगर) फर्निचर मिळते हे चदनी लाकूड ब्रह्मदेशातील जंगलातून येते

सिंगापूरच्या चायना टाउनमध्ये सर्व प्रकारच्या पारपारिक चिनी वस्तु, कलाकुसरीची कामे व चिनी मदिरे आढळतात फीलीप स्ट्रीटला 'शात सागराचे' मदिर

आहे (वाक हाय चें विओ) १८५२-५५ मध्ये सिंगापूरला आलेल्या चिनी लोकानी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे मदिर बाधले ह्याच्या छतावर अनेक छोटे छोटे पॅगोडे व मानवी आकृत्या खोदलेल्या आहेत 'चूग फू यी की' ला पारंपारिक चिनी मेडिकल हॉल आहे चायना टाउनमध्ये चिनी शाळाही आहेत येथे नाटकातील मुखवटे, सिंहाची मुडकी वगैरे मिळते

सेरगून स्ट्रीटला आलं की भारतातच आल्यासारखे वाटते म्हणून ह्यास 'लिटिल इंडिया' असे म्हणतात बफेलो रोडला भारतातील मुसलमानाचा गुराचा व्यापार होता सध्या तेथे साड्या, माळा व इतर भारतीय वस्तूची दुकाने आहेत येथील घराच्या, दुकानाच्या दारांवर आब्याच्या पानाची तोरणे, नारळ लावलेले आढळतील श्री वीराम्मा कालीम्मा मदिर हे एका चुन्याच्या भट्टीत काम करणाऱ्या कामगारांनी बाधले रेसकोर्सला महात्मा गांधींचे स्मारक आहे १९५० साली नेहरूनी कोनशिला बसविली किंता रोडला एक छोटेसे बर्मी बौद्ध मदिर आहे दहा टन वजनाच्या शुभ्र सगमरवरी दगडातून ३-३ मीटर उचीचा बुद्धाचा पुतळा खोदण्यात आला आहे हा संगमरवरी दगड मडाल्यातून आणण्यात आला येथे ब्राउन शुगर, फटाके, कोलंबी तादूळ, वाळलेल्या बीन्स वगैरे मिळते

थायलडप्रमाणेच सिंगापर उत्सवप्रिय आहे जानेवारीमध्ये सिंगापूरला आतरराष्ट्रीय पतगोत्सव साजरा करण्यात येतो जगातील सर्व पतगशोकीनाचा येथे मेळावा भरतो आकाश प्रचड पाश्चात्य पतग व पौर्वात्य बलून्सने भरुन जाते हे पतंग फुलपाखरे, साप, सिंह, अशा तऱ्हे तऱ्हेच्या आकाराचे व रगाचे असतात थायपुसम्, सेरगून रोडवरील पेरुमला मदिराहून चेट्टियार मदिरापर्यंत पश्चात्तापदग्ध हिंदू तामीळ आपल्या सर्वांगाला, कपाळाना, गालाना जीभेला सुद्धा अणकुचीदार स्क्रू टोचून वजनदार हुक्स लटकावून (त्याला लिंब सुद्धा अडकवतात) मत्रमुग्ध अवस्थेत मिरवणुकीने वाजत गाजत निघतात बरोबर त्यांचे हितचितक असतात हा उत्सव भगवान सुब्रह्मण्यम् भव्य मूर्तीच्या मिरवणुकीने सुरु होतो बे-साक-दिवस हा बुद्धाचा जन्म त्यांच्या ज्ञानप्राप्तीचा व मृत्यूचा दिवस मानला जातो जगातील सर्व भागातून बौद्ध धर्मीय लोक येथे प्रार्थना करण्यासाठी येतात हारा राया पुसा हा मुसलमानाचा रमझानाचा शेवटचा दिवस, ईद म्हणून साजरा करण्यात येतो ड्रॅगन बोट उत्सव चौ यॉन ह्या प्राचीन चिनी कवीच्या सन्मानार्थ साजरा करण्यात येतो ह्या कवीने जगातील दुष्ट तत्त्वाच्या निषेधार्थ जलसमाधी घेतली त्याला वाचविण्यासाठी मल्लाह समुद्रात मोठमोठ्या अक्राळविक्राळ ड्रॅगन्सच्या आकारांच्या बोटीची शर्यत लावतात साथीला त्या कवीवर हल्ला चढविणाऱ्या माशाना घाबरविण्यासाठी मोठमोठ्याने ड्रम्स वाजविण्यात येतात, पाण्यावर सपासप वल्ही मारण्यात येतात कवीच्या पुण्यतिथीनिमित्त त्याच्या आत्म्याच्या शातीसाठी भात व मटण

समुद्रात टाकण्यात येते ह्या रेसमध्ये भाग घेण्यासाठी सपूर्ण आशिया, युरोप, अमेरिकेतून लोक येथे येतात ही बोट जवळ जवळ १२ मीटर लाब असून तिला माशाच्या खवल्यानी रगविण्यात येते, ड्रॅगनच्या मुंडक्यांचा व शेपटीचा आकार देण्यात येतो व विविध रगांनी व फुलानी तिला शृगारण्यात येते थीमिथी हा हिंदु उत्सव बघण्यासाठी मारीअम्मा मंदिराच्या प्रांगणात ही ss गर्दी लोटते भक्त चार मीटर लाबीच्या जळत्या निखाऱ्यावरून चालतो ह्याशिवाय नवरात्री, दिवाळी, ख्रिसमस, वगैरे सण साजरे होतात.

वार्षिक सणावार उत्सवाप्रमाणेच अनेक सास्कृतिक कार्यक्रमांचा येथे बारा महिने हगामा चालू असतो 'एशियन कल्चरल शो' म्हणून एक ४५ मिनिटांचा रगीबेरंगी नृत्याचा कार्यक्रम फारच मनोरंजक वाटला. हा कार्यक्रम चिनी सिंह नृत्याने सुरु होतो झाज तास (थाळीसारखे वाद्य - gong) आणि कानाचे पडदे फाडणाऱ्या ड्रमसच्या आवाजात 'सिंह' उड्या मारतो, डरकाळ्या फोडतो, लोळणफुगडी घेऊन प्रेक्षकाचे स्वागत करतो, ह्याच्या उलट 'लोटस डान्स' व 'परिस्वप्ननृत्य' फारच कोमल व आल्हाददायक वाटले सुदर मलाया युवतीचा जळत्या मेणबत्त्या घेऊन केलेला 'हार्वेस्ट डान्स' ही छान वाटला भारतीय नर्तकाचा प्रवेश होताच प्रेक्षकानी मनापासून टाळ्या पिटल्या त्याच्या पायातील छुमछुमणारे चाळ, चमचमणारे अलकार, झगमगणारी वस्त्र, हस्तमुद्रा, नेत्रमुद्रा व पदन्यासाने कथाकथन करण्याचे त्याचे कसब पाहून सर्वांनी दाद दिली सपेरा, त्याची बीन व नागाच्या हालचालींनी सर्वांना मोहित केले ह्या शोनंतर काही शूर प्रेक्षकांना स्टेजवर बोलावण्यात आले व त्यांच्या गळ्यात सर्पराजांना गुडाळण्यात आले. मडारीन हॉटेलमध्ये 'एशिअन नाइट' म्हणून फिलीपाइन्स, मलेशिआ, थायलड, सिंगापूर देशातील नृत्य व गाण्याचा कार्यक्रम असतो वेयाग्ज हा चायनीज ऑपेरा खुल्या ओपन एअर थिएटरमध्ये करतात हा निःशुल्क असतो भडक वेशभूषा व मेकअप डौलदार हालचाली, झाज व तासांचा ठणठणाट ह्यामुळे हा ऑपेरा नाटकी वाटतो ह्याशिवाय सर्व हॉटेल्स, नाइट क्लब्ज, थिएटर्समध्ये बारा महिने नाटक, ऑपेरा, डिस्को वगैरे जल्लोष असतोच ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, क्रिकेट, कॅनोइग, गोल्फ, फ्लाइग वगैरे अनेक खेळांचे क्लब आहेत

सिंगापूर हे फ्री पोर्ट आहे साऱ्या जगातून येथे माल येतो प्राचीन पौर्वात्य ॲंटिक व आधुनिक पाश्चात्य सुखसाधने दोन्ही गोष्टींचे हे माहेरघर आहे तऱ्हेतऱ्हेच्या कलाकुसरीच्या डब्या, लाखेच्या वस्तु, शिंपल्याच्या वस्तु, हस्तीदंत, जेड जडविलेल्या वस्तु येथे मिळतात अरब स्ट्रीटला चिनी पेंटीग्ज, बाटीक कपडे, टेबल क्लॉथ, पडदे, हस्तकलेच्या इतर वस्तू मिळतात इराणी व तुर्की गालिचे, चिनी गालीचे, चायना सिल्क, थाय सिल्क, सोनेरी धाग्यानी गुफलेले मलेशियन सिल्क, भारतीय सिल्क, पॉलिएस्टर साड्या, रेडिमेड कपडे, हॅंडीक्राफ्ट, ह्याची विविधता दिसून येते टी.व्ही. व्हिडीओही स्वस्त

आहेत एक हैजार सिंगापूर डॉलर्समध्ये कलर टी व्ही अनअम्पनीड बॅगेज म्हणून पाठवू अशा जाहिराती हॉटेल्समध्ये लावण्यात येतात सूसर, मगर, साप, पाली, ह्यांच्या कातड्याच्या, हॅंडबॅग्ज, बूट, बेल्ट्स, पर्सेस येथे छान मिळतात चिनी व मलायी दागिने, चिनी इम्पोरियममध्ये मिळतात येथे पुरुषाचे कपडे फार स्वस्त व चागले शिवून मिळतात. अरब स्ट्रीटलाच जेड, मोती, सोने, हिरे ह्याचे अलंकार मिळतात. ह्याच स्ट्रीटला वेताच्या बास्केट्स, पक्षांचे पिंजरे, चट्या, हॅट्स, कुड्यासाठी हॅंगींग बास्केट्स वगैरे वस्तूची व्हरायटी मिळते. सिंगापूरला सोने सर्रास मिळते सर्व बॅंकातसुद्धा सोने विकतात चायना टाउनमध्ये सोन्याच्या दागिन्याचा नेत्रदीपक लखलखाट दिसून येतो मादक द्रव्याचे प्रमाण कमी आहे. ह्याची आयात-निर्यात करणाऱ्या लोकाना मृत्यूदंड देणारे हे एकमेव राष्ट्र आहे येथील डिपार्टमेंटल स्टोअर्स, मोठमोठी असली तरी हॉंगकॉंग, बेरूत सारखी वैभवसंपन्न व आकर्षक वाटली नाही सेसील स्ट्रीट, हॅटन वे हा व्यापारी विभाग आपल्याकडील फोर्टसारखा वाटला बहुतेक बॅंका व वकालती ह्याच भागात आहेत

काही वर्षांपूर्वी 'पसार मालम्' (मलायी रात्रीचा बाजार) सिंगापूर रोडवर फार लोकप्रिय होता. छोट्या छोट्या स्टॉल्सवर व्यापारी आपला माल घेऊन तयार असतात संगीताच्या कॅसेट्स लावलेल्या असतात. छोट्या छोट्या दिव्यातून दिव्याच्या लखलखाटात विविध मालानी लहलडलेली दुकाने फार आकर्षक दिसतात, हे स्टॉल्स पाहून युरोप व मध्यपूर्वेतील त्या मधमाशाच्या पोळासारख्या असलेल्या बाजाराची आठवण झाल्याशिवाय रहात नाही तेथील मूळ रहिवाशानी हाताने बनविलेल्या सुबक वस्तु, सोनेरी कोटींगची फुल, काशाच्या भांडी व इतर असंख्य वस्तू दिसतात भिंतीवर लटकविण्यासाठी असलेली भव्य चित्रे, पेंट केलेले पखे रगविण्याचे प्रात्याक्षिक येथे बघावयास मिळते. ह्या कला आता कालाच्या उदरात गडप होऊ लागल्या आहेत चिनी भरतकाम, वीणकामाच्या वस्तु, ऑपेरासाठी रगविलेले मुखवटे, चिनी अक्षरात आपले नाव आपल्या डोळ्यासमोर खोदलेले सील्स वगैरे वस्तूही मिळतात लाकडी तळाचे चिनी जोडे, सील खोदणे, भविष्य सागणे, गिऱ्हाईकाच्या नावाचे पृथ्थक्करण करणे ह्या सिंगापूरच्या जुन्या व्यवसायांनाही उजाळा दिला जातो शिवाय नाटक (नवटकी टाईप), कलाप्रदर्शन, चिनी ब्रश पेंटींग, सिल्क पेंटींग, सुदर सुवाच्य हस्तलेखन, फिंगर प्रिंटींग, वगैरेही व्यवसाय चालतात 'पसाह मालम्' ची वेळ संध्याकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत असते

सिंगापूरला रेडिओ सर्व्हिस इग्लीश, चिनी, मलायी, व तामीळमध्ये होते टी.व्ही.वरसुद्धा चिनी, मलायी, इग्लीश, तामीळमध्ये कार्यक्रम असतात हॉटेल्समध्ये टी.व्ही. सेट्स टेलिटेक्स्ट सिस्टीमला जोडलेले असून सकाळी सात वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत मनोरंजन, स्पोर्ट्स, अर्थ-व्यवस्था, फ्लाईट्स अरायव्हल व डीपार्चर टाइम,

काही विशेष प्रसग वगैरे माहिती देतात

येथील स्थानीय पेपर्स इंग्लीशमध्ये दोन आहेत 'स्ट्रेट्स टाइम्स' 'बिजनेस टाइम्स' शिवाय मलायी, चिनी, तामीळ भाषेतही स्थानीय वर्तमानपत्र मिळतात महत्त्वाचे आतरराष्ट्रीय पेपर्स येथे येतात क्रेडीट कार्ड्सप्रमाणे चार्जकार्डसची येथे पद्धत आहे एखादा दुकानदार बाजवीपेक्षा अधिक महाग वस्तू विकत असेल तर कार्डकपनीशी सपर्क साधून योग्य अॅक्शन घेता येते

म्हणताता ना, 'भूखे भजन न होय गोपाला' सिंगापूरमध्ये मलायी, इंडोनेशियन, नोन्या (मलायी + चीक्का मलान) सी-फूड, जपानी, थाय, कोरीयन, भारतीय, इटाली, पाश्चात्य सर्व प्रकारच्या अन्नपूर्णा आपणास तृप्त करतात सेरगून रोडवरील बाजारातच 'अन्नपूर्णा' नावाचे साउथ इंडियन हॉटेल होते तेथे पुरीभाजी, दोसा इडली-साबार सर्व मिळत असे बाजारात हिडताना एका ऑस्ट्रेलियन बाईने मला विचारले, 'तुमचे ते आत बटाटा स्टफ करून पॅनकेक करतात ते कुठे मिळते ?' तिला मसाला डोसा म्हणायचे होते बिर्याणी, चिकन करी वगैरे सर्व मिळते मॅरे स्ट्रीटला मोतीमहल हॉटेल आहे नॉर्थ ब्रिज रोडला इस्लामिक रेस्टॉरन्ट आहे भारतीय जेवण स्वच्छ केळीच्या पानात देतात

मलाया पद्धतीच्या भोजनात सटाय हा प्रकार ग्रील्ड मटण, चिकन मसालेदार करीबरोबर खातात नासी म्हणजे मटण, प्रॉन्स, अंड्याचे तुकडे, घालून केलेला फ्राइड राइस 'नोन्या' प्रकारच्या भोजनात 'पोह-पिआह' हा एक प्रकार मजेदार असतो मैद्याच्या पिठाच्या पातळ रोलमध्ये बांबूचे तुकडे, प्रॉन्स, पोर्क सॉसेजेस भरून तळतात व गरमागरम चीली सॉसबरोबर देतात

चिनी लोक तर सुगरणपणाबद्दल प्रसिद्धच आहेत अस म्हणतात, पुरूषाला जर तीन लग्न करण्याची परवानगी मिळाली तर जपानी पत्नी सेजेला, भारतीय पत्नी सेवेला आणि चिनी पत्नी स्वयपाकाला मिळाली तर तिन्ही लोकात त्याच्याइतका सुखी प्राणी कोणी नाही चिनी भोजनातसुद्धा हॉकीयन, हक्का, हीनाइज, पेकींग, शाघाय- सर्वांच्या पद्धती अलग अलग 'योंग टाउ फू' ही हक्का चिन्यांची आवडती फिश-बॉल करी ओटाक-ओटाक हा एक फिश करीचा प्रकार फार चविष्ट वाटला नारळाच्या दुधात अनेक मसाले व सॉसेस घालून त्यात मासा शिजवितात, व तो नारळाच्या पानात गुंडाळून तो ओव्हनमध्ये भाजतात सपूर्ण बदक पीस काढून स्वच्छ धुवून आत मसाला व निरनिराळी सॉसेस भरून मैद्यात बुडवून तळतात

रस्त्यावर सुद्धा गाड्या घेऊन फेरीवाले विविध प्रकारचे खाद्य पदार्थ विकतात पण येथील हेल्थ-इन्स्पेक्टर अशा फेरीवाल्याची नियमितपणे तपासणी करतात घाणेरडेपणा, अस्वच्छता ह्याला कडक आळा घालण्यात येतो, त्यामुळे ते पदार्थ खाण्यास भीति वाटत नाही ह्या लोकाच खुल्या हवेत किचन असत तेथे रगीबेरगी छत्र्याच्या खाली टेबलावर

ते गरम गरम पदार्थ करून वाढतात सी-फूडमध्येही खूप प्रकार असतात खेकडे, प्रॉन्स, झिंगे, शिंपले, कालव, बेडकाच्या तगड्या शिवाय आपण आतापर्यंत न पाहिलेले अनेक प्रकारचे मासे येथे चाखण्यास मिळतात ह्या लोकाच आवडत खाण म्हणजे चीली क्रॅब खेकड्याला झणझणीत' तिखट - आबट चीली - टोमॅटो सॉसमध्ये शिजवून खातात वाफाळलेल्या प्रॉन्सबरोबर ताजे ताजे चीली जिंजर सॉस पाहिले की नुसत्या वासानेच तोंडाला पाणी सुटते हार लोक हे ताजे प्रॉन्स त्याच्या कवचासकट सोया सॉसमध्ये शिजवतात नतर त्यावर अनेक मसाले भुरभुरवतात

बाजारात हॉटेलच्या शो-केसेस मधून किंवा खाद्य पदार्थांच्या दुकानात साप, पाली, झुरळाच्या लोणच्याच्या बरण्या ठेवलेल्या पाहून किंवा एखादा चिनी दुकानदार पाल, सरडा तराजूवर तोलताना पाहून अगावर सर्रर्रकन् काटा उभा रहातो काळजात लकलक होतं काय सागावे एखादा ली-चुन आपल्या सौ ला असंही सागत असेल,' अग ए, ऐकलस का ? आज माझा जानी दोस्त येणार आहे'बर का,जरा तो विंचवाचा मुरबा किंवा मधमाशाचा जॅम काढ ब्रेडबरोबर खायला' त्याची आज्ञाधारक धर्मपत्नीसुद्धा विंचवाच्या मोरंब्याच्या बरणीचा दादरा सोडताना विचार करीत असेल 'दुपारी चहाबरोबर बेडकांच्या गरमागरम कटलेटबरोबर गाधीलमाशांचे झणझणीत' सॉस द्यावे तोंडी लावायला,'इकडची' स्वारी खुष होईल । म्हटलेच आहे- 'तस्य तपैव हि मधुरंस यस्य मनो हि यत्र सलग्नम्' कुशवतसिंगने ज्याचा आबटशौकीन घाटी लोकाचा दही साखर कालविलेला गोपाळकाला म्हणून नाक मुरडीत त्रिफळा उडविला होता तोच वेलची-जायफळाच्या घमघमीत वासाचे, बदाम-चारोळ्याची नाजुक पखरण घातलेले ओशट, चिकणे वस्त्रगाळ केशर मिश्रित श्रीखड अमृतखड म्हणून आपण पेशव्याच्या काळापासून ओरपत आलोच आहोत ना ! माझी मैत्रिण तेजस्विनी कानविंदे हिला तर श्रीखड इतके आवडते (तशी कुठल्याही गोड पदार्थापुढे एरवी नावाप्रमाणे बिजली असलेली ही ललना पार नागी टाकते) की श्रीखडाचे पातेले घेऊन माडा ठोकून खाली बसून बोटाने कण,न कण चाटून पुसून खाण्यात तिची अगदी ब्रम्हांनदी टाळी लागते श्रीखड व तिच्यामध्ये कोणी,'अगदी एखादा 'चमचा' सुद्धा आलेला तिला खपत नाही हे ध्यान पाहून कोणाला खरेही वाटणार नाही की कॅनडाहून मास्टर्स करून आलेले आहे व सीडॉट सारख्या विख्यात कपनीत उच्च पदस्थ इलेक्ट्रॉनिक्स इजिनियर आहे ह । ह । माझ्यावरून जाऊ नका तशा माझ्या सगळ्याच मैत्रिणी कर्तबगार ललनाकुल ललामभूता, उच्चविद्याविभूषित व उच्चपदस्थ आहेत अरुधती देवस्थळे येथील साहित्य अकादमीसारख्या नामवर सस्थेत सहायक सपादिका आहे तर सुनीति जैन महाराष्ट्र इन्फर्मेशन सेंटरमध्ये इन्फर्मेशन ऑफिसरची जबाबदारी आपल्या खाद्यावर पेलत आहे डॉ जयती चटर्जी व डॉ ललिता निरजकर दिल्ली युनिव्हर्सिटीमध्ये यशस्वी प्राध्यापिका

आहेत तर विजया जोशी जे एन्. यू मध्ये यशस्वी प्राध्यापिका आहेत तर प्रभा देव पुण्याच्या विख्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये डॉक्टरेट मिळवून संशोधन करीत आहे डॉ प्रतिभा काबळी व डॉ सरोज कुलकर्णी दुबईला यशस्वी डॉक्टर्स म्हणून नाव कमावीत आहेत तर, सीमा शर्मा लंडनहून (कारण तिचे पति श्री एल के शर्मा तेथे टाइम्स ऑफ इंडियाचे विशेष संवाददाता म्हणून काम पहात आहेत) येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या संपादनाचे काम पहात आहे माझ्या दोघी मोठ्या बहिणी डॉ कमल कर्णिक जर्मन साहित्यात डॉक्टरेट मिळवून बंगलोरला मॅक्समुल्लरमध्ये असिस्टंट डायरेक्टर आहे, जर्मन साहित्यात लेखिका म्हणून तिने चांगलेच नाव कमावले आहे, दुसरी डॉ सरोज तासकर मुंबईला विख्यात डॉक्टर असून तिने सामाजिक कार्यास स्वतःला वाहून घेतले आहे मीच आपली निखट्टूपणे घरात बसून भाज्या आमट्या फोडणीला टाकीत बसले आहे चौऱ्याशी लक्ष योनी फिरून मिळालेला सुंदर मानव जन्म कुरडत त्याची लोंबणारी लक्तर मजेने पहात बसले आहे रोम जळल्यावर नीरो नव्हता का व्हायोलिन वाजवीत बसला हो, मधून मधून आयुष्याचे गणितही सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे, पण मूर्खासारख्या वजाबाक्याच जास्त केल्या, बेरीज कधी करता आलीच नाही जमेच्या बाजूला शून्य-ताळा कसा जमणार? गणित सपशेल चूक, भोपळा मार्क।

अरे, हे ओढाळ मन संधि मिळाली रे मिळाली की दावणीला हिसडा मारून दावं तोडून जाणाऱ्या वासरासारखे कसे चौखुर उधळते आतापर्यंत ५/६ दिवस भटकणे, खरेदी शो बघणे सर्व व्यवस्थितपणे पार पडले एअरपोर्ट टॅक्सचे दोघांचे २४ डॉलर्स वेगळे काढून ठेवले, बसचे पैसेही निराळे काढून ठेवल्यावर उरलेले पैसे पुरतात की नाही अशी परिस्थिति निर्माण झाली अर्थात् काटकसर ही फक्त खाण्यापिण्यातच करणे शक्य असल्यामुळे सातव्या दिवशी सकाळी फक्त चहा पावावर भागविले, पण समाधान झाले नाही संध्याकाळी स्वस्त जेवण कोठे मिळेल ह्याचा तपास करीत असता एक मद्रासी अण्णा तृप्तपणे ढेकर देत बडीशेप चघळत रस्त्यावरून जाताना दिसला अर्थात् उघड आहे तो साबार भातावर चांगलाच हात मारून आला असावा हे लगबगीने त्या दिशेला गेले, तेथे एक मद्रासी हॉटेल होते एक सिंगापूरी डॉलरला आपल्यासारख्या चार माणसांना पुरेल एवढा उकडा भात, साबार, पापड व लोणचे असे गरमागरम जेवण केळीच्या पानात बांधून घेऊन आमच्या खोलीत आम्ही जेवलो सिंगापूरला जशी पॉंचतारी हॉटेल्स पाहिली तशी अशी बिनतारी हॉटेल्सही

आमची फ्लाईट रात्रीची असली (KLM) तरी आम्ही संध्याकाळी लौकरच जाऊन विमानतळावर मुक्काम ठोकला मी आपली आवडते काम (माणसं न्याहाळणे) सुरु केले लोकांची सतत वर्दळ चालू होती कोठून येतात हे लोक व कुठे जातात? आता ह्या क्षणी त्यांना पहातेय, परत आयुष्यात कधी ह्यातील एकाचे तरी दर्शन होईल का? तीन

मुक्या-बहिऱ्या मुली बरोबर चालल्या होत्या त्यातील एकीचे केस अगदी पायाच्या टाचेपर्यंत लांब होते, आपल्या विशिष्ट खाणाखुणाच्या भाषेत त्याचे मजेत सभाषण चालले होते, त्या हास्यविनोदही करीत होत्या, मध्येच कोणाची तरी टिंगलही करीत असाव्यात जणु दुनियेला बजावत होत्या, 'बघा बघा, आमचीही दुनिया आहे तुमचे बोलणे आम्हाला समजत नाही, आमचे तरी तुम्हाला समजेल का ? फुकाची रूबाबी मारू नका'

विमानतळावर बुकिंग कांउटरवर आमचे तीन नग झाले म्हणून एक बॅगेजमध्ये ठेवावा लागेल असे आम्हाला सागण्यात आले आम्हाला सर्व सामान बरोबर घेऊन जायचे होते कारण दिल्लीत अपरात्री सामानासाठी ताटकळत बसण्यात अर्थ नव्हता त्याला दाद न देता आम्ही सर्व सामानासकट विमानात निघालो पण Acrobridge मध्येच आम्हाला पकडून एक नग बॅगेजमध्ये द्यावाच लागला KLM यात्रा पाच तासांची होती व्यवस्था उत्तम होती, मुख्य म्हणजे World Cup Final मॅच दाखविण्याचे फार मोठे औचित्य दाखविण्यात आल्यामुळे सर्व फुटबॉल प्रेमी समाधान पावले हवाई सुदऱ्या अतिशय मन लावून लगबग करीत होत्या पण आपल्याकडील काही व्यापारी (सिंगापूरला स्थायिक झालेले) त्यांना उगीचच नाचवत होते, सारखी फुकटची दारू ढोसत होते त्या बिचाऱ्या धावून धावून लालेलाल झाल्या होत्या त्याच्या जागी फ्रेंच, जर्मन, इग्लिश असती तर त्यांनी चागला इगा दाखविला असात पण उच लोक शात व सोशिक असतात विमानातील सर्व वातावरणच इतके घरगुती झाले की पॅसेंजरमधील काही १२/१३ वर्षांच्या उच मुली उठून हौसेने ह्या हवाईसुदरीच्या मदतीला लागल्या प्रवास अगदी मजेने हसत खेळत पार पडला

सिंगापूरची वेळ दिल्लीच्या पुढे दोन तास आहे त्यामुळे सिंगापूरच्या वेळेप्रमाणे जरी आम्ही दिल्लीला पोहोचलो तरी त्यावेळी दिल्लीला तीनऐवजी मध्यरात्रीचा एक वाजला होता सर्व सव्यापसव्य आटपून दोन वाजता आम्ही दिल्ली-दरवाजा उघडला आणि दोन थकल्या भागल्या मुशाफिरानी 'स्वीट होम' मध्ये प्रवेश केला ....।

* * *

# परिशिष्ट दुबईमधील नोकरी संबंधी-

येथे जेवणखाण व चहापाण्याचा खर्च कमीत कमी २००DM (सुमारे ४५० रुपये) येतो जागाची भाडी भयकर आहते त्यामुळे जागा व वाहन, कपनीने दिल्याखेरीज नोकरी घेऊ नये नोकरी घेताना सरकारमान्य एजटतर्फे घ्यावी Director of immigration Agreement नोंदवावी तुमचा पासपोर्ट व कराराची प्रत तुमच्या घरी देऊन ठेवावी भारतीय भागीदाराची नीट चौकशी करावी दुबईत आल्यावर पासपोर्ट नेहमी तुमच्याजवळच ठेवा तुमच्या मालकाकडे देऊ नका जर मालकाने पासपोर्ट ठेवून घेतला तर Labour and immigration Dept मध्ये तक्रार करा भारतीय वकालतीत तक्रार नोंदवा सध्या मेकॅनिकल इजिनियर लोकाना नोकऱ्या आहेत कामगार वर्गास नेहमीच नोकऱ्या मिळू शकतात, कारकून किंवा अकाउटट लोकाना, टेलिफोन ऑपरेटरची व टाइपिस्ट लोकांना वाव आहे केटरिंगच्या लोकाना पण चागल्या नोकऱ्या मिळू शकतील फिटर, वेल्डर, प्लबर, इलेक्ट्रिशिअन ह्यासारख्या लोकाना पण भरपूर वाव आहे

वरील लेख लिहिला त्यावेळी १ दरहॅम २ २५ ते २ ५० रु दर होता सध्या हा दर रु ४ ४० ते ५ ०० आहे दुबईला महागाईही खूप झाली आहे

# प्रवासाचे नियोजन व तयारी

प्रथम ज्या देशांना भेटी देणार असाल त्या देशाच्या वकीलातीना भेट द्या, त्याच्याकडे त्या त्या देशाची, तेथील प्रेक्षणीय स्थळाची माहिती असते तसेच विमान कपन्या व प्रवासी एजट ह्यांच्याकडेही माहिती असते हे सर्व साहित्य विनामूल्य मिळते जेवढे जमा करता येईल तेवढे जमा करावे व त्याचा बारकाईने अभ्यास करून कोणत्या ठिकाणी किती दिवस रहाणार हे ठरवा

दर डोई सुमारे ५० अमेरिकन डॉलर्स दर दिवशीचा खर्च येतो ह्यात खाणे-पिणे, हॉटेलचा खर्च, सहलीचा खर्च सर्व खर्च येतात ह्या शिवाय विमानाचे तिकीट आहे कोठे ही Tip देऊ नका, शक्य तो टॅक्सी करू नये, मोठ्या हॉटेलमध्ये खाऊ नये ह्या गोष्टी नीट पाळल्या तर वरील खर्चात तुम्ही चागल्या तऱ्हेने सहल करू शकाल खरेदीचा, दारूचा खर्च ह्यात धरला नाही ज्या देशात जितका खर्च करणार, असाल तेवढ्या रकमेचे रूपये त्या देशातील नाण्यात एकदाच बदहून घ्या उदा इग्लडला पाच दिवस रहाणार असाल तर ५०x५ = २५० डॉलर्स किंवा १२५ पौंडात रूपये बदलून घ्या दर वेळी एका नाण्यातून दुसऱ्या नाण्यात बदलत गेलात तर तोटा होईल ह्याप्रमाणे स्वित्झर्लंडला १०

दिवस रहाणार असाल तर १०x५० = ५०० डॉलर्स किंवा १००० स्विस् फ्रँकचे रुपये बदला

प्रथम पासपोर्ट बनवून ठेवा शक्य तो सर्व देशांस योग्य असाच घ्या व साधारण ५ वर्षे चालेल असा घ्या

ज्या ज्या देशात जायचे असेल त्या त्या देशाच्या वकीलातीतून व्हिसा घ्या सबंधित माहिती त्या त्या वकीलातीतून कळेल तीच माहिती फक्त विश्वसनीय असते त्यासाठी पासपोर्ट लागेल तुमच्या कंपनीचे शिफारसपत्र व ओळखपत्र उपयोगी पडेल

कॉलरा व देवीचे इंजेक्शन देणारी हॉस्पिटल्स असतात तेथे आतरराष्ट्रीय प्रमाणपत्रावर देवी व कॉलराचे इजक्शन दिल्याचे प्रमाणपत्र मिळेल देवीचे तीन वर्षे व कॉलराचे सहा महिने इंजक्शन परिणामकारक धरतात हे प्रमाणपत्र मिळण्यासाठी तुमचा पासपोर्ट जरूरी आहे प्रवासाच्या सभाव्य तारखेच्या आधी पधरा दिवस इजक्शन घेऊन ठेवा

नतर विमान कपन्यांना भेटा Excursion Fare ची चौकशी करा ह्यासबधी नेहमी जाहिराती येतात बऱ्याच कपन्या ५ ते २०% सूट देतात ५ माणसे एकत्र गेली तर खास सवलती देतात बहुतेक Excursion fare वर जाताना दोन व येताना दोन असे स्टॉप्स देतात ह्यामुळे तुम्हाला बरेच देश एकाच तिकीटावर पहाण्यास मिळतात

रिझर्व्ह बँकेतून किंवा स्टेट बँकेतून किंवा राष्ट्रीय बँकेतून परकीय चलन मिळवा आपल्याकडे सध्या फक्त डॉलर्स व पौंड मिळतील P Form मिळवा ह्या सर्व गोष्टी तुमचा प्रवासी एजंट करू शकेल नंतर तुमचे तिकीट घ्या शक्यतो सर्व ठिकाणचे आरक्षण असलेले बरे

शक्य असेल तर आयोजित सहल घेऊ नये कारण आयोजक निदान ४० ते ५०% फायदा घेतोच तो फायदा तुम्ही वापरू शकता तसेच एखादे ठिकाण तुम्हाला जास्त आवडले तर आयोजित सहलीत तुम्हास तेथे ठरल्या वेळेपेक्षा जास्त रहाता येत नाही त्याचप्रमाणे खाण्याची व्यवस्था व वेळ ह्यावर बंधन येते तसेच सहली आयोजित करणारा अशाच ठिकाणी तुम्हाला नेईल उदा दुबईला जास्त सवलती मिळाल्या तर तो दुबईलाच नेईल, दमास्कसला नेणार नाही सर्व आयोजित सहलीत तुम्हास पाहिजे असलेलीच ठिकाणे असतील असे नाही ह्याचा विचार करून आपली सहल आपण ठरवा प्रत्यक्ष ज्या ठिकाणी जाणार त्या स्थानावरून तुम्हास उत्तम उत्तम सहली चौकशी करून ठरविता येतील, सबब आधी सहलींचे पैसे भरण्याची घाई करू नये हॉटेलचे आरक्षण पहिल्या दिवशीचेच करा व विमान कपनीला तुम्हाला किती दराचे हॉटेल पाहिजे ते सागा विमान कपनी हे काम विनामूल्य करील एकदा तेथे पोहोचल्यावर ठरवा की हेच हॉटेल ठीक आहे की ह्याहून अधिक स्वस्तपण मिळू शकेल तसेच बहुतेक परदेशी

हॉटेलातून सहलींची माहिती व तिकीटे पण मिळतात. त्याचीपण चौकशी करा

बरोबर जे सामान घ्याल त्याचे माणशी वजन २० किलोपेक्षा जास्त नसावे प्रवासात तुम्ही खरेदी करणारच त्याचासुद्धा जागा ठेवा व तुमचे निघतेवेळीचे सामान १२/१३ किलोच ठेवा (माणशी) कमी सामानामुळे टॅक्सी, हमालीचा खर्च येणार नाही. सर्व सामान स्वतःला मैल मैल वाहून नेता येईल एवढेच असावे शिवणकामाचे सामान, चाकू, नेहमीची औषधे, २०/२५ फूट लांब प्लॅस्टीकची दोरी, पेला, प्लेट, गॉगल्स, थरमास व छत्री बरोबर ठेवा

पैसे ट्रॅव्हलर चेकमध्ये असलेले बरे. त्यासाठी पासपोर्ट नेहमी जवळ पाहिजे शक्य तो लहान रकमेच्या नोटा घ्या व पैसे विभागून ठेवा. एकाच जागी ठेवू नयेत हाँगकाँग -सिंगापूर-युरोप-अमेरिकेत चोऱ्या खूप होतात पैशासाठी खूनसुद्धा होतात हे लक्षात ठेवावे

तुमचा पासपोर्ट नंबर व संभाव्य मुक्कामाची ठिकाणे, त्याच्या तारखा तुमच्या घरी कळवून ठेवा. ट्रॅव्हलर चेकचे नंबर पण घरी कळवून ठेवा

हं चला, उचला बोरीया बिस्तर. . . . . !

शिवास्ते पंथानः सन्तु !!

* * *

REFBK-0026583

वरुन : १) मुखवटा : पसार मालम
२) व ३) सीरिया : प्राचीन अवशेष
४) मलुला : व्हर्जिन मेरी मूर्ती



हॉटेलातून सहलींची माहिती व तिकीटे पण मिळतात , त्याचीपण चौकशी करा

बरोबर जे सामान घ्याल त्याचे माणशी वजन २० किलोपेक्षा जास्त नसावे प्रवासात तुम्ही खरेदी किरणारच.त्याचासुद्धा जागा ठेवा व तुमचे निघतेवेळीचे सामान १२/१३ किलोच ठेवा (माणशी) कमी सामानामुळे टॅक्सी, हमालीचा खर्च येणार नाही सर्व सामान स्वतःला मैल मैल वाहून नेता येईल एवढेच असावे शिवणकामाचे सामान, चाकू, नेहमीची औषधे, २०/२५ फूट लाब प्लॅस्टीकची दोरी, पेला, प्लेट, गॉगल्स, थरमास व छत्री बरोबर ठेवा

पैसे ट्रॅव्हलर चेकमध्ये असलेले बरे त्यासाठी पासपोर्ट नेहमी जवळ पाहिजे शक्य तो लहान रकमेच्या नोटा घ्या व पैसे विभागून ठेवा एकाच जागी ठेवू नयेत हाँगकाँग -सिंगापूर-युरोप-अमेरिकेत चोऱ्या खूप होतात पैशासाठी खूनसुद्धा होतात हे लक्षात ठेवावे

तुमचा पासपोर्ट नंबर व संभाव्य मुक्कामाची ठिकाणे, त्याच्या तारखा तुमच्या घरी कळवून ठेवा ट्रॅव्हलर चेकचे नंबर पण घरी कळवून ठेवा

ह चला, उचला बोरीया बिस्तर. . . . . . !

शिवास्ते पंथान सन्तु ॥

* * *

REFBK-0026583




● थायलंड : पारंपारीक लोकनृत्याचे दिलखेचक सादरीकरण

● लाजवाब खाना तैय्यार है शाबजी !

● उद्योगच उद्योग पैसाच पैसा दुबई : वर्ल्ड ट्रेड सेंटर





लखलखती रात्रीची दु

